तंजावरचे मराठे

१०/-

श्री.

विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराजसाहेब सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेर बहादूर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. इ., एलएल. डी. यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून " श्री सयाजी–साहित्यमालें "तून विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार " **तंजावरचे मराठे राजे** " या नांवाचा ग्रंथ श्रीयुत विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें, यांजकडून तयार करवून उक्त मालेंतील २२३ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा, प्राच्यविद्यामंदिर बडोदें.	मं. र. मजमुदार भा. मदतनीस.	भा. का. भाटे विद्याधिकारी, राज्य बडोदें.

१-१०-३३

आधारभूत ग्रंथांची यादी.

१ Shivaji and his Times by sir Jadunath Sarkar Third Edition.

२ History of Marathas by Grant duff

३ History of the Maratha people by Kincaid and Parasnis.

४ सभासदाची बखर

५ ९१ कलमी बखर

६ राजवाडे ८ व १५ असे दोन खंड

प्रस्तावना

१ मद्रासचे विद्वान इतिहासलेखक श्रीयुत सुब्रह्मण्य यांनीं हें पुस्तक संशोधनपूर्वक लिहिलें असल्याचें श्रीयुत अयंगार या प्रख्यात इतिहासज्ञांनीं आपल्या उपोद्घातांत स्पष्ट म्हटलेंच आहे. अशा या मूळ इंग्रजी पुस्तकाचा हा अनुवाद आहे. तो करीत असतांना अवश्य त्या विशेष माहितीची भर ठिकठिकाणीं घातली आहे. त्यामुळें हें पुस्तक आतांपर्यंतच्या माहितीच्या निष्कर्षरूपानें मराठी वाचकांपुढें ठेवण्याचा प्रयत्न झालेला आहे.

२ तंजावरचा शिलालेख विस्तृत असून तो मराठी भाषेंत खोदविलेला आहे. त्याचें सर्व इंग्रजी भाषांतर श्रीयुत सुब्रह्मण्य यांना न मिळाल्याचें त्यांनीं आपल्या भूमिकेंत लिहिलेंच आहे. तो दुर्मिळ शिलालेख मोठ्या प्रयत्नानें मिळवून मुद्दाम परिशिष्टांत दिला आहे. त्यावरून इतिहास अभ्यासूंना अवश्य तें साहाय्य होईल अशी खात्री आहे. शिलालेखाचा सारांश आरंभीं दिलाच आहे.

३ प्रस्तुत अनुवादक अज्ञानी असल्यानें त्याला या कामीं त्याच्या अनेक विद्वान मित्रांचें साहाय्य घ्यावें लागलें आहे. त्या सर्वांचा तो कृतज्ञतेनें आभारी आहे. मुख्यतः सांगावयाचें म्हणजे या पुस्तकांतील चुकीच्या भागाचा तोच जबाबदार असल्यानें विद्वान् इतिहासभक्त

त्याला सन्नानी करतील अशी त्याची खात्री आहे. प्रस्तुत पुस्तक बडोद्याच्या भाषांतरशाखेनें प्रसिद्ध केल्यामुळें व छपाइचें काम बडोद्याचे चिरपरिचित श्रीयुत दामोदर शेटजी यांनीं मुंबईस मोठ्या आस्थेनें केल्यामुळें हें पुस्तक इतक्या लवकर प्रकट करितां येत आहे हें लेखकाचें सद्भाग्यच होय.

४ पुस्तकांत कांहीं चुका राहिल्या आहेत. पृष्ठ ४९ ते ५५ या सात पृष्ठांपैकीं प्रत्येक विषम पृष्ठावरील मथाळा चुकला आहे. तो '(दुसरा) शहाजी सन १६८४–१७१२' असा पाहिजे. इतर चुका किरकोळ आहेत.

विजयादशमी.
बडोदें, तारीख
२८–९–१९३३

वि. स. वाकसकर.

अनुक्रमणिका.

परिशिष्टें

चित्रांची यादी

श्री

तंजावरचे मराठे राजे

प्रकरण १ लें

स्थूल निरीक्षण.

मुद्दे

१ विजयानगरचें साम्राज्य व दक्षिणेची स्थिति.

२ मुसलमानी सत्तेची आक्रमणशीलता व हिंदूंचा मत्सरीपणा.

३ शहाजी व व्यंकोजी यांचें कर्तृत्व.

४ शिवाजीचें कर्तृत्व व मोंगलांची त्रेधा.

५ मोंगलांची सत्ता व निजामाच्या सत्तेचें कारण.

६ कर्नाटकाचे नवाब, मदुरेची व्यवस्था व चंदासाहेबाचा उत्कर्ष.

७ चंदासाहेबाच्या अधिकाराचा ऱ्हास व मराठ्यांचा उत्कर्ष.

८ मराठ्यांचे पराक्रम, मुरारीराव व प्रातापसिंह यांची एकी.

९ निजामाचें पुनरागमन व कर्नाटकाच्या नवाबाची स्थापना.

१० कर्नाटकाच्या सत्तेसंबंधीं भानगडी व निजामाच्या उलाढाली.

११ इंग्रज व्यापाऱ्याविषयीं बार्थालोम्यूचा अभिप्राय.

विजयानगरचें साम्राज्य व दक्षिणेची स्थिति.

तुंगभद्रा नदीच्या दक्षिणप्रदेशावर अलीकडेस सुमारें दोनशें वर्षें पर्यंत जी एकछत्री सत्ता गाजत होती, ती सत्ता विजयानगरसाम्राज्याची होय. त्यापूर्वी तामिळ, चोल वगैरे प्रख्यात राजे तिकडेस होऊन गेले. (परिशिष्ट १ पहा.) वहामनी सुलतानाच्या दक्षिणेकडील राज्यविस्ताराला प्रतिबंध या नात्यानें हें विजयानगरचें साम्राज्य स्थापन करण्यांत आलें होतें. या साम्राज्यानें जांबुव्दीपाचा दक्षिणप्रांत आश्चर्यकारक त्वरेनें व्यापिला. कुमार कंपनापासून अच्युतापर्यंत (सन १३६५–१५४२) सुमारें पावणे दोनशें वर्षांतील अनेक विजेते व आधिराजे यांच्या कारकीर्दींतील पुष्कळ खोदिव लेखांचे अवशेष आजहि दृग्गोचर होतात; त्यावरून हा प्रांत त्याच्या सत्तेखालीं होता असें सिद्ध होतें. कृष्णदेवरायाच्या आधिपत्याखालीं हें साम्राज्य कळसाला पोंचलें होतें. यवनसत्तेपासून अलिप्त राहिलेलें हें साम्राज्य कृष्णदेवानंतर तीस वर्षांनीं संयुक्त शत्रूंनीं लयास नेलें व दक्षिणेकडील सर्वांत भव्य नगर नामशेष होऊन राहिलें. संरक्षणाच्या आशेनें हिंदूंचें स्वातंत्र्य दक्षिणेकडेस गेलें होतें, पण तालिकोटच्या सन १५६५ मधील युद्धानें त्याची मृत्युघांटच वाजविली. तथापि, यानंतर नायक व मराठे यांनीं कांहींकाल स्वातंत्र्य उपभोगिलें, परंतु तेहि अल्पजीवचि झाले. त्यामुळें सर्व दक्षिणहिंदुस्थान प्रथम यावनी अमलाखालीं व नंतर आंग्लसत्तेखालीं कायमचें गेलें. विजयानगरच्या साम्राज्यांत मोडणारीं जिंजी, तंजावर, मदुरा (परिशिष्ट २) व म्हैसूर हीं संस्थानें त्या साम्राज्याचा नाश होतांच स्वतंत्र होऊन पुढें लवकरच दक्षिणेचे सुल्तान व उत्तरेचे मोंगल यांच्या आधिराज्यांत प्रविष्ट झालीं. विजयानगरची साम्राज्यसत्ता प्रचलित असतांना त्या सत्तेंतील ज्या मांडलीकांना विजयानगराच्या राजाधिराजाचे पादत्राण शिरोधार्य समजण्यांत भूषण वाटत

असे, त्या मांडलीकांची पुढें कांहींहि मदत विजयानगराधिपतीला अवनतीच्या प्रसंगीं झाली नाहीं. तथापि, शिवाजीच्या दयार्द्रबुद्धीच्या व आश्रयाच्या आधारावर विजयानगराचें राज्य सन १६७६ पर्यंत जीव धरून राहिलें होतें.

मुसलमानी सत्तेची आक्रमणशीलता व हिंदूंचा मुत्सद्दीपणा.

२ विजयानगरच्या साम्राज्याला रसातळाला पोंचविण्यासाठीं दक्षिणेंतील पांच बहामनी सुलतान एक झाले होते. त्यांतील विजापुर व गोवळकोंडा येथील सुलतानांनाच आपल्या राज्याचा विस्तार दक्षिणेकडेस करण्यास पुरेसें सामर्थ्य होतें. शिवाजीचा पिता शहाजी भोसले यानें विजापुरी फौजेंतील सरदार रणदुल्लाखान याचा दुय्यम अंमलदार अशा नात्यानें दुर्बळ व निवारसी झालेल्या विजयानगरच्या साम्राज्यांतून रस्ते बनवून म्हैसूरचा एक भाग व वेलोर आणि जिंजी हे प्रदेश सन १६३८ मध्यें विजापुरी सुलतानाच्या नांवाखालीं, परंतु स्वतःच्या वंशजासाठीं हस्तगत केले. वेलोर व जिंजी हे प्रदेश हस्तगत करण्यास मदुरेच्या तिरुमल नायकानें शहाजीस सहाय्य करून विजयानगरच्या साम्राज्याची अप्रतिष्ठा करण्यांत समाधान मानिलें. विजयानगरचें साम्राज्यमनोरथरूपीं पिशाच्च दुर्बळ व असाहाय्य झालें होतें. त्याला फक्त तंजावरच्या नायकांचाच आश्रय होता. असें हें पिशाच्चसुद्धां मदुरेचा नायक व म्हैसूरचा उडियार यांच्या ठिकाणची स्वार्थी स्वातंत्र्यलालसा नष्ट करूं शकलें नाहीं. आपल्या धन्याविरुद्ध मुसलमानांना बोलाविण्यांत मदुरेच्या तिरुमल नायकाला यत्किंचितूहि किंतु वाटला नाहीं. उडियार राजांनीं आपली सत्ता हळूं हळूं व इतरांना न कळत वाढविली. त्यांची स्वार्थांधता व कलहप्रियता यांजवर दाव टेविण्यासाठींच विधिघटना म्हणून मुसलमानांची सत्ता जणूं त्यांच्या प्रदेशमर्यादेवरच उभी होती.

शहाजी व व्यंकोजी यांचें कर्तृत्व.

३ बेडकांना जसा ओंडक्याच्या ऐवजीं बगळा राजा मिळाल्याची काल्पनिक कथा इसापानें लिहून ठेविली आहे, तसाच प्रकार विश्वास घातकी कपटपटू दासांचा ठरलेला आहे. म्हणजे त्यांस विद्यमान् धन्याच्या ऐवजीं दुसरा धनि मिळतो, इतकेंच. विजापुराच्या सुलतानास खडंणी देण्यास शहाजीनें तंजावर व मदुरा येथील नायकांना भाग पाडिलें. सन १६६३ मध्यें विजापुरी फौज त्रिचनापल्ली पर्यंत जाऊन धाकानें कर वसूल करती झाली. शहाजीनें आदिलशहाच्या नांवावर म्हैसूरचा जो भाग जिंकला होता तो शहानें शहाजीस देऊन टाकिला. सन १६६४ मध्यें शहाजीच्या मृत्यूनंतर ही म्हैसूरची जहागीर व्यंकोजी किंवा एकोजी यास मिळाली. हा एकोजी शहाजीच्या द्वितीय पत्नीचा पुत्र होय. शहाजीचा एकहि पुत्र भित्रा किंवा दुर्बळ नव्हता. तंजावरच्या नायकांचें म्हैसूरवर जें स्वामित्त्व होतें तें व्यंकोजीनें स्वतःस प्राप्त करून घेतलें होतें.

शिवाजीचें कर्तृत्व व मोंगलांची त्रेधा

४ हिंदुस्थानच्या विस्तृत इतिहासपटावर मराठी सत्तेचा उदय व उत्कर्ष ही एक आश्चर्योत्पादक घटना होय. शहाजीचा पुत्र शिवाजी यानें स्थापन केलेलें मराठ्यांचें राज्य हें दाक्षिणेंतील सुलतान व उत्तरेकडील मोगल बादशहा यांच्या कुशींत तीक्ष्ण शल्याप्रमाणें होतें. मोगलांनीं विजापुर व गोवळकोंडा हीं राज्यें जिंकल्यावर त्यांचा मराठ्याशीं निकट संबंध आला. महाराष्ट्रांतील मराठ्यांची सत्ता ढांसळल्यावर त्यांनीं प्रतिकाराचें केंद्र जिंजीस नेऊन राजाराम आणि ताराबाई यांच्या धाडसी नेतृत्त्वाखालीं मोगली सत्तेचा प्रतिकार केला.

मोंगलांची सत्ता व निजामाच्या सत्तेचें कारण.

५ अनेक वर्षें चाललेला जिंजीचा वेढा सन १६९८ मध्यें संपला व कावेरी आणि वइगई या नद्यांच्या दुआवांत आपल्या पादुकांचें पूजन होण्याइतका मान आपणांस मिळाला हेंहि वृद्ध औरंगजेबाच्या दृष्टीस पडलें. जिंजीचा वेढा चालू असतांना झुलफिकारखानानें कर्नाटकाच्या सर्व भागावर खंडणी बसविली. झुल्फिकारखानानंतर मोगलांच्या दक्षिण हिंदुस्थानाच्या फौजदाराच्या हुद्यावर दाउदखानाची नेमणूक झाली. दक्षिण हिंदुस्थानांत नवीन जिंकलेल्या प्रदेशांतून वसूल उत्पन्न करण्याचें काम त्यानें नियमितपणानें फार चोख बजाविलें. सन १७०७ मध्यें औरंगजेबाचा मृत्यु झाल्यावर दोनच कारकीर्दीमध्यें सर्व दक्षिण हिंदुस्थान दूरच्या मोगली साम्राज्यांतून विभक्त होऊन तत्त्वतः स्वतंत्र झालें. या दक्षिण हिंदुस्थानची प्रत्यक्ष मालकी निजामाकडेस आली. त्याच्या ताब्यांत कांहीं हिंदु राजे व तीस नवाब आले. यांपैकींच कर्नाटकाचा मुख्य हा एक होता.

कर्नाटकचे नबाब, मदुरेची व्यवस्था व चंदासाहेबाचा उत्कर्ष.

६ सादतुल्लाखान हा सर्वमान्य व क्रमानें पहिला असा कर्नाटकाचा नवाब होय. (सन १७१०–१७३२) दोस्तअल्ली हा या सादतुल्लाखानाचा दत्तक पुत्र असल्यानें तोच वारस झाला. निजाम उल्मुल्क व हा दोस्त अल्ली यांच्यांत मुळींच रहस्य नव्हतें. त्यामुळें, दिल्लीच्या भानगडीच्या राजकारणांत निजाम अगदीं गर्क होऊन गेला असतांना, दोस्त अल्लीनें त्या स्थितीचा फायदा घेतला. तंजावरचे मराठे, मदुरेचे नायक, रामनदचे मरवे, व म्हैसूरचे उडियार या संस्थानिकांकडून तरवारीच्या धाका-

शिवाय खंडणी वसूल होत नसे. आपल्या कुटुंबाचें पाषणे परभारें या संस्थानिकांकडून व्हावें या हेतूनें पुत्र सुबदरअल्ली व जामात चंदासाहेब यांना दोस्त अल्लीनें दक्षिणेकडेस विजय मिळविण्यासाठीं पाठविलें. मदुरेचें राज्य त्याच्या आटोक्यांतील शेवटचें होतें. तेथील राजा चोक्कनाथ याच्या मृत्यूनंतर तेथें मीनाक्षी ही राणी राज्य करीत होती. विश्वासघात व डावपेंच यांच्या जोरावर चंदासाहेबांनें सन १७३६ मध्यें मीनाक्षी राणीला राज्यावरून दूर केलें (परिशिष्ट ३ पहा.) व चंदासाहेबाच्या भावानें केरळपर्यंत स्वाऱ्या करून विभक्त असलेल्या पाळेगारांना जिंकिलें.

चंदासाहेबाच्या अधिकाराचा ऱ्हास व मराठ्यांचा उत्कर्ष.

७ चंदासाहेबाच्या सत्तेचा उत्कर्ष लक्षांत घेऊन नबाब दोस्त अल्लीनें त्याला दिवाणाच्या पदावरून कमी केलें. मदुरेचें राज्य खाल्सा करण्याइतका मुसलमानी सत्तेचा उत्कर्ष पाहून दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदु राजांनीं मराठ्यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ (सन १७१४–१७२०) याच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांची सत्ता पुनरुज्जीवित झाली होती व ते इसवी सनाच्या अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास सर्व हिंदुस्थानावर वर्चस्व मिळविण्याच्या विचारांत होते. सत्तेची वृद्धि व मुसलमानांना तिची जाणीव करून देणें या दोन गोष्टी करण्याला मराठ्यांना ही संधी उत्तम प्राप्त झाली.

८ मराठी सैन्यानें सन १७४० मध्यें विजयामागून विजय मिळविले. कर्नाटकचा (दुसरा) नबाब दोस्त अल्ली याचा पराभव होऊन तो मृत्यु पावला. चंदासाहेबाला कैद करून राजबंदी या

नात्यानें सातार्‍यास नेण्यांत आलें. त्रिचनापल्लीचें राज्य **मीनाक्षी** व **चंदासाहेब** यांना लागोपाठ मिळालें. पण चारच वर्षांत तिसर्‍या स्वामीच्या ताब्यांत तें गेलें. गुटीचा **मुरारीराव** हा त्यावेळीं लुटारू म्हणून प्रसिद्ध होता. या लुटीच्या धंद्याला तो काळ मोठ्या किफायतीचा होता. तंजावरचा **प्रतापसिंह** हा या **मुरारीचा** मित्र होता. या **प्रतापसिंहाच्या** ताब्यांत चौदा हजार लोकांचें सैन्य होतें. **मुरारी** व **प्रतापसिंह** हे दोघेहि मराठ्यांस मिळाले. तो काळ मराठ्यांच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्या-सारखा होऊन गेला. त्या काळीं मराठीसत्तेचें केंन्द्र सातार्‍यास असून तेथूनच मराठ्यांच्या सत्तेच्या सूत्रांना चालना मिळत असे. अशा वेळीं तंजावर व त्रिचनापल्ली येथील मराठासत्ताधीश एक होऊन साताऱ्च्या छत्रपतीच्या अंकित झाले असते तर दक्षिणहिंदु-स्थानांत त्यांनीं फार महत्त्वाची कामगिरी केली असती. परंतु तसा योगायोग नव्हता असें म्हणावें लागतें.

मराठ्यांचें पराक्रम, मुरारीराव आणि प्रतापसिंह यांची एकी.

९ कर्नाटकचा नबाब **सुबदरअल्ली** याचा सन १७४२ मध्यें खून झाल्यावर त्याचा मुलगा त्याचे गादीवर आला. यावेळीं दिल्लीच्या भानगडींतून निजाम मुक्त झाला होता. तो अर्काट येथें गेला. त्यानें **सुबदरअल्लीच्या** मुलाच्या ऐवजीं दुसर्‍या नबाबाची नेमणूक करून मराठ्यांजवळून त्रिचनापल्ली हस्तगत केली. कर्नाटकांत दुसर्‍या नबाबाची रीतसर नेमणूक झाल्यावर लवकरच त्याला विषप्रयोग झाला, म्हणून निजामानें त्याच्या जागीं **अन्वरुद्दीनची** नेमणूक सन १७४४ मध्यें केली.

निजामाचें पुनरागमन व कर्नाटकच्या नबाबाची स्थापना.

कर्नाटकाच्या सत्तेसंबंधीं भानगडी व निजामाच्या उलाढाली

१० या समयांत नशीबाचा चरखा निराळेंच सूत कांतीत होता, व त्याचें एक स्वतंत्र वस्त्र विणलें जात होतें. या वस्त्राच्या जाळ्यांत हे दक्षिणेकडील सत्ताधीश बेसावधपणानें गुरफटले जाऊन त्यांना प्रस्तुत युगांत त्या जाळ्यानें आंग्लसत्तेखालीं खेंचून आणिलें. सन १७४९ मध्यें कर्नाटकचा नवाब अन्वरुद्दिन हा मृत्यु पावला. त्यानंतर महंमदअल्ली हा नवाब झाला. तो महमंदअल्ली व चंदासाहेब यांचें वैर व सन १७४८ मधील निजामाच्या वारसांतील तंटा, फ्रेंच व इंग्रज यांनीं घेतलेले निरनिराळे पक्ष, कर्नाटकमध्यें महमंदअल्ली व इंग्रज यांचे विजय हे प्रकार हिंदुस्थानच्या अलीकडच्या इतिहासांत प्रारंभींचेच असल्यानें सर्वप्रसिद्धच आहेत.

इंग्रज व्यापाऱ्यांविषयीं बार्थोलोम्यूचा अभिप्राय

११ **महमंदअल्ली** फक्त नामधारी नवाब असल्यानें दुसऱ्याच्या हातांतील बाहुलें होऊन राहिला होता. इंग्रज (कंपनीच्या) व्यापाऱ्यांच्या मेहरबानीमुळें त्याला राज्य प्राप्त झालें. कर्नाटक प्रांत इंग्रजांच्या सत्तेखालीं येण्याला क्लाइव्ह व वेल्स्ली यांचें दूरदर्शित्व व राजकारण मुख्य असल्यानें त्यानांच धन्यता देणें प्राप्त आहे. जे इंग्रजलोक फक्त व्यापाराच्या लालसेनें हिंदुस्थानांत आले त्यांना एतद्देशीय राजकारणांत प्रविष्ट होण्याला तत्कालीन राजकारणविषयक तर्कपरंपरा व प्रांतसंबंधीं लालसा मुख्यतः कारणीभूत होत. आणि परमेश्वरी इच्छेनुरूप पूर्वोक्त आधारावर इंग्रजांनीं आसेतुहिमाचल असें एक समर्थ साम्राज्य स्थापन केलें. अठराव्या शतकांत इंग्रजी राजकारणाचें शब्दचित्र बार्थोलोम्यूच्या लेखांत चित्रित केलें आहे त्याचें भाषांतर या पुढें देतों. सदर प्रवासी

सन १७७६ पासून १७८९ पर्यंतच्या अठरा वर्षांच्या काळांत हिंदुस्थानांत आला होता. तो म्हणतोः—

" हिंदुस्थानांत इंग्रज लोकांना प्रथम व्यापारी म्हणून वास्तव्य करितां येतें. ते कोणालाहि न कळत आपली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न करितात. व्यापारांत मिळालेल्या सवलतींनीं त्यांची तृप्ती होत नाहीं, म्हणून ज्या राजांनीं त्यांना आश्रय दिला असेल त्यांच्याच हिताविरुद्ध ते स्वतःच्या हिताची तरफदारी करितात. अशा निर-निराळ्या राजांना परस्पराशीं युद्धप्रवण करण्यास त्यांना साधनेंहि तत्काल प्राप्त होतात. मागाहून मोबदला मिळावा म्हणून कित्येक वेळां ते त्या राजांना मदतहि करितात. कित्येक वेळां ते दोन राजांत कलह उत्पन्न करून वितुष्ट आणितात किंवा त्यांच्या राजकीय संबं-धांत घोंटाळे उत्पन्न करण्याचा प्रयत्न करितात. सारांश, ज्या प्रदेशा-वर त्यांचा डोळा असतो तो प्रदेश त्यास प्राप्त होईपर्यंत ते स्वस्थ बसत नाहींत. "

पहिल्या प्रकरणाचे आधारभूत ग्रंथ.

1 Dr. S. K. Iyengar. Sources of Vijaya-nagar History, Introduction.

2 Mr. Krishna Sastri : The Later Vijaya-nagar Emperors (Arch--Survey of India Rep 1908-of and 1911-12)

3 Rev. Heras : The Aravidu Dynasty chs 7. and 9.

4 Dr. S. K. Iyengar : Ancient India chs II

5 Justic Ranade ; Rise of Maratha power ch. 12.

6 Prof. Sarkar : Aurangzeb vol. V ch. 1.

7 Grose ; A voyage to the East Indies 1750-64 Vol 2 Introduction.

8 Orme: A history of the military transaction in Hindustan Vol 1.

9 Copies of Papers relative to the restoration of the King of Tanjore, Vol 3 P 56 see Pratap Singh's letter of 1762 about theNaveails (connemara library, Madras)

10 Bartolomeo: A voyage to the East Indies P. 49-50.

प्रकरण २ रें

तंजावरांत मराठी राज्याची स्थापना

मुद्दे

१ तंजावराकडील प्रदेशाचे नैसर्गिक गुणदोष.
२ चोल राजांची असाहाय्य स्थिति.
३ एका क्षत्रपाचा राजद्रोह व बदली.
४ तंजावर मदुरा येथील संस्थानिकांचा कलह.
५ शहाजीनें जिंजी कशी काबीज केली.
६ विवाहविषयक बोलण्यावरून मदुरा व तंजावर येथील राजांचें भांडण.
७ विजयराघवाचे अनेक विवाह व युद्धांत त्याचा मृत्यु.
८ चोक्कानें मदुरेची सत्ता धारण केली;
९ बालराजपुत्राचा बचाव, वेंकन्नाचें राजकारण व आदिलशहाकडेस मदतीची मागणी.
१० अलगिरीचा पराजय आणि वेंकाजीचा पराक्रम.
११ तंजावरास एकोजीची स्थापना व कपटी तेलगू ब्राह्मणाचें पलायन.
१२ तंजावरांतील ज्ञानयुगाची परंपरा व अभिवृद्धि.
१३ राजांची अदलाबदल व राज्यकारभाराशीं प्रजेची फारकत.
१४ कायमची राज्यव्यवस्था अद्यापि अस्तित्वांत यावयाची होती.

तंजावराकडील प्रदेशाचें नैसर्गिक गुणदोष

कावेरी नदीच्या मुखाजवळील प्रदेश हा वैभवशाली सुधारणेचें माहेर म्हणून आजहि प्रसिद्ध आहे. तो प्रांत निसर्गतःच सुपीक असल्यामुळें तेथील जनतेला जमिनीच्या मशागतीसाठीं फारसा वेळ खर्च करावा लागत नाहीं. अर्थात् अशा रीतीनें मिळालेला सर्व वेळ

प्राचीनकाळापासून जनतेनें कलाकौशल्याची व सरस्वतीदेवीची उत्तम रीतीनें समृद्धि करण्यांत घातलेला आहे. तेथील आर्यसमाज यवनसंस्कृतीला प्रदेशानें:च फार दूर राहिल्यामुळें त्यानें आपली संस्कृति व कलानैपुण्य यांचें संगोपन उत्तम रीतीनें केलें. परंतु तंजावरासारख्या ल्हान संस्थानाला स्वतःचें स्वातंत्र्य संभाळीत असतां बुद्धिसत्ता किंवा कलाभिज्ञता यांचा स्वतःस कांहींहि उपयोग न होता स्वतःभोंवती अनेक मत्सरी शेजारी उत्पन्न होणें अपरिहार्य झालें. तिकडील सुपीक जमीन व आल्हादकारक वातावरण यांच्या योगानें राजा व प्रजा दोघेहि सुखाधीन झाले. मध्यवर्ती राजसत्तेला ते लोक अगदींच मुकल्यानें उच्च प्रकारचा देशाभिमान त्यांच्या ठिकाणीं वास करीत नव्हता. व म्हणूनच स्वातंत्र्य संरक्षणार्थ लागणाऱ्या शारीरिक बलाची जोपासना तेथील राजांकडून मुळींच झाली नाहीं.

चोल राजांची असाहाय्य स्थिति.

२ लष्करी सामर्थ्याच्या उणीवीमुळें हें तंजावरचें संस्थान अवनतीला पोंचून शेंवटीं खालसा झालें. जरी शेंवटच्या मराठी राजाजवळ प्रचंड फौज असती व तो स्वतः मोठा शूर असता आणि त्यानें पुढील पिढीला एखादा लिओनिडास दिला असता तरीहि तंजावरच्या स्वातंत्र्याचें संरक्षण त्यावेळीं सुद्धां झालें नसतें. विजयानगरसाम्राज्यविस्ताराच्या लाटेपुढें शेवटचा चोलराजाहि त्या अपरिहार्य घटनेला शरण गेला असता. कारण त्याचीं साधनें भिकार होतीं व त्याला साहाय्यकर्तेंहि मिळणें शक्य नव्हतें. सर्वांवर कळस म्हणजे त्याला राज्यकारभाराच्या कांहीं आधुनिक सुधारणेशीं सतत झगडावें

लागलें हा होय. त्या आधुनिक सुधारणा इतक्या नूतन आणि म्हणूनच अपूर्व होत्या कीं, हिंदुस्थानांतील तत्कालीन इंग्रजांनासुद्धां त्या सुधारणा अडचणीच्या वाटून त्यांना तोंड देतां देतां पुरेवाट झाली होती.

एका क्षत्रपाचा राजद्रोह व त्याची बदली.

३ सन १८०० मध्यें तंजावरच्या शेंवटच्या आधिपतीनें कांहीं नियमित वार्षिक वेतन घेऊन इंग्रजांना आपल्या राज्याची सत्ता अर्पण केली. तंजावर येथें नायकांनीं सव्वाशें वर्षांवर राज्य केलें, पण सन १६७६ मध्यें पहिल्या मराठी राजानें (वेंकोजीनें) त्यांच्यापासून तंजावरची राज्यसूत्रें हरण करून आपल्या हातीं घेतलीं. **बुक्करायाचा** पुत्र कुमार **कंपन** यानें दक्षिण हिंदुस्थान जिंकिलें व आपली सत्ता विजयानगरास स्थापन केली तेव्हांपासून **कृष्णदेव रायाचा** भाऊ **अच्युत** याच्यापर्यंत तंजावर प्रांतावर वेळोवेळीं सुभेदारांच्या नेमणुका विजयानगराहून होत असत, व तिकडील राज्यव्यवस्था चालत असे. सन १४२४ मध्यें दुसऱ्या **देवरायाच्या** कारकीर्दींत **मादन्ना** हा विजयानगरच्या चोलराजांनीं नेमिलेला तंजावर प्रांताचा सुभेदार होता. मुख्य क्षत्रप **नागम्मा** यानें पंडनाचें राज्य बळकाविलें होतें. त्या पंडनाच्या साहाय्यानें **कृष्णाच्या** ताब्यांतील वीर **नागम्मा** या क्षत्रपानें साम्राज्याविरुद्ध बंड केलें. **अच्युतानें** बंडखोरांचें पारिपत्य करून त्याच्या जागीं **विश्वनाथाची** नेमणूक केली. क्षत्रप या नात्यानें **विश्वनाथाचें** दक्षिणहिंदुस्थानासंबंधीचें प्रेम **नागम्मासंबंधी** अपत्यप्रेमापेक्षांहि श्रेष्ठ होतें. पुढें, त्याच्या ताब्यांतील प्रांतांपैकीं तंजावरचा प्रांत निराळा करून तो **शिवाप्पास** दिला. हा **शिवाप्पा** माजी विजयानगरसाम्राज्याधिपतीचा साडू होता.

तंजावर व मदुरा येथील संस्थानिकांतील कलह.

४ आपल्या साम्राज्याधिपतिविषयीं प्रशंसनीय निष्ठावंत असण्याचा सद्गुण तंजावरच्या नायक राजांमध्यें होता. हा सदगुण इतर संस्थानिकांत मात्र नव्हता. तालीकोटच्या युद्धानंतरहि तंजावरचे राजे चंद्रगिरीचा क्षत्रप (Viceroy) जो व्यंकट त्याशीं राजनिष्ठ होते. सन १५८६ मध्यें व्यंकट हा साम्रज्याधिपति झाला तेव्हां शिवाप्पाचा नातु व वारस हा आपल्या साम्राज्याच्या छत्राखालीं मदुरेच्यानायकाशीं सिंहाच्या शौर्यानें लढला. हा मदुरेचा नायक फारच दुष्ट होता. सन १६१४ मध्यें तो गादीवर आल्यानंतर त्यानें सम्राटाच्या वारस पुत्राचें स्वागत केलें. तंजावरचा राजा दुसरा श्रीरंग यानें वैरी सरदारांच्या कटाला शौर्यानें तोंड देऊन त्या अनुजीवित वारसाला त्याच्या पूर्वजांच्या सिंहासनावर बसविलें. मदुरेच्या नायकाचें व याचें वैर कायमचें राहण्याला याची प्रखर राजनिष्ठाच कारण होय. कारिकालाच्या वेळेपासून तंजावरची भरभराट कावेरी नदीच्या धक्क्याच्या आधारावर अवलंबून होती. जिंजी, सोलग व पोर्चुगीज या मुख्य त्रिकुटाचें रघुनाथांशीं वैर होतें. मदुरेच्या नायकानें आतांच सांगितलेल्या त्रिकुटाची मैत्री संपादन करून मागें कथन केलेला कावेरीचा धक्का जमीनदोस्त केला. हें पाहून साहाय्यकर्त्यांच्या जोरावर रघुनाथानें त्या त्रिकुटावर चालून जाऊन आनिकट जवळ टोपूर येथें त्याचा पराभव करून त्याला पळवून लाविलें.

शहाजीनें जिंजी कशी काबीज केली ?

५ सन १६४६ मध्यें विजयानगरचा राजा श्रीरंग हा वेदनूर येथें पळून गेला, त्याबरोबरच विजयानगरचा इतिहासहि या वेळेपासून बंदच झाला. विजयानगरचा सम्राट् सन १६४० मध्यें जिंजीच्या बंडखोर

मुख्याचा समाचार घेण्यास गेला होता. जिंजी येथील आपल्या मुख्याच्या विरुद्ध लढण्याला मदुरेच्या त्रिमूल नायकानें गोवळकोंड्याच्या सुलतानाला बोलाविलें व मुसलमानी सैन्य आपल्याविरुद्ध येत असलेले पाहून तो जिंजीचा मुख्यहि पळून गेला. त्यामुळें गोवळकोंड्याच्याच्या सुलतानाला सहज विजय प्राप्त झाला. या सुलतानाचे जिंजीसंबंधीं कांहीं दुष्ट हेतु होते ते त्रिमूलाच्या लक्षांत येतांच त्यानें अदूरदर्शीपणानें गोवळकोंड्याच्या सुलतानाविरुद्ध विजापुरच्या सुलतानाला म्हणजे एकाच्या विरुद्ध त्याच्याच दुसऱ्या धर्म बांधवाला पाचारण केलें. विजापुरकरांनीं कांहीं त्रिमूल नायकाचा नफा केला नाहीं. विजापुरकरातर्फे शहाजीनें जिंजीचा प्रांत काबीज केला व तंजावर आणि मदुरा यांवर खंडण्या मात्र बसाविल्या.

विवाहविषयक बोलण्यावरून मदुरा व तंजावर येथील राजांचें भांडण.

६ रघुनाथाचा मुलगा विजयराघव विजयानगरच्या गादीवर असताना (विजापुरच्या) सुल्तानाला शरण गेला व खंडणी देण्याचें त्यानें कबूल केलें. त्याचा शेजारी मदुरेचा चोक्कनायक यानें त्याच्याशी दोन लढाया केल्या. पहिली लढाई सन १६६४ मध्यें झाली. त्या लढाईंत तंजावर व जिंजी येथील मुख्य आणि मदुरेचे दल्वाय यांचें त्रिकूट एक झालें होतें. दुसरी लढाई मात्र सन १६७३ मध्यें एकदम उपस्थित होऊन उभय पक्षांना हानिकारक झाली. तंजावरच्या राजकन्येचा मदुरेच्या चोक्कराजपुत्राशीं विवाह ठरावा किंवा न ठरावा हा वादाचा मुद्दा होता. (मदुरेच्या) चोक्कराजपुत्राला आपली कन्या पत्नी म्हणून देण्याला (तंजावरचा) नायक सिद्ध नव्हता. व चोक्काला मात्र ती मुलगी आपल्या घराण्यांत येणें इष्ट वाटत होतें. अशा या

मतभेदामुळें चोक्क व नायक या दोन पक्षांत तंटा उपस्थित होऊन युद्धप्रसंग ओढवला. हें दर्शनी कारण असलें, तरी या दोन राजांचें वैर अनेक पिढ्यांचें होतें हें मुख्य कारण होय.

विजयराघवाचे अनेक विवाह व युद्धांत त्याचा मृत्यु.

७ विलक्षण व भयप्रद असा शत्रू विजयानगरच्या गोपुराशीं मूर्तिमंत दृग्गोचर होईपर्यंत विजयानगरचा राजा विजयराघव हा देवपूजा करण्यांत तनुमनोधनेंकरून गर्क होऊन गेला होता. सन १६७३ मध्यें शत्रूनें वालम नगर हस्तगत केलें व नंतर तंजावराला वेढा घातला. तंजावरचा सेनापति व सैनिक यांच्यामध्यें प्रेम नसल्यानें राजाला फौज सोडून गेली व तो अगदीं एकाकी झाला असें मनुची म्हणतो. विजयराघवानें आपल्या अंमलदारांच्या बायका व मुली भ्रष्ट करून आपल्या जनानखान्यांत त्यांपैकीं कांहींना कायमचें ठेविलें होतें. या राजाच्या विवाहित स्त्रिया सातशें व उपपत्न्या पंधरा हजार तीनशें होत्या. म्हणजे पौराणिक कृष्णाची या बाबतींत बरोबरी करण्याला फक्त एकशेंआठच स्त्रियांची उणीव दिसते. असो, या भक्तशिरोमणि विजयराघव राजाची राहणी याप्रमाणें होती. यानें आपल्या पुत्रालाही कैदेंत ठेविलें होतें. या पुत्राचें नांव मन्नरु होतें. हा राजपुत्र मोठा बुद्धिशाली व आनंदी होता. शत्रुसैन्य विजयानगरावर चालून येऊन त्या सैन्यानें लढाईस सुरुवात केली. या लढाईंत शत्रुसैन्याची सरशी पाहून मदुरेच्या चोक्काला राजकन्या मिळूं नये म्हणून विजयराघव राजानें आपला सर्व जनानखाना तोफांनीं प्रथम उडवून दिला, नंतर मन्नरु राजपुत्राला कैदेंतून मुक्त केलें व समशेर हातांत घेऊन त्याच्यासह मोठ्या शौर्यानें शत्रूसैन्यांत शिरला, लढला व शेंवटी रणभूमीवर देह ठेवून स्वर्गास निघून गेला. याप्रमाणें

त्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. कांहींहि असो हा सर्वच प्रकार फार उद्वेगकारक घडला.

चोक्कनें मदुरेची सत्ता धारण केली.

८ दीर्घकाळपर्यंत राजनिष्ट म्हणून प्रसिद्ध असलेल्या तंजावरच्या राजघराण्याच्या अपकर्षास एव्हांपासून सुरुवात झाली, हें पाहून मदुरेच्या विजयी चोक्काला आनंद झाला. त्यानें मोठ्या त्वरेनें तंजावरच्या क्षत्रपाच्या जागीं अलगिरी नांवाच्या आपल्या वडील बंधूची स्थापना केली व तो आपल्या राजधानीला परत आला. परत आल्यावर त्यानें मदुरेची सत्ता धारण केली न केली तोंच या अलगिरीनें कृतघ्नतेनें स्वतःचें स्वातंत्र्य जाहीर केलें.

बाल राजपुत्राचा बचाव, वेंकन्नाचें राजकारण व आदिलशाहाकडेस मदतीची मागणी.

९ युद्धापूर्वी विजयराघवराजानें आपला सर्व जनानखाना तोफांनीं उडवून दिला हें मागें सांगितलेंच आहे. याप्रमाणें तो जनानखाना उडवून देण्यापूर्वीच विजयराघवाच्या पट्टराणीनें आपला मुलगा चेंगमलदास याला एका दाईबरोबर दूर सुरक्षित स्थळीं पाठवून दिलें. त्या राज्याधिकारी वंशजाला दाईनें सुरक्षितपणें नेगापट्टम येथें नेलें. तेथें एका चेट्टीनें त्याचें संगोपन केलें. रायसम वेंकन्ना या नांवाचा एक नियोगी तेलंगी ब्राह्मण हा प्रथम विजयराघव व नंतर अलगिरी यांचा चिटणीस होता. अलगिरीच्या कारकीर्दींत या चिटणिसाला राज्यकारभारांत स्वतंत्रपणें ढवळाढवळ करितां येत नसल्यानें त्यानें त्या मुलाला परत आणून वडिलोपार्जित गादीवर बसविण्याचा कट उभारिला. त्या तेलंगी ब्राह्मणानें उन्मत्त अलगिरीचा सूड उगविण्याची शपथ घेऊन विजयराघवाचा वचावलेला मुलगा चेंगमल-

दास याला बरोबर घेतलें आणि दक्षिणेकडील सम्राट् विजापुरचा सुल्तान (आदिलशहा) याच्याकडेस नेलें, व त्याला सर्व वृत्तांत निवेदन केला व तरुण राजपुत्राला साहाय्य करण्याची विनंति केली.

अलगिरीचा पराजय आणि वेंकाजीचा पराक्रम

१० या प्रसंगीं आदिलशहाच्या तर्फेनें **शहाजीचा** मुलगा **वेंकोजी** भोसले हा बंगलोरचा जहागिरदार होता. नवीन नेमिलेल्या तंजावरच्या **अलगिरी** नायकाची हकालपट्टी करून तेथें **चेंगमल-दासाची** स्थापना करण्याची कामगिरी आदिलशहानें त्या **वेंकाजी** भोसल्यालाच सांगितली. **सरभोजीच्या** कारकीर्दींत **राघवार्याचा** मुलगा **वेंकटकवि** यानें भोसल वंशावली नावाचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला असून तो आज तंजावरच्या ग्रंथसंग्रहालयांत आढळतो. त्यावरून असें दिसतें कीं, **वेंकोजीनें** अरणी सर केली व नंतर त्रिचनापल्लीच्या **नायकाशी** त्याचें युद्ध झालें. त्याच्या ताब्यांतून तंजावरची मुक्तता **व्यंकोजीनें** केली व तिरुवाडी जवळ तिरुमलवाडी येथें तो राहिला. त्याला तेथें असें स्वप्न पडलें कीं, त्यानें एकदम तेथून आपल्या घरीं जाऊं नये. या सुमारासच तंजावरच्या लोकांत यादवीस सुरुवात होऊन एका पक्षानें मराठ्यांचें (म्हणजे **वेंकोजीचें**) साहाय्य घेतलें व तंजावरचें राज्य हस्तगत करण्यास मराठ्यांस सुचविलें. त्याप्रमाणें **वेंकोजीनें** तंजावरचें राज्य घेतलें. **अलगिरीला** पदच्युत करून तंजावरच्या गादीवर **चेंगमलदासास** बसवावें या कामासाठींच **आदिलशहानें** वेंकाजीस पाठविलें होतें, परंतु मिळालेल्या विजयानंतर **चेंगमलदासानें** खर्चाची रक्कम **वेंकोजीस** तत्काळ न दिल्यानें वेंकोजीनें तंजावरचें राज्य घेतलें असें एक कारण **विल्क्स** देतो.

११ आपणांस मदत करावी अशी अलगिरीनें मदुरेच्या चोकांना विनंति केली होती पण तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं; त्यामुळें अय्यंपेंटच्या लढाईंत वेंकोजीला पूर्णपणें यश प्राप्त झालें व त्यानें मोठ्या प्रयत्नानें राजधानी काबीज केली. आपल्या पित्याची जहागीर आपल्या ताब्यांत येण्यासाठीं व्यंकोजीनें तंजावरावर स्वारी केली, परंतु तेथील राजा पेडलगिरी यानें तंजावरच्या एका तटावर व्यंकोजीचा पराजय केला असा मजकूर एका तेलगू हस्तलेखांत आहे. चेंगमलदास यास राज्याभिषेक करण्यांत आला, परंतु त्यानें तें राज्यपद मिळविलें नसल्यानें तो तें संभाळण्यासहि असमर्थ ठरला. या नवीन राजाची दाई, त्याचा पालनकर्ता पिता चेट्टी व कटाच्या सूत्रांचा चालक तेलगू ब्राह्मण वेंकण्णा नियोगी या तिघांत मुख्याधिकाराची अहमहमिका लागली. त्या कारस्थानी तेलगू ब्राह्मणानें बहुमताच्या जोरावर राजकीय परिस्थिति दूषित केली, पुनः सूड उगविण्याची प्रतिज्ञा केली व अशा गप्पा पसरून दिल्या कीं, ‘ मराठ्यांनीं तंजावर सर करण्याचा विचार चालविला आहे. ’ ही बातमी ऐकतांच तंजावरचा शेवटचा नायक जीव वांचविण्याच्या हेतूनें पळून गेला. तेलगू ब्राह्मण वेंकण्णा हा मोठा कर्तृत्वशाली व राजकारस्थानी होता. बदललेल्या परिस्थितीला साजेल अशी त्यानें जनतेची तयारी केली. वेंकण्णानें पुढें एकोजीची महत्वाकांक्षाहि प्रज्वलित केली. तंजावर हस्तगत करण्याची इच्छा एकोजीस होतीच. परंतु विजापुरच्या सुलतानापासून स्वतंत्र होण्यास त्याची अदूरदर्शी सारासारविचारशक्ति अनुकूल नसल्यानें तो स्तब्ध राहिला होता, अशी हकीकत तंजावर येथील

तंजावरास एकोजीची स्थापना व कपटी तेलगू ब्राह्मणाचें पलायन.

आंध्रभाषेंतील राजुल चरित्रांत आहे. (परंतु विजापुरचा आदिलशहा सन १६७३ मध्येंच मृत्यु पावला असल्यामुळें वरील हकीकत विश्वसनीय दिसत नाहीं.) विजापुरचा सुलतान मृत्यु पावल्यामुळें एकोजीनें सारासार विचारशक्तीस बाजूस सारिलें व बंदुकीचा एकहि बार उडविल्याशिवाय मोठ्या विजयानें तंजावरांत प्रवेश केला. तंजावरच्या राजाची दुर्बलता, त्याच्या मंत्र्यांतील फूट व त्याच्या प्रजेतील अनेक पक्षोपपक्ष या कारणांनीं तंजावरचें राज्य हस्तगत करण्याचा स्वार्थी विचार मराठ्यांच्या मनांत फार दिवसांपासून होता. राजकारणी वेंकण्णा हा असाधारण उद्योगी व अत्यंत धूर्त होता, तसाच तो सदसद्विवेकशून्य व कृतघ्नहि होता. त्याचा स्वभाव सतत कांहीतरी उपद्व्याप करण्याचाच होता. तो आपल्या परीनें एक राज्यदाताच होता. त्याचा नवीन धनि त्याला पूर्णपणें ओळखीत नसल्यानें आरंभीं त्याला पुष्कळ सत्ता मिळाली होती. त्या तेलगू ब्राह्मणानें (१ अलगिरी व २ चेंगमलदास) अशा दोन धन्यांना बाजूला सारिलें होतेंच. तसेंच त्यानें वेंकोजीलाहि बाजूस सारिलें असतें. परंतु आपला सुरक्षितपणा धोक्यांत असल्याचें त्याच्या लक्षांत आल्यानें तो तेलगू ब्राह्मण वेळींच सावध होऊन तेथून निसटून गेला.

तंजावरच्या ज्ञानदानाची परंपरा व अभिवृद्धि.

१२. याप्रमाणें नायकांनीं तंजावरचें राज्य गमाविलें व अगदीं निराळी भाषा जाणणारे लोक त्या राज्यावर अधिष्ठित झाले. हे नवीन राजे जरी दूरचे होते तरी त्यांनीं तंजावर हें आपलेंच घर आहे असें समजून तेथें वसति केली; व प्रजारक्षणाची परंपरा चालविणें, धर्मसंबंधीं कार्याचा पुरस्कार करणें, कलांना व शिक्षणाला उत्तेजन देणें हीं सत्कृत्यें त्यांनीं सतत व अखंड चालविलीं. नायकांच्या राज्यांत तंजावराकडेस संस्कृत

तेलगू वाङ्मयाची अपरिमित वृद्धि झाली. दुसरा नायक राजा अच्युत याचा दिवाण गोविंद दीक्षित हा कांहीं कालपर्यंत रघुनाथाचा मुतालिक व नंतर दिवाण म्हणून प्रसिद्ध झाला. तो, विद्वच्छिरोमणि अपया दीक्षिताचा मित्र असून विद्वान् म्हणून प्रसिद्ध होता. याचाच पुत्र यज्ञनारायण यानें साहित्य रत्नाकर हा ग्रंथ लिहिला. याच ग्रंथांत रघुनाथाच्या कार्यांचें वर्णन आहे. नायक राजेहि मोठे गुणाढ्य होते. गोविंदानें 'साहित्यसभा' या ग्रंथांत लिहिलें आहे कीं, रघुनाथ हा गायनकलावेत्ता असून मोठा संस्कृतज्ञ व तेलगू भाषाभिज्ञ होता. तसेंच या रघुनाथ राजानें सहा ग्रंथ लिहिले होते. तो मोठा योद्धाहि होता. त्यानें पोर्चुगीज लोकांचा पराजय करून जाफनाला त्याच्या पूर्वजांच्या गादीवर बसविलें. रघुनाथ हा पापभीरु व मोठा दाता असल्यामुळें त्यानें आपलें संचित द्रव्य देवधर्मांत व परोपकारांत खर्च केलें. तो आठ भाषांचा ज्ञाता होता. मदुरावनी व रामभद्रांबा या दोघी नामांकित कवयित्रींनीं रघुनाथाच्या दरबारांतील वाङ्मय मंडळ भूषविलें होतें. नायक हे वैष्णव होते. तथापि त्यांनीं शंकराचीं मंदिरेंहि शृंगारिलीं होतीं. सुधींद्र व राघवेंद्र या दोन माध्व गुरूंनाहि रघुनाथानें आश्रय दिला होता. नायक राजांनीं गरीबांसाठीं धर्मशाळा बांधिल्या होत्या व विद्वान् ब्राह्मणांना ते चांगल्या देणग्याहि देत असत. नायकांच्या मागून तंजावरावर मराठ्यांचें राज्य झालें व मराठ्यांनींहि नायकांच्या दानधर्माचा कित्ताच पुढें चालविला होता, हें पुढील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईल. अपया व नीळकंठ यांनीं जें ज्ञानयुग सुरू केलें, त्यांत कृष्णानंद व रामभद्र ही विद्वानांची जोडी शेवटीं झाली होती.

राजांची अदलाबदल व राज्यकारभाराशीं प्रजेची फारकत

१३. नायकांनीं संस्थानाच्या हिताकडेस कधींहि दुर्लक्ष केलें नाहीं. नेहमीं चालणाऱ्या लढायामुळें नायक हे फार सावध राहात असत. डच व डेन्स व्यापाऱ्यांना त्यांनीं आश्रय दिला होता. त्यांत युद्धप्रसंगीं त्या लोकांकडून आपणांस तोफांचा पुरवठा व्हावा असा नायक राजांचा हेतु होता. विजयराघवानें आपल्या राजधानींतील किल्ल्यांची दुरुस्ती करून पट्टुकोटिया, अरन्तंगी, किल्लेनेलीकी, निरुपदूर या व इतरहि ठिकाणीं कांहीं नवीन किल्ले बांधिले. परंतु युद्धकलेमध्यें तो आपल्या पित्यापेक्षां कनिष्ट होता. ज्या संस्थानांत प्रजेवर कसलीच जबाबदारी नसते त्या संस्थानाविषयीं ती प्रजाहि इतकी निष्काळजी असते कीं, तेथें कोण राजा राज्य करीत असतो याचीहि चौकशी ती करीत नाहीं; मग परकीयांच्या हल्ल्यापासून त्या संस्थानचें संरक्षण प्रजेनें करावें अशी आशा तेथील संस्थानिक कसा करूं शकेल ? तंजावरच्या प्रजेलाहि परकीय सत्तेची इतकी संवय झाली होती कीं, ती चोळ, नायक व मराठे यांच्यांत कांहींच भेद मानीत नव्हती. कारण कोणा-च्याहि कारकीर्दींत राजकारण व सत्ता यांशीं तिचा संबंध आलाच नाहीं. परकीयसत्तेनेंसुद्धां तेथील जनतेची पूर्वीच्या सत्तेहून अधिक अशी आर्थिक हानि कांहीं केली नाहीं. तंजावरांत त्या कालीं जित व जेते हा भेद प्रचलीत असला तरी जेत्यांनीं जितांना निःशस्त्र करण्याच्या कलेचा गंधहि नव्हता. अनेक घराण्यांचे उदयास्त झाले, परंतु त्यामुळें प्रजेच्या व त्यांच्या लौकिक व्यवहारांत कांहीं खंड पडला नाहीं.

कायमची राज्य-व्यवस्था अद्यापि अस्तित्वांत यावयाची होती.

१४. तिकडील पृथक् पृथक् संस्थानें स्वतंत्रपणें युद्ध करण्यास असमर्थ होती व अशा अनेक असमर्थ संस्थानिकांची जूट होण्यास मत्सर हा एक मनोविकार आडवा येत असे. त्या संस्थानांच्या पसंतीनापसंतीकडे लक्ष न देतां त्यांना बाहेरच्या बाजूनें विजेते सेनापती हे बलाढ्य सैन्यबलाच्या जोरावर नामशेष करण्याच्या प्रयत्नांत होते. सन १६७६--७७ मध्यें शिवाजीनें जी या बाजूस स्वारी केली होती ती एकाद्या विद्युल्लताकेप्रमाणें किंचित्काल दृश्यमान झाली. मोगली सत्तेनें या संस्थानांना कांहींकाळपर्यंत आपल्या सत्तेखालीं आणिलें, परंतु शांतता नांदण्याला तो काळ फारसा अनुकूल नव्हता. सर्व हिंदी संस्थानांना समान दर्जा प्राप्त करून देणें, सर्व हिंदीप्रजेला सर्व साधारण कायद्यांचीं बंधनें घालणें व तिला आलस्य, अव्यवस्था व अधःपात या त्रिदोषांतून मुक्त करून, उत्साही, व्यापारविषयक व उच्च राजकारणी शिक्षण देण्याचें कार्य करणें अशीं तीन महत्कृत्यें पार पाडण्यास एक अधिक कुशल लष्करी सामर्थ्य व राजनीतिविषयक धोरण सर्व हिंदुस्थानांत अद्यापि (शंभर दीडशे वर्षांनंतर) प्रस्थापित व्हावयाचें होतें.

Additional authorities.

1 Tanjore district gazetteer P. 35-53.

2 Tanjore district manual Part V, ch. 3

3 Madura district manual Part III. ch. 8

4 Mr. Sathyanadhan : The Nayaks of Madura, Introd. ch. I and 10-14.

5 Rey Heras: The Aravidu dynasty ch. 8. 13-17, & 19.

6 Manucci 1653-1708 Storio Do Mogor vol. 3 P. 103.

7 Mr. T. S. Kuppusami Sostri: Nayaks of Tanjore.

8 Dr. S. K. Iyengar: Sources of Vijayanagar History. P. 252-327.

9 MER 1924 P. 119 and MER 1925 P. 92.

प्रकरण ३ रें

राज्यसंस्थापक एकोजी सन १६७६–१६८३.

मुद्दे

१ व्यंकोजीनें तंजावर हस्तगत केलें त्यास शिलालेखाचा आधार.
२ मृत्यूनंतरहि राजा या नात्यानें व्यंकोजीचें नांव चाललें.
३ दुसऱ्या शहाजीच्या राज्यारोहणाचा सन.
४ व्यंकोजीचें कर्तृत्व व राजकारणकौशल.
५ शिवाजीची कर्नाटकावर स्वारी व व्यंकोजीशीं भेट.
६ व्यंकोजीस शिवाजीचा उपदेश.
७ व्यंकोजी व शिवाजी यांचा तह व पुढील वागणूक.
८ तंजावरकरांचें स्वातंत्र्यच त्यांच्या नाशास कारण झालें.
९ व्यंकोजी व म्हैसूरकर यांचें वैर व वेंकाजीचा थोरपणा.
१० शिवाजी व वेंकाजी यांचा पराक्रम.
११ संस्कृत व तेलगू भाषांची जोपासना.
१२ रामनदचा किलावय याचें राजकारण.
१३ वेंकाजीचें कर्तृत्व व किंचित् महत्त्वाकांक्षा.
१४ अनेक राण्या व उपपत्न्या यांच्यामुळें भानगडी झाल्या.
१५ अनेक मराठी राजांच्या राण्या व उपपत्न्या यांची संख्या.
१६ राण्या व उपपत्न्या यांचें शिक्षण.
१७ मुद्दुपलानी या उपपत्नीचे ग्रंथकर्तृत्व.

· तंजावर येथील बृहदीश्वर शिलालेखांत एकोजीनें (वेंकाजीनें) राक्षसनामसंवत्सरे शके १५९६ (या शकाला सन १६७४ येतो पण मूळ ग्रंथांतील) सन १६७६ च्या माघ शुद्ध पक्षांत तंजावर सर केलें असें म्हटलें आहे. (परिशिष्ट १ पाहा) अनल संवत्सर (?) शके १५९७ च्या चैत्रांत म्हणजे सन १६७६ च्या एप्रिलमध्यें तंजावरांत वेंकाजीनें कायमचा मुक्काम केला. त्या शिलालेखांत जे असे उल्लेख आले आहेत त्यांच्या सत्य-तेबद्दल शंका राहत नाहीं. कारण वेंकाजीच्याच वंशांतील (दुसऱ्या) सरफोजीच्या कारकीर्दींत प्राप्त होणारे सर्व कागदपत्र व आधार मिळवून हा शिलालेख खोदविलेला आहे; व सन १६७४ पासून सन १६७६ पर्यंतचे कालनिर्देश कारकीर्दीच्या आरंभींच इतिहास-कारांनीं दिले आहेत. सन १६७६ पूर्वीं तंजावर हस्तगत झालें असल्याचा आधार नाहीं. मद्रास--तामिल हस्तलिखितांत आनंद-संवत्सरापासून काल्युक्त संवत्सरापर्यंत म्हणजे सन १६७४ पासून सन १६७९ पर्यंतचा काळ एकोजीस दिलेला आहे. परंतु त्या हस्तलिखितांतील काल वरील शिलालेखांतील काळाशीं जुळत नाहींत. दुसरें, वेंकाजीचा धनी जो विजापुरचा सुलतान त्याच्या मृत्यूनंतर लवकरच तंजावर हस्तगत झालें असें तंजावर येथील आंध्र राजुल चरित्र या ग्रंथांत म्हटलें आहे. आदिलशहाच्या वंशवृक्षाच्या परी-क्षणावरून असें दिसतें कीं, सन १६७६ मध्यें विजापुरच्या गादीवर अल्पवयस्क सुलतान होता; व विजापुरचें राज्य मोंगलांनीं खालसा करीपर्यंत हा तेथें राज्य करीत होता. याचें नांव सिकंदर आदिलशहा होय. सन १६७६ मध्यें एकोजीनें

व्यंकोजीनें तंजावर कधीं हस्तगत केलें त्यास शिलालेखाचा आधार

पोर्च्युगीज लोकांस दिलेली एक देणगी प्रसिद्ध आहे. ती देणगी म्हणजे **विजयराघवानें** पूर्वी नेगापट्टम् हें डचलोकांना दिलें होतें, तीच देणगी मान्य करणारी सनद होय. आणि हें उघड दिसतें कीं, राजांची बदली होतांच डच लोकांनीं नवीन राजापासून (यांतच एकोजीहि समजावयाचा आहे) पूर्वीची वतनें कायम करून घेतलीं असावींत.

मृत्यू नंतरहि राजा या नात्यानें एकोजीचें नांव चाललें

२. एकोजी हा रुधिरोद्गारी संवत्सरांत शके १६०४ मध्यें म्हणजे सन १६८३ मध्यें निवर्तला असें शिलालेखांत लिहिलें आहे. सन १९१८ मध्यें सांपडलेल्या ५४० व्या शिलालेखावरून असें दिसतें कीं, ५४० वा शिलालेख एकोजीनें कलियुगाच्या ४७८४ व्या वर्षी (सन १६८२) म्हणजे शके १६०५ (१६०३ ?) दुंदुभीसंवत्सरांत कोरलेला असावा.) सन १७९८ चें चौकशी मंडळ व शार्ट्स (Schwarts) यांच्या मतें एकोजीनें सात वर्षे राज्य केलें होतें असें दिसतें; व विल्कस म्हणतो कीं, चिक्कदेवरायाला बंगलोर विकत दिलें त्या विक्रीसंबंधींचा करार एकोजीनें सन १६८६-८७ मध्यें केला होता. सन १६९९-१७०० मध्यें रंगमलाशीं एकोजीनें युद्ध केलें असा उल्लेख ईस्ट इंडिया कंपनीच्या दप्तरांतून (Records) दिसतो. सन १६८१ पासून पुढें ते एकोजीचें वर्णन वारंवार करितात. सन १६८१ मध्यें जनगांवचा नायक एकोजी होता. सन १६८२ मध्यें म्हैसूरकडून एकोजीस वालम् हा गांव मिळाला (म्हैसूरनेंच मदुरा हस्तगत केली होती.). एकोजीचा प्रांत म्हणून तंजावरचा उल्लेख सन १६८५ मध्यें आहे. एकोजीशीं तह झाल्यावर तिरुमलवसल येथें करार

झाल्याचा निर्देश सन १६८७ मध्यें आहे. नागापट्टम् जवळील एका किल्ल्यासंबंधीं फ्रेंचांनीं एकोजीच्या मुलाशीं सन १६८८ मध्यें तह केल्याचा लेख आहे. इंग्रजांनींहि त्याच्याशीं याच साली तह केला असा दाखला आहे. याच सालच्या निराळ्या तीन पत्रांत तंजावरच्या राजाला एकोजी म्हटल्याचें दिसतें. सन १६९० मध्यें एकोजीनें इंग्रजाशीं कांहीं करार केल्याचें लिहिलें आहे. या शिवाय या पत्रांत असेंहि म्हटलें आहे कीं, तंजावरच्या राजाकडून रामराजाला मोठी मदत मिळाली व त्या मदतीच्या जोरावर मोगलांचा पराभव करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. सन १६९१ मध्यें झुलफिकारखानानें एकोजीच्या राज्यापर्यंत चाल केली होती, म्हणून राजानें डच लोकांशीं तह केला. तंजावर हा प्रांत एकोजीचा असल्याचा आधार सन १६९२ च्याहि एका पत्रांत आहे. दोन वर्षांनंतर म्हणजे सन १६९४ मध्यें झुलफिकारखानानें तंजावरचा राजा एकोजी याशीं तह केल्याचें लिहिलें आहे. यावरून स्पष्ट दिसतें कीं, एकोजी व त्याचा वडील मुलगा शहाजी यांच्या उल्लेखांच्या संबंधांत एकोजीच्या मृत्यूनंतरच्या कागदांत बराच घोंटाळा झालेला आहे. एकोजीच्या मृत्यूनंतरहि अनेक वर्षें त्याच्याच नांवाचा उल्लेख होत असे इतका तो प्रसिद्ध होता.

दुसऱ्या शहाजीच्या राज्यारोहणाचा सन

३. दुसऱ्या शहाजीचा मंत्री गंगाधर याचा मुलगा त्र्यंबकराय मखी यास एकोजीनें मंत्रीपदाचें शिक्षण दिलें असा एक उल्लेख असल्यानें एकोजीसंबंधीच्या काळाच्या ऐतिहासिक गोंधळांत आणखी भर पडली आहे. रामायणावरील धर्मशास्त्रविषयक प्रसिद्ध व दुर्मिळ टीका ‘ धर्मकूट ’ ही या त्र्यंबक-

रायानेंच लिहिलेली आहे. या टीकेच्या एका कडव्यांत शहाजी-साठीं (म्हणजे आपल्या मुलासाठीं) एकोजीनें राज्याचा त्याग केला असें अस्पष्टपणें म्हटलें आहे. हीच ऐतिहासिक गोष्ट अय्या-अव्वलच्या शाहेन्द्रविलास काव्यांत उल्लेखिली आहे. यानंतर एकोजी आणखी किती वर्षें जगला हें कळत नाहीं. विल्क्स म्हणतो त्याप्रमाणें तो सन १६८७ पर्यंत जगला असावा. कारण, एकोजीच्या सैन्याबरोबर काल्र व मारवाडी पेंढारी यांचें सन १६८६ मध्यें युद्ध झाल्याचा उल्लेख मदुरेच्या मिशनच्या एका पत्रांत आहे. सन १६८३ मध्यें एकोजी फक्त ५४ वर्षांचा होता. पट्टुकोटाई येथील शिलालेख शके १६०६ मधील आहे त्यावरून दुसरा शहाजी हा सन १६८५ मध्यें महाराजपदाधिष्ठित झाला होता असें सिद्ध झालें आहे. यावरून दुसऱ्या शहाजीला सन १६८५ पूर्वी म्हणजे सुमारें सन १६८४ मध्यें राज्यारोहण झालें असावें असें मानावें लागतें.

एकोजीचें कर्तृत्व व राजकारणकौशल

४. छत्रपति शिवाजी हा एकोजीचा वडील बंधु होय, हें सर्वमान्य सत्य आहे. शिवाजीएवढें कर्तृत्व एकोजी मध्यें नव्हतें याबद्दलहि वाद नाहीं. परंतु असें असलें तरी, आपल्या काळच्या मोंगलाशीं एकोजी हा नेहमीं मोठ्या साहसानें व उमेदीनें झगडा करीत असे हें प्रसिद्धच आहे. मद्रास येथील हस्तलिखित ग्रंथावरून असें सिद्ध होतें कीं, एकोजी हा फक्त योद्धाच नसून पीकपाण्याची उन्नति करण्यांतहि मोठा कर्तृत्वशाली राजा म्हणून प्रसिद्ध होता. त्यानें कांहीं जुने काल्वे दुरुस्त केले, कांहीं नवीनहि बांधिले व कांहीं पडित जमिनी लागवडीस आणिल्या. मदुरा मिशनचीं कांहीं पत्रें 'मदुरेचे नायक' यामध्यें भाषांतरित झालीं आहेत त्यावरून या एकोजी

राजाला आपल्या संस्थानची किती तळमळ वाटत होती हें स्पष्ट दिसतें. पाण्याच्या पुरानें कांहीं खेड्यांचा नाश केला होता; द्रव्याच्या बाबतींत राजा एकोजी अगदीं हातटेकीस आला होता. रयतेच्या मालकीचें बेंचसे पीक खार लुटून नेत असत किंवा अमीन लोक त्यासाठीं रयतेला मनस्वी छळीत असत; हें लक्षांत घेऊन एकोजीनें चार पंचमांश पीक आपल्या ताब्यांत घेतलें. शिवछत्रपतीला कांहीं दंड वगैरे देणें एकोजीला भाग पडलें असल्यानें तो देण्यासाठींहि एकोजीनें प्रजेजवळील पै न् पै हिसकावून घेतली होती.

शिवाजीची कर्नाटकावर स्वारी व एकोजीची भेट.

५. एकोजीच्या कारकीर्दींतील रोमांचकारी धामधुमीचा प्रसंग म्हणजे शिवाजानें एकोजीवर व कर्नाटकावर सन १६७६--१६७७ मध्यें जी स्वारी केली तो होय. आपल्या तीर्थरूपाच्या जाहगिरींतील आपला भाग घेण्यासाठीं ही स्वारी शिवाजीनें केली होती हें प्रसिद्धच आहे. मुख्य मुसलमानी सत्तेपासून विभक्त होऊन स्वतंत्र होण्याचा प्रयत्न एकोजी करीतच होता. त्यास मदत करून मराठी राज्याचा भगवा झेंडा कर्नाटकांत फडकवावा या हेतूनें शिवाजीनें ही कर्नाटकावर स्वारी केली होती. रघुनाथ पंडित हा एकोजीचा एक मंत्री होता. परंतु तिकडील कारभारांत त्याचें तेज पडत नसल्यानें तो अगदीं वैतागून गेला होता. पुढें त्यानें एकोजीची नोकरी सोडिली व तो शिवाजीच्या पदरीं येऊन राहिला. त्यानेंच शाहाजीच्या जहागिरींत भाग मिळविण्यासाठीं शिवाजीची महत्त्वाकांक्षा प्रदीप्त केली. शिवाजीनें गोवळकोंड्याच्या सुलतानाशीं तह केला, जिंजी हस्तगत केली व नंतर तंजावरावर चाल केली आणि एकोजीची भेट घेतली. वेलोरसुद्धां कोलेरूनचा उत्तरेकडील

(औदिच्य) प्रदेश शिवाजीच्या सैन्यानें काबीज केला. शिवाजीची व एकोजीची (म्हणजे या बंधूंची) भेट निष्फळ झाली. आपण इकडेच राहिलों तर मोंगलांची स्वारी आपल्यावर होईल अशी शंका घेऊन शिवाजी घाईघाईनें परत महाराष्ट्रांत आपल्या राजधानीस गेला.

एकोजीस शिवाजीचा उपदेश

६ महाराष्टांत परत येताना शिवाजीनें जिंजी व कोलेरून या प्रांतावर आपल्यातर्फे शहाजीचा दासीपुत्र संतोजी यास मुख्य सुभेदार नेमिलें. वेंकाजीनें संतोजीवर स्वारी केली. पण संतोजीनें मोठ्या शौर्यानें ती स्वारी परतवून स्वसंरक्षण केलें. वेंकाजीचें वागणें शिवाजीला कमीपणा आणणारें असें होतें. शिवाजीशीं कलह करण्यास वेंकाजी उद्युक्त झाला होता पण त्याच्या अशा वागण्यानें शिवाजीचा सर्व हिंदुस्थानावर मराठशाही स्थापण्याचा थोर मनोरथ दुर्बळ झाल्यानें शिवाजीला मनस्वी दुःख झालें. शिवाजीचीं इतिहासप्रसिद्ध दोन पत्रें याच वेळीं वेंकोजीला त्यानें लिहिलेलीं (परिशिष्ट ४ व ५) आहेत. पुढें सन १६८० मध्यें विजापुरकरांशीं जो तह झाला त्यायोगें आसमंतांतील प्रदेशासह जिंजीचा मुलुख शिवाजीकडेस आला; तेथील राज्यव्यवस्था कशी उत्तम असावी यासंबंधाचें विवेचन करून तहाची कलमें (परिशिष्ट ६) ठरविलीं आहेत. प. ४ चें पत्र सन १६७८ मधील असून त्यांत त्या दोन बंधूंतील बेबनावाच्या दुष्परिणामाचें निदान केलें आहे. प. ५ चें पत्र सन १६८० मधील असून त्यांत वेंकाजीनें दुःख करीत बसण्यापेक्षां भूषणभूत कर्तव्य करावें असा उपदेश केला आहे. कारण सन १६७८ मधील युद्धांत वेंकाजीचा पराजय झाल्यापासून त्याला मनस्वी खेद वाटूं लागला होता. दुसऱ्या पत्राचें तात्पर्य असें कीं,

'आपल्या कुटुंबांत मीच (शिवाजी) वयानें वडील असल्यानें तुझ्या (वेंकाजीच्या) संरक्षणाची जबाबदारी माझ्यावरच आहे हें तुलाहि मान्य असावें. तुझ्या सैन्यांतील शिस्तीकडेस लक्ष दे व सद्यःस्थितीकडेस काळजीपूर्वक पाहा. माझ्या लहान भावाची कीर्ति व स्तुति ऐकून मला किती आनंद होईल त्याची कल्पना करा. थोर कृत्यें करण्याची हींच वेळ आहे. तरी सावधानता ठेवून कर्तव्यतत्पर व्हा.

एकोजी व शिवाजी यांचा तह व पुढील आगणूक

७ (विजापुरचा आदिलशहा) सुलतान हा वेंकोजीपेक्षां अधिक वलिष्ट असूनहि शिवाजीच्या अटी मान्य करीत असे. त्यामुळें वेंकोजीलाहि शिवाजीच्या अटी मान्य करणें भागच होतें. तत्काळ एक मोठी रकम शिवाजीला देण्यांत आली व वार्षिक खंडणीहि देण्याचें वेंकोजीनें मान्य केलें. शिवाजीच्या मृत्यूनंतर (म्हणजे सन १६८० नंतर) तंजावराहून खंडणी मिळण्याचें बंद झालें व परस्परसाहाय्य व कार्यप्रसंगीं आमंत्रण यांशिवाय सातारकर भोसले व तंजावरचे भोसले यांचा कांहीं संबंध राहिला नाहीं. म्हणजे सन १६८० नंतर लगेच तंजावरकर भोसल्यांचा संबंध मराठी सत्तेच्या केन्द्रस्थानापासून स्वतंत्र झाला.

तंजावरकरांचें स्वातंत्र्यच त्यांच्या नाशास कारण झालें

८ याप्रमाणें कर्तृत्वदर्शक बुद्धिसामर्थ्याची व नेतृत्वाची संधि तंजावरकर भोसल्यांनीं घालविली. जिंजी, तंजावर व सातारा येथील मराठेराजांमध्यें क्षुल्लक पण मत्सरमूलक झगडे झाले. त्यांनीं दक्षिणेंत मराठी साम्राज्यस्थापनेचा संभवहि नष्ट केला. (दुसऱ्या) शहाजीच्या मृत्यूनंतर तंजावरचा पृथक्पणा

त्याच्या राज्यकर्त्याला लाभदायक झाला नाहीं. कारण मुसलमानी सत्तेला तंजावरच्या असहाय राजाचा प्रथमच बळी पडला. त्यामुळें सर्वांत अधिक बळकट अशी मुख्य सत्ता दक्षिणेकडून अगदींच उघडी पडली. अठराव्या शतकाच्या हिंदुस्थानाच्या इतिहासाच्या उंबरठ्यावर ऐक्याचा अभाव हें मोठेंच संकट उभें ठाकलेलें दृग्गोचर होतें.

एकोजी व म्हैसूरकर यांचें वैर व एकोजीचा थोरपणा

२ तंजावरासारख्या व्हानशा संस्थानाचे शेजारी मोठे मत्सरी होते व त्यांनीं तंजावराला सतविण्याची एकहि संधी व्यर्थ घालविली नाहीं, म्हणून नवीन राज्यकर्त्याला संकटग्रस्त परिस्थितीला तोंड देणें भाग पडलें. तेथील प्रजेला परक्या राजसत्तेची संवय झाली असल्यामुळें तिनें या शेवटच्या परक्या सत्तेविरुद्ध कुरकुर केली नाहीं. परंतु त्या सत्तेच्या शेजारच्या सत्ताधीशांनीं तंजावरच्या राजाला शांतता मिळूं दिली नाहीं. वेंकाजीविरुद्ध मदुरेच्या चोक्कनाथानें जिंजीच्या संतोजीचें साहाय्य घेतलें, परंतु वेंकाजीनें संतोजीशीं लढत असताना पलायन केल्यामुळें वेंकाजीचा नाश करण्याचा चोक्कनाथाचा मनोदय जागच्या जागींच राहिला. सन १६७८ ते सन १६८० च्या काळांत एका धाडसी मुसलमान सरदारानें चोक्कनाथाचीच गादी बळकाविली. पुढें चोक्कनाथानें स्वतःचें राज्य मिळविलें न मिळविलें तोंच म्हैसूरच्या राजानें त्रिचनापल्लीवर स्वारी केली. पूर्वीचें वैर बाजूस सारून वेंकाजीनें चोक्कला मदत केली. कारुण्यनिर्विकारक शोकपर्यवसायी पण प्रेममूलक अशा एका तेलगू काव्यांत वेंकाजीच्या या उदार बुद्धीचें वर्णन आलें असल्यानें वेंकाजीची ही उदारबुद्धी अमर झाली आहे.

१० एका संस्कृत शोकपर्यवसायी निबंधावरून वरील काव्य ग्रथित केलेलें आहे. त्या संस्कृत निबंधाचा कर्ता वीरराघवाचा मुलगा नेलूर शिवराम कवि हा होय. एकोजीचा नातु जयसिंह याला हा संस्कृत निबंध शिवराम कवीनें अर्पण केलेला आहे. शिवाजी व वेंकाजी यांचीं महत्कृत्यें कवीनें नेहमीच्या रसभरित पद्धतीनें वर्णन केलीं आहेत. "शिवाजीनें मोंगलांचा पराजय करून छत्रपति पदवी मिळविली. वेंकाजीनें नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व राजांचा पराजय करून पांड्यांना म्हैसूरच्या जोखडांतून सोडविलें." ही नेहमीची वर्णन पद्धति होय.

कमलकज्ञानीधीमध्यें शिवाजी व वेंकाजी यांचे पराक्रम.

११ नायकांच्या आश्रयानें संस्कृत व तेलगू वाङ्मय भरभराटीस येऊन वैभवसंपन्न झालें व त्याच्या दर्शनीय वृद्धीसाठीं नायकांच्या मागून येणाऱ्या राजाला फक्त पूर्वपरंपरा कायम ठेविण्याचेंच काम राहिलें होतें. तेथील राजे ब्राह्मणाचे फार मोठे भक्त असल्यामुळें, तंजावराकडील लौकिकभाषांकडेस त्यांचें दुर्लक्ष होऊन संस्कृत व तेलगू भाषांची मात्र चांगलीच वृद्धी झाली. असें म्हणतात कीं, स्वतः वेंकोजीनेंहि तेलगू भाषेमध्यें द्विपाद रामायण ग्रथित केलें असून त्याच्या कारकीर्दींत तेलगू भाषेंतील इतर कांहीं ग्रंथ लिहिलेले आहेत.

संस्कृत व तेलगू भाषांची जोपासना

१२ रामनदचा मुल्य हा मदुरेच्या नायकांचा अंकित होता. प्रसिद्ध किलावन हा रामनदचा मुल्य असून तो सेतुपतीच्या इतिहासांत अंतिम मर्यादारूप होय. त्याची महात्वाकांक्षा व

रामनदाचा किलावन याचें राजकारण

स्थलांतर करण्याची त्वरा मोठी आश्चर्यकारक होती. तो स्वतः बंडखोर असल्यानें आपल्या ताब्यांतील सरदारांच्या मनांतील बंडखोरपणाचा अंकुर मूळांतच खुडून टाकीत असे. पुडु कोट्टाईचा जहागिरदार त्याचा अंकित असून तंजावरच्या मुख्यांच्या कच्छपीं लागला होता. तें पाहतांच त्यानें जहागिरीच्या मालकीसंबंधीं मूळ घराण्यांतच फेरफार करून ती मालकी त्याचा मेहुणा तोंडामन याला दिली. मदुरेच्या राजाच्या अंकितपणातून सुटून आपण मोकळें व्हावें अशी त्याची प्रखर इच्छा होती. या इच्छेनें प्रेरित होऊनच त्यानें पांबर व पुडुकोट्टाई यांमधील प्रदेश वेंकाजीला देऊन त्या देणगीच्या मोबदल्यांत त्याच्याकडून सैन्याची मदत मिळविली. ही लढाई वेंकाजीचा मुलगा जो (दुसरा) शहाजी याच्या कारकीर्दीत संपली. या युद्धांत मदुरेचा पराजय, पुडुकोट्टाईच्या जहागीरदाराच्या संयुक्त सैन्याला विजय व तंजावरकरांना प्रदेश याप्रमाणें तिघांना तीन प्राप्त झाले.

वेंकाजीचें कर्तृत्व व त्याची महत्त्वाकांक्षा

१३ तंजावरच्या मराठ्यांच्या इतिहासांत असल्या विपुल लढायांचे उल्लेख आहेत. सुमारें अठराशें वर्षांपूर्वी ज्या उत्साहानें प्रदेश व सत्ता यांच्या संबंधीं ज्या महत्वाकांक्षेनें चकमकी झडल्या त्याच महत्वाकांक्षेनें व उत्साहानें त्या, खिस्ताच्या अठराव्या शतकांतहि झाल्या. आपल्या शेजाऱ्यांनां तोंड देऊन वेंकाजीनें आपलें राज्य संभाळिलें व तें पुढील पिढीच्या स्वाधिन केलें. त्याच्या राज्यापासून बेंगलोर हें फार दूर असल्यानें तेथें व्यवस्था ठेविणें हें फार खर्चाचें व त्रासदायक काम आहे असें पाहून तें विकून टाकून जवळच प्रदेश मिळवून तो आपल्या राज्यास जोडून राज्याचा प्रदेश शक्य तेवढा विस्तृत करावा असा पोक्त विचार वेंकाजीनें केला. यावरूनच

हें उघड होतें. कीं, साम्राज्य स्थापन करण्याचा त्याचा थोर विचार नव्हता. कीर्ति व ऐश्वर्य यांच्या महासागरांत धोक्यानें विहार करण्यापेक्षां तंजावरराज्याच्या ऐश्वर्यरूपी कुंडांतच आपल्या पूर्वजांप्रमाणें आनंदानें डुंबत राहण्यांतच वेंकाजीला समाधान वाटत होतें. मराठ्यांचा देशाभिमान व त्यांची अधिक विजयाची महत्वाकांक्षा यांच्या भरीला भरून इतर कोणाहि मराठ्याला अधिक पराक्रम करून मराठी सत्ता तंजावराकडेस वृद्धिंगत करण्याला वेंकाजीनें सवडच ठेविली नाहीं. तसेंच शेजारच्या जहागिरदारांनीं एकमत होऊन मोगली सत्तेच्या विस्ताराविरुद्ध झगडा करावा, निदान स्वसंरक्षण करण्यास तरी त्यांनीं तत्पर व समर्थ असावें, यासाठीं वेंकाजीनें अल्प ते प्रयत्नहि केले. परंतु त्यांचाहि फारसा उपयोग झाला नाहीं. आपल्या मराठी राज्याच्या बाहेर जाणें, तें वाढविणें, त्याचा लौकिक व मानसन्मान वृद्धिंगत करणें, त्याच्या लष्करी सामर्थ्याची वृद्धि करणें हे प्रकार वेंकाजीनंतर त्याचा पुत्र (दुसरा) शहाजी याच्याशिवाय इतर कोणीहि मराठा राजा अमलांत आणूं शकला नाहीं.

अनेक राण्या व उपपत्न्या यांच्यामुळें भानगडी झाल्या.

१४ मराठे राजांच्या राण्या व उपपत्न्या यांबद्दल थोडेंसें विवेचन करून हें प्रकरण संपवूं. पूर्वी सर्वसाधारण जनता व राजा यांच्या खाजगी व सार्वजनिक राहणींत म्हणण्यासारखा तफावत नसे. अशा काळीं राजानें अनेक विवाह केले असतां त्यापासून होणाऱ्या संततींमध्यें राज्याधिकारित्वासंबंधीं तंटे उपस्थित होत. राण्या व उपपत्न्या यांचे आप्तसंबंधी सार्वजनिक कार्यांमध्यें लुडबुड करीत. दरबारांत कारस्थानें उत्पन्न होत. जबाबदार व्यक्तीस निष्प्रयोगहि होत. राजाची सांसारिक काळजी वृद्धिंगत होऊन दुःखांचा उद्भव होई. या सर्वांचा परिणाम अर्थातच संस्थानाच्या

उन्नतीवर फार घाईट होई. शिवाय त्या काळीं राजांचे प्रधान पूर्ण सत्ताधीश असत व राज्यव्यवस्था अनेक कारभाऱ्यांमध्यें विभागून दिलेली असे. त्याचा परिणाम सहाजिकपणेंच उद्वेगकारक होई.

प्रत्येक मराठी राजांच्या राण्या व उपपत्न्या यांच्या संख्या.

१५. वेंकाजीला दोन राण्या व नऊ उपपत्न्या होत्या. त्याला दहा मुलें होते. वेंकाजीचा मुलगा (दुसरा) शहाजी यालाहि कित्येक उपपत्न्या होत्या. पहिल्या सरभोजीला तीन राण्या होत्या. तुकोजीला पांच राण्या व अनेक जातींच्या अशा सहा उपपत्न्या होत्या. दुसऱ्या एकोजीला सहा राण्या व तीन उपपत्न्या होत्या. प्रताप याला पांच राण्या व अनेक जातींच्या अशा सहा उपपत्न्या होत्या. तुळजा राजाला पांच राण्या होत्या. (दुसऱ्या) सरभोजीला दोन राण्या व चोवीस उपपत्न्या होत्या. शिवाजीला वीस राण्या व अनेक उपपत्न्या होत्या. मुबलक द्रव्य व अनियंत्रित सत्ता हीं राजांजवळ असल्यामुळें बहुपत्नीकत्वानें त्यांना कधींहि खर्चाची अडचण भासलीसुद्धां नाहीं. बहुपत्नीकत्वाला धार्मिक अडचण कांहींच नव्हती. कारण शास्त्रप्रणेत्यांनीं तशी परवानगी पूर्वींच देऊन ठेविली आहे. परंतु राजकीय दृष्टीनें मात्र ही चाल फार अडचणी उत्पन्न करणारी व हीन राज्यव्यवस्थेला कारणीभूत झाली यांत शंका नाहीं.

राण्या व उपपत्न्या यांचे शिक्षण.

१६ राजांच्या उपपत्न्यांपैकीं कित्येक फार गुणसंपन्न होत्या. त्या नामांकित रूपवती होत्या इतकेंच नव्हे परंतु त्या प्रख्यात विदुषी व नृत्यगायनांच्या कामां-तहि फारच मार्मिक होत्या. विशेषतः नायक राजांच्या कित्येक तेलगू उपपत्न्या विदुषी म्हणूनहि प्रसिद्ध

आहेत. अशा कित्येक विदुषींनीं रचिलेलीं सुंदर व मनोहर पदें आजलाहि तामिल व तेलगू देशांत अनेक ठिकाणीं ऐकावयास मिळतात. रंगाजी या नांवाची एक प्रसिद्ध नायकीण विजयराघव नायकाची उपपत्नी होती. विव्दत्तेमध्यें तिची बरोबरी एकाहि नायकिणीनें आजपर्यंत केल्याचें प्रसिद्ध नाहीं. कारण ती मोठी विदुषी म्हणून आजहि प्रसिद्ध आहे. विजयराघवाचा विलास ज्यांत वर्णिला आहे असें 'मन्नरुदसा विलासम्' नांवाचें एक सर्वोत्कृष्ट काव्य तिनें रचिलें आहे.

मुदुपल्लानि या उपपत्नीचें ग्रंथकर्तृत्व.

१७ प्रतापसिंहाची उपपत्नी मुदुपल्लानी हीहि मराठ्याच्या कारकीर्दीतील नामांकित नायकीण म्हणून प्रसिद्ध आहे. राधिकासन्तवनम् नांवाचें एक काव्य तिनें रचिलें आहे. सप्तपादुल याचें कर्तृत्वहि तिच्याकडेसच आहे. तिरुमल भट्टाचार्य कुटुंबांतील वीरराघव देसिक हा तिचा गुरु होता.

Additional authorities.

1 The Report of the Tanjore Commission 1798.

2 Wilks: sketches of south India 2 vols.

3 Grant Duff: History of the Marathas vol I. ch 9.

4 Sarkar: Sivaji Ch. 12.

5 Takakhav and Keluskar; The life of Sivaji Maharaj Ch. 26

6 M. E. R. 1924 Page 119-122.

7 Exhibit No. B. 140 in Apeal No. 199 and 200 of 1919 In H. c. of Madras which gives a summary of the Mar. Ins.

8 Exhibit No. B. 141. Do which gives a summary of the Madras Tamil mss.

9 Tanjore district mannual part V ch 4.

10 Madura district manual part III ch 9.

प्रकरण ४ थें

(दुसरा) शहाजी सन १६८४ ते १७१२

मुद्दे

१ वेंकाजीच्या तीन पुत्रांची कारकीर्द.
२ मराठी सत्तेचा आदर्श व मोंगलांची तरकी
३ राजाराम व ताराबाई यांचे पराक्रम.
४ जिंजीचा वेढा व झुल्फिकारखानाची कर्तबगारी.
५ शहाजीचा वकील व सेतुपतीचा पराक्रम.
६ म्हैसूर, त्रिचनापल्ली, मदुरा व तंजावर यांचीं युद्धें.
७ शहाजीचें कर्तृत्व.
८ शहाजी व तत्कालीन वाङ्मयोत्तेजन.
९ कांहीं तामिल नाटकें.
१० या कारकीर्दीतील तेलगू वाङ्मय.
११ संस्कृत वाङ्मय व पंडित
१२ इतर संस्कृतज्ञ पंडित.
१३ बाकीचे पंडित व त्यांची विद्वत्ता.
१४ इतर ग्रंथकार.
१५ शृंगारमंजरी नाटक.
१६ अप्पय्या दीक्षिताची माहिती.
१७ विद्वत्समूहाची स्तुति व तंजावरचें अभिनंदन.
१८ भोंसल्यांचें विरक्त जीवन.
१९ मराठी राजे व तामिल वाङ्मयाची आवड.
२० कांहीं तामिल ग्रंथ व ग्रंथकार.
२१ मराठी ग्रंथरचना.
२२ मराठी राजे व ख्रिस्ती लोक.
२३ ख्रिस्ती लोकांचे अपराध.



राजा शहाजी

(व्यंकोजीचा वडील पुत्र व तंजावरचा दुसरा राजा)

एकोजीच्या तीन पुत्रांची कारकीर्द.

१ बृहदीश्वर शिलालेखावरून (प्र. १ पहा) दिसतें कीं, शहाजी, सरभोजी व तुकोजी असे तीन पुत्र एकोजीस होते, व त्यांनीं एका विचारानें राज्य केलें. या तिघांची एकी होती याला अन्य प्रमाण म्हणजे धर्मकूट हा ग्रंथ होय. हे तिघेहि राजपुत्र वयांत आल्यावर पृथक् ठिकाणीं राहत असत. यांच्यापैकीं सरभोजी हा कुंभकोणम् जवळ सक्कोटाई येथें व सर्वांत ल्हान तुकोजी हा मानारगुंडी सुभ्यांतील महादेवीपट्टण येथें राहत असे. थोरला शहाजी हा राजपदधारी असल्यानें कदाचित् बहुधा तंजावरासच राहत असणें साहजिक आहे. बहुदा पहिले दोघे हे त्या त्या ठिकाणचे सुभेदार असावेत. शके १६३३ नंदननाम संवत्सरे म्हणजे सन १७१२ मध्यें (दुसरा) शहाजी हा अवघा चाळीस वर्षांचा असतांना निपुत्रिक मृत्यु पावला. शहाजीच्या मृत्यूनंतर सरभोजी व तुकोजी हे एकचित्तानें राज्याची व्यवस्था पाहूं लागले. परंतु शके १६४९ कीलकनाम संवत्सरे म्हणजे सन १७२८ मध्यें सरभोजी हाहि वयाच्या त्रेपनाव्या वर्षी निवर्तला. दुसरा एक शिळालेख शके १६४० मध्यें कोरलेला आहे, त्यावरूनहि या तिघा बंधूंनीं एक विचारानें राज्य केल्याचें निश्चित होतें. सरभोजीच्या मृत्यूनंतर सन १७२८ मध्यें तुकोजी हा राज्याचा एकटा धनि झाला. तो शके १६५७ अनल संवत्सरांत (म्हणजे सन १७३६ मध्यें) आपल्या वयाच्या एकुणसाठाव्या वर्षी मृत्यु पावला. एकोजीनें शेवटपर्यंत राज्य केलें.

२ शिवछत्रपतीच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या सत्तेला उतरतीच कळा लागली. सन १६८७ मध्यें औरंगजेबानें दक्षिणेकडील

सुल्तान नामशेष केले व औरंगजेबाच्या सरदारांनीं पश्चिम हिंदुस्थानांतील मराठी सत्ता खिळखिळी करून टाकिली. विजापुरकरांशीं दुसऱ्या शहाजीचें रहस्य होतें असें शिलालेखावरून दिसतें व औरंगजेबापुढें विजापुरकर सरदार पळून गेल्यावर सरभोजीनें त्यांना मदत केली असें मद्रास येथील कांहीं हस्तलेखावरून दिसतें.

मराठी सत्तेचा आपकर्ष व मोंगलांची सरशी

३ औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी केली तेव्हां मराठ्यांनीं सातारा ही राजधानी सोडून दिली व स्वतः राजाराम जिंजीस जाऊन राहिला. अर्थात्च मोंगलांना प्रतिकार करण्याचें मराठ्यांचें केंद्रहि साताऱ्याहून जिंजीस गेलें. राजाराम व त्याची राणी ताराबाई यांनीं मोंगलांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार मोठ्या शौर्यानें केला व त्यांचे सेनापति आणि सैन्य यांना जिंजीच्या किल्ल्यापर्यंत नेलें. साताऱ्याचा राजाराम व तंजावरचा दुसरा शहाजी यांचें नातें पुढें दर्शविल्याप्रमाणें चुलतभावांचें होतें.

राजाराम व ताराबाई यांचें पराक्रम.

शहाजी

शिवाजी	व्यंकाजी
राजाराम	(दुसरा) शहाजी

राजारामावरील या आपत्तीच्या प्रसंगीं दुसऱ्या शहाजीनें त्याला मदत केली होती असें ' धर्मकूट ' ग्रंथावरून दिसतें. एकोजीनेंहि रजारामाला मदत केली होती असें ऑर्म म्हणतो. तो

मदत राजारामाला नसून संभाजीला केली असणें संभवनीय दिसतें. व अय्या अय्वालच्या शाहेंद्रविलास काव्यावरून असेंच दिसतें. फोर्ट सेंट जॉर्ज येथील सन १६९० चीं रोजनिशी व विचारविनिमयाचें चोपडें (Diary and consultation book) यावरून असें दिसतें कीं, एकोजीनें मोगलांचा पराजय करण्यासाटीं राजारामाला स्वारांची व पैशाचीहि मदत केली होती. सन १६९३ मध्यें राजारामानें तंजावराहून पुनः मदत मिळवून वीस हजार स्वारांचें पथक जिंजीस आणिलें.

जिंजीचा वेढा व झुलफिकारखानांची कर्तबगारी

४ जिंजीला मोगलांचा वेढा पडला होता, त्या काळांत मोगलांनीं आसपासच्या गांवांवर खंडण्या वसविल्या. सन १६९८ मध्यें मोगलांनीं जिंजीचा किल्ला सर केला. तेव्हां हिंदुस्थानांतील मोगलांचे विजयहि पूर्णच झाले. जिंजीचा वेढा लढविणारा मोगलांचा सेनापति झुल्फिकारखान यानें सन १६९१ पासून तंजावर जिंकून चार लक्ष रुपयांची खंडणी तंजावरावर लादली होती. परंतु ही खंडणीची रक्कम वसूल करण्यास नेहमीं सालोसाल स्वाऱ्या कराव्या लागत. सन १६९३, १६९४, १६९८, १७००, १७०१ या सालांतील फोर्ट सेंट जॉर्जच्या पत्रांवरून स्पष्ट दिसतें कीं, तंजावराहून खंडणीची रक्कम सालोसाल वसूल करण्याला मोगल सेनापतींना तंजावरावर चाल करून जावें लागत असे. दुसऱ्या शहाजीनें त्रिचनापल्लीच्या मंगम्माल राणीकडून कांहीं प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला होता. झुल्फिकारखानानें तो सन १६९७ मध्यें परत राणीस देवविला, असा उल्लेख नबाबास लिहिलेल्या एका टाचणांत दिसतो. कर्नाटकाच्या फौजदारीच्या जागेवर झुलफिकार-

खानानंतर दाउदखानाची नेमणूक झाली. त्यानें झुल्फिकारखाना-प्रमाणेंच कित्ता गिरविला होता. खंडणी वसूल करण्यासाठीं त्यानेंहि तंजावरावर मुदतबंदी स्वाऱ्या केलेल्या दिसतात. याप्रमाणें तंजावरचें आधिपत्य आदिलशहाकडून मराठ्यांना घेतलें शिवाजीस अर्पण केलें व नंतर दिल्लीच्या मोगलांस दिलें.

शहाजीचा वकील व सेतुपतीचा पराक्रम.

५ दुसऱ्या शहाजीचा वकील गंगाधर याचा मुलगा बाबाजी यानें पंवर व पुडुकोट्टाई यांच्यामधील प्रांत हस्तगत करून तेथें एक किल्ला बांधिला असें पुडुकोट्टाईच्या शिलालेखांत अभिमानपूर्वक उल्लेखिलें आहे. परंतु सेतुपती राजानें हा प्रांत हस्तगत केला होता हें पूर्वीच सांगितलें आहे. मरवांच्या मुख्याविरुद्ध मरवांला या दुसऱ्या शहाजीनें मदत केल्याचें ‘ धर्मकूट ’ ग्रंथांत लिहिलें आहे.

म्हैसूर, त्रिचनापल्ली मदुरा व तंजावर यांची युद्धें.

६ सेतुपतीच्या साहाय्यानें दुसऱ्या शहाजीनें त्रिचनापल्लीच्या मंगम्माल राणीचा कांहीं प्रांत हस्तगत केला होता. (मदुरा व त्रिचनापल्ली हीं राज्यें पूर्वीच एक झालीं होतीं.) त्यासाठीं सन १७०० मध्यें दुसऱ्या शहाजीशीं तिचें युद्ध सुरू होतें. या युद्धांत राणीनें शहाजीचा पराजय केला, परंतु शहाजीचा दिवाण बालोजी (बाबाजी ?) यानें शत्रुपक्षाला लांच देऊन शांतता प्रस्थापित केली. पुढें लवकरच म्हैसूरकरांनीं कावेरीवर एक पूल बांधिला त्यायोगें त्रिचनापल्ली व तंजावर यांना सारखेंच संकट उत्पन्न झाल्यामुळें तंजावरकरांनीं आपली बाजू बदलली. कावेरीचा धक्का पडल्यानें भावी युद्धाचें संकट टळलें. परंतु तंजावर व त्रिचनापल्ली येथील

आधिपतींचें सर्वसाधारण सख्य इंग्रजांशीं जर झालें नसतें तर या उभयतां आधिपतींनीं कल्लाडीच्या धक्क्यावर म्हैसूरकरांशीं निकराची लढाई केली असती. त्रिचनापल्ली व तंजावर येथील संस्थानिकांचें वैर पिढीजात होतें. परंतु तें नाहींसें होऊन त्यांचें सख्य झाल्यानें म्हैसूरचा किलवल हा राजा फार उद्विग्न झाला. तथापि त्यानें त्रिचनापल्लीच्या मंगम्माल राणीच्या फौजेचा पराजय करून सन १७०२ मध्यें तंजावरकर (दुसऱ्या) शहाजीचा अरलंगी किल्ला हस्तगत केलाच. याप्रमाणें एकदां एकाचा तर नंतर दुसऱ्याचा याप्रमाणें म्हैसूर-तंजावर-त्रिचनापल्ली या त्रिकुटांपैकीं प्रत्येकाचा विजय-पराजय कांहीं काळ पर्यंत चालू होता. परंतु या तिघांपैकीं एकहि जण कायमचा समजूतदार किंवा अधिक सुखी असा राहिला नाहीं. कारण तसा जर कोणी राहिला असतां तर त्यानें युद्धांतून तत्काळ आपलें अंग काढूनच घेतलें असतें. असो.

शहाजीचें वर्तन.

७ दुसरा शहाजी आपल्या वयाच्या बाराव्या वर्षी गादीवर आला. तो जरी याप्रमाणें अगदीं अल्पवयाचा होता तरी त्यानें राज्यकारभार मोठ्या चातुर्यानें व हुषारीनें चालविला. शहाजी हा स्वतः फार चाणाक्ष व दूरदर्शी होता. एकोजीच्या वेळचें निष्णात कारभारीमंडळ त्यास मदत करण्यास सिद्धच होतें. याच्या कारकीर्दींत पीकपाण्याची समृद्धी असे. एकोजीच्या वेळची (म्हणजे त्याच्या पित्याच्या कारकीर्दींतील) व्यवस्था त्यानें तशीच सुरळीतपणें पुढें चालविली होती असें मद्रास येथील हस्तलिखितांवरून दिसतें. या कारकीर्दींत जमिनीवरील साऱ्यांत वाढ झाली होती तरी प्रजा नाराज नसून आनंदी व आज्ञाधारक अशीच राहिली होती असें सन १७९८ च्या

कमीशननें लिहून ठेविलें आहे. या शहाजीनें तंजावर येथील किल्ला सुधारून दुरुस्त केला, कांहीं धर्मशाळा नवीन बांधविल्या व कित्येक रुग्णालयेंहि उभारलीं. या रुग्णालयांत रोग्यांना योग्य उपचार करण्या-साठीं अरबस्थानांतून मोठमोठे नामांकित हकीमहि राजानें आणविले व दिवाणी आणि फौजदारी दावे चालविण्यासाठीं उत्कृष्ट न्यायमंदिरें स्थापन केलीं, असें हिकी म्हणतो. इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीच्या लेखावरून असें दिसतें कीं, या शहाजीच्या सैन्यांत घोडदळ व पायदळ मिळून चौदा हजारांची संख्या होती. एवढ्या सैन्यानें सन १६९९ मध्यें ट्रँकेबारला वेढा घातला होता. यावरून उघड दिसतें कीं, ज्याच्या जोरावर राज्याचें महत्त्व व थोरपण अवलंबून असतें त्या सेनेच्या पराक्रमपटुत्वाविषयींहि (दुसरा) शहाजी मोठा दक्ष असे.

शहाजी व तत्कालीन वाङ्मयोत्तेजन.

८ शहाजीच्या कारकीर्दींत वाङ्मयाची इतकी समृद्धी झाली होती कीं, तंजावरचा एकहि राजा या बाब-तींत या शहाजीच्या बरोबरी करूं शकत नाहीं, असें दिसतें. तो स्वतः मोठा विद्वान् व भाषाशास्त्रज्ञ होता. त्यानें शिक्षणाला उत्तेजन दिलें. छापखाने व समृद्ध वाचकवर्ग यांचे अभावीं राजे, सरदार मंडळी आणि लक्ष्मीपुत्र यांनींच विद्येची थोरवी जाणून विद्वानांना उत्तेजन दिलें पाहिजे व त्यांच्या वाङ्मयसेवेचें चीज केलें पाहिजे. लक्ष्मी व सरस्वती यांचें वैर नैसर्गिक असल्यानें अशिक्षित श्रीमंतांना लक्ष्मी फारच प्रिय असते व ते तिला जीवापाड जपतात. सरस्वती-भक्त मात्र बहुशः दरिद्रीच असतात. यामुळें सरस्वतीदेवी ही दारिद्र्यदेवतेची सतत प्रार्थना करून आपल्या भक्तांना नेमतेम जीवंत ठेविण्याचा प्रयत्न करिते.

९ या कारकीर्दीच्या वर्णनात्मक अशीं कांहीं तामिल नाटकें तंजावरच्या पुस्तकालयांत आढळतात. तामिल भाषेंत त्यांना कुथु (कथा ?) म्हणतात.

कांहीं तामिल नाटकें

भूलोकदेवेंद्रविलासम्, अतिरूपवती कल्याणम्, शंकरनारायण कल्याणम्, चंद्रिकाहासविलास नाटकम्, कोरवंजी, विष्णुसहराज विलासम् हीं सर्व नाटकें तामिल भाषेंत आहेत. यांची गणना उच्च वाङ्मयांत होत नाहीं. कारण, यांतील कथानक, विनोद व रचना-पद्धति ही उच्च प्रकारची नसून यांतील कांहीं भाग थोडासा अश्लील आहे. हीं नाटकें बहुदा राजदरबारांत होत असावींत. मराठ्यांची व्यावहारिक भाषा या नाटकांतील पात्रांच्या तोंडीं घातली आहे. एकादी राजकन्या शहाजीवर प्रेम करूं लागते व शेवटीं त्याच्याशीं विवाह लाविते असें साधारण कथानक या प्रत्येक नाटकांत आहे. एकादा मोठा भाषापंडित व योद्धा अशा रीतीचें वर्णन या नाटकांतून या शहाजीराजाचें केलेलें आहे. याशिवाय यांत जो भाग आहे त्यांत एकोजी, शहाजी व सरफोजी यांची विशेषतः स्तुतीच दिसते, व असे भाग मोठे मोठे व विस्तृत आहेत. परंतु ते वाङ्मयाच्या उत्कृष्टपणाचे दर्शक नाहींत.

१० पूर्वी नायक राजांच्या कारकीर्दींत तेलगू भाषेंतहि कांहीं ग्रंथ रचिलेले दिसतात. त्या नायक राजांच्या कारकीर्दीनंतर तंजावरास मराठी राजे झाले त्या मराठी राजांच्या कारकीर्दींत तयार झालेल्या ग्रंथांची माहिती वर दिलीच आहे. या ग्रंथाशिवाय या कारकीर्दींत कांहीं ग्रंथरचना तेलगू वाङ्मयांतहि झाली आहे. परंतु हे ग्रंथहि पूर्वीच्या नायक राजांच्या कारकीर्दींत तयार झालेल्या

या कारकीर्दींतील तेलगू वाङ्मय

तेलगू वाङ्मयाच्या ग्रंथांच्या दृष्टीनें हीनच ठरतात. मराठे हे राज्यकर्ते होईपर्यंत पूर्वीच्या राजदरबारांत तेलगू भाषाभिज्ञ कवी होतेच. अर्थात् मराठी राजांनींहि त्या कवींना दरबारी नोकरींत पुढें चालूंच ठेविलें. होतें. शहाजीनें आपल्या बंधूंच्या मदतीनें मुसलमानांचा पराजय केला, मदुरा हस्तगत केली व बनारस पावेतोंचा प्रांत जिंकिला असें वर्णन सहराज विलास नाटकामध्यें आहे. येथें बनारस पावेतोंच्या विजयाचा उल्लेख झाला आहे, परंतु त्यावरून दुसऱ्या शहाजीनें फारतर एखादे वेळीं काशीची यात्रा केली असेल एवढेंच समजावयाचें आहे. कारण त्यानें उत्तरेकडेस बनारसपर्यंत विजय मिळविल्याचा दाखला ऐतिहासिक साधनांत उपलब्ध नाहीं. विष्णु सहराजविलास् ही तामिल भाषेंतील नृत्य (नाट्या) असून तेलगू लिपीमध्यें लिहिलेली आहे.

संस्कृत वाङ्मय व पंडित

११ सन १६७६ पासून १७३६ पर्यंतच्या सुमारें साठ वर्षांच्या काळांत उच्च दरजाचें संस्कृत वाङ्मय निर्माण झालेलें आहे. धर्मकूट ग्रंथाचा उल्लेख पूर्वीं एकवेळां येऊन गेलाच आहे. दुसरा शहाजी हा सर्वतोपरी श्रेष्ठ राजा असल्याबद्दल त्याची पुष्कळ स्तुती या ग्रंथांत केली आहे. त्र्यंबकराममखी या विद्वानानें रामायणाचा एक नवीन व निराळा अर्थ बसविला आहे. एकोजीनें या कवीची आर्थिक उन्नति करून त्याला आपला पुत्र जो दुसरा शहाजी याचा कारभारी नेमिलें. एकोजीचा मंत्री जो गंगाधर मखी त्याला तीन पुत्र होते. त्यांचीं नांवें त्र्यंबक, नरसिंह व भगवंत अशीं होतीं. पूर्वोक्त त्र्यंबकराम हा या तिघांपैकीं ज्येष्ठ होय. दुसरा भाऊ नरसिंह मखी हा होता. यानेंच त्रिपुरविजय-चंपू

नामक ग्रंथ रचिला. हा नरसिंहराय यांहीं काळपर्यंत एकोजीचा मंत्री होता. (दुसऱ्या) शहाजीनंतर सरभोजी हा गादीवर आला. त्यानेंहि आपल्या दिवाणाच्या जागीं पूर्वोक्त त्र्यंबकरायाला ठेविलें होतें. त्याचा धाकटा भाऊ जो नरसिंह याचा पुत्र आनंदराय मखी यानें आचारनवनीत नांवाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे, त्यावरून असें सिद्ध होतें कीं, सन १६९८ मध्यें त्र्यंबक दिवाणानें शहाजीच्या मदतीनें एक मोठा यज्ञ केला होता. धीधर्म नांवाचा एक ग्रंथ या त्र्यंबकानेंच केलेला आहे. गंगाधराचा सर्वांत लहान पुत्र भगवंत राव याचें नांव वर आलेंच आहे. राघवाभ्युदय नाटक, मुकुंदविलास काव्य आणि उत्तर-चंपु हे ग्रंथ या भगवंतरायानेंच रचिलेले प्रसिद्ध आहेत.

इतर संस्कृतज्ञ पंडित

१२. शहाजीच्या दरबारांत वेंकटकृष्ण दीक्षितार या नांवाचा एक कविशिरोमणि होता. त्यानेंच नटेश विजयम् नाटक लिहिलें आहे. सन १६९३ मध्यें शहाजीनें तिरुवसनल्लूर या खेडें गांवाचें मूळ नांव बदलून शहाजीराजापुरम् असें नवीन नांव ठेविलें व तो गांव आपल्या दरबारांतील सेहे-चाळीस पंडितांना देणगी म्हणून दिला. या सेहेचाळीस पंडितांतच उपर्युक्त वेंकटकवि हा एक होता. हा खेडेगांव विद्वानांचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध होता. कारण भाषा, वाङ्मय, तत्त्वज्ञान व औषधी यांबद्दल तंजावरांतील मराठी कारकीर्दींत हा गांव फार प्रसिद्ध होता. कांहीं नामांकित तेलगू कवि याच गांवांत रहात असत. वेंकट-कवीनें नटेशविजय नाटकाशिवाय श्रीरामचंद्रोदय काव्य, उत्तर

चंपु व कुशलवविजय नाटक हे ग्रंथ लिहिले आहेत. तंजावर येथें राजधानीच असल्यानें तेथें तो प्रसिद्ध होता इतकेंच नव्हे, पण त्रिचनापल्ली व जिंजी या शहरांतील दरबारामध्योंहि तो नामांकित विव्दान् म्हणून विख्यात होता.

शहाजीचे पंडित व त्यांची विद्वत्ता.

१३. शहाजीनें आपल्या दरबारांतील शेहेचाळीस पंडितांना एक गांव इनाम दिल्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्या शेहेचाळीस पंडितांतील आणखी कांहीं विद्वानांची ओळख वाचकांना करून देणें इष्ट आहे. मदनभूषण व गौरीमयूरचंपू हे ग्रंथ आप्पा दीक्षिताचे आहेत. शिवाय या आप्पानें गौरीमयूर नांवाचा एक ग्रंथ लिहून तो त्याचा आश्रयदाता आनंदराय याच्या नांवानें प्रसिद्ध केला. या शेहेचाळीस कवीमध्यें रामभद्रदीक्षित हा कवि सर्वांत श्रेष्ठ होता. त्याची बुद्धिमत्ता सागराप्रमाणें विस्तीर्ण व पाताळासारखी खोल होती. तिरुमलनायकाच्या दरबारांत ज्यानें विद्वत्तेंत अग्रमान मिळविला तो नीळकंठ दीक्षिताचा शिष्य होय. वेदान्ती भगवन्द बालकृष्ण व चोक्कनाथ दीक्षित यांच्या विद्या तर रामभद्रानें सहज ग्रहण केल्या. यांच्यापैकी चोक्कनाथ दीक्षितानें आपली कन्या रामभद्राला देऊन जांवई करून घेतलें. दर्शनशास्त्र, व्याकरण व स्वर यांमध्यें रामभद्रानें लवकरच प्राविण्य संपादन केलें. वस्तुतः अर्वाचीन पतंजली या नांवानें तो प्रख्यात झाला होता. त्यानें अनेक ग्रंथ रचिले आहेत. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख करावयाचें मनांत आणिलें तर जानकी परिणय, शृंगारतिलकाभाण परिभासवृत्तीवरील टीका आणि सद्दर्शन सिद्धांतसंग्रह असा उल्लेख करितां येईल. कुंभकोणम् जवळ कडार-

माणिकम् नांवाच्या गांवचा रामभद्र हा मूळचा राहणारा होता. विद्वानांना या कंडारमाणिकम् गांवांत विद्वत्तेचें बाळकडू मिळत असे. रामभद्र हा विव्दन्मंडळांतील मुकुटमणि म्हणून प्रसिद्ध झाला होता. संस्कृत भाषेच्या इतिहासांत ही त्याची प्रसिद्धी वज्राक्षराप्रमाणें चिरंजीव राहिलेली आहे.

इतर ग्रंथकार

१४. सिद्धान्तसिद्धांजन हा एक वेदान्तपर ग्रंथ आहे. त्यावर रत्नतूलिका नांवाची टीका लिहिणारा भास्कर दीक्षित नांवाचा विद्वान, विद्यापरिणिय व जीवानन्द हे दोन ग्रंथ लिहून ते आश्रयदाता आनंदराय मखीला अर्पण करणारा वेदकवि, सुखसंदेश व अद्भुतदर्पण नाटक यांचा कर्ता महादेव कवि, रसात्मक काव्याचा कर्ता म्हणून आजहि प्रसिद्ध असलेला वेंकटेश उर्फ अय्या अवल, शृंगारमंजरी शहाजीयम् या काव्याचा कर्ता पेरियाप्पा कवि यांचीं श्रेष्ठ स्तुतिस्तोत्रें शहाजीच्या दरबारांतील ज्या नऊ कवींनीं केली आहेत ते नऊ कवी व पेरियाप्पा कवि अशा इतर अनेक प्रसिद्ध कवींनीं तिरुवसनल्लुर येथें शहाजीच्या वदान्यत्वाचा लाभ घेतलेला आहे.

शृंगारमंजरी नाटक

१५. शृंगारमंजरी शाहजीयम् हें नाटक असून तेंच तिरुवइयर येथें उत्सवप्रसंगीं करावें असें ठरलें होतें. हें काव्य शहाजीच्या चरित्रांतील ऐतिहासिक भागावर रचिलेलें आहे. शहाजी एका सुंदरीवर प्रेमानें अगदीं लुब्ध झाला होता असा प्रसंग यांत वर्णिला आहे. या नाटकांत नायिकेच्या सौंदर्याचें आणि नायक तें सौंदर्य पाहून अगदीं भुलून गेल्याचें उत्कृष्ट व नमुनेदार वर्णन आहे. कवि पेरियाप्पा हा एक

विद्वान् घराण्यांतील असून दरबारामध्यें तत्कालीन विद्वच्छिरोमणींच्या मालिकेंतील एक म्हणून प्रसिद्ध होता.

अप्पया दीक्षिताची माहिती

१६. रामराज्याभिषेक नाटक व वल्लीपरिणय यांचे प्रयोग पेरियाप्पाच्या खेड्यांतील उत्सवप्रसंगीं होत असत. तिरुवसनाल्लुर येथील वीरराघव याचें पार्वतीस्तोत्र त्यानें याच काळांत लिहिलेलें आहे. उदार माणिक्य नाटकाचा कर्ता नल्ल कवि होय. या कवीनें राजाज्ञेवरून दुसऱ्या कांडावरहि ग्रंथरचना केलेली आहे. अप्पया दीक्षित हा मयूरगौरीचा राहणारा होता. त्यानें आचारनवनीत नांवाचा ग्रंथ रचिला हें पूर्वीच सांगितलें आहे. या ग्रंथांत जन्मविधि व श्राद्धविधि या संबंधीं माहिती दिली आहे. राजाच्या इच्छेवरून अप्पय्यानें प्रथम एक सारग्रंथ तयार केला व राजानेंहि स्वतः कांहीं भाग रचिलेला आहे, असें म्हणतात. राजाला उद्देशून एक अष्टपदी रचिलेली असून गायनप्रसंगीं ती म्हणतात. असें सांगतात कीं, शहाजी हा उत्कृष्ट ग्रंथकार व परीक्षक असल्यानें त्यास अठराव्या शतकांतील भोज म्हणतात. (पृ. ७ पहा.)

सिंहस्नानाची स्तुति व तंजावराचें अभिनंदन

१७. सन १५५० ते सन १७५० या दोनशें वर्षांच्या काळांत नायक व मराठे यांचें राज्य तंजावरास एका मागून दुसरें असें झालें. या दोनशे वर्षांच्या काळांत वाङ्मय व तत्त्वज्ञान यांचा जो उत्कर्ष तंजावरास झाला त्याचें पूर्णपणें आकलन कोणासहि झालें नाहीं, त्यामुळें त्याचें महत्वहि फारसें लोकांच्या लक्षांत आलें नाहीं. राजकारणदृष्ट्या तंजावर स्वतंत्र नसलें तरी तेथील विद्वानांनीं आपल्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें सर्व दक्षिण हिंदुस्थानचें अग्रेसरत्व मिळ-

विलें होतें. तंजावरचा इतिहास इतर सर्व बाजूंनीं रूक्ष व नीरस असला तरी तेथील विद्वत्समूहाच्या तेजस्वी बुद्धिसामर्थ्यानें तो सत्यशोधकांचें मनोरंजन करीत असतो व म्हणून एखादा भाग वाळवंटांतील सुपीक प्रदेशाप्रमाणें आल्हाददायक आहे यांत संशय नाहीं.

भोसल्यांचें विरक्त जीवन.

१८. अद्वैतकीर्तन या नांवाचा एक ग्रंथ तामिल भाषेंत लिहिलेला आहे. त्यावरून, शेवटीं शेवटीं शहाजी हा संसाराला कंटाळून योगी झाला असावा असें वाटतें. जगांत राहून विरक्त असण्याची मनोवृत्ति शिवाजी पासून दृश्यमान् होत असून ती एकोजी व शहाजी यांच्यामध्येंहि होती. महाराष्ट्रीयांच्या प्रमाणेंच भोसले घराण्यांतील व्यक्तींच्या मनावरहि असलेलें साधूंचें नैतिक वजन (तंजावराकडेस सुद्धां) भोसल्यांच्या मनावर कायम असल्याचें दृश्यमान होतें. शहाजीच्या कारकीर्दींत भोंसलवंशावळी नांवाचा एक संस्कृत ग्रंथ झालेला आहे; त्यावरून असें दिसतें कीं, शहाजीची एक भगिनी मोठी योगिनी होती. अद्वैत कीर्तन नांवाचा दुसरा एक ग्रंथ आहे, त्यावरून शहाजी हा, परब्रह्मानंदयोगी व त्याचा शिष्य पूर्णब्रह्मानन्दयोगी या साधु पुरुषांचा मोठा भक्त होता असें दिसतें. योगी पूर्णब्रह्मानन्द हा प्रायश्चित्तदीपिका व उपग्रंथदीप या ग्रंथांचा कर्ता पूर्वाश्रमांतील अप्पाशास्त्री होय. हा मंदारमाणिक्यमचा राहणारा होता. कृष्णानन्द सरस्वती हा सिद्धान्त सिद्धांजन या वेदान्त निबंधग्रंथाचा लेखक होय. या ग्रंथांत अद्वैत तत्त्वांचें प्रतिपादन केलेलें आहे. त्रिपुर उपनिषद् भाष्याचा कर्ता रामानन्द हा बहुदा या कृष्णानंदाचा शिष्य असावा. शहाजीच्या कारकीर्दींतील

भास्कर दीक्षित हा या कृष्णानंदाचा गुरु होता. दीक्षित गुरूनें कृष्णानंद शिष्याच्या ग्रंथावर एक टीका लिहिली आहे. नंतर सुमारें पन्नास वर्षांनीं सदाशिव ब्रह्मेंद्र हा एक महात्मा होऊन गेला. धावडशीकर ब्रह्मेन्द्रस्वामी तो हा नव्हे. या महात्मा ब्रह्मेंद्रानें ब्रह्मतत्त्वप्रकाशिका नांवाच्या ग्रंथांत ब्रह्मसूत्रांचें विशदीकरण केलें आहे. या शिवाय अद्वैततत्त्वज्ञानांत परंपरागत ज्ञान प्राप्त झालेल्या कांहीं यतींचीं नांवेंहि आपण ऐकितों. ज्ञानसूर्याच्या प्रकाशानें जगांतील अज्ञानांधकाराचा नाश करण्याचें कार्य परमेश्वरानें शंकराचार्यास सोंपिलें आहे अशी इकडील श्रद्धावन्त लोकांची समजूत आहे. कुंभकोणम् येथील एक आचार्य-पीठ प्रसिद्धच आहे. या पीठावरील शंकराचार्यांना आपल्या कर्मा-संबंधीच्या कर्तव्यांत वर सांगितलेल्या विद्वान् यतींची फार मदत होत असे. अप्पया दीक्षितानंतर तत्त्वज्ञानविषयक पूर्वोत्तरपक्षयुक्त तत्त्वज्ञानात्मकअभ्यासाचा पुनरपि पुरस्कार करण्यांत आला. मराठी राजांनां अद्वैत मताचा अभिमान पुष्कळच असल्यानें त्यांनीं त्या मताचा केलेला पुरस्कार दीर्घकाळजीवी आहे असें आज तरी वाटतें.

मराठी राजे व तामिल वाङ्मयाची आबळ.

१९. तंजावर येथील मराठ्यांच्या कारकीर्दींत साधारणतः तामिल वाङ्मयाला उत्तेजन मिळालें नाहीं, असें खेदानें म्हणावें लागतें. संस्कृत व तेलगू वाङ्मयाचें पुनरुज्जीवन झालें, परंतु तामिल वाङ्मयाला हें सद्भाग्य लाभलें नाहीं. नवीन म्हणजे मराठी राज्यकर्त्यांनीं नायक राजांचेंच वाङ्मयासंबंधीचें ब्रीद पुढें चालविलें असेंच म्हटलें पाहिजे. कारण तामिल भाषेकडेस नायक राजांनींहि दुर्लक्ष्यच केलें होतें,

परंतु तामिल भाषेला उत्तेजन देण्याचें कार्य मठाधीशांनीं अव्याहतपणें मात्र चालविलें होतें. अशा रीतीनें उत्तेजन मिळालेल्या तामिळ वाङ्मयांतील उत्कृष्टपैकीं स्थलपुराणें, शैववैष्णवमतानुयायी पवित्र वाङ्मयाचें सार, त्यावरील टीका व कमी प्रतीची कांहीं नाटकें अशीं वाङ्मयविषयक कित्येक उदाहरणें देतां येतील. बुद्ध व जैन यांच्या भरभराटीच्या वेळीं उच्च व अनेकविध तामिळ वाङ्मय अस्तित्वांत आलें. त्याच्या खालोखाल मिशनरींच्या चळवळीनें प्रचलित तामिल भाषेची अभिवृद्धि झपाट्यानें झाली यांत संशय नाहीं.

कांहीं तामिल ग्रंथ व ग्रंथकार

२०. अशा या रूक्ष कालखंडांतहि सन १७०० मधील वेदारण्यनचें थायुमनवर व सन १७५० मधील एका कवीचें अरुणाचलकविरापुर हीं काव्यें अपवादरूपानें कां होईना पण निर्माण झालीं हें सत्य आहे. थायुमनवर हें काव्य उत्कट मनोविकार असले व तन्मयता प्राप्त झाली तरच उत्कृष्ट म्हणतां येतें. या आपल्या विपुलवाङ्मयकर्तानें मद्रासेकडे **शियाली** हा सर्वतोमुखीं झालेला आहे. सन १६८० मधील तिरुवरचा **वैद्यनाथ देसीकर** आणि **स्वामिनाथ देसीकर** यांच्यासारखे विद्वच्छिरोमणी, तिरुवादुथुराईचा अनेक शास्त्रवेत्ता **तंबिरण** सन १७८२ मधील **शिवज्ञानस्वामिगल** इत्यादि विद्वानांची नामावली आपआपल्या तामिल वाङ्मयविषयक कृतीनें मद्रासेकडेस अमर झाली आहे. मिळैशतकम् या ग्रंथाचा कर्ता कवि **शर्करपुलवर** हा प्रतापाच्या कारकीर्दीचा उल्लेख करीत असल्यानें दुसऱ्या एका तामिल विद्वान् कुटुंबाचा आपणांस बोध होतो.

२१ या कारकीर्दीत कांहीं ग्रंथ मराठी भाषेंत झालेले आज उपलब्ध आहेत. कांहीं भाषांतरें, कांहीं स्तुतिविषयक ग्रंथ व थोडे स्वतंत्र ग्रंथ अशी मराठी भाषेंतील विविध ग्रंथरचनाहि या काळीं झालेली आहे. मुख्यतः दक्षिण महाराष्ट्रांतून मराठी वाङ्मयाची पुरवणी तंजावरास भरपूर होत असे.

मराठी ग्रंथरचना.

२२ तंजावरचा राजा खिस्ती लोकांच्या विरुद्ध आहे, त्यानें खिस्ती लोकांवर डोईपट्टी बसविली, त्यानें खिस्त्यांना छळिलें व त्यांना आश्रय ज्यांनीं तसें शेजारच्या संस्थानिकांनींहि छळावें असा प्रयत्न केला असें मनुची म्हणतो. परंतु मंगम्माल + ही जवळच्याच मदुरा व त्रिचनापल्लीची राणी फार शांत स्वभावाची होती. पश्चात्कालीन श्वार्ट्झ (Schwartz) प्रमाणेंच पूर्वकालीन मनुची हाहि साधारणतः तंजावरच्या कारभाऱ्यांचा धार्मिकपणा व ख्रिस्तीधर्माविषयीं त्रयस्थपणा यांबद्दल त्या ब्राह्मणांना नांवें ठेवितो. राजाच्या मंत्रीवर्गांत ब्राह्मणांचाच भरणा असल्यामुळें राजा त्यांच्याच तंत्रानें मोठा धर्माभिमानि असे. खिस्ती लोकांना त्रास न देण्याविषयीं दाउदखान फौजदारानें शहाजीला लिहून कळविलें होतें.

मराठी राजे व खिस्ती लोक

+ चोक्कनाथ नायक (स १६६०–१६८२) या राजाची ही राणी होय. राजाच्या पश्चात हीच राज्यकारभार पाहूं लागली. सन १६९८ च्या सुमारास तिनें त्रावणकोरवर विजय मिळविला. पुढें सन १७०४ मध्यें विजयरंग नायकानें मदुरेचा कारभार हातीं घेतला व या मंगम्माल राणीला उपाशीं ठेवून जीवें मारिलें. या विजयरंगाची व एक पत्नी मीनाक्षी राणी होय.

खिस्ती लोकांचे अपराध.

२३ वस्तुस्थिति अशी होती कीं, खिस्ती लोकांनीं तंजावरच्या प्रजेंतील जाती व वर्ग यांच्यांत द्वेष उत्पन्न केला होता. पोर्तुगिज मिशनरी हे हिंदु-पद्धतीचा पोषाख करून स्वतःस रोमन ब्राह्मण म्हणवीत व भोळ्या लोकांना भुरळ पाडीत. पांडिचरी येथें यांनीं ब्राह्मण वस्तीमध्यें खिस्ती लोकांना राहण्यासाठीं दोन इमारती बांधिल्या होत्या व हे खिस्ती मिशनरी (धर्मोपदेशक) हिंदूंच्या देवळांत जाऊन धर्मोपदेश करूं लागले होते. खिस्ती लोकांनीं कुडलोर येथें एका नाटकांत हिंदुदेवतांचीं पात्रें घालून अनिर्वचनीय चेष्टा केली होती. हें नाटक तंजावर येथेंहि राजासमोर करण्यांत आलें. असले हे प्रकार तंजावरच्या राज्याच्या बाहेर घडले होते तरी त्या योगानें राजा व प्रजा यांचा चित्तक्षोभ होणें साहजीकच होतें. त्याचा परिणाम कदाचित् खिस्ती लोकांवर कांहीं होणें अपरिहार्य झालें असेल. साधारणतः तंजावरचे राजे हे फार शांत व सहनशील होते. त्यांनीं डेन्स आणि डच यांच्या धार्मिक बाबतींकडेस आरंभापासून दुर्लक्ष्यच केलें. जेव्हां व्यापारीलोक कर देण्याची चुकवाचुकव करीत तेव्हां मात्र राजाला आपला अधिकार वापरणें भाग पडत असे व कदाचित् इतर गुन्हेगार व्यापाऱ्यांबरोबर खिस्ती गुन्हेगार व्यापाऱ्यांनाहि शासन होत असेल. खिस्तीलोक संख्येनें वाढले, त्यामुळें धार्मिक दृष्ट्याहि पूर्वीच्या प्रमाणानें त्यांचें संख्याधिक्यच झालें. त्यांच्या एकीचें बंधनहि भक्कम असे. परदेशच्या व्यापाऱ्यांना ते राजा किंवा प्रजा यांच्याहून अधिक जवळचेच असत. अशा एकंदर कारणामुळें मनुची वगैरेनीं तंजावरच्या राजाविरुद्ध एकतर्फी हकीकती ऐकून त्याच सत्य मानून लिहून ठेविलेल्या आज आपणां-पुढें असाव्यात.

प्रकरण ५ वें

पहिला सरभोजी (सन १७१२–१७२८)

व

तुकोजी (सन १७२८–१७३६)

मुद्दे

१ मरवाचा राजा व त्याचे वारस यांच्या भानगडी.
२ कावेरीचा धक्का व रामनदाचे वारस.
३ आनंदरायराचा शाप व अंत.
४ सरभोजीच्या राणीचें कपट, तिसऱ्या मुलाचा अन्त व क   राजा
५ तुकोजीला राज्यप्राप्ति व त्याची विद्वत्ता.
६ तुकोजींचें इतर राजकारण.
७ मीनाक्षी, चंदासाहेब व तंजावरावरील संकट.
८ दिवाणाची असमर्थता व तुकोजीच्या पश्चात् इतर भानगडी.
९ तंजावरांतील भानगडीचा कालखंड.

मरवाचा राजा व त्याचे वारस यांच्या भानगडी

१ स्वराज्य व परराज्य अशा दोन्हि राजकारणाचा कित्ता दुसऱ्या शहाजीनें जो घालून दिला होता त्याचेंच अनुकरण सरभोजीनें व तुकोजीनेंहि वारसाईच्या नात्यानें केलें. मरवाचा राजा किलावन यानें एक मुलगा दत्तक घेतला होता. त्याचें नांव रघुनाथ असें होतें. हा रघुनाथ सन १७२० मध्यें निवर्तला. पुढें दुसरा मुलगा विजयाहि मरण पावला. तेव्हां गादीच्या वारसाईबद्दल यादवी सुरू झाली. त्यामुळें सर्व मरव संस्थान मोठ्या घोंटाळ्यांत पडलें. किलावनाच्या रखेलीचा मुलगा

भवानीशंकर व **तांडदेव** हे दोन वारस पुढें आले होते. तंजावरच्या मराठी राजांनीं **भवानीशंकराचा** पक्ष घेऊन त्याला गादीवर बसविण्यांत विजय संपादिला. या मदतीबद्दल भवानीशंकरानें तंजावराच्या उत्तरेकडील पंबर नदीजवळील प्रांत मराठी राजास देण्याचें वचन प्रथम दिलें होतें. परंतु **भवानीशंकरास** राज्यपद प्राप्त झाल्यावर त्यानें तें पाळिलें नाहीं म्हणून तंजावरकरराजांनीं **तांडदेवाला** मदत केली. **भवानीशंकराच्या** सैन्याचा मराठ्यांनीं पराजय केला व मरवाच्या राज्याची सुव्यवस्था लावून दिली. ठरल्याप्रमाणें तंजावरच्या उत्तरेकडील प्रांत मराठी राजांना न मिळाल्यामुळें त्यांनीं हा खटाटोप केला होता. मरवाच्या राज्याची सुव्यवस्था लाविल्यानंतर त्या औदिच्य प्रांताचे तीन विभाग करून एक तंजावरकरांस देण्यांत येऊन बाकीच्या दोहोंचा समावेश प्रस्तुतच्या रामनाद व शिवगंगा-भूमी यांच्या इनामी भागांत विभागून देऊन समाविष्ट केला. याव-रून शिवगंगा संस्थानच्या उत्पत्तीचें मूळकारण तंजावरचे मराठे राजे होत. त्यांनीं मदुरेशीं युद्ध करून विजय संपादिला. रामनाद नाम-शेष केलें व मदुरेच्या राज्याचा अपकर्ष प्रकट केला. याप्रमाणें मदु-रेचा अपकर्ष झाल्यामुळेंच **सरभोजीनें** रामनादाच्या + राजकारणांत यशस्वी रीतीनें मध्यस्थी केली. दळवई **आनंदरायर** साहेब नांवाचा एक मंत्री तंजावरचा कारभार पाहत असे. त्यानें

+ ही जहागीर मदुरेच्या पूर्वेकडे व दक्षिणेकडेस आहे. हिच्यांत रामनाद तिरवादानाई, परमगादी, तिरुपल्ली आणि मुदुकुलत्तर अशा जमीनदारी तहशिली आहेत. येथील संस्थानिक मरवन जातीचे आहेत, यांस सेतुपति ही पदवी आहे. **रघुनाथ** किलावन हा प्रख्यात संस्थानिक झाला. याच्या नंतरच वारसाईचा तंटा होऊन सन १७२५ चे सुमारास त्याचे तीन भाग झाले त्यांचें वर्णन मूळांत दिलेंच आहे

तीनहि भावांची दिवाणगिरी यशस्वीपणें केली. तो मोठा विद्वान् म्हणून प्रसिद्ध आहे. रामनाद येथें वारसाईच्या हक्कासाठीं यादवी चालत असतांना वारसांपैकीं भवानीशंकराला प्रथम तंजावरकरांनीं साहाय्य दिलें. पण पुढें तो राज्यावर बसल्यानंतर त्यानें जेव्हां आपलें वचन भंग केलें तेव्हां तंजावरकरांनीं तोंडमानाला मदत दिली. त्यावेळीं त्यांच्या प्रतिकारासाठीं भवानीशंकरानें मदुरा व पुदुकोट्टाई येथील संस्थानिकांच्या फौजा बोलाविल्या हें पाहून पूर्वोक्त आनंदरायरनेंच तंजावरच्या फौजेला पेशव्यांचें साहाय्य मिळवून देऊन भवानीशंकराच्या व त्याच्या साहाय्यकर्त्यांच्या सैन्यसंघाला सामना दिला. एका संस्कृत नाटकावरून असें म्हणतां येईल कीं, दुसऱ्या शहाजीच्या कारकीर्दीत या आनंदरायर कडेस धर्माधिकारी हें पद होतें. सरभोजीच्या कारकीर्दीत निराळ्या जागेवर याची नेमणूक होऊन राघोपंडित दिवाण हा सुभेदार नेमिला गेला.

कावेरीचा धक्का व रामनदाचे वारस.

२ तंजावर येथील पुस्तकालयांत अद्वैत कीर्तन या नांवाचा एक तामिल भाषेतील हस्तलेख आहे. त्यांत असें आहे कीं, कावेरी नदीच्या धक्क्याला एकदां चीर पडली होती. ती चीर बुजवून धक्का दुरुस्त करण्याची परवानगी मदुरेच्या नायकराजानें देणें अवश्य होतें. परंतु परवानगी मागितली असूनहि नायकराजानें नाकारिली. यानंतर तिकडेस अवर्षण व दुष्काळ पडले त्यामुळें त्या धक्क्याची दुरुस्ती झाली. कावेरी नदीचा हा धक्का पाडून टाकण्यासाठीं कांहीं दुर्जन आले होते. पण सरभोजी राजानें त्यांच्याशीं युद्ध केलें. यासंबंधानें सरभोजीचरित्र या संस्कृत ग्रंथांत राजाची

स्तुति केली आहे. या ग्रंथाची हस्तलिखित प्रत तंजावर येथील पुस्तकालयांत आहे. रामनादाच्या गादीबद्दल जें युद्ध चाललें होतें त्याशीं कावेरी नदीच्या या धक्क्याचा संबंध होता. कावेरी नदीचा धक्का कारिकालानें बांधून मोठी कीर्ति संपादन केली होती. व ती तामिल कवींच्या काव्यांतूनहि अवतीर्ण झालेली दिसते. या धक्क्याच्या नाशानें विध्वंसकांच्या कर्तृत्वाचीहि अशीच विस्तृत व निरंतरची पताका उभारली जाईल अशी समजूत होती, या गोष्टीचा उल्लेख करणें आवश्यक वाटतें.

आनंदरायराचा शाप व अंत.

२. सरभोजी हा मोठा धर्मात्मा व दाता होता अशी प्रसिद्धी आहे. आनंदरायर साहेब दलवाय हा सरभोजींचा धर्माधिकारी होता, असें पहिल्याच दालनांत सांगितलें आहे. या धर्माधिकाऱ्यानें तिरुवैयारुमध्यें अंगमरम् व तिरुवाडियारुमध्यें सरभोजीराजापुरम् यासारखे अग्रहार (मनुष्य वस्तीस योग्य अशीं घरें वगैरे बांधणें व त्यांत खाद्यपेय ठेवणें.) दिले अशी प्रसिद्धी आहे. यानेंच कावेरी नदीचा एक कालवा बांधून त्याला अय्याक्क्या-मारु असें स्वतःचें अनुलक्षून नांव दिलें आहे. यानंतर तंजावरच्या दरबारांत या आनंदरायरास सरखेल ही पदवी मिळाली. सरभोजी राजाला पुत्र झाल्यावर या सरखेलानें एक सोन्याचा पाळणा राजास नजर केला. यानंतर कांहीं अप्रसिद्ध कारणांनीं राजानें याला कैदेंत टाकून पोषणासाठीं फक्त मीठभातच देण्याचा हुकूम केला. हें पाहून या ब्राह्मणानें राजाला ' तिरुवैयारु येथील मंदिरांतील प्रचंड घंटा तुटून पडेल व राजवाड्याच्या उत्तरेचा कोट पडून जाईल ' असा शाप दिला व नंतर स्वतःची जीभ

ओढून प्राणत्याग केला. आश्चर्य हें कीं, आजहि ती घंटा योग्यस्थळीं टांगलेली नाहीं व राजवाड्याच्या उत्तरेचा बुरुज पडकाच आहे. दुसरी अशीहि एक दंतकथा प्रचलित आहे कीं, राजानें या आनंदरावर दैव्याला बंधमुक्त केलें व तो परत आपल्या गांवीं जात असतांना वाटेंतच मृत्यु पावला. मद्रास येथील तामिळ भाषेच्या हस्तलिखित संग्रहांत मॅकेन्झी नामक ग्रंथ आहे. त्यांत अय्यावय्यासंबंधीं असा लेख आहे कीं, त्यानें संपत्ति शोधून काढिली, तिरुवेंकलु येथें एक मंदिर दुधारलें आणि नित्येक रकमा धर्मदाय देऊन मृतांच्या क्र्याहि बांधविल्या. परंतु पूर्वोक्त प्रकारें अय्याचा शोकदायक शेवट झाला असें या ग्रंथांत लिहिलेलें नाहीं. हा ग्रंथ सन १८१८ मध्यें लिहिला असावा. असो. प्रस्तुत ब्राह्मणधर्माधिकारी हा विद्वानांचाहि मोठा आश्रयदाता होता. या आनंदरावाच्या नांवावर वेदकवीनें विद्यापरिणय नांवाचें एक नाटक लिहिलें असून तें तंजावरास आनंदवल्ली देवीच्या उत्सवांत करण्याचा प्रघातच पडला होता. एका व्यक्तीचें विद्येशीं लग्न लागल्याचा कथाभाग या नाटकांत आहे. एकोजीच्या दिवाणाचा मुलगा जगन्नाथ यानें सभराजविलास व रतिमन्मथ (हीं नाटकें) लिहिल्याचें आढळतें. शिवभारत हा संस्कृत ग्रंथ असून त्यांत शिवाजी व त्याचे पूर्वज यांची महत्त्वाची माहिती आहे असें म्हणतात. या ग्रंथांत शिवा-जीचें चरित्रहि आहे. (हा ग्रंथ जुना असावा.) याच कारकीर्दींत या ग्रंथाचें तामिळ भाषांतर झालें असावें. तें तामिळ भाषांतर शिवाजी चरित्रम् या नांवानें प्रसिद्ध आहे. या शिवभारत ग्रंथाची एक नक्कल महाराष्ट्रांत आणून आतां (१९३२) प्रसिद्ध करण्यांत आली असून, त्यांतील एका उल्लेखाच्या आधारानें सन १६२७ मधील

शिवजन्म चुकीचा ठरविण्याचा प्रयत्न चालू आहे. बृहदीश्वर शिलालेखांत शिवाजी व व्यंकोजी यांचे जन्म शके १५५१ मध्यें झाल्याचें लिहिलें आहे. त्याच धोरणानें या शिवभारतांत दिलेला **शिवजन्म** शके१५५१ हाच खरा असावा असें कित्येक मानितात. शिवभारताची अस्सल प्रत आपणांपुढें नाहीं. हातीं आलेल्या नकलेंत शके १५५१ च्या फाल्गुन वद्य ३ तृतीयेस शिवाजीचा जन्म झाल्याचें लिहिलेलें आहे. तंजावराच्या शिलालेखांत हाच शक व्यंकोजीच्याहि जन्माचा दिलेला आहे. व्यंकोजी लहान भाऊ होता हें सर्वमान्यच असल्यानें त्याचा जन्म त्याच शकांतील बाकीच्या बारा तेरा दिवसांतच झाला असावा व त्यावरून त्या शकाच्या वैशाख-जेष्ठांत शहाजी हा जिजाबाई व तुकाई या दोनाहि पत्न्यांसह राहत असावा असें सिद्ध करणें प्राप्त आहे. तसें सिद्ध होईपर्यंत नवीन शिवजन्मतिथि ग्राह्य करण्यांत घाई होईल. शिवदिग्विजय नांवाच्या बखरींत शके १५५३ 'प्रजोत्पत्ति'ताक्षी' संवत्सर हा व्यंकोजीचा जन्म-शक सांगितला आहे. परंतु शिलालेख हा बखरींपेक्षां अधिक प्रमाणभूत असतो व बखरींतील शक आणि संवत्सर यांचा मेळहि नाहीं, यामुळें बखरींतील काल चुकीचा होय यांत शंका नाहीं. शिवाजीचा जन्म--शक तंजावराकडेस सरासरी तीन वर्षांनीं पुढें ढकलला आहे, त्याच प्रमाणें व्यंकोजीचाहि जन्म शक महाराष्ट्रांत सरासरी दोन वर्षांनीं उशीरा झाल्याचें लिहिलें आहे हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. असो.

सरभोजींच्या राणीचें कपट तोतया मुलाचा जन्म व कट्टु राजा.

४ सातारच्या एका कुटुंबांतील मुलीशीं सरभोजीचा विवाह झाला होता. सरभोजीस संतती झाली नाहीं. मराठी शिलालेखांत (प. १) असें लिहिलें आहे कीं, सरभोजीच्या दुसऱ्या राणीनें गरोदर असल्याचें सोंग केलें होतें. पुढें दहा महिन्यांनीं तिला एक मुलगा झाल्याचें प्रसिद्ध करण्यांत आलें. त्या मुलाचें नांव सवाई शहाजी असें सांगण्यांत आलें होतें. तंजावर किल्ल्यावरील कुप्पी अथवा रूपी नांवाची एक परीट स्त्री होती तिचा हा मुलगा होय, परंतु त्याला राजपुत्र बनविण्यांत आलें. कदाचित राजा सरभोजीचा व रूपी परटिणीचा कांहीं संबंध असेलहि परंतु तो प्रसिद्ध नव्हता. कांहींहि असलें तरी हा मुलगा खरा राजपुत्र नव्हे अशी शंका सरभोजींचा बंधु तुकोजी याला आली होती व ती त्यानें सरभोजी राजाच्या कानावरहि घातली होती. त्यामुळें राजाच्या हुकुमानें त्या मुलाला दूर नेण्यांत आलें. कदाचित् ठारहि केलें असावें अशी लोकवार्ता आहे. दुसरी एक दंतकथा अशी प्रचलित आहे कीं, राजानेंच त्या अर्भकाला ठार मारिलें व जिनें ढोंग केलें होतें त्या दुसऱ्या राणीचा त्याग केला. कुकोजी हेंहि त्या मुलाचें दुसरें नांव होतें. पुढें कट्टुराजा या नांवाचा एक तोतया उत्पन्न झाला होता व तो आपण लहानपणीचा कुकोजी अथवा सवाई शहाजी असून प्राणांतातून बालपणींच बचावून रानांत वाढल्याचें सांगत होता.

तुकोजीला राज्यप्राप्ति व त्याची विद्वत्ता.

५ सन १७२८ मध्यें **सरभोजी** निवर्तला. त्याची एक राणी सती गेली, (**सुलक्षणाबाई** व **राजसबाई** अशा दोघी राण्या सती गेल्या असें शिलालेखांत आहे.) **सरभोजी** नंतर **तुकोजी** हा राज्यावर बसला. सोबतच्या शिलालेखावरून **तुकोजीनें** आठ वर्षें राज्य केलें असें दिसतें. पण मद्रास येथील एका हस्तलिखित पत्रांत **तुकोजीनें** सहा वर्षें राज्य केलें असा उल्लेख आहे. **तुकोजी** हा मोठा भाषाशास्त्रज्ञ होता. त्यानें आपल्य राज्यांत हिंदुस्थानी पद्धतिचें गायन सुरू केलें. **तुकोजीनें** संगीत सारामृत नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे त्यावरून तो गायनकलभिज्ञहि होता असें दिसतें. त्याचा खाजगी कारभारी **घनश्याम पंडित** यानें भवभूतीच्या उत्तररामचरित्रावर एक टीका लिहिली आहे. याच समयास **मनंभट्ट** नांवाचा एक विद्वान् गृहस्थ होऊन गेला. तो प्रचंड संस्कृतग्रंथलेखक असून उत्कृष्ट पुस्तकांचाहि संग्राहक होता. **घनश्याम** हाहि दुसरा एक मोठा लेखक म्हणून प्रसिद्ध होता. आपण चौसष्ट ग्रंथ लिहिले असें तो म्हणतो. त्याच्या दोन पत्नी **सुंदरी** व **कमला** यांनींहि एका संस्कृत नाटकावंर एक टीका लिहिली आहे.

तुकोजीचें इतर राजकारण.

६ रामनादाच्या संस्थानिकावर **सरभोजीनें** एक यशस्वी मोहिम चढविली होती, ती **तुकोजीनें** मागें घेऊन **सरभोजीच्याच** कारकीर्दींत सलोखा घडवून आणिला हें मागें सांगितलेंच आहे. अद्वैत कीर्तनांत असें म्हटलें आहे कीं, आपण स्वतः राज्याचा वारस आहोंत असें ठरविण्यासाठीं

भवानीशंकरानें तुकोजीची मदत घेतली होती व त्यानें त्याला सहाय्यहि केलें होतें.

मीनाक्षी, चंदासाहेब व तंजावरवरील संकट.

७ त्रिचनापल्लीची राणी **मीनाक्षी** हिच्या विरुद्ध पाळेगारांनीं बंड उभारिलें. तेव्हां **तुकोजीनें मीनाक्षीस** मदत केली होती असें मद्रास येथील एका हस्तलेखावरून व शिलालेखावरून (प. १) दिसतें. वादनकलेवर **तुकोजीचा** एक ग्रंथ आहे. त्यांत 'मदुरेमध्यें मुसलमानांचा पराजय, व मदुरा हस्तगत करण्याचा पराक्रम **तुकोजीनें** केला होता, असें म्हटलें आहे. परंतु हें असले काव्यमय उल्लेख तात्पर्यतःच इतिहासक्षेत्रांत येतात. त्यावरून आपणांस असें सांगतां येईल कीं, सन १७३४ मध्यें **चंदासाहेबानें** मदुरेवर पहिलीच स्वारी केली व तींतच त्याचा पराजय व्हावयाचा, कारण **मीनाक्षी** राणीला **तुकोजीनेंहि** सहाय्य दिलें होतें. परंतु **चंदासाहेबानें** उघडपणें समोरासमोर युद्ध करण्याऐवजीं युक्तिप्रयुक्ति व विश्वासघात यांच्या जोरावर सन १७३६ मध्यें त्रिचनापल्लीस आपली सत्ता प्रस्थापित केली. (मदुरा व त्रिचनापल्ली असें एकच राज्य झालें होतें.) मदुरेच्या नायकांच्या शेजारचीं संस्थानें नामशेष झालीं, त्यामुळें तंजावरच्या मराठी राजांस मोठाच धक्का बसला. दोन मुसलमानी सत्तांमध्यें तंजावर हें संस्थान सांपडल्यामुळें यावनीसत्तेमध्यें त्याला विलीन होणें भाग पडलें. कोंडींत सांपडल्याप्रमाणें तंजावर हें संस्थान अडकलें गेल्यामुळें मुसलमानी सत्तेंत सामील झालेल्या हिंदुसंस्थानांत त्याची आणखी एक भर पडली. कसेंहि असो, तूर्त तरी तंजावरानें मोठ्या कष्टानें आपलें जीवित राखिलें होतें. या प्रसंगीं तंजावरास

एका दूरदृष्टी व शूर अशा कर्तृत्ववान् राजाची आवश्यकता होती. परंतु तेथें अंतःकलह असून, अनेक पंथ व कपटपटुता यांनीं युक्त अशा ढोंगी लोकांनीं तंजावरचें राज्य या समयास अगदीं व्यापून टाकिलें होतें.

दिवाणाची असमर्थता व तुकोजीच्या पश्चात् इतर भानगडी.

८ या प्रसंगीं तंजावरास एक चेट्टी (श्रेष्टी=व्यापारी) दिवाण-पदावर होता, व त्याचेंच वर्चस्व एकंदर राजकारणावर होतें. त्याचा बुद्धिवाद व उपदेश अगदींच अहित परिणामी असल्या-मुळेंच तंजावरची प्रजा त्यावर अगदीं नाराज झाली होती. हा प्रकार तुकोजीच्या कारकीर्दीच्या शेवटीं घडून आला. राज्याची मालकी कोणी घ्यावी याच प्रश्नानें तुको-जीच्या पश्चात् इतर सर्व प्रश्न मागें पडले. तुकोजी गादीवर बसला तेव्हां त्याचा मुलगा एकोजी (दुसरा) हा चाळीस वर्षांचा होता. तुकोजीला सयाजी नांवाचा निराळाच एक राज्याधिकारी पुत्र होता, अशी एक समजूत आहे. या दोघांशिवाय एका नायडू जातीच्या रखेलीच्या पोटीं तुकोजीला मुलगे झाले होते. परंतु यांतील दोघे पूर्वींच मरण पावले होते व एकच हयात होता. अन्नपूर्णा नांवाच्या खांडाराणीच्या पोटीं तुकोजीला प्रताप नांवाचा एक पुत्र झाला होता. तंजावरच्या लोकप्रिय व प्रसिद्ध राजांच्या नामावळींत हा **प्रतापच** शेवटचा राजा होय.

तंजावरांतील भानगडींचा काळखंड.

९ तंजावरच्या इतिहासांत सन १७३६ तें सन १७३९ पर्यंतचा तीन चार वर्षांचा कालखंड अज्ञानांधकारमय राज्याधिकारासंबंधीं कलहपूर्ण, अराजनिष्ठांना भरभराटीचा व ढोंग्यांच्या अस्तित्वाला पोषक असा होऊन गेला.

प्रकरण ६ वें.

अराजकता सन १७३६ ते १७३९.

मुद्दे.

१ व्यंकोजीचा पराक्रम, संशयी स्वभाव आणि मृत्यु.
२ सय्यदाच्या आधारावर तोतयाचें प्राबल्य.
३ सुजानबाईस कैद.
४ तोतयास पुनः राज्यप्राप्ति, प्रतापाचें राज्यारोहण.
५ इतिहासकारांचा मतभेद.
६ सयाजींची माहिती.
७ तोतयासंबंधीं कांहीं लेख.

एकोजीचा पराक्रम, संशयी स्वभाव आणि मृत्यु.

१ (दुसरा) **एकोजी** ऊर्फ **बाबासाहेब** यानें फक्त एकच वर्ष राज्य केलें असें तंजावर येथील शिलालेख व मद्रास येथील हस्तलिखित यांवरून दिसतें. आपल्या विरुद्ध कांहीं कट होत आहे कीं काय ? या संशयांतच तो नेहमीं असे. **वेंकोजीच्या** कारकीर्दीपासून तंजावरास **सय्यद** या नांवाचा एक किल्लेदार होता. तोच या (दुसऱ्या) **एकोजीच्या** कारकीर्दींत जवळजवळ खरा सत्ताधारी बनला. किंवा अक्षरशः राज्यपददाता (Kingmaker) या पदवीस पोंचला. ही पदवी त्या **सय्यदाला** चार वर्षेंपर्यंत उत्तम प्रकारें शोभते. दुसऱ्या **एकोजीच्या** कारकीर्दीमध्यें गुप्त कट नुसता वाहत होता व शेवटीं एका गुप्त कटाला तो बळीहि पडला, हें मात्र फार विलक्षण झालें. मरणसमयीं या एकोजीचें वय एकेचाळीस वर्षांचें होतें. सन १७३६ मध्यें

चंदासाहेबानें त्रिचनापल्लीला जात असतांना मध्येंच तंजावरावर स्वारी केली. यासमयीं **एकोजी** हा फार आजारी होता. तथापि, त्यानें **चंदासाहेबाशीं** लढाई करून त्याला पळावयास लाविलें. मद्रास येथील हस्तलिखितावरून दिसतें कीं, यावेळीं तंजावरचा खजिना अगदीं रिकामा झाला होता व राज्यव्यवस्था नीट चालविण्यासाठीं एका मंत्रीमंडळाची योजना **एकोजीनें** केली होती. परंतु कांहीं तारक मार्ग या मंत्रीमंडळीलाहि काढितां आला नाहीं.

सैय्यदाच्या आधारावर तोतयाचें प्राबल्य.

२ एकोजी (दुसरा) नंतर त्याची पत्नी **सुजानबाई** ही राज्याधिकारिणी झाली. पिंगल संवत्सर शके १६५८ मध्यें **एकोजी** मृत्यु पावला. तेव्हांपासून शके १६६० काल्युक्तीं संवत्सरापर्यंत दोन वर्षें **सुजानबाईनें** राज्य केलें. कारण (शके १६६० मध्येंच म्हणजे) सन १७३८ मध्यें **कट्टु राजानें** किल्ल्यांत प्रवेश करून राज्यव्यवस्था आपल्या हातीं घेतली. **सुजानबाईनें** तीन वर्षें राज्य केलें असें मद्रास येथील हस्तलिखितावरून दिसतें. त्या हस्तलिखितांत असें लिहिलें आहे कीं, दुष्ट व जुलमी अशा स्त्री–अधिकाराला कंटाळून सन १७३८ मध्यें एक तोतया उत्पन्न झाला व त्याला **सिद्दोजी, तुलाजी, तुकाजी** व **सुब्बा चेट्टी** या मंत्र्यांचें साहाय्य मिळालें. या मंत्री सहायकांनीं **सुजानबाई** राणीसंबंधीं शक्य तेवढा अधिक तिरस्कार उत्पन्न करून ठेविला होता. सर्व राज्यांत किल्लेदार **सय्यद** हा फार मोठा सत्ताधारी अधिकारी असून तो इच्छेप्रमाणें वाटेल तें करीत असे. राज्यांतील सैन्य त्याच्याच ताब्यांत असे. व **शाहूजी** अथवा उपर्युक्त **कट्टुराजा**

या तोतयानें सय्यदाचाच फायदा घेऊन सुजानबाईवर वर्चस्व मिळविलें. आपण पहिल्या सरभोजीचे पुत्र आहोंत असें या तोतयानें जाहीर केलें.

सुजानबाईस कैद.

३ तोतया कट्टुराजाला तंजावरांतून हांकून दिल्यावर तो फ्रेंचाकडेस गेला व त्यानें त्यांना कारिकाल बंदराचा मोबदला देण्याचें वचन देऊन तंजावराचें राज्य मिळवून देण्यास मदत मागितली. याच वेळीं सय्यदानें सुजानबाईस कैद करून मंत्रीमंडळांतील एक मंत्री सिदोजी याला त्याच्या दोन भावांसह तंजावरच्या दिंडी दरवाजासमोर सुळावर चढविलें. हा सिदोजी सुजानबाईच्या विशेष कृपेंतील इसम होता.

तोतयास पुनः राज्यप्राप्ति, प्रतापाचें राज्यारोहण.

४ तोतया शाहूजी सन १७३८ मध्यें तंजावरास परत आला, व त्यानें नंतर एक वर्ष राज्य केलें. फ्रेंचाना कारिकाल बंदर देण्यास सन १७३९ च्या फेब्रुवारीमध्यें तोतया राजाला चंदासाहेबानें भाग पाडिलें व पुढें एप्रिलमध्यें राजानें ती देणगी कायम केली. कारिकाल बंदरांत फ्रेंचानां उतरण्याला या तोतया राजानें म्हणजे शाहूजीनें सन १७३८ च्या जुलईमध्यें बंदी केली होती. यावरून हा तोतया सन १७३८ पूर्वीं तंजावरच्या राज्यावर आला असावा असें वाटतें. या बंदीमुळेंच चंदासाहेबानें तंजावरावर स्वारी केली असावी. मुसलमान किल्लेदार सय्यद हा फार धूर्त होता. तो फ्रेंचांना मिळालाच होता. तोतया राजानें वर प्रमाणें जरी फ्रेंचानां कारिकाल बंदर दिलें, तरीहि थोडक्याच

दिवसांत त्याला आपला गाशा गुंडाळावा लागला. कारण तो खरोखरीच तोतया होता, खरा राजपुत्र नव्हता. किल्ल्यांतील एका रूपी अथवा कुप्पी या परटिणीचा तो मुलगा होता. नागापट्टण् येथील डच व फोर्टसेंट जॉर्ज येथील इंग्रज लोकांना त्या तोतयानें मोठमोठ्या देणग्या देण्याचीं वचनें देऊन त्यांची मदत मिळविली होती. असें, तंजावर येथील शिलालेखांत लिहिलें आहे. (परि. १) परंतु तो कुप्पीचा मुलगा आहे असें निश्चितपणें बाहेर येतांच त्याला पदच्युत करण्यांत आलें. सन १७३९ मध्यें डचांनीं यूरोप येथें पुढील आशयाचें पत्र पाठविलें " शाहूजी हा खरा राजपुत्र नसल्यानें चंदासाहेबानें त्याला कैद केलें व प्रतापाच्या इच्छेविरुद्ध प्रतापाला राज्यावर बसविण्यांत आलें." पुढें प्रताप स्वतः कारागृहांत जाऊन तोतया शाहूजीला भेटला, व 'या शाहूजीच्या इच्छेविरुद्ध हें राजपद घेण्याची आपली मुळींच इच्छा नाहीं' असें शाहूजीला म्हणाला. त्यावर शाहूजी (तोतयाराजा) म्हणाला, 'जर तूं राज्यपदाचा स्वीकार केला नाहींस तर आपण दोघेहि ठार मारिले जाऊं. म्हणून तूं राज्याधिकार धारण कर. नंतर आपण दोघेहि जीवंत राहून पुढील कार्यक्रम यथास्थित पार पाडूं.' यामुळें तोतयानंतर प्रतापसिंहानें तंजावरचें राजपद सन १७३९ मध्यें स्वीकारिलें. शिलालेखांतहि प्रतापसिंहाच्या राज्यारोहणाचा शक १६६० सिद्धार्थी हा दिला आहे. त्यावरून प्रतापसिंहाचें राज्यारोहण सन १७३९ च्या पहिल्या दोन तीन महिन्यांत झालें असावें.

इतिहासकारांचा मतभेद.

५ या काळासंबंधानें बराच गोंधळ आहे. ऑर्म म्हणतो कीं, प्रताप व त्याचा माजी शहाजी हे सरभोजीचे पुत्र होते. परंतु हे दोघेहि तुकोजीचेच पुत्र होते असें डफ म्हणतो. परंतु ऑर्म व डफ हे दोघेहि या बाबतींत चुकीचेच ठरतात. आतां निःसंदिग्ध रीतीनें असें सिद्ध झालें आहे कीं, तुकोजीच्या अन्नपूर्णा नांवाच्या खांडाराणीचा मुलगा प्रताप हा होय. शहाजी हा सरभोजीचा मुलगा होता असें उगीच प्रसिद्ध केलें होतें. आतां एकट्या सयाजीचाच प्रश्न शिल्लक राहतो. परंतु धर्मशास्त्राप्रमाणें ज्याला तुकोजीचा मुलगा म्हणतां येईल असा कोणीहि सयाजी मुळींच नव्हता, हें पुढें ओघानें सिद्ध व्हावयाचेंच आहे.

सयाजीची माहिती

६ बृहदीश्वर शिलालेख व मद्रास येथील शिलालेख यांमध्यें सयाजीचें नांव नाहीं. परंतु यावरून सयाजीचें नास्तित्व सिद्ध होतें. कारण शिलालेख हा दुसऱ्या सरभोजीच्या कारकीर्दीमध्यें तंजावरास खोदविलेला आहे. व हा सरभोजी प्रतापसिंहाचा नातू होता. अर्थात् प्रतापसिंहाहून अधिक जवळचा वारस इतर कोणी होता असें त्या शिलालेखांत येणें शक्यच नाहीं, असें म्हणतां येईल. परंतु तुकोजीला असा कोणी तरी कायदेशीर पुत्र होता, याला कांहीं निःसंदिग्ध पुरावाच नाहीं. तंजावरचे गॅझेटिअर व क्रमिक पुस्तक यांमध्यें या सयाजीचा उल्लेख येतो, पण तो सगळा लेखकांच्या कल्पनाशक्तीचा खेळ होय.

तोतयासंबंधीं कांहीं लेख.

७ मागें सांगितलेले डच-लेख व डॉडवेलनें उद्धृत केलेला सन १७३९ मधील नेगापट्टमच्या डच गव्हर्नराचा लेख, यांवरून निःसंशयपणें असें सिद्ध होतें कीं, शाहूजीनंतर राज्यावर प्रतापसिंहच विराजमान झाला होता. 'सुजानबाईला शाहूजी या तोतया राजानेंच राज्यावरून काढलें होतें' असें डच गव्हर्नच्या लेखांत स्पष्टच म्हटलें आहे. 'सन १७३८--३९ मध्यें शाहूजी हा तोतयाच तंजावरास राज्य करीत होता,' असें आनंदरंगा पिले याची रोजनिशी व 'फ्रेंच पॉवर' हें मॅलिसनचें पुस्तक यांवरून दिसतें. मॅलिसनच्या पुस्तकावरून असेंहि सिद्ध होतें कीं, शाहूजीला तंजावरातून बाहेर हाकून दिलें होतें, तेव्हां त्यानें कारिकाल बंदर फ्रेंचांना देण्याचें अभिवचन सन १७३८ मध्यें दिलें होतें, व त्यामुळें लवकरच त्याला राज्य प्राप्त झालें. परंतु त्यानें फ्रेंचांना कारिकालांत उतरण्याची तत्काळ बंदी केली, हें मागें तिसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. आनंदरंगम् पिले यानें शाहूजीची हकीकत सन १७३९ पर्यंत पुढें लिहिली आहे. परंतु वर सांगितलेले डच लेख याहून अधिक माहिती देत नाहींत. त्यावरून असें दिसतें कीं, सुजानबाईला बाजूस सारून एका व्यक्तीनें राज्य बळकाविलें व तीच व्यक्ती पुढें राज्याधिकारिणी म्हणून कायम झाली. असा राज्यापलाप करणारी व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून शाहूजी किंवा कट्टुराजा म्हणून प्रसिद्ध असलेली परंतु खरोखर कुप्पी अथवा रूपी परटिणीचो औरस पुत्रसंततीच होय. हाच शाहूराजा आपणांस सरभोजाचा पुत्र म्हणवीत होता. हा कट्टुराजा खरोखरीच तोतया होता असें सिद्ध होईपर्यंत तंजावरच्या खऱ्या राज्याधिकारी व्यक्तीचा प्रश्न पूर्णपणें घोंटाळ्यांतच पडला

होता. मागें सांगितलेले डच लेख, आनंदरंगम् पिळे याचा सन १७४६ मधील फ्रेंच लेख व कट्टुराजाचाच राज्यावर हक्क असल्याचा सन १७४९ मधील इंग्रजी लेख हे सर्व आधार कट्टुराजाच्या तर्फेचे आहेत. **प्रतापसिंह** हा बेकायदेशीर वारस असून **कट्टुराजाच** खरा वारस आहे असें हे सर्व लेख एक मतानें प्रतिपादन करितात. राज्याधिकार धारण करण्याबद्दल **प्रतापानें** दर्शविलेल्या डळमळीतपणाचा उल्लेख डच लेखामध्यें आहे. आणि मराठी शिलालेख व मद्रासचे हस्तलेख यांना म्हणजे यांतील एतद्विषयक उल्लेखाला अधिक महत्त्वाचें कारण म्हणजे तंजावरांत गोंधळलेलें राजकीय वातावरण होय. डच लेखांनीं प्रथमपासून चुकीचा पक्ष घेतला व पत्रामागून पत्रें पाठवून पहिल्या चुकीवर झांकण घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण **सरभोजीचे** पुत्र असल्याचें शाहूजीनें जें स्वतःच्या अधिकाराच्या प्रतिपादनासाठीं जवळपासच्या लोकांस सांगितलें होतें, तेंच एकाद्या नोकरानें जाऊन आनंदरंगापिळे यास कथन केलें व तें त्यानें आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलें. परंतु सन १७४९ मधील इंग्रजांच्या लेखापेक्षां पिळे याच्या या लेखाला अधिक महत्त्व देणें योग्य वाटत नाहीं. कारण फ्रेंच लेखक इंग्रजांना उद्देशून मोठ्या खोचदारपणानें लिहितो कीं, " तुम्ही (तंजावराच्या) मृत राजाकडून कोणी तरी भूत उत्पन्न करून घेऊन स्वतःच्या मतलबासाठीं त्या राज्यावर स्थापून वर्तमानकालीन राजाला पदच्युत करावें हा तुमचा विचार योग्यच म्हणावयाचा," या विवेचनावरून हें उघड सिद्ध झालें कीं, प्रताप हा गादीवर येण्यापूर्वी ज्या **सयाजीनें** एक वर्षपर्यंत राज्य केलें तो अगर तसा कोणी **तुकोजीला सयाजी** नांवाचा पुत्र कायदेशीर वारस नव्हता.

Additional authorities.

1 Anandaragam Diary 1 Ch 4 13. IV p 350 in by Dodwell.
2 Mallesoh The rise of the French power in India ch 3.



तंजावरचा राजा प्रतापसिंह

(कारकीर्द १७३९--१७६३)

प्रकरण ७ वें.

प्रतापसिंग १७३९ ते १७६३.

मुद्दे.

१ प्रतापाची योग्यता.
२ प्रतापाची प्रजानुरक्ती.
३ तोतयाचें बंड व यवनांचें कारस्थान
४ किल्लेदार सय्यद याचीं कारस्थानें.
५ प्रताप व नवाब यांचा संबंध.
६ साताराकरांची मदत.
७ तोतयाचे प्रयत्न.
८ इंग्रजांची यशस्वी मध्यस्थी.
९ नवाबीसंबंधीं युद्धें.
१० महंमदअल्लीस प्रतापाची मदत.
११ महंमदअल्ली व म्हैसूरकर यांचे संबंध.
१२ मानाजीचा पराक्रम.
१३ प्रतापाची स्तुती.
१४ कांहीं प्रादेशिक घालमेली
१५ महंमदअल्लीची तंजावरावर स्वारी.
१६ तंजावरसंस्थान लयास जाण्याचीं कारणें.
१७ प्रतापसिंहाचा मृत्यु व वारस.

प्रतापाची योग्यता.

१ तंजावराच्या नामांकित मराठी राजांच्या यादींत प्रताप हा शेवटचा राजा होय. वेंकाजी, शहाजी व सरभोजी यांच्यानंतर प्रतापाचें नांव येतें. इंग्रज, फ्रेंच व या उभयतांचे प्रतिस्पर्धी यांना जोंपर्यंत प्रतापाच्या

साहाय्याची आवश्यकता होती तोंपर्यंत प्रतापास जेवढें सुख मिळत होतें तेवढें सुख इंग्रज व महंमदअल्ली यांची सत्ता कर्नाटकांत स्थिर झाल्यावर म्हणजे (प्रतापाच्या) वृद्धापकाळांत त्याला मिळालें नाहीं. चंदासाहेबानें तंजावरावर वारंवार स्वाऱ्या केल्यामुळें त्याच्याविषयींचा प्रतापाचा आपलेपणाचा भाव अगदीं नष्ट झाला. त्रिचनापल्लीच्या वेढ्यानंतर महंमद अल्लीनें प्रतापास असें कळविल्याचें प्रसिद्ध आहे कीं, "तुझ्यामुळेंच मी आज जिवंत आहे. माझ्या पित्याच्या मृत्यूच्या समयीं मी जी प्रतिज्ञा केली होती ती पूर्ण करण्यासाठीं चंदासाहेबाला माझ्या स्वाधीन कर." क्लाइव्ह आणि ईस्ट इंडिया कंपनी आरंभीं आरंभीं प्रतापाला स्वतंत्र राजा समजून 'His majesty' या पदवीनें संबोधीत असत. परंतु तेंहि पुढें बंद झालें असें दिसतें.

प्रतापाची प्रजानुरक्ती.

२ राज्याधिकार धारण करण्याला प्रताप अगदीं नाखुष होता. पण राज्यांतील मुख्य मुख्य कर्त्या माणसांनीं 'संस्थानाच्या हितासाठीं तरी प्रतापानें राज्याधिकार स्वीकारावा' अशी त्याला गळ घातली; व अतिशय मनधरणी केल्यामुळें प्रतापानें तंजावरची गादी पतकरली. शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, प्रताप हा भला, बुद्धिमान, रूपसंपन्न व शूर असा राजा होता. प्रजेची भक्ति वृद्धिंगत होण्यासाठीं प्रतापानें प्रजेला कुडिवारम् हें अधिक प्रमाणांत करण्याची सवलत दिली. कुडीवारम् म्हणजे जमीन नांगरण्याची मजूरी. ही बहुधा पिकाच्या प्रमाणांत असे. तें मजूरीचें प्रमाण प्रतापानें वाढविल्यामुळें गरीब लोक साहजिकपणेंच अधिक सुखी झाले असावेत. या शिवाय प्रता-

पानें नागोर येथें एक मशीद बांधून त्या मशीदीच्या खर्चासाठीं पंधरा गांवें इनाम दिलीं. यावरून प्रतापाची प्रजानुरक्ती व त्याचा सहनशील स्वभाव यांची चांगली जाणीव होते. त्याच्या भोंवतीं जीं माणसें असत त्यांच्या स्वभावाची परीक्षा तो फार तीक्ष्ण दृष्टीनें व बारकाईनें करीत असे. ज्याची लहर व जुल्मी वृत्ती यांच्या योगें सगळ्या तंजावराचा नाश होण्याची वेळ आली होती, त्या किल्लेदाराला प्रतापानें प्रथम पुष्कळच धाकांत ठेविलें व नंतर एका प्रसंगीं देहान्ताची शिक्षा केली. देवी कोट्टाईच्या वेढ्यापासून सेनापति मानाजी याची फार प्रख्याती झाली व प्रतापानें त्याच्या युद्धकलाभिज्ञतेचा पुष्कळच उपयोग करून घेतला. मानाजी हा स्वभावानें लहरी व हूड असल्यानें कित्येक वेळां तो प्रतापाच्या आज्ञेच्या विरुद्ध वर्तन करीत असे. तो एखाद्या प्रसंगाची चिकित्सा मोठ्या मार्मिकरीतीनें परंपरा जुळवून करण्यांत कुशल होता व इंग्रजाविषयीं त्याला आपलेपणा वाटत असे. प्रतापाचा चिटणीस गादीराव व सेनापति सखोजी या उभयतांचे सूत या मानाजीशीं नसे. या उभयतांच्या सल्ल्यावरून प्रतापानें मानजीला आपल्या नोकरांतून दोनदां कमी केलें व एकदां तर कैदही केलें. परंतु मुराररावाच्या सत्यनाशी स्वारीपासून किंवा इतर भयंकर संकटांतून तंजावराचें रक्षण करण्यास एकटा मानाजीच समर्थ होता, अशी सर्वांचीच खात्री होती. प्रख्यात डबीरपंडित हा दुसरा एक मोठा इसम होता. जमाबंदीच्या कामांत हा फार निष्णात असे. प्रतापाच्या मुलाचा कारभारही त्यानें कांहीं दिवस केला, त्यामुळें राज्याला पुष्कळच लाभ झाला. मध्यंतरी थोडेच दिवस हा पंडित

कारभार करीत नव्हता. पूर्वी कांची शहरांत शंकराचार्यांचे पीठ होतें; परंतु तेथें यावनी मताचें प्राबल्य वाढत असलेलें पाहून आचार्यांनी आपलें पीठ उदयारपालयम् येथें नेलें. येथील शंकराचार्यांचा मुक्काम कामकोटी येथें असतांना तेथें आचार्यांचा सन्मान करण्यासाठीं राजा प्रताप हा डबीर पंडिताला बरोबर घेऊन गेला होता.

तोतयाचें बंड व यवनांचें कारस्थान.

३ तंजावरच्या गादीसाठीं शाहूजी नांवाचा एक तोतया राजा उभा करून सय्यदानें पुनः एकदां क्लेश उत्पन्न केले होते. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं. सय्यद हा चंदासाहेबाशीं कांहीं कारस्थान करीत असल्याचें पुढें उघडकीस येतांच प्रतापानें त्याला देहान्त शिक्षा केली. कोयाजी काट्टीगाई हा तंजावर येथील एक मोठा सरदार प्रतापाशीं वैर करीत असे. तोतया शाहूजीच्या तर्फेनें या कोयाजीनेंच परदेशी व्यापारी व चंदासाहेब यांच्याशीं कांहीं कारस्थान रचिलें होतें, व अगदीं आरंभीं म्हणजे सन १७४० मध्यें स्वतः तोतया शाहूजी हाहि प्रतापाच्या विरुद्ध कांहीं कारभार करीत होता.

किल्लेदार सय्यद याचीं कारस्थानें.

४ किल्लेदार सय्यद हा पहिलीच कारवाई करीत असल्याचें आढळून आलें. आपल्या मुलासाठीं तंजावरचें राज्य लाटावें, असा त्याचा उद्देश असावा असें दिसतें. जर त्याला दीर्घकाळपर्यंत जगूं दिलें तर तंजावरास यावनी सत्तेचें प्राबल्य खास झालें असतें. तो स्वतः क्रूर, लहरी व पराकाष्ठेचा स्वच्छंदी होता. मोठी सत्ता आपणांस असावी अशी त्याला पराकाष्ठेची आवड होती.

त्याच्या ताब्यांत कांहीं फौज असल्यानें तिच्या जोरावर स्वतःच्या मर्जीप्रमाणें वाटेल तेव्हां राजाला पदच्युत करण्याचें अथवा वाटेल त्यास राज्याधिकार देण्याचें त्याला सामर्थ्य होतें. चार वर्षेपर्यंत खरा सत्ताधीश तोच होता. तो स्वतः धर्मानें यवन असल्यानें कर्नाटकाचा नबाब सादतुल्लाखान व त्याचा जांवई चंदासाहेब यांच्याकडेस त्याचा विशेष ओढा होता. त्याच्याकडेस राज्याचा कारभार ज्या मुदतींत होता त्या मुदतींत तंजावर येथील देवळें व यज्ञयाग यांच्याकडेस पूर्ण दुर्लक्ष होऊन धर्मादायहि बंद पडला होता. वांचेश्वर उर्फ कुट्टिकवि यानें सन १७४१ मध्यें 'महिषा शतक' नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत नानाजी, शाहजी, सरभोजी व आनंदराव यांच्या वेळचे सुखाचे दिवस गेले असें मोठ्या दुःखपूर्ण उद्गारांत लिहून ठेविलें आहे.

प्रताप व नबाब यांचा संबंध.

५ सन १७७६ मध्यें कर्नाटकाच्या नबाबानें एक पत्र डायरेक्टरांस लिहिलें असून त्यांत प्रतापाच्या राज्यारोहणापूर्वीचा तंजावराचा वृत्तांत नमूद केलेला आहे. या वृत्तांतांत नबाबाशीं प्रतापाचा कसा संबंध होता हें दर्शविलें आहे. दोस्तअली हा कर्नाटकाचा सुभेदार असताना प्रताप हा मोठा अवज्ञाशील आहे असें पाहून त्याला एका मुसल्मान अंमलदारानें सेवान्त वेतन देऊन नोकरींतून निवृत्त केलें होतें. मराठ्यांनीं सन १७४० मध्यें दोस्त अलीचा वध केल्यामुळें प्रतापाला पुनः राज्यप्राप्ति झाली. नंतर तंजावराकडून किती खंडणी घ्यावयाची हें ठरविण्यासाठी निजामानें आपलें सैन्य पाठविलें व त्याच्या धाकानें खंडणी वसूल

केली. अन्वरुद्दीन यानें तीन स्वाऱ्या केल्याचा दाखला आढळतो व त्यावरून मुख्य सत्तेचें लढाऊ सामर्थ्यहि कसें हीन होतें याची माहिती मिळते.

सातारकरांची मदत

६ वर दिलेली माहिती अगदीं बरोबर आहे. आपलीं राज्यें पूर्णपणें खालसा होऊं नयेत म्हणून दक्षिणेकडील मराठी संस्थानिकांनीं साताऱ्याहून फौजेची मुख्य मदत मागविली. त्याप्रमाणें ती आली व त्या फौजेशीं लढत असतांना कर्नाटकाचा नबाब दोस्तअल्ली हा मारला गेला. ऑर्म म्हणतो कीं, निजामानें मराठ्यांना नबाबाविरुद्ध चिथविलें होतें. परंतु चंदासाहेबांशीं नबाबाच्या मुलाचें वैर असल्यानें तो मुलगाच या मराठ्यांच्या स्वारीबद्दल जबाबदार आहे. रघूजी व फत्तेसिंग यांच्या हाताखालीं सुमारें दहा हजार फौज देऊन शाहूनें त्यांना नबाबावर पाठविलें व मराठ्यांशीं युद्ध करीत असतानाच नबाब मारिला गेला. मराठ्यांनीं त्रिचनापल्ली काबीज करून ती गुटीचा लुटारू राजा मुरारीराव याला दिली व चंदासाहेबाला कैद करून साताऱ्यास नेलें. साताऱ्याहून आलेल्या रघूजी भोसल्याला सगळा दक्षिण हिंदुस्थान जिंकण्याची महत्त्वाकांक्षा होती. पण तसें घडल्यास आपणहि साताऱ्या छत्रपतीचे मांडलिक होऊं या भीतीनें प्रतापानें रघूजीला मनापासून साहाय्य केलें नाहीं, इतकेंच नव्हें पण त्रिचनापल्लीची देणगीहि त्यानें स्वीकारली नाही. तंजावरचा राजा प्रतापसिंह याची ही अदूरदर्शी राजकारणकुशलता उभयपक्षांना

अहितकर होती. मुरारीनें पूर्वी तंजावरावर स्वारी केली त्यावेळीं मानाजीनें मोठ्या कुशलतेनें त्याला परत पिटाळून लाविलें. त्यामुळें मुरारी व प्रताप यांच्यामध्यें आतां रहस्य राहिलें नव्हतें. यानंतर सन १७४२ मध्यें कर्नाटकाच्या नवाबाचेंच सैन्य आलें. त्यानें मुरारीच्या ताब्यांतील त्रिचनापल्ली सर केली व ती अन्वरुद्दीन यास दिली आणि तंजावरावर कांहीं खंडणीहि लादली; व ती तंजावरकरांस मान्य करणें भाग पाडिलें. गुंतागुंतीच्या परिस्थितिमुळें निजाम व नवाब, आणि मराठे व परदेशीव्यापारी या जोड्यांमध्यें केव्हां काय परिस्थिति उत्पन्न झाली असती तिचा अंदाज काढितां येणें शक्य नसल्यामुळें प्रतापाची कारकीर्द अस्थिर व क्षुद्र ठरते असें फार तर म्हणतां येईल. ही परिस्थिति प्रतापाच्या कारकीर्दीच्या अखेरीपर्यंत तशीच राहिली व शेंवटीं शेंवटीं कोणतेंहि धाडसी राजकारण करणें अशक्य झालें.

तोतयाचे प्रयत्न.

७ तोतया राजा शाहूजी हा सन १७३९ मध्यें तंजावरच्या गादीवरून पदच्युत झाला. त्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे सन १७४५ चे सुमारास त्यानें पांडिचरीला फ्रेंचाकडेस मनुष्य पाठवून आपलें राज्य बळकाविणाऱ्या प्रतापाच्या विरुद्ध मदत मागितली. परंतु ती त्यास फ्रेंचांनीं दिली नाहीं. फ्रेंचाकडून मदत न मिळाल्यामुळें तो सन १७४९ मध्यें फोर्टसेंट जॉर्ज डेव्हिड याजकडेस गेला. यावेळीं कोयाजी कट्टिगाई हा तोतयाच्या बाजूनें पुढारी होता. परंतु सन १७३९ पासून पुढें सात वर्षेपर्यंत मद्रास येथील आंग्लसत्तेनें प्रतापाला राजा म्हणून मान्य केलें होतें. सन १७४७ मध्यें प्रताप व इंग्रज यांनीं एकमतानें

कारिकाल घेण्याचें ठरविलें होतें. परंतु तोतयाचा लोंचटपणा, लढाईचा खर्च आणि देवीकोट्टाइ बंदर देण्याचें आमिष हीं प्रलोभनें झिडकारिणें मोठें कठिण होतें. देवीकोट्टाई हें बंदर कोलेरून नदीच्या मुखाजवळ असून तें समुद्राकडून व उत्तरेच्या बाजूनें तंजावरावर स्वामित्व गाजविण्याची गुरुकिल्ली असल्यानें कोलेरून नदीकांठची वसाहत मोठी आश्चर्यजनक झाली. त्याकाळीं जहाजांना सुरक्षितपणें किनाऱ्याला लावितां येत असे. तेथें जवळच लांकडे व धान्य यांचा भरपूर पुरवठा असे. इत्यादि कारणांनीं इंग्रजकंपनीला ती देणगी मोठी प्रलोभनीय वाटली.

इंग्रजांची यशस्वी मध्यस्थी.

८ हिंदुस्थानच्या राजकारणांतील इंग्रजांची यावेळची मध्यस्थी अगदीं प्रथमचीच होय व ती चांगल्या मुहूर्तावर झाली होती असें त्यांच्या दृष्टीनें म्हणावें लागतें. येथील राजकारणांतील इंग्रजांच्या मध्यस्थीची चळवळ परिणामाच्या दृष्टीनें इंग्रजांना मोठी लाभकारक व हिंदी लोकांना तत्कालीन राजकारणाच्या दृष्टीनें अखेरचीच झाली. याच सुमारास प्रतापानें इंग्रजी कंपनीला फ्रेंचांच्या विरुद्ध मदत दिली होती. तथापि इंग्रजी कंपनीनें निमकहरामी करून प्रतापावर दोन मोहिमा केल्या. देवीकोट्टाई येथील किल्ल्याचा परीघ सुमारें एक मैलाचा असून त्याच्या भिंती १८ फूट उंचीच्या होत्या. तंजावरच्या लोकांनीं मोठ्या शौर्यानें त्याचें संरक्षण केलें होतें. तेथील किल्लेदारानें तर मोठ्या हिंमतीनें इंग्रजांना कळविलें होतें कीं, "माझें वय४० वर्षांचें झालें असून आजपर्यंत मला कोणीहि दोष दिलेला नाहीं. म्हणजे इतक्या चोख रीतीनें किल्लेदाराचें

कर्तव्य मी आजपर्यंत बजाविलें आहे. मजजवळ पांच हजार फोज असून या किल्ल्याचें संरक्षण प्राणान्तापर्यंत करण्याचा निश्चय त्या समग्र फौजेनेंहि मजप्रमाणेंच केलेला आहे. हा किल्ला अभेद्य असल्यानें आम्हांपैकीं एकूनएक संरक्षक मरून जाईपर्यंत तो लढवावा असा आमचा दृढ संकल्प आहे." कांहींहि असो. इंग्रजांची पहिली स्वारी अयशस्वी झाली व तो किल्ला त्यांना हस्तगत करितां आला नाहीं. दुसऱ्या स्वारींत मोठ्या शिकस्तीनें देवीकोट्टाई हें बंदर इंग्रजांनीं हस्तगत केलें. यावेळीं लॉरेन्स व क्लाइव्ह हे दोन इंग्रज प्रसिद्धीस आले. प्रतापाचा सेनापति मानाजी हा त्यावेळीं फारच शौर्यानें लढला व बंदराचें संरक्षण उत्तम प्रकारें करिता झाला. परंतु कर्नाटकावर जमलेल्या राजकीय वातावरणाच्या ढगांनीं उभय पक्षांत त्वरेनें तह घडवून आणिला. या युद्धांत जयश्रीनें इंग्रजांना माळ घातली होती तरीहि त्यांनीं आपलाच हेका न चालवितां व ज्या तोतयाची त्यांनीं तरफदारी केली होती त्यालाहि राज्यपदावर न बसवितां प्रतापसिंहाशीं तह केला. तथापि इंग्रजांना देवीकोट्टाई हें बंदर मिळालें व तोतयाच्या पोषणाची व्यवस्था झाली. हिंदुस्थानांतील प्रदेशाची प्राप्ति याच प्रसंगीं इंग्रजांस प्रथम झाली. म्हणजे ही मोहीम अशा दृष्टीनें यशस्वी झाली. इंग्रज व हिंदी यांच्या भावीयुद्धांत इंग्रजांना जें राजकारण सिद्धीस न्यावयाचें होतें त्याचें उपजत पोषण प्रताप-शाहूजी या युद्धानें केलें. त्यांत शाहूजीच्या तर्फेनें इंग्रज लढले हें वर सांगितलेंच आहे. या युद्धानंतर तंजावरच्या राजाला तोतयाची भीति मुळींच राहिली नाहीं. परंतु प्रताप अगर त्याचा मुलगा (राजपुत्र) यांना परदेश-

त्यांबद्दल मुळींच प्रेम राहिलें नाहीं. परदेशस्थांनीं तंजावरच्या राज्यांत प्रवेश करितांच एक कर द्यावा असें राजानें ठरविलें.

नबाबीसंबंधीं युद्धें.

९ वारसाइसंबंधाचा उपरिनिर्दिष्ट झगडा थंड पडला तोंच महंमदअल्ली व चंदासाहेब यांच्यामध्यें कर्नाटकाच्या नबाबगिरीसंबंधीं एक लढाई उपस्थित झाली. ही लढाई म्हणजेच कर्नाटकाचें युद्ध होय. वस्तुतः भाऊबंदकीच्या युद्धाचा शेंवट हा कर्नाटकाच्या लढाईचा सूचक असा श्रीगणेशाच होय. साताऱ्याच्या कैदेंतून चंदासाहेबाची मुक्तता, सन १७३६ ते १७३९ या वर्षांमधील तंजावरांतील यादवी, फ्रेंच व मुजफरजंग यांच्या बरोबर तंजावरच्या तोतयानें जोडिलेला स्नेह, कर्नाटकाचा नबाब अन्वरुद्दीन याचा सन १७४९ मधील मृत्यु व नबाबीच्या प्राप्तीसंबंधी महंमदअल्ली व चंदासाहेब यांच्यामधील स्पर्धा, अशा कारणांमुळें प्रताप व मानाजी यांना इंग्रजांशीं तह करणें भाग पडलें. तंजावर हें शहर त्रिचनापल्लीच्या जवळच आहे. व त्रिचनापल्लीसच महंमदअल्ली व चंदासाहेब यांच्या युद्धाचा वणवा पेटल्यानें तंजावर हें शहर मोठ्या कचाटींत सांपडलें. कारण दोघांनींहि प्रतापाकडेस मदत मागितली व ज्याला मदत मिळणार नाहीं तो आपल्या संस्थानास उपद्रव देईल अशी प्रतापास धास्ती वाटत होती. मराठी शिलालेखांत असें लिहिलें आहे कीं, महंमदअल्ली हा नेगापट्टमहून त्रिचनापल्लीस पळून जात असताना प्रतापसिंहाचा पाहुणा म्हणून तीन महिने मध्येंच तंजावरास राहिला होता. सन १७४९ च्या डिसेंबरमध्यें चंदासाहेब व मुजफरजंग हे त्रिचना-

पळीस जात असताना मध्येंच तंजावरास थांबलें. तंजावराच्या राजा- कडेस मोगलांची वरीच मोठी रक्कम घेणें होती हें या उभयतांस ठाऊक होतें. ती रक्कम वसूल करण्याच्या निमित्तानें त्यांनीं तंजाव- राच्या किल्लयास वेढा दिला, रकमेची मागणी केली व ती रक्कम वसूलहि केली. हे दोघे यवन सरदार फ्रेंचांचें मित्र असल्यानें त्यांनीं कारीकालजवळ ऐशीं खेडींहि स्वतःसाठीं मिळविलीं. तंजावरास दोन किल्ले असल्यानें तंजावराचें संरक्षण उत्तम प्रकारें होत असे. या दोन किल्लयांतील एक किल्ला अधिक मजबूत होता. त्यामुळें तंजावराचा एकदम पराजय झाला नाहीं. प्रतापसिंह या धूर्त मराठी राजानें आपल्या मदतीला नासिरजंग येईल या उत्सुकतापूर्ण आशेच्या अन्तस्थ कारणानें, चंदासाहेब व मुजफरजंग या यवन शत्रुद्वयांना तहाच्या निमित्तानें कांहीं दिवस झुलविलें. नासिरजंगानें कर्नाटकांत केलेल्या पराक्रमानें चंदासाहेब पळून गेला व त्याचा मुख्य साहाय्यकारी मुज- फरजंग हा प्रतापसिंहाकडून मिळालेल्या खंडणीचा कांहीं हिस्सा घेऊन पांडेचरीला सटकला.

१० सन १७५० मध्यें प्रतापसिंग व इंग्रज यांच्यांत मित्रत्वाच्या नात्यानें झालेला पत्रव्यवहार आज उपलब्ध आहे. परंतु इंग्रजांनीं तंजावरावर नुकतीच स्वारी केली असल्यानें इंग्रजांच्या वर्तनाचा

महंमदअल्लीस प्रतापाची मदत.

कटु अनुभव आल्यामुळें राजा प्रतापसिंग हा नबाव व फ्रेंच यांच्या मित्रत्वाच्या भानगडींसंबंधीं उदासीन राहिला होता. जेव्हां त्रिचना- पल्ली येथें महंमदअल्ली हा शत्रूकडून वेढिला गेला, तेव्हां म्हैसूरचा मुतालिक नंदराजा व गुटीचा मुरारीराव यांनीं महंमदअल्लीला मदत केली; व सन १७५२ मध्यें प्रतापसिंहहि त्या मित्रसैन्यांमध्यें सामील

झाला. प्रतापसिंहाच्या ताब्यांत पांच हजार स्वार व तीस हजार पायदळ असल्यानें कर्नाटकामध्यें हा राजा फार महत्त्वाचा सत्ताधारी असा मानिला जात असे. त्यानें तीन हजार स्वार व दोन हजार पायदळ असें पांच हजार सैन्य मानाजीच्या ताब्यांत देऊन त्याला महंमदअल्लीच्या मदतीसाठीं पाठविलें. यावेळीं अर्काट येथें क्लाइव्हच्या नेतृत्वाखालीं सैन्यानें जो पराक्रम केला त्या योगें नशीबाचें पारडें एकदम फिरलें. अनेक मित्रांच्या साहाय्यानें महंमदअल्लीनें त्रिचनापल्ली हस्तगत केली. फ्रेंचांच्या ताब्यांतील किल्ला व कोईलड्डी हस्तगत करण्यास लॉरेन्सच्या नेतृत्वाखालीं मानाजीनें इंग्रजांस मदत दिली. या सगळ्या युद्धांत इंग्रजांनां तंजावराहून सर्व पुरवठा होत होता. चंदासाहेब हा शरण आला होता; पण महंमदअल्लीच्या चिथावणीवरून मानाजीनें विश्वासघातानें त्याचा शिरच्छेद केला. या एकंदर युद्धांत तंजावरच्या राजानें चांगली मदत केल्यामुळें त्याला कोईलाड्डी व एलंगुड हीं गांवें व मागील दहा वर्षांच्या खंडणीची माफी देण्यांत आली.

महंमदअल्ली व म्हैसूरकर यांचें संबंध.

११ म्हैसूरच्या मुतालिक नंदाराजानें जी मदत केली होती ती बद्दल त्याला महंमदअल्लीनें त्रिचनापल्ली देण्याचें वचन दिलें होतें; परंतु तें वचन पुढें त्यानें पाळिलें नाहीं; म्हणून नंदाराजा व मुरारीराव हे दोघेहि इंग्रजांचे साहाय्यकर्ते फ्रेंचाकडेस गेले. याचप्रमाणें प्रतापानेंहि आपणांस मिळावें या हेतूनें फ्रेंच्यांच्या तर्फे दुप्लेनें प्रतापाला धाक दपटशहा व कांहीं प्रलोभन दाखविलें. त्यामुळें किंचित्काळ दुप्लीचा मनोरथ सिद्धिस गेला. परंतु त्वकरच राजा

परत आपल्या संघांत (नंदराजा व मुरारी यांच्याकडेस) आला. संघांतून फुटून गेल्याबद्दल राजाला कडक शासन झालें. मुरारीनें त्याच्या मुलुखावर स्वारी केली व काइल्डी कालिगुल्ला धुळीस मिळविलें. या युद्धांत राजाचा सेनापति गड्डीराव याचा पराजय झाल्यानें मानाजीला नोकरींत परत ठेवावें लागलें. त्याला फ्रेंचांच्या आग्रहानें नोकरींतून नुकतेंच कमी केलें होतें. मानाजीच्या विजयी पराक्रमानें व नबाबानें कांहीं रोकड रक्कम दिल्यामुळें मुरारीला परत जाणें भाग पडलें. 'या युद्धांत तंजावरचा राजा प्रताप हा पौरस्त्य राजकारणांतील न्यायीपणाच्या धोरणानें वागत असे' असें त्यावेळच्या इंग्रजी बातमीपत्रांत म्हटलें आहे. परंतु असें स्पष्ट दिसतें कीं, त्याला चंदासाहेब किंवा फ्रेंच यांच्याबद्दल आपलेपणा मुळींच नव्हता. हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापन करण्याच्या इंग्रजांच्या प्रयत्नाला मात्र त्याची मदत झाली.

मानाजीचा पराक्रम.

१२ तंजावरच्या गादीसाठीं फ्रेंच हे एका तोतया राजाला पुढें आणण्याच्या प्रयत्नांत असल्याबद्दल इंग्रजांनीं सन १७५७ मध्यें प्रतापाला कळविलें. परंतु 'आजपर्यंत पंचवीस तोतये उत्पन्न झाले त्यामुळें आपणांस आतां अधिक एका तोतयाची धास्ती मुळींच वाटत नाहीं.' असें प्रतापानें इंग्रजांस उलट कळविलें. चंदासाहेबाला शेहेचाळीस लक्ष रुपये देण्याचा एक ठराव सन १७४९ मध्यें तंजावरास केला होता, ती रक्कम वसूल करण्यासाठीं सन१७५८ मध्यें लाली हा कारिकालहून तंजावरावर चालून गेला. परंतु त्याला नागोरास मुळींच लूट मिळाली नाहीं. मानाजीच्या पराक्रमापुढें लाली अगदीं फिका पडला.

कारिकालजवळच इंग्रजांच्या लढाऊ जहाजांचा काफला दिसूं लागतांच लाली हा तंजावराहून तत्काळ परत फिरला. तंजावरच्या सेनेला इंग्रजांच्या लहानशा फौजेचें साहाय्य मिळाल्यामुळें तिनें कमी झालेल्या व उपासानें अर्धमेल्या झालेल्या फ्रेंच्यांच्या फौजेला हैराण केलें. सन १७६१ मध्यें पांडेचरीच्या वेढ्याच्या सात वर्षांच्या मुदतींत राजा प्रताप यानें सहा हजार स्वार व इतर सर्व पुरवठा इंग्रजी सेनापतीस केला होता. इंग्रजांशीं त्याचें इतकें रहस्य होतें कीं, तंजावर हें इंग्रजांचेंच आहे असें त्यानें एकदां लिहिलेलें आहे.

प्रतापाची स्तुति.

१३ प्रतापाला 'तंजावरचा महाराज' असें इंग्रजी कंपनी म्हणतच असे; व सन १७६२ मध्यें कंपनीच्या गव्हर्नरानें प्रताप हा चक्रवर्ती असल्याचें नबाबाला कळविलें होतें. परंतु हा सर्व बाह्य असा शाब्दिक देखावाच ठरला. कारण गेल्या युद्धांत प्रतापानें इंग्रजांस इतकी मदत दिली तरी नबाबानें, मित्रांनीं, शेजाऱ्यांनीं व इंग्रज कंपनीनेंसुद्धां तंजावराला नंतर फारच धिक्कारपूर्वक वागविलें. तंजावरचें राज्य हें नेत्रशल्याप्रमाणें महंमदअल्लीला त्रासदायक वाटत असे, म्हणून तें खालसा करावें असा त्याचा हेतु होता. इंग्रजी कंपनीनें सन १७६२ मध्यें डायरेक्टरांना कळविलें कीं, तंजावरकराशीं युद्ध पुकारिलें तर इतर संस्थानें, महंमदअल्लीच्या अधिकारीवाणीला विरोध न दर्शवितां तंजावरकरांना मिळतील. पुढें मद्रास सरकारच्या मध्यस्थीनें तंजावरच्या राजानें नबाबास बावीस लक्ष रुपये मागील बाकीबद्दल दिले व चार लक्षांची सालीना ठरीव खंडणी मान्य केली. कोइलाडी व येलांगुड्डु हीं गांवें नबाबानें राजास परत दिलीं. जो तह ठरला

त्याच्या पूर्ततेसाठीं कंपनीची जामीनगिरी मिळाली. या नंतर दर-साल खंडणीची रक्कम वसूल करण्यांत आली, व आजपर्यंत स्वतंत्र किंवा अर्धवट स्वतंत्र असलेलें तंजावरचें राज्य आपलें स्वातंत्र्य गमावून बसलें. प्रतापानें महंमदअल्लीच्या ऐवजीं फ्रेंच व चंदासाहेब यांना जरी मदत केली असती, तरी याहून अधिक फायदेशीर तह झाला असता असें नाहीं.

कांहीं प्रादेशिक घालमेली.

१४ रामनदकरांशीं फार दिवसांपासून चालत आलेलें वैर अरंतंगीं येथें सरहद्दीवर चालूंच होतें. तुकोजीच्या कारकीर्दीच्या शेवटीं तंजावरकरांचा कांहीं प्रदेश गमावला होता, तो पुदुकोट्टाईच्या तोंडामनांच्या मदतीनें मानाजीनें परत मिळविला. परंतु पुन्हां तो प्रदेश गमावला, व नबाबाच्या मनाई हुकुमामुळें प्रतापानें ह्या प्रदेशाचा वाद सोडून दिला. कारण नबाब हा तंजावरचा खरा अधिपति होता व इंग्रजी कंपनीच्या साह्यानें तो निरंकुश झाल्यामुळें त्याचें आसन स्थिर होऊन रक्षणहि झालें. त्याच्या कारकीर्दींत सरहद्दीवर तोंडामन लोकांशीं कांहीं झगडे होत, पण ते किरकोळ स्वरूपाचे होते.

महंमदअल्लीची तंजावरावर स्वारी.

१५ आपला गेलेला प्रांत परत मिळविण्याच्या हेतूनें प्रतापसिंहाच्या गादीवर आलेल्या वारस राजानें रामनदावर स्वारी केली. त्या राजाचें तें कृत्य नबाबास अपमानकारक वाटून त्यानें प्रथम तंजावरावरच चाल केली. हें श्रीमंत संस्थान खालसा करावें असाच महंमदअल्लीचा हेतु होता. म्हणून प्रथम त्याचा पाडाव

करून तें आपल्या ताब्यांत घेण्याचा त्याचा हेतु होता. तंजावराची संपन्नता कावेरी नदीच्या आविकूट कालव्यावर अवलंबून असल्यानें तो कालवा दुरुस्त करण्यासहि महंमदअल्लीनें परवानगी दिली नाहीं, असें त्याच्या सन १७६३ व १७६५ च्या पत्रव्यवहारावरून दिसतें.

तंजावर संस्थान लयास जाण्याचीं कारणें.

१६ तंजावरच्या राज्यास उतरती कळा लागण्याला प्रतापसिंहाच्या वंशजांचा कमकुवतपणा मुख्य कारण होता हें तर खरेंच आहे. तथापि इंग्रजी कंपनीस महंमदअल्लीचा भक्कम पाठिंबा असल्यानें तंजावरचें संस्थान सत्वर लयास गेलें. सन १७६१ मधील पानिपतच्या युद्धांत पूर्णपणें पराभव झाल्यानें हिंदुस्थानांतील मराठ्यांची सत्ता फार दुर्बळ झाली व मराठी साम्राज्याची एकीहि नामशेष झाली. तथापि स्वतःची प्रांतिक सत्ता स्थापण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या इंग्रजी कंपनीला त्यावेळीं हिंदुस्थानांत सर्वांत अधिक बलिष्ठ मराठेच वाटत होते. मराठी सत्ताधाऱ्यांत असलेला राजकारणकौशल्याचा अभाव व तंजावर हें संस्थान अगदींच दूर बाजूस राहिलें, अशा उभयविध कारणांनीं तंजावर संस्थानाला उतरती कळा प्राप्त झाली.

प्रतापसिंहाचा मृत्यु व वारस.

१७ सन १७६३ तारीख १६ डिसेंबर रोजीं तंजावरचा राजा प्रतापसिंह हा मृत्यु पावला. तिसरी व पांचवी अशा त्याच्या दोन राण्या सती गेल्या. त्याचा राज्याधिकारी पुत्र तुळजाजी हा होय.

Additional Authorities.

1 ORME:-A history of the military transactions of the British in Hindustan 2 vols.

2 WILKS:-Sketches of south India 2 vols.

3 DODWELL:-Duplex and Clive.

4 AITCHISON:-Treaties and engagements vols. (10)

5 Papers relative to the Restoration of the Raja of Tanjore vol. III.

प्रकरण ८ वें.

तुळजाजी (सन १७६३–१७८७)

मुद्दे

१ विद्याप्रीति
२ धर्मप्रियता
३ भोळेपणा
४ अन्याय्य वर्तन
५ मरवाशीं युद्ध व नबाबाशीं बेबनाव
६ आरोपांची अयथार्थता
७ नबाबाची स्वारी
८ राजपदावर तुळजाजीची पुनः स्थापना
९ नवीन तह
१० हैदराची स्वारी व प्रजेची दुर्दशा
११ मृत्यु व दत्तविधान
१२ वंशवृक्ष

१ **विद्याप्रीति.** वडील प्रतापसिंह याच्या देखरेखीखालीं प्रस्तुत तुळजाजीला योग्य आणि आवश्यक शिक्षण प्राप्त झालें होतें. तो मोठा भाषाशास्त्रज्ञ होता व संस्कृतकाव्य-रचनाहि करीत असे. तेलगू व मराठी लेखकांना त्यानें आश्रय दिला होता. त्रिचनापल्ली येथें कस्तुरीरंगायन् या नांवाचा एक विद्वान् गृहस्थ फौजेंत नोकर असून कांहीं शिपायांचा जमादार होता. त्यानें आपल्या मुलखासंबंधानें कांहीं काव्य लिहिलेलें आहे. अलूरी

कुप्पान हा या जमादाराचा शिष्य म्हणून प्रसिद्ध होता. तुळजाजीनें या शिष्याला आन्ध्रकालिदास या योग्य पदवीनें भूषविलें होतें. त्यानें आनंदगिरीच्या शंकरविजय या ग्रंथाचें भाषांतर केलें असून तें आचार्यविजयम् या नांवानें प्रसिद्ध आहे. याशिवाय कुप्पान यानें अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांत पंचनद स्थलपुराण, रामायणाचे यक्षगण, भागवतकथा, परमभागवतचरित्र, इंदुमतीपरिणय, कर्मविपाक हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. तंजावरच्या राजांच्या आश्रयाखालीं तेलगू वाङ्मय फार भरभराटीस आलें. किंबहुना विजयानगरच्या राज्याच्या पश्चात् हें तेलगू वाङ्मय कावेरी तीरावर पराकाष्ठेच्या उन्नतीस पोंचलें होतें; इतकेंच नव्हे पण तुळजाराजानंतर ही उन्नति थांबली व तें वाङ्मय परत आपल्या मूळ प्रदेशांत गेलें. सत्यच कथन करावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, एकुणीसाव्या शतकाच्या आरंभापासून हिंदी भाषांचें जीवन नष्ट झाल्यासारखेंच झालें असून त्यांची चळवळ आणि कर्तृत्वशक्ति दृग्गोचर होण्यापूर्वीं पाश्चात्य कल्पनांचें जन्तु त्यांच्यांत प्रविष्ट करावे लागले होते. साधे व सरळ उद्गार, ऐतिहासिक व तौलनिक गुणदोषविवेचन, या वाङ्मयीन पद्धति वस्तुतः आधुनिक आहेत. कारण हे प्रकार प्राचीन हिंदी वाङ्मयांत नाहींत.

धर्मप्रियता.

२ आपल्या पूर्वजांप्रमाणें राजा तुळजाजी हा धार्मिक मतांत मोठा सहनशील असे. मिशनरी शार्झ यावर त्याचा इतका विश्वास असे कीं, हा राजा लवकरच ख्रिस्ती धर्म स्वीकारील असें तत्रस्थ हिंदीजनतेला तर काय, पण शार्झलासुद्धां वाटूं लागलें होतें. शहाजीच्या वेळेपासून तंजावरचे मराठे हे अद्वैत मताच्या संन्याशांचे भक्त होते. हें इतिहास-

प्रसिद्धच आहे. व तिरुविसनाल्लूर हें ठिकाण त्यावेळीं वेदान्तविद्येंत पारंगत असलेल्या यतींचें निवासस्थान असल्या-बद्दल प्रसिद्ध होतें. या यतींना तंजावरचे मराठी राजे मदत करीत असत. रघुनाथ व सुधींद्र यांच्या वेळेपासून राजा तुळजाजी व सद्गुरु स्वामिगल यांच्यापर्यंत तत्वज्ञान व सुसंस्कार यांचा अखंड झरा वाहत होता, तो मात्र त्यापुढें अर्वाचीन काळाच्या रूक्ष वाळवंटांत कोरडा ठणठणीत झाला.

भोळेपणा.

३ लांच स्वीकारण्याच्या अपराधामुळें लॉर्ड पिगाट याला तेथील नोकरींतून तुळजाजीनें कमी केलें होतें व लांच खाण्याचा आरोप राजा तुळजाजीनें पिगाटवर उघडपणें करावा असें अध्यक्ष स्टॅटन यानेंसुद्धां सुचविलें होतें. परंतु राजा तुळजाजी हा मित्र व शत्रू या दोघांहि विषयीं उदार वृत्तीचा असल्यानें त्यानें आरोप केला नाहीं. शार्झ यानें तुळजाजीच्या दरबारचें या समयींचें ‘ चैनी व उधळ्या ’ असें जें वर्णन केलें आहे तें अतिशयोक्तीचें मानिलें तरी तुळजाजी हा राजा स्वतःच्या राज्य-कारभाराविषयीं उदासीन असल्याचें दर्शक आहे. तुळजाजीची मद्यपानासक्ति व डबीरपंतासारख्या योग्य माणसाला नोकरींतून कमी करणें, असले उद्वेगजनक प्रकार यावेळच्या मद्रासच्या हस्त-लिखितावरून दिसतात.

अन्याय्य वर्तन.

४ आपल्या वडिलांच्या वेळच्या कर्तृत्वशाली कारभारी मंडळाला नोकरींतून कमी करणें अथवा कैदेंत घालणें हें पहिलें कृत्य राज्यारोहण होतांच तुळजाजीनें केलें. त्यानें राज्याधिकार धारण करितांच जमाबंदीचा मुख्य कारभारी डबीरपंत याची संपत्ति हरण करणें हें पहिलें कृत्य केलें.

कर्नाटकाचा नवाब महंमदअल्ली याचा तंजावरच्या प्रधानमंडळावर मित्रत्वाचा लोभ, त्यामुळें तुळजाजीच्या जुल्मी वर्तनानें त्याचें तुळजाजीसंबंधीचें प्रेम कमी झालें. वैयक्तिक अधिकाराच्या मदांधतेनें केलेल्या कृत्यानें तुळजाजी हा इतरांच्या मनांतून अगदीं उतरला व निःस्पृहपणें हितपरिणामी सल्ला देणारा असा एकहि उपदेशक त्याजवळ राहिला नाहीं. चाकरीवरून दूर केलेल्या डबीरपंताला राज्याच्या हितासाठीं पुनः चाकरीवर घेण्यांत आलें. राज्यामध्यें योग्य व निग्रहपूर्वक वागणारीं माणसें कामावर ठेविणें, त्यांच्या अधिकाराचीं कर्तव्यें मुकर करून नेमून देणें व त्यास ठरीव वेतन देणें हाच मार्ग सर्वोत्तम आहे अशी सर्वांची खातरी झाली. ज्या काळांतील राजव्यवस्थेची चर्चा आपण करीत आहोंत, त्या काळांत नालायक माणसें अधिकारारूढ असल्याचें दिसत नाहीं. कारण असे अधिकारी नेमणें म्हणजे चौकोनी ठोकळा एकाद्या नळींत कोंबून ठोकळा व नळी अशा दोनहि वस्तु निरुपयोगी करण्यासारखेंच आहे. व हाच प्रकार तुळजाजीनंतर अमरसिंगाच्या कारकीर्दींत झालेला दिसतो. कारण त्याचा मंत्री सरखेल शिवराव याची नेमणूक त्याची योग्यता नसतांना झाली होती. माजी (नोकर) दिवाण सखोजी याला दुप्लीनें लांच देऊन सहज वश करून घेतलें होतें, पण तसा नोकर आतां कोणीहि नव्हता. पहिल्या सरभोजीसारख्या चांगल्या मराठी राजाच्या कारकीर्दींतहि तंजावरच्या दरबारांत कारस्थानें सुरू असतच, व त्या कारस्थानांचा परिणाम सरभोजीला एक बनावट अपत्य तयार करून देण्यांत झाला. शेंवटीं प्रतापसिंहाच्या दरबारांत मानाजी व गड्डीराव यांचें वैयक्तिक वैर भयंकर रीतीनें परिणत झालें. परंतु

असल्या अपवादाशिवाय प्रतापसिंहाची बाकीची कारकीर्द नांवाजण्यासारखीच झाली.

मरवांशी युद्ध व नबाबाशी बेबनाव.

५ पूर्वी सन १७६३ मध्यें रामनदाच्या पाळेगारांनीं तंजावरकरांचे हनुमंतगुडी व इतर प्रांत हस्तगत केले ते परत मिळविण्यासाठीं तुळजा राजानें सन १७७१ मध्यें रामनदकरावर स्वारी करण्याची सिद्धता केली. दुसरें एक भांडण वारसाईबद्दल होतें, त्यांतहि तुळजाजीनें एक पक्ष घेतला होता. तुळजाजीनें आपले प्रांत मिळविले व लहान मोठ्या मरवांच्याकडून द्रव्यहि प्राप्त करून घेतलें. मरव हे कर्नाटकाच्या नबाबाचे संस्थानिक होते, व त्यांचें आणि तुळजाजीचें रहस्य नव्हतेंच. त्यांत आतांच सांगितलेला तुळजाजीच्या मध्यस्थीचा व स्वारीचा प्रकार नबाबास अपमानकारक वाटला व त्यानें राजाला शिक्षा करण्याचा बेत केला; आणि सन १७७१ मध्यें इंग्रजी कंपनीनेंहि नबाबाला मदत पाठविली. याप्रमाणें सैन्याची मदत मिळतांच नबाबानें किल्ल्याला वेढा घातला, तटाला खिंडार पाडिलें व नबाबाच्या फौजेनें किल्ल्यावर हल्ला चढविण्याची सिद्धता केली. इतक्यांत राजानें नबाबाच्या मुलास मोठी रक्कम देण्याचें ठरविलें व त्या मुलानें इंग्रजांच्या मान्यतेशिवाय स्वतंत्रपणें तहहि केला. राजास मदत करण्याचें त्रिंबकरावानें कबूल केलें. याच समयास पांच लक्ष रुपये घेऊन आनंदराव हा म्हैसूरकरांशीं विरोध करण्यांत गुंतला होता. परंतु नबाबानें चार लक्ष रुपये देण्याचें कबूल करितांच आनंदरावानें आपलें वचन मागें घेतलें. अशा भानगडी झाल्यामुळें तुळजाजी राजाला त्यावर

स्वारी करणाऱ्या नबाबाशीं अपमानास्पद तह करणें भाग पडलें. मागील बाकी म्हणून आठ लक्ष रुपये देण्याचें ठरलें व लढाईचा खर्च म्हणून सुमारें बत्तीस लक्ष रुपये नबाबास देण्याचें तुळाजीनें मान्य केलें. या बत्तीस लक्ष रुपयांच्या ऐवजीं दोन प्रांत (सुभे) नबाबाकडेस दोन वर्षेंपर्यंत राहावेत; (इंग्रजी) कंपनीचे व्यापारी व विणकरी यांचें संरक्षण राजानें करण्याचें मुक्रर झालें व नबाबाला ज्या परकीय लोकांनीं युद्धसंबंधीं मदत दिली होती त्यांच्याशीं वागण्याची नबाबाची जी राजनीति ठरेल त्याप्रमाणें राजानेंही आपली राजनीति ठरवावी असें ठरलें. तंजावरच्या ताब्यांत अरणी ही बरींच वर्षें होती; ती व हनुमंतगडी असे दोनहि प्रांत राजापासून परत घेतले. या प्रकारें झालेल्या गुप्त करारांत ईस्टइंडिया कंपनीचा फायदाच झालेला होता, तरीहि हा प्रकार मद्रास येथील इंग्रजांच्या मुख्याला ग्राह्य वाटला नाहीं.

आरोपांची अयर्थाथता.

६ वर सांगिल्याप्रमाणें तह झाला, परंतु तुळजाजीनें तो पाळिला नाहीं. सातारकर छत्रपति व हैदरअली यांच्याशीं तो कांहीं कारस्थान करीत असावा अशी समजूत होती. परंतु वस्तुस्थिति अशी होती कीं, कर्नाटकचा सुलतान व तंजावरास नुकताच आलेला म्हैसूरचा राजा या दोघांनांहि लांचेच्या स्वरूपाची कांहीं देणगी देण्याच्या विचारांत तुळजाजी हा होता. अशी देणगी जर न दिली तर म्हैसूरचा राजा तंजावर लुटून खैदान मैदान करील अशी त्याला धास्ती वाटत होती. सातारा दरबार व तंजावरचा दरबार यांच्यामध्यें कांहीं पत्रव्यवहार होता. सातारकराशीं व असा पत्रव्यवहार असणें आपल्या इभ्रतीस फार

हानिकारक आहे अशी नवाबाची समजूत झाली होती. परंतु तंजावरच्या प्रतापसिंहापासून म्हणजे तुळजाजीच्या तीर्थरूपापासून सातारकर छत्रपतीशीं त्यांचा मित्रत्वाचा पत्रव्यवहार होताच. युद्धप्रसंगीं डच व डेन्स लोकांनीं तुळजाजीराजाला कांहीं लष्करी साहाय्य केलें होतें. त्यामुळें तुळजाजीनें डच व डेन्स लोकांना कांहीं खेडीं विकत दिलीं होतीं. या कारणानें तुळजाजी हा कांहीं दंग करण्याच्या विचारांत असल्याचा संशय अधिक दृढ झाला होता. अशा एकंदर कारणांमुळें इंग्रज कंपनीच्या मदतीनें (अर्काटच्या नवाबानें) सन १७७३ मध्यें पुनः एकदां तंजावर सर करून तुळजाजीला कैद केलें. याच सुमारच्या तुळजाजीच्या विनंतीवरून फौजेसह राघोबा पेशव्यानें दक्षिणेवर चालून जाऊन ' तंजावरचें राज्य हें अर्काटच्या नवाबाचें मांडलिक नसून सातारच्या शाहू छत्रपतींचें मांडलिक आहे, म्हणून तंजावरच्या राजाला आम्हांस सोंपावें ' अशी नवाबाजवळ मागणी केली होती. परंतु इतर पुष्कळशा कारस्थानांमुळें ही मागणी तशीच टाकून राघोबाला परत पुण्यास जाणें भाग पडलें. हा प्रसंग सन १७७१-७२ मधील होय. त्या वेळीं पुण्यासहि पेशवाईबद्दल भानगडी सुरूच होत्या. व राघोबाला पुण्यास परत येण्यास तेंहि कारण असूं शकेल.

नबाबाची स्वारी.

७ आठ हजार कर्नाटकी सैन्याचें ठाणें नबाबानें तंजावरास ठेविलें. तंजावरचें राज्य सन १७७३ पासून सन १७७६ पर्यंत म्हणजे सरासरी तीन वर्षें पर्यंत मुसलमानांच्या ताब्यांत होतें. तंजावरच्या हिंदुराजांच्या दीर्घकालीन इतिहासामध्यें हें तीन वर्षांचें यावनीवर्चस्व अपवादरूप होय. तंजावरची परिस्थिति मोठी बिपद्‌ग्रस्त होती. नबाबानें तंजा–

वरचें उत्पन्न आपल्या धनकोला लावून दिलें होतें. व ते धनकोहि फॉल बॉनफील्डसारखे कठोर हृदयाचे होते. त्यांनीं अन्नान्न झालेल्या व कोणतीहि तक्रार करण्यास अशक्य असलेल्या असाहाय्य शेतकऱ्यांपासून कवडीन्‌कवडी हिसकाऊन घेतली. तंजावरांतील बरेच लोक बेकार व उपाशी राहिल्यामुळें त्यांनीं देशत्याग केला असें शाझनें लिहून ठेविलें आहे. सन १७७५ मध्यें एक्यैशीं लक्ष रुपये वसूल केले होते. वस्तुतः ही रक्कम फारच मोठी होती. कारण तोंपर्यंत जास्तींत जास्त वसूल सन १७६१ मध्यें फक्त साडेसत्तावन लक्षांचाच झाला होता. सन १७७४ ते १७७६ पर्यंतच्या काळांत नवाबानें साडेसत्त्याण्णव लक्ष चक्रम् तंजावरांतून वसूल केले होते. असें पिगॉट म्हणतो.

तुळजाजीची राजपदावर पुनः स्थापना.

८ कोर्ट ऑफ डायरेक्टरांनीं कर्नाटकाच्या नबाबाची तंजावरवरील ही दुसरी स्वारी दूषणीय ठरवून तुळजाजीला सोडून देण्याचा नबाबाला हुकूम केला. त्याकाळीं स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करणें हें तुळजाजीच्या आवांक्याबाहेरचें होतें; व त्याला परिणामकारक मदत देण्यास मराठे व हैदरच समर्थ होते; परंतु एकाच्याहि दरबारांत निष्णात राजकारणी पुरुष नसल्यामुळें दोघेहि असमर्थच होते, असें म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. त्यामुळें, तुळजाराजानें बंड करण्याचा प्रयत्न केला होता, या म्हणण्यांत मुळींच तथ्य दिसत नाहीं. संकटप्रसंगीं इंग्रजांच्या अधिकारी वर्गाची मालिका स्वतःच्या व कंपनीच्या हिताच्या संरक्षणार्थ नेहमीं सज्ज असे. इंग्रजी पद्धति आजहि (स. १९३३) आस्तित्वांत आहे. या पद्ध-

तिमुळें संकटग्रस्त व्यक्ति तेव्हांहि वरिष्ठाकडेस मदतीची याचना करी, व त्या वरिष्ठाला आपल्या चुकींची दुरुस्ती करण्याला अवसर मिळे. तो वरिष्ठ या अशा तक्रारींच्या निमित्तानें हाताखालच्या कामगारांच्या कामाची तपासणी करी व त्यांजकडून झालेल्या चुकांवर मोठ्या औदार्यानें सारवासारव करी. किंबहुना सारवासारव करण्याची अशी संधि तो व्यर्थ गमावीत नसे. राज्यारूढ झाल्यावर तुळजाजीराजानें स्वतःचें दैन्य बाजूस ठेवून इंग्रजी कंपनीस अतिशयोक्तिपूर्ण असें एक नमुनेदार पत्र लिहिलेलें आहे. त्यांत तो म्हणतो, " इंग्रजी कंपनीचे उपकार इतके आहेत कीं, मला एक हजार जिव्हां असत्या तरीहि त्या त्याचें वर्णन करूं शकल्या नसत्या. हा देश कंपनीचाच आहे.......".

नवीन तह.

९ तुळजाजी राजा पुनः तंजावरच्या राज्यावर अधिष्ठित होताच कंपनीकडून त्याच्याशीं नवीन तह घडविण्यांत आला; व जें कांहीं लहानसें सैन्य त्याच्या ताब्यांत होतें, तेंहि त्याच्याकडून या तहाच्यां आधारानें कमी करण्यांत आलें. सन १७६८ मध्यें सहा हजार स्वार व दोन हजार पायदळ एवढें सैन्य तुळजाराजाजवळ होतें असें शार्झ म्हणतो. परंतु आतां तेंहि कमी झालें. फक्त राजाच्या संरक्षणाचेंच लहानसें सैन्य असावें असें ठरलें. फिरंगी वगैरे इतर युरोपियन लोकांचा त्रास पोहोंचूं नये म्हणून राजानें इंग्रजी फौजेची एक तुकडी आपल्या पदरीं ठेवावी. अर्थात् या तुकडीचा खर्च कंपनीस द्यावा व खंडणी वेळच्यावेळीं नबाबास द्यावी. याशिवाय तंजावरच्या संरक्षणार्थ कंपनीला एक फौज बाळगावी लागेल, तिच्या खर्चासाठीं चार लक्ष रुपये कंपनीस

द्यावे. पाळेगार किंवा कालार यांनीं जर तंजावरच्या राज्यांत लुट-लुटींस प्रारंभ केला तर त्याचा बंदोबस्त करून त्यांना हाकलून देण्यासाठीं राजानें कंपनीची पायधरणी करावी.' अशा प्रकारचीं कलमें तहांत होतीं. आपलें राज्य आपणच सांभाळावें हें राजयंत्राचें मुख्य लक्षण. पण तेंच तुळजाजीला पुनः राज्यपद मिळवून देण्याच्या निमित्ता-नेंच याप्रकारें हिरावून घेतलें गेलें. या तहांत आणखी एक कलम असें होतें कीं, तुळजाजीनें स्वतःचे असें कोणतेंहि राजकारण परदेशाशीं स्वतंत्रपणें करूं नये. परंतु हें कलम व्यर्थच होतें. मात्र यायोगें कंपनीचा फाजिल सावधपणा दिसतो. कारण, त्यावेळीं हिंदुस्थानां-तील इतर यूरोपीय सत्ता मरणाच्या पंथाला लागलेल्या होत्या. सन १७६९ मध्यें हैदराशीं जो तह झाला त्यांत तंजावरच्या या तुळजाजी राजाला 'कर्नाटकाचा मित्र व साहाय्यकर्ता' असें म्हटलें आहे. साराश, या वेळेला तंजावरच्या राजाला निबल, परंतु थोडें अधिक उत्पन्न असलेला, असा एक जहागीरदारच बनवून ठेविला होता. सारांश त्याचें राज्य लयास जाऊन त्याची म्हणून म्हणविणारी रयत कफल्लक होऊन राहिली होती. म्हणजे छत्रपती शिवाजीच्या प्रसिद्ध कर्नाटकच्या स्वारीनंतर सुमारें शंभरच वर्षांनीं तंजावरच्या राज्याची याप्रमाणें इतिश्री झाली. सन १७६३ सालीं पॅरिस येथें जो तह झाला, त्यायोगें कर्नाटकचा स्वतंत्र नबाब हा असाहाय्य राजा होऊन इंग्रज कंपनीच्या हातांतील बाहुलें व सावकाराच्या हातांतील एक खेळणें बनला. कर्नाटकची एक मुख्य सत्ताधारी संस्था कंपनी ही बनली होती व तिचा दरज्जा संरक्षण करण्यासाठीं तिच्या पदरीं पुरेशी फौज व भरपूर दारूगोळ्यांची युद्ध सामग्रीहि नेहमीं जय्यत असे. कारोमांडळच्या किनाऱ्यावर यावेळीं फक्त कंपनीचीच

फौज राहत होती व तिचें पोषण नबाब आणि तंजावरकर राजे यांच्या उत्पन्नांतून होत असे. म्हणजे कंपनी हीच कर्नाटकची खरी राज्याधिकारिणी सत्ता बनली. तिनें नबाबाला पुष्कळ चढविलें व तो वेडगळपणानें स्वतःच्या हितसंबंधीं अंध झाला. कंपनीनेंहि त्याला द्रव्य व दारूगोळा देतो देतो म्हणून नुसत्या थापावर झुलविलें. प्रजेला तोडून दिलेलीं उत्पन्नें, देवळांचीं इनामें, मठ, धर्मशाळा व भटभिक्षुक यांना अर्पिलेल्या धर्मादाय देणग्या, यांखेरीज करून २७७ खेड्यांचा नागोर जिल्हा कंपनीस तोडून दिला. दक्षिणेकडील सुपीक प्रदेशांत कंपनीचा पाय रोंवण्यास हें दुसरें साधन झालें. पुढें भविष्यकाळीं मोठमोठे बलाढ्य राजेहि कुमकेचा स्नेह जोडण्याच्या कंपनीच्या जाळ्यांत सहज सांपडले. त्यांतून दुर्बळ तुळजाजी निसटणें मुळींच शक्य नव्हतें. तुळजाजी हा इंग्रजांचा मित्र व संरक्षित राजा झाला. या तहानंतर लवकरच तंजावरचें राज्य खालसा झालें; त्यामुळें हा तह म्हणजे भटाला मिळालेल्या ओसरीसारखाच झाला. याचा अर्थ असा कीं, पुनः राज्यपद मिळविण्यासाठीं तुळजाजीला फार भारी किंमत द्यावी लागली; व त्यानंतर एका मागून एक जे तह झाले, त्याच्यायोगें राजाची परिस्थिति फार बिकट होऊन तो खर्चाखालीं चेपून गेला.

हैदराची स्वारी व प्रजेची दुर्दशा.

१० म्हैसूरच्या दुसऱ्या युद्धप्रसंगीं (सन १७८१ मध्यें) हैदरानें तंजावरावर जी स्वारी केली, त्या स्वारीमुळें लोकांचे जे हाल झाले ते फक्त लेखांच्या स्वरूपांत आज दिसतात. ब्रेटविट हा टिपूस तंजावर येथें शरण गेल्यानें तुळजाजीराजाची परिस्थिति मोठी बिकट झाली. कारण त्यायोगें तुळजाजीचा एकुलता एक संरक्षकहि

कमी झाला. राजधानीच्या मुख्य (म्हणजे तंजावर) शहराशिवाय बाकी सर्व प्रदेशांत सहा महिनेपर्यंत शत्रूंनींच मुक्काम ठोकिला होता. तेथलि प्रजेला लुटण्यांत येऊन कांहीं व्यक्तींना पळवून नेण्यांतहि आलें. अगदीं नंतर म्हणजे सन १७८४ मध्यें टिप्पूनेंच बारा हजार मुलें पळवून नेलीं असें श्वार्झ म्हणतो. (अर्थात्च या अर्भकांना मुसलमानी धर्माची दीक्षा दिली असावी. असो.) प्रजेचीं जनावरें नेलीं व कालवे बुजवून टाकण्यांत आले. आणि चोऱ्यामाऱ्या करण्यास नेहमीं तत्पर असलेल्या कालार लोकांनीं रिकामी झालेलीं धान्यागारें (कोठारें) अगदीं स्वच्छ करून ठेविलीं. नवाबानें सतत तीन वर्षें व नंतर तुळजाराजानें पिळून काढिल्यामुळें प्रजा अगदीं वैतागून जन्माला आल्याबद्दलच शोक करूं लागली. तिनें, अन्नान्न स्थितिमुळें दीनवाणीनें, परमेश्वराच्या प्रार्थनेस प्रारंभ केला. पुष्कळ जमीन नापिक झाली. बेकारी माजली व अन्नाची भयंकर टंचाई झाली. पोटासाठीं पासष्ट हजार लोकांनीं देशत्याग केला. तंजावरामध्यें आजूबाजूला प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले होते, असें श्वार्झ म्हणतो. पीकपाणी व उत्पन्न यांचा विचार केला असतां पुढें पंचवीस वर्षेंपर्यंत म्हणजे सन १८०० पर्यंत तंजावरची आर्थिकस्थिति सुधारली नव्हती असें स्पष्ट दिसतें. या भीतिग्रस्त काळांत जी भीति व जें दुःख तेथील प्रजेनें अनुभविलें तें अपूर्व होतें. म्हणजे तशी भीति व तसें दुःख त्या प्रजेनें पूर्वीं कधींहि अनुभविलें नव्हतें. संस्थानच्या जमीनमहसुलाचें उत्पन्न अनिश्चित झाल्यामुळें तें वसूल करणेंहि मोठें घोंटाळ्याचें झालें. शेतीचें काम अव्यवस्थित झालें व कोणत्या साधनांनीं शेती करावी या संबंधींहि शेतकरी घोंटा-

ढ्यांत पडले. म्हणून अगदीं नवी, भयंकर परिणामी व जुलमी अशी एक पद्धति, शेती करण्यास अस्तित्वांत आणिली. या पद्धतीला शेती सुधारणारी पुट्टकदारी पद्धति असें म्हणत. कांहीं कर माफ करण्यांत आले व अधिक स्वास्थ्य देण्याचींहि वचनें देण्यांत आलीं.

मृत्यु व दत्तविधान.

११ वयाच्या एकुणपन्नासाव्या वर्षीं तुळजाजी हा मृत्यु पावला. त्याच्या राण्यांपैकीं दोघी राण्या सती गेल्या. त्यांची संतती त्याच्या हयातींतच निवर्तली होती. तुळजाजीनें आपला एक गोत्रज मुलगा मांडीवर घेतला व तो वयांत येईपर्यंत आपल्या एका भावानें राज्यकारभार पहावा असें निश्चित केलें होतें. हा भाऊ म्हणजे प्रतापसिंहाचा दासीपुत्र अमरसिंह होय. मांडीवर घेतलेल्या या मुलाचें नांव सरभोजी असें प्रसिद्ध करण्यांत आलें. तुळजाजीचा मित्र मिशनरी शार्झ यानें या सरभोजीची काळजी घ्यावी, असें तुळजाजीनें मरणसमयीं ठरवून सरभोजीला शार्झच्या स्वाधीन केलें होतें.

वंशवृक्ष.

१२ तुळजाजी हा मालोजीच्या वंशांतील सहावा पुरुष असून सरभोजी हा मालोजीचा भाऊ जो विठोजी त्याच्या वंशांतील आठवा पुरुष होय, हें वंशावळीवरून लक्षांत येईल. या दत्तविधानानें नातू हा आजोबाच्या मांडीवर बसून आपल्या पित्याचा भाऊ झाला.

बाबाजी.

१ मालोजी	१ विठोजी
२ शाहाजी	२ त्रिंबकजी
३ व्यंकोजी	हा तंजावरासच राहिला.
४ तुकोजी	३ गंगाजी
५ प्रतापसिंह	४ उवाजी
६ तुळजाजी	५ गंगाजी
याला संतति नसल्यानें यानें सरभोजीस दत्तक घेतलें.	६ सुभानजी
	७ शाहाजी
	८ सरभोजी

या सरभोजीच्या वंशांतलिच लक्ष्मीअम्मा ही कन्या बडोद्याच्या श्रीमंत सयाजीराव महाराजांचे पौत्र प्रतापसिंह यांची पितामही होय.

Additional authorities.

1 Copies of papers relative to the restoration of the Raja of Tanjore vols 1-3.

2 Wilks: Historical Sketches of South India 2 Vols.

3 Aitchison: Treaties, engagemets and Sanads vol. X

4 Schwartz, his remains consisting of letters journals &c.

5 Pearson: Memoirs of Schwartz 2 Vols.

6 Original papers relative to Tanjore.

7 The Restoration of the Raja of Tanjore Considered 1777.

प्रकरण ९ वें.

अमरसिंग सन १७८७ ते १७९८

मुद्दे.

१ नवीन तह.
२ अमरसिंगाच्या अडचणी.
३ टिपूच्या युद्धानंतरचा तह.
४ वारंवार तह करण्याचे हेतु व परिणाम.
५ अमरसिंगाच्या वारसाईची सशास्त्रता.
६ शार्ट्झचे प्रयत्न व सरभोजीस राजपदप्राप्ति.
७ अमरसिंगाची पदच्युति.
८ अमरसिंगाची योग्यता.

नवीन तह.

१ अमरसिंग ऊर्फ रामस्वामी हा प्रतापसिंहाचा दासीपुत्र म्हणजे प्रतापाच्या एका उपपत्नीचा मुलगा होय. या अमरसिंगानें तंजावरचें राज्य बळकाविल्यामुळें दुसऱ्या सरभोजीच्या कारकीर्दींत कोरल्या गेलेल्या शिलालेखांत याच्यासंबंधीं निंदाव्यंजक मजकूर आलेला आहे. सरभोजीच्या बालवयांत राज्यकारभार अमरसिंगानें पहावा अशी तुळजाजीच्या अन्तकाळची इच्छा होती. बालसरभोजी वयांत येऊन राज्यावर बसला, तेव्हां इंग्रजी कंपनीनें वस्तुतः बळजबरीनें निष्कारण एक तह त्याच्याकडून करून घेतलाच. तंजावरच्या राज्याची सुरक्षितता कायम राहण्यासाठीं कांहीं फौज ठेविणें अपरिहार्य होतें. त्या

फौजेच्या खर्चासाठीं तंजावरच्या उत्पन्नाचा दोन पंचमांश खर्च करणें अवश्य असल्याकारणानें तेवढें उत्पन्न कंपनीला तोडून देण्याचें ठरवून, कांहीं प्रदेश कंपनीच्या ताब्यांत देऊन, त्या उत्पन्नाची जामीनगिरी मुक्रर करण्यांत आली. प्रत्यक्ष युद्धप्रसंगीं फौजेच्या खर्चाचीहि रक्कम दुप्पट द्यावी असें ठरलें होतें. नबावाला कर्जाचें तीन लक्ष पॅगोडा व नबाबानें खंडणी दाखल देण्याचें सालिना चार लक्ष पॅगोडा मिळून होणारी सर्व रक्कम इंग्रजी नाण्यामध्यें कंपनीस तंजावरच्या राजानें देण्याचें ठरलें. उभय पक्षांच्या मित्रशत्रूसंबंधीं सर्वसाधारण कलम तहांत घातलें होतेंच.

अमरसिंगाच्या अडचणी.

२ पूर्वोक्त तहानें तंजावरच्या उत्पन्नावर इतकें ओझें लादलें होतें कीं, तें वेळच्या वेळीं देणें राजाला अशक्य झालें. प्रजेची दैना, संस्थानीं नोकरांचा लांचखाऊपणा, वसूलाच्या अडचणी, खंडणी व इतर देणं कंपनीस देण्याचा अनियमितपणा, यासंबंधीं मद्रास येथील हस्तलिखितांत उल्लेख आहे. आपली लोकप्रियता वाढविण्यासाठीं अमरसिंगानें कुडिवरम् (जमीन लावणीच्या मजुरीचें वेतन) वाढविलें व आपल्या कृपेंतील इसमांस आणि विद्वान् लोकांस जमिनींच्या जहागिरी दिल्या. राज्यांतील नियमित प्रदेशाच्या उत्पन्नाची जबाबदारी कांहीं इसमांस सोंपणें याला तंजावराकडे पुट्टकदारी (म्हणजे एक प्रकारची देशमुखी) पद्धति म्हणतात. जमाबंदीचा हिशेब व्यवस्थित ठेविणें व जमिनीच्या पिकांची वृद्धि करणें यासाठीं ही पुट्टकदारी पद्धति अस्तित्वांत

आली होती. परंतु ती यशस्वी झाली नाहीं; म्हणून जमाबंदीचें उत्पन्न वसूल करण्याची सर्व व्यवस्था सन १७९०-९१ मध्यें आपल्या हातीं घेणें इंग्रजीकंपनीस भाग पडलें. परंतु कंपनीचे दुभाषी म्हणजे मध्यस्थी कांहीं पहिल्या कामगाराहून अधिक थोर मनाचे आणि उदार वृत्तीचे नव्हते. त्यामुळें थोडक्याच अवधींत त्यांनीं शक्य तेवढें अधिक द्रव्य संपादन केलें. रेव्हरंड शार्झ म्हणतो कीं, दहा पंधरा वर्षांच्या अवधींत एक एका दुभाषानें दोन दोन चार चार लक्ष रुपयांची प्राप्ति करून घेतली होती.

टिपूच्या युद्धानंतरचा तह.

३ टिपूशीं युद्ध झाल्यावर सन १७९२ मध्यें कर्नाटकाच्या नबाबाशीं ज्या अटीवर तह झाला होता त्या, किंवा तशाच अटीवर अमरसिंगाशीं नवीन तह करण्यांत आला. कंपनीनें लष्करी व्यवस्था पतकरली व अमिरसिंगानें त्या प्रीत्यर्थ कांहीं रक्कम देण्याचें मान्य केलें. सैन्याची व्यवस्था कंपनीकडेस असून तंजा- वरच्या राज्यांतील किल्ल्यांवर मात्र राज्यांतल्या फौजेचीं ठाणीं होतीं. कंपनीची पूर्ण सत्ता राज्यावर व राज्याच्या उत्पन्नावर युद्ध- प्रसंगीं असे. उत्पन्नांतून फक्त एक लक्ष पॅगोडा व जमाबंदीच्या उत्पन्नाचा एक पंचमांश राजाला त्याच्या खाजगी खर्चासाठीं मिळण्याचें ठरलें होतें. मदतीची ठरलेली रक्कम व खंडणी मात्र वेळच्यावेळीं देण्याचें मुक्रर झालें होतें. मात्र यांत कसूर होतांच कंपनीनें स्वतंत्रपणें आपली रक्कम राज्यांतून स्वतंत्रपणें वसूल करून घेण्याचें मुक्रर झालें होतें. अगदीं आरंभीं परदेशीं राजकारण व सैन्यावरील सत्ता राजाकडून काढून घेऊन, मग राज्यांतील जमा-

बंदी वसूल करण्याचें कामहि कंपनीनेंच घेण्याचा प्रयत्न केला. तरवारीच्या म्हणजे सैन्याच्या बळावर प्रतिष्ठा असते व गमावलेली सत्ता खजिन्याच्या पूर्णतेवर परत मिळविणें शक्य असते. सैन्य व खजीना यांच्या अभावीं प्रतिष्ठा व सत्ता टिकणें किंवा परत मिळणें मुळींच शक्य नाहीं.

वारंवार तह करण्याचे हेतु व परिणाम.

४ वर सांगितल्याप्रमाणें जे तहामागून तह झाले, त्यावरून राजकारणीं लाभकारक अशा ठरीव धोरणाची प्रगति करण्याची इंग्रजांची आवड व्यक्त होते. याप्रमाणें प्रगति करून इंग्रजांनीं हळू हळू आपला शिरकाव राज्यव्यवस्थेंत करून घेतला व शेवटीं तंजावरचें राज्य खालसा केलें. मागाहून ठरविलेल्या प्रत्येक तहामुळें पूर्वीच्या तहापेक्षां कांहीं विशेष अधिकार कंपनीस मिळत गेले व त्यामुळें देशांतील लोकांची आर्थिकस्थिति व यथार्थ मनोदशा यांचा विशेष अभ्यास करण्यास व प्रजेशीं परिचित होण्यास कंपनीस पुष्कळ सवड मिळत गेली. असें करण्यांत कंपनीचा एकच हेतु होता; व तो असा कीं, कालानुसार तंजावरचें राज्य खालसा करण्याचा प्रसंग आलाच, तर प्रजेस त्याबद्दल वाईट वाटूं नये. कदाचित् शोकवर्धक कांहीं मनोविकार उत्पन्न झालेच, तर वाईटाच्या जागीं चांगली राजवट प्राप्त झाली असें अनुकूलतेचेच विचार तिच्या मनांत यावेत. यावरून कंपनीस तंजावरचें राज्य यापूर्वीच खालसा करितां आलें असतें, पण त्यायोगें प्रजेमध्यें अप्रीति उत्पन्न झाली असती असें वाटतें. तसा प्रसंग न यावा म्हणून एक सत्ताविहीन नामधारी राजा तंजावरच्या राज्यावर कंपनीनें आजपर्यंत ठेविला होता.

शिवाय एकाद्या नामधारी राजामार्फत जें हित कंपनीस साधता आलें तें राजाशिवाय तिला कसें साधतां आलें असतें? हाहि एक प्रश्न विचार करण्यासारखाच आहे. सत्तेची अगदीं बदल होण्यासारखी वेळ अद्यापि आली नव्हती. कारण कर्नाटकचा नबाब हा अद्यापि नामधारी कां होईना, पण मुख्य सत्ताधारी नबाब होता. मागें सांगितल्याप्रमाणें मित्रत्वासंबंधीं एकामागून एक असे झालेले अनेक तह बाजूस ठेवून कंपनीनें जर तंजावरचें राज्य खालसा केलें असतें, तर तिचें महत्त्व मुळींच राहिलें नसतें. दक्षिण हिंदुस्थानच्या राज्यकारणांत अद्यापपर्यंत म्हैसूरचा सुलतान हा एक प्रमुख म्हणून प्रसिद्ध होता. तंजावरकरांशीं जर शत्रुत्व पतकरिलें असतें, तर कंपनीच्या मार्गांतील सहज दूर होणाऱ्या अडचणी मात्र दूर होण्याच्या ऐवजीं अधिक वाढल्या असत्या.

अमरसिंगाच्या वारसाची सशास्त्रता.

५ तुळजाजीनें मरणसमयीं सरभोजीला दत्तक घेतलें होतें हें मागील आठव्या प्रकरणाच्या शेंवटीं सांगितलेंच आहे. अर्थात् तंजावरच्या राज्याचा खरा वारस तोच होता. पण त्याचा हक्क बाजूस सारण्याच्या अमरसिंगाच्या प्रयत्नामुळें सन १७९३ मध्यें मद्रासच्या गव्हर्नरास तंजावराच्या पंडिताशीं वाटाघाट करून सरभोजी हा खरा वारस नसून अमरसिंगच कायदेशीर वारस आहे, असें जाहीर करणें भाग पडलें. या प्रकारावरून उघड दिसतें कीं, आरंभापासूनच अमरसिंगाला मद्रासच्या गव्हर्नराची मदत होती, व त्या मदतीच्या जोरावरच तो आपला हक्क प्रस्थापित करूं पाहात होता.

शार्झचे प्रयत्न व सरभोजीस राजपद प्राप्ति.

६ रेवरंड शार्झ यानें अमरसिंगाला राज्यावरून काढून टाकण्याचें महत्वाचें कार्य ख्रिस्तीधर्माच्या उन्नतीच्या आशेनें केलें. अगदीं आरंभीं म्हणजे सन १७९० मध्यें त्यानें असें लिहिलें आहे कीं, कंपनीच्या संरक्षणासाठीं अमरसिंगानें राज्यांतील मुख्य लोकांना बोलावून सभा केली होती; परंतु कर्ज-फेडीसाठीं प्रांतचे प्रांत ज्यांना मक्त्यानें दिले होते, अशा एक लक्ष सावकारांचें समाधान कांहीं करण्यांत आलें नाहीं. अज्ञानी सरभोजीला दूर लोटल्यामुळें अमरसिंगाबद्दल शार्झ याला कांहीं प्रेम वाटत नव्हतें. शिवाय सरभोजी हा शार्झचा पाल्य असल्यानें तो राजा झाल्यावर आपल्या (ख्रिस्ती) लोकांचा बराच फायदा होईल अशी त्याची भावना होती. तुळजाराजा हा ख्रिस्ती धर्म स्वीकारील अशी ज्याप्रमाणें शार्झला आशा वाटत होती त्याचप्रमाणें सरभोजीबद्दलहि वाटत होती. कारण, एकादा संस्थानिक ख्रिस्ती होणें हा मिशनरींचा व ख्रिस्तीधर्माचा मोठाच विजय होय. शार्झनें मरतां मरतां सुद्धां ख्रिस्ती होण्याचाच सरभोजीला उपदेश केला. अशा कारणांमुळें अमरसिंगाचें दोष प्रसिद्धीस आणण्यांत शार्झनें मुळींच आळस केला नाहीं. ‘ अशिक्षित राजा ’ अशा प्रकारानें अमरसिंगाचा उल्लेख शार्झ हा करितो. या अमरसिंगाच्या कारभा-रांत दोष पुष्कळ होते. परंतु पर्वतप्राय अडचणींतून त्यानें राज्यकार-भार चालविला होता हें खरें आहे. तुळजाराजाची विधवा राणी व सरभोजी यांनीं आपणांस हा अमरसिंग वाईट रीतीनें वागवीत असल्याबद्दल लॉर्ड कॉर्नवालिस याजकडेस तक्रारी करून दाद

तली होती. व इंग्रजी राज्यव्यवस्थेचे आपण फार आभारी असून अझूनहि जगणार इत्यादि अतिशयोक्तिपूर्ण उद्गार सरभोजींनें काढिलेले आहेत.

अमरसिंगाची पदच्युति.

७ सरभोजींच्या दत्तविधानासंबंधानें शॉर्झची व्यक्त झालेली हार्दिक कळकळ आणि सरभोजीचा इंग्रज कंपनीशीं झालेला थोरपणाचा पत्रव्यवहार, या मानानें मद्रास सरकारचें या प्रसंगीचें वर्तन फारच कठोर व विदारक दिसतें. सरभोजी हा आपल्या जन्मदात्या पित्याचा एकुलता एकच पुत्र असल्यानें सन १७९३ मध्यें त्याचें दत्तविधान अयोग्य असल्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यावेळीं तो स्वतः चांगला वयांत आलेला होता व त्याला दत्तक घेणारा तुळजाजी हा अत्यंत दुर्बळ झालेला होता. या समयास कांहीं गुह्य कारणांनीं मद्रास सरकारनें त्यास अनुमति दिली. आपणांस मान्य असलेल्या ठरावाखालीं इंग्रजांनीं कांहीं लोभी व भित्र्या पंडितांना सही करावयास लावून अमरसिंगाला त्या लेखानें सन १७९६ मध्यें पदच्युत केलें व सरभोजीला राज्यावर बसविलें. राज्यारोहण आणि पदच्युति तत्काळ झाली तरीहि आनंद किंवा शोक या योगें प्रजा व्याप्त झाल्याचें चिन्ह जें अश्रुसंचन तें झाल्याचें दिसत नाहीं. कारण राजांची अदलाबदल झाल्यामुळें प्रजेला कधींहि कांहींच वाटत नसे. फक्त करवाढ झाली तरच तिची जाणीव प्रजेस होई. लॉर्ड व्हॅलेशियाच्या प्रवासवृत्तावरून असें दिसतें कीं, यानंतर दोनच वर्षांनीं म्हणजे सन १७९८ मध्यें सरभोजींनें जसा खर्चासाठीं सालीना ठरीव रक्कम घेऊन राज्याचा राजानामा दिला,

तसा राजीनामा रेसीडेंटाच्या इच्छेप्रमाणें अमरसिंगानें सन १७९६ मध्यें देण्याचें नाकारिल्यामुळें त्याची पदच्युति झाली. दत्तकाचा शास्त्रार्थ व अमरसिंगाची पदच्युति यांना संभवनीय मुख्य कारण काय होतें हें यावरून लक्षांत येतें. सारांश, सरभोजी हा तुळजाजीचा दत्तक पुत्र असल्याबद्दलची योग्य पदवी त्यास प्राप्त झाली.

अमरसिंगाची योग्यता.

८ मेजर वसू यानीं The rise of the Christion power in India, vol 2 P.405 " या पुस्तकांत The life of General Sir Devid Baird " या ग्रंथांतील एक उतारा दिला आहे. त्यावरून अमरसिंग हा भला व मोठा कृपाळू होता असें दिसतें. इंग्रज कंपनीशीं तो मोठा स्वामिनिष्ट असे. कंपनीनें अनेक तहांच्या योगें तंजावरच्या राजांच्या मानेवरील जोखड जरी जड करून ठेविलें होतें, तरीहि तें त्यानें उचललेंच होतें. भल्या लठ्ठ वार्षिक नेमणुकी घेऊन राज्याचा त्याग करणें व तें राज्य इंग्रजी कंपनीस सोंपणें ही कल्पना त्याला पटली नाहीं. यावरून तो मोठा तत्त्वनिष्ट होता असें दिसतें. वारंवार वदलणारीं कंपनीचीं धोरणें व राज्याच्या जमाबंदीचें ओझें, यायोगें कोणीहि इतर अधिक कर्तृत्ववान् व्यक्ति राजपदावर आली असती तरी, तिनेंहि अमरसिंगापेक्षां अधिक यशस्वी रीतीनें तंजावरचा राज्यकारभार चालविला असता असें वाटत नाहीं. सरकारी खजीन्यांतील शिल्लक राजाच्या खर्चापुरतीहि नसे, अशा परिस्थितींत दुसरा राजा तरी प्रजेसाठीं काय करूं शकला असता ? सरकारी कर वसूल करणाऱ्या अमंलदाराला पौरस्त्य प्रजा फार भीत असते. त्या भीतीपासून फक्त त्यानें प्रजेचें

संरक्षण केलें असतें. प्रजेवर जुल्म करण्याचे--दडपशाही व अन्याय असे-दोन प्रकार असतात. आणि राजानें मुख्यतः याच प्रकारापासून प्रजेचें संरक्षण करावयाचें असतें. तंजावरच्या राजाचे सावकार व कंपनीचे दुभाषे यांचे जुल्म प्रजेवर होत होते. त्यावरून दडपशाहीचा मुद्दा तंजावरच्या राजाच्या विरुद्ध जातो. परंतु शॉअर्च्या संमतीनें केलेली न्यायदानाच्या पद्धतीची यथायोग्य योजना ही पदच्युत केलेल्या अमरसिंगाच्या शहाणपणाची उत्तम रीतीनें पटणारी साक्ष होय. मजुरांच्या ओझ्यावरील कर निम्मे करणें व शेतें प्रत्यक्ष नांगरणारांची मजुरी वाढविणें (म्हणजे कुडीवरम) या परोपकारी वृत्तीमुळें अमरसिंगाला लोकप्रियतेची आवड होती; व राज्याची कामधेनु जी प्रजा, ती चांगली व दुधाळ राहावी अशी त्याची कृति होती हें उघड दिसतें.

प्रकरण १० वें

(दुसरा) सरभोजी सन १७९८ ते १८३३ आणि शिवाजी सन १८३३ ते १८५५.

मुद्दे

१ इंग्रजी कंपनीचे तह व सरभोजीची राज्यनिवृत्ति.

२ इंग्रजी कंपनीचें दूरदर्शित्व व त्याची नैतिक योग्यता.

३ सरभोजीची संस्कृति.

४ सरभोजीनें केलेल्या सुधारणा.

५ सरभोजीचे गुण.

६ सरभोजीचा पुत्र शिवाजी.

७ तंजावरचें राज्य खालसा झाल्यावर तेथील राज्यव्यवस्था.

८ सत्तेचें अधिष्ठान.

इंग्रजी कंपनीचे तह व सरभोजीची राज्यनिवृत्ति.

१ तंजावरच्या राज्याची व्यवस्था आपण सुधारूं अशा अर्थाचें वचन, राज्यावर येण्यापूर्वी सरभोजीनें दिलें असावें, असें सन १७९९ च्या तहाच्या प्राथमिक हकीकतीवरून दिसतें. तंजावर राज्यांत नोकरलोक लांच वगैरे स्वीकारीत असत. त्या कर्तव्यभ्रष्टतेची चौकशी करण्यासाठीं सन १७९८–९९ मध्यें इंग्रजीकंपनीनें एक समिति नेमिली होती. राज्यांत जुलूमजबरदस्ती मात्र नव्हती. तथापि, राज्याची उत्कृष्ट व्यवस्था लागावी

या हेतूनें सालीना एक लक्ष पॅगोडा व जमाबंदीपैकीं एकपंचमांश इतकें उत्पन्न स्वीकारून सरभोजीनें तंजावरचें राज्य कंपनीच्या स्वाधीन केलें व तो स्वतः राज्याच्या दगदगींतून निवृत्त झाला. सन १७९२ मध्यें जो तह झाला होता त्यानें तंजावरच्या राजाची बहुतेक सत्ता व त्याचें उत्पन्न संपुष्टांतच आलें होतें. पण सरभोजीनें वरप्रमाणें राज्यनिवृत्ति पतकरून त्या तहापुढें एक पाऊल टाकिलें. तो कायदेशिर वारस राजा ठरला असला तरी खरें सांगावयाचें म्हणजे तो नामधारीच राजा होता. त्याच (ह्मणजे सन १७९२) सालांत झालेल्या दुसऱ्या एका तहानें तंजावरांतील किल्ला व जवळपासचा प्रदेश यांशिवाय बाकीच्या सर्व प्रदेशावरील स्वामित्व सरभोजी राजानें गमाविलें होतें. कायम जमाबंदी व न्यायदानपद्धति कंपनीनें स्थापन करावयाची होती. कंपनी जी जमाबंदी मुक्रर करील ती कधींहि फिरवूं नये असें ठरलें होतें.

इंग्रजी कंपनीचें दूरदर्शित्व व त्याची नैतिक योग्यता.

२ सर्व गव्हर्नरजनरलांमध्यें श्रेष्ठ जो लॉर्ड वेल्स्ली, तो यावेळीं कंपनीच्या राज्यव्यवस्थेचा मुख्य सूत्रधार होता; व अशा करड्या सत्ताधाऱ्याकडून वर सांगितल्यापेक्षां अधिक नरम व्यवस्थेच्या अटी ठरल्या असत्या असा तर्कसुद्धां करितां येत नाहीं. सारांश, अमरसिंगापासून तंजावरचें राज्य काढून तें सरभोजीला देण्यांत कांहीं विशेष कारण किंवा विशेष हेतु होता, असें स्पष्ट दिसतें. याप्रकारें योजिलेल्या दीर्घकालीन शहाणपणाबद्दल कोणालाच संशय वाटत नाहीं. फक्त या शहाणपणाच्या नैतिक योग्यतेबद्दल प्रश्न उपस्थित होतो; परंतु स्वर्गप्राप्ति व राज्यप्राप्ति यांत खरे-

खरी जर्मीन अस्मानाचें अंतर शब्दशः असल्यानें त्यांच्या प्राप्तीची साधनेंहि तशींच भिन्न भिन्न व क्वचित परस्पर विरोधीहि असणारच. हिंदी लोकांचें लक्ष राज्यप्राप्तीपेक्षां स्वर्गप्राप्तीकडेच विशेष होतें व आहेहि हें प्रसिद्धच आहे. परंतु परिणामाच्या योग्यतेवरून साधनांची नीतिमत्ता ठरविण्याच्या अनेक बाबतींपैकीं ही राज्यप्राप्तीची बाबत आहे असेंच म्हणावें लागतें. सरभोजीच्या प्रजेनें अर्वाचीन काळ व अधिक कुशल राज्यकारभार अनुभविला यांत संशय नाहीं. सैन्य अथवा पुरेसें द्रव्यबळ यांच्या अभावीं सरभोजी राजा आपल्या राज्याचें संरक्षण करण्यास अथवा समान दर्जाच्या इतर संस्थानिकांकडून व मित्रांकडून मानमान्यता मिळविण्यास असमर्थ झाला होता. याचें तात्पर्य असें कीं, पदरीं सैन्य नसल्यामुळें त्याला प्रजेचें संरक्षण करितां येईना, व खजीन्यांत पुरेशी संपत्ति नसल्यामुळें इतर संस्थानिक व मित्र त्याला मानसन्मान देईनात. प्रजेच्या सुस्थितीच्या वृद्धीसाठींहि सरभोजीला कांहीं करितां आलें नाहीं. खजीन्याची मत्ता व फौजेवरील सत्ता हीं ज्याच्या आधीन असतात, तोच राज्य कारभाराबद्दल व प्रजेच्या सुस्थितीबद्दल जबाबदार असतो, हें उघड आहे. एकाकी झालेल्या तंजावरच्या राज्याला एकुणीसाव्या शतकांत कांहीं जीवितहेतु किंवा इतिकर्तव्यता राहिली नव्हती. तेथील राजे दुर्बळ व असहाय असे होते. त्यामुळें ते कर्नाटकाच्या नबाबाच्या राजकारणाला व इंग्रजीकंपनीच्या शक्तिमत्तेला सहज बळी पडले.

सरभोजीची संकृति.

३ सरभोजीनें आपलें सर्व आयुष्य सुसंस्कृतीला वाहून आपला दरबार विद्वत्तेचें माहेरघर बनविला. सरभोजीचा शिक्षक एक मिशनरी शॉर्झ हा

होता, हें प्रसिद्धच आहे. या शार्झच्या सन्निध्यानें सरभोजीला पाश्चात्य शिक्षणाची गोडी लागली व हिंदी पंडितांच्या सान्निध्यामुळें पौरस्त्य शिक्षणाची आवड त्याला होतीच. शॉर्झचें एक संगमरवरी स्मारक या सरभोजीनें तंजावरामध्यें ख्रिस्तीदेवळाजवळच उभारिलेलें आहे. तो इंग्रजी भाषा उत्तम प्रकारें बोलत व लिहीत असे. त्यानेंच तंजावरांत एक उत्तम पुस्तकालय स्थापन केलें असून त्यांत छापील व हस्तलिखित अशा विविध भाषांतील ग्रंथांचा संग्रह उत्कृष्ट आहे. डॉ. बार्नेल यानें येथील पुस्तकांची एक सूचि लिहिली आहे. तीवरून असें दिसतें कीं, हें पुस्तकालय अनेक नामांकित व विस्तीर्ण पुस्तकालयांपैकीं एक असून यांत बावीस हजार ग्रंथांचा संग्रह आहे. त्यांतील संख्याधिक्य संस्कृत ग्रंथांचेंच आहे. तेथें वेदान्त, व्याकरण, काव्य, गायन, नृत्य, शिल्पकला, ओषधी, खगोल इत्यादि अनेक विषयांवरील ग्रंथांचा संग्रह आहे. या पुस्तकालयांत ताडपत्रावरील ग्रंथांचाहि संग्रह चांगलाच आहे. हे ग्रंथ नायकराजांच्याहि पूर्वीचे आहेत. परंतु त्यांतील बरेच ग्रंथ नायक व मराठे राजे यांच्याहि काळचे असावेत असें दिसतें. औषधोपचारांसंबंधींची माहिती जमा करून ती सरभोजीच्या आज्ञेनें पुढील पिढीच्या हितासाठीं व्यवस्थित रीतीनें लिहून जतन करून ठेविली आहे.

सरभोजीनें केलेल्या सुधारणा.

४ सरभोजीनें एक लहानसें संग्रहस्थानहि स्थापिलें, जुनीं नाणीं जमविलीं व त्याकालीं आश्चर्यकारक वाटत असलेला छापखानाहि सुरू केला. या छापखान्यांत देवनागरी खिळे जुळविता येत असल्यानें त्या प्रकाराचा तो पहिलाच छापखाना होय. जेते या

-नात्यानें मराठ्यांनीं दक्षिण हिंदुस्थानांत प्रवेश केल्यावर स्वतःबरोबर देवनागरी लिपी नेली असावी. पुढें या देवनागरी लिपीनें तिकडील ग्रंथलिपीहि काबीज केली. तंजावर येथील पुस्तकालयांत अलीकडेस सांपडलेल्या शिवभारत या पोथीच्या नक्लेसंबंधीं असा तर्क वाहतो कीं, ती सन १७९८ नंतर केव्हां तरी झाली असावी. परंतु ही पोथी नक्कल नसून अस्सलच असली तर ती सन १७९८ नंतरच केव्हां तरी रचिली असावी. या पोथीच्याच आधारावर प्रचलित शिवजन्म मिति बदलण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु अस्सल पोथी प्राप्त होईपर्यंत हे प्रयत्न सिद्धिस जातील असें दिसत नाहीं. बाकी कांहींहि असलें तरी सदर पोथीचा कवि शिवाजीच्या दरबारांत असून त्यानें आपला ग्रंथ शिवाजीच्या सांगण्यावरूनच लिहिला आहे, हें पोथींतील वर्णन काव्यमय असल्यानें अनैतिहासिक होय. कारण मराठी दरबारांत व पेशवाईमध्येंहि दरबारांत विद्वान् ठेविण्याचा प्रघात दिसत नाहीं. असो. पवनचक्की, विद्युत्यंत्र, मनुष्याचा हस्तीदंती सांगाडा, राजमहालांत उघडलेली वेधशाळा, अशा नवीन नवीन कृतींच्या योगें सरभोजीची संशोधकबुद्धि प्रत्ययास येते. त्याला शिल्पकलेचेंहि थोडेसें ज्ञान होतें, व रंगरोगणाच्या कलेचाहि तो ज्ञाता होता. तंजावरच्या मराठी राजांच्या राजमहालांतील दिवाणखाना उत्कृष्ट तैलचित्रांनीं शृंगारिलेला आहे. याशिवाय तेथील राजमहालांत व मद्रास येथील संग्रहालयांतील भिंतीवरून कांहीं मराठी राजाराणींचीं व त्यांच्या प्रधानांचीं तैलचित्रें काढिलेलीं आहेत. त्यायोगें तीं तीं स्थानें फारच शोभायमान दिसतात व चित्रकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणूनहि दृग्गोचर होतो. तेथील पुस्तकालयांत व इतर इमारतींत कांहीं अनर्घ्य असे रंगी छाप-

कामाचे नमुने आजहि दिसतात. सालुवनायकन्पट्टनम् येथील आठ मजली इमारतीचा मनोरा आजसुद्धां सरभोजीच्या शिल्पकलेच्या आवडीचें प्रत्यंतर दर्शवितो. इंग्रजांनीं सन १८१५ मध्यें नेपोलियनवर विजय संपादन केला, त्या आनंदप्रदर्शनार्थ स्मृतिचिन्ह म्हणून सरभोजीनें वरील मनोरा उभारिलेला आहे. सरभोजीला राजपदप्राप्ति इंग्रजांच्या कृपेनें झाली म्हणून इंग्रजांचे आभारप्रदर्शनार्थ त्यानें सेतुभवसत्रम् व पदुकोट्टाई येथें चुनाविटांचे दोन स्तंभ उभारिण्यास सुरवात केली होती, परंतु हीं कामें पूर्ण होण्यापूर्वींच त्याला राज्याचा त्याग करावा लागला.

सरभोजीचे गुण.

५ सरभोजी हा चांगला देखणा होता. यथाप्रमाण अशी त्याची शरीरयष्टी होती व संस्कृतीची आवड त्याला फार होती. या व अशाच इतर कारणांमुळें तो प्रजेला फार प्रिय असे. त्याला उत्कृष्ट घोड्यांचा फार नाद असे. त्याच्या संग्रहींहि अनेक उत्तमोत्तम अश्व होते. सरभोजी हा अचुक नेम मारणारा होता असें बिशप हेबर म्हणतो. ख्रिस्ती लोकांना तंजावरच्या दरबारांत चांगल्या नोकऱ्या मिळत असल्यामुळें हा बिशप सरभोजीची स्तुति करितो. सरभोजीचा उत्तम स्वभाव व सभ्य वर्तनक्रम यासंबंधीं लॉर्ड व्हॅलेन्शिया हा त्याची प्रशंसा करितो. वाद्यें व इतर नाजूक कला यांना उत्तेजन देण्यांत सरभोजी हा आदर्श असा पौरस्त्य राजा होऊन गेला. याशिवाय त्याचा धर्मादाय मोठा औदार्यपूर्ण होता व गरीबांना अन्नदान करण्यांत तो तत्पर असे. ओरात्तनाद येथील शिलालेखांत असलेल्या (दोन) संस्कृत श्लोकांवरून त्याचें औदार्य असें दिसतें कीं, त्यानें प्रत्येक वैदिक

यज्ञाच्या सांगतेला साहाय्य केलें होतें. त्यानें केलेल्या दानधर्माची माहिती परिशिष्ट ८ मध्यें दिली आहे.

सरभोजीचा पुत्र शिवाजी.

६ सरभोजीच्या मृत्युसमयीं शिवाजी नांवाचा त्याचा एकच पुत्र जीवंत होता. हा शिवाजी नेहमीं आजारी असल्यानें क्षणिप्रकृतीचा झाला होता, असें हेबर म्हणतो. शारीरिक किंवा बौद्धिक उन्नति अशी त्याची कधींच झाली नाहीं. या शिवाजीच्या कारकीर्दींत तयार झालेलीं कांहीं नाटकें व कांहीं स्तुतिविषयक काव्यें मात्र अस्तित्वांत आहेत. यानें वीस बायका केल्या होत्या. तो सन १८५५ मध्यें निवर्तला तेव्हां त्याला फक्त दोनच कन्या होत्या. तंजावरचा हल्लींचा राजा हा या शिवाजीच्या दत्तक पुत्राचा वंशज होय. (स. १९३३)

तंजावरचें राज्य खालसा झाल्यावर तेथील स्वस्थता.

७ राजा ही नामधारी पदवी सरभोच्या मृत्युनंतर लोप पावली. सरभोजीला शिवाजीशिवाय वारस पुत्र नव्हता. हिंदुस्थानांतील संस्थानें नामशेष करण्याच्या डलहौसीच्या कठोर राजकारणानें राजाविषयक मानसन्मान व तसेंच इतर सर्व प्रकार एकदम लुप्त केले. प्रीव्हीकौन्सिलचा एक ठराव होऊन त्यायोगें खालसा संस्थानांतील सर्व धनदौलत जप्त करण्यांत आली. परंतु हा ठराव स्पष्ट व उघडपणें अन्याय्य होता. या ठरावानें इंग्रजांनीं तंजावरच्या राजाशीं अन्याय्य वर्तन केल्याचें किंचित् दुःखकारक स्मरण राहिलें आहे. या ठरावामागून राजाची खाजगी मालमत्ता राजाच्याच पण योग्य अशा निकटच्या

वारसास देण्यांत आली. याप्रमाणें ज्या तंजावरच्या राजाला ' राजा व मित्र ' म्हणून लॉर्ड क्लाइव्ह हा संबोधीत असे, तो तंजावरचा राजा आतां ईस्टइंडिया कंपनीच्या प्रजाजनांपैकीं एक प्रजा झाला. तेथील त्यावेळच्या रेसीडेंटानें असें म्हटलें आहे कीं, ' तंजावरचें राज्य खालसा केल्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला तेव्हां त्यासंबंधीं सार्वजनिक मतप्रदर्शन असें मुळींच झालें नाहीं; त्यामुळें सार्वजनिक शांततेच्या संरक्षणासाठीं साधारण पोलिसांच्या मदतींचीसुद्धां मला आवश्यकता भासली नाहीं. ' पदच्युत झालेल्या राजाबद्दल प्रजेच्या मनांत मुळींच प्रेम नव्हतें काय ? अथवा त्या प्रजेला आपली नापसंती व्यक्त करण्याचें यत्किंचित्‌हि धैर्य नाहीं काय ? संस्थानांतील प्रजेची राजनिष्ठा व शांत मनोवृत्ति यांचें यथातथ्य वर्णन कोणीहि खरा मानसशास्त्रवेत्ताच करूं शकेल. परंतु शांततेचें संरक्षण करण्यास शांततावाद्यालाहि सामर्थ्याची आवश्यकताच असते. तंजावरची प्रजा पन्नासाहून कांहीं अधिक वर्षें इंग्रजांकडेस, ते राज्यकर्तेच असावेत या भावनेनें पाहत होती, व इंग्रजांनीं त्या प्रजेला आधुनिक पद्धतीनेंच वागविलें होतें.

सत्तेचें अधिष्ठान.

८ तंजावरावर राज्य करीत असलेली मराठीसत्ता याप्रमाणें नष्ट झाली. नायक व चोल या राज्यकर्त्यांच्या मार्गालाच हे मराठी राजेहि लागले. या राजघराण्यानें आपलें सामर्थ्य गमावतांच आपापल्या सत्तेसहि ते मुकले. ज्या संस्थानाचें लष्करीसामर्थ्य बलवत्तर असतें, त्याच्याच सत्तेचें अधिष्ठानहि मजबूत असतें, हें तत्त्व कितीहि विरुद्ध युक्तिवाद केला तरी अमान्य करणें शक्य नाहीं. कारण नुसत्या गोडीगुला-

बीनें किंवा बा-बेटा करून प्रजेवर कोणीहि राज्य करण्यास समर्थ होत नाहीं; व गवतांचें तट रचून शत्रूंच्या माऱ्यापासून आपल्या राजधानीचें संरक्षण करूं शकत नाहीं. तंजावरचें संस्थान आज जर अस्तित्वांत असतें तर राष्ट्रैक्याच्या चालत्या गाड्यांत त्याची आणखी एक खीळ अधिक बसली असती, इतकेंच.

Additional authorities.

1 Hickey's Tanjore Maratha Principality 1894.
2 Bishop Hiber: Travels III P 456.
3 Lord Valentia Travels 1 Ch. 7.
4 M. E. R 1924 P 119-122.



श्री. महाराणी कामाक्षीबाईसाहेब

(तंजावरचे शेवटचे राजे शिवाजीमहाराज यांच्या पत्नी.)

प्रकरण ११ वें

राज्यव्यवस्था.

मुद्दे.

१ राजाचे अधिकार.
२ कारभारी मंडळ.
३ उत्पन्न व अधिकारी मंडळ.
४ खोदीव लेख.
५ प्रांतांची वांटणी.
६ कामांची सर्वसाधारण वांटणी.
७ गांवचे लोकनियुक्त कामगार.
८ जमाबंदीची वसूली.
९ दवाखान्यांची अव्यवस्था.
१० न्यायदान.
११ दिवाणी न्यायाची विशिष्ट पद्धति.
१२ पंचांचे अधिकार.
१३ न्यायदानांत दिव्याचा उपयोग.
१४ फौजदारी न्याय.

राजाचे अधिकार.

१ संस्थानांत राजा हा सर्वाधिकारी असे. सर्व संस्थान व त्याचीं सर्व मूलस्थानें यांवर राजाचीच सत्ता असे. प्रधान हे त्याचे नोकर समजले जात. शॉर्ज लिहितो कीं, " अज्ञान जनसमुदायाच्या मतानें तंजावरचा राजा हा स्वतःच्या अनियंत्रित सत्तेनें राज्य चालविणारा आहे, परंतु खरें

पाहतां तो राजा या पदापेक्षां गुलाम याच पदाचा अधिकारी आहे." त्याचीं खाजगी कृत्यें व त्याच्या शारीरिक आणि बौद्धिक करमणुकी यामुळें राज्यविषयक कामें करण्यास त्यास फारच थोडा वेळ मिळतो. धर्मगुरु व मिशनरी यांच्या धर्मभोळेपणामुळें त्याला राजवाड्यांतून बाहेर पडतांच येत नसे. कर्तृत्ववान् राजाच्या कारकीर्दीमध्यें-सुद्धां संस्थानविषयक पुष्कळसें काम त्याच्या प्रधानावर व स्थानिक अंमलदारावरच पडत असे.

कारभारी मंडळ.

२ राज्याच्या कारभारीमंडळांत सुशिक्षित उच्च जातीच्या प्रधानांचाच भरणा असे. कित्येक प्रसंगीं एकादा राजपुत्र, राजबंधु किंवा राजाचा एकादा आप्त यास कारभारीमंडळांत बसावयास बोलावित असत. प्रधानांच्या नेमणुकी पिढीजात होत असत, अशीं अनेक उदाहरणें आहेत. तंजावरच्या मराठी राज्यांत आरंभापासून तुकोजीच्या कारकीर्दीपर्यंत राजाच्या सह्यागाराचें काम गंगाधर मखीच्या वंशजांनींच केलेलें आहे. असें राज्यविषय काम एकाद्या कुटुंबाचें वंशपरंपरागत वतनी ठरल्यानें त्याच्या लायकीचा प्रश्नच उत्पन्न होणें शक्य नाहीं. मंत्री या पदाचें काम कित्येक वेळां दळवी या पदांतहि मिळविलें जात असे. पट्टुकोट्टाईच्या शिलालेखांतील गंगाधराचा पुत्र बाबाजी किंवा लोकमताचा बोलेजी, हा मंत्री व दळवी या दोनहि पदांचा अधिकारी होता. दळवी हाच सेनापति असे. आनंदराय दळवीस एकवेळीं पेशवा हें पद प्राप्त झालें होतें. हा दळवी या पदावर होता व यानेंच रामनदच्या युद्धांत पराक्रम गाजविला होता. आरंभीं हा धर्माधिकारी होता व नंतर दळवी झाला. याचा बाप व आजा हे

प्रधान पदावर होते, त्यामुळें त्या पदाची पिढीजात मालकी त्याचीच होती. त्याचा काका त्र्यंबक मरवी याच्या पश्चात् हा आनंदराय मरवी मंत्री या पदाचा अधिकारी झाला; व त्यानें शहाजी, सरभोजी व तुकोजी; अशा तीन राजांच्या कारकीर्दीत आपल्या पदाचीं कामें केलीं.

उत्पन्न व अधिकारी-मंडळ.

३ राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब जमाबंदी ही असल्यानें प्रधान किंवा दिवाण हा दळवी पदाच्या खाल-चाच म्हणजे दुसरा अंमलदार असे. मद्रास येथील शिलालेखासंबंधींच्या सन १९११ च्या अहवालावरून असें दिसतें कीं, सुभेदार राघो पंडित हा सरभोजीचा दिवाण असून, आनंदराय हा दळवी व मंत्री पदाधिष्टित होता. पुढच्या काळांत डबीर पंडितांची नेमणूक दिवाण या पदावर झाली व त्यांनीं जमाबंदीचें काम फारच उत्कृष्ट रीतीनें केलें. याशिवाय राजाच्या खाजगीमध्यें कोषाधिकारी, संप्रति, (समीपवर्ती ?) धर्माधिकारी व सरखेल या हुद्यांचे कामगारहि होते. कोषाधिकाऱ्याच्या हाताखालीं हिशेब ठेविण्याच्या कामावर अनेक मदतनीस (सुम्पर्दी) व नत्तुल्लनक्कु या हुद्यांचे नोकर असत. धर्मादायाच्या कामाकडेस तंजावरच्या संस्थानानें पुष्कळ व्यवस्था केल्यानें त्या कामासाठीं एक स्वतंत्र दिवाणाच्या नेमणुकीची आवश्यकता होती. सुभेदार अय्यावय्यन हा धर्माधिकारी, सरखेल व दिवाण अशा पदावर लागोपाठ चढत गेला होता. सन १७९८ मध्यें जें एक चौकशी मंडळ नेमिलें होतें, त्याच्या सूचनेप्रमाणें प्रतापानें सरखेल हें नवीन पद उत्पन्न केलें. तथापि, हें पद सरभोजीच्या कारकीर्दीमध्यें अस्तित्वांत आलें,

अशी समजूत प्रचलित आहे, व ती फार दृढ आहे. याशिवाय घनश्याम पंडित हा स्वतःस तुकोजींचा गृहामात्य म्हणवीत असून खाजगी कारभाऱ्याला सरखेल ही निराळी पदवी आहेच. पुढच्या काळांत सरखेल शिवराव हाच अमरसिंगाचा मुख्य मंत्रसचिव होता. चोलांच्या कारकीर्दीत तिरुपंथिरावलाई असें एक महत्वाचें अधिकारपद होतें. त्याला समानार्थक असें रायासम हें पद निर्माण केलें. परन्तु हें पद स्वतंत्र होतें कीं सरखेलांतच समाविष्ट झालें होतें, हें मात्र समजत नाहीं. अष्टप्रधान या संस्थेंत पुरोहित हें एक पद होतें. या प्रकारच्या मुख्य कारभारी मंडळाशिवाय एक मुख्य न्यायाधीश व अमंल्दार हीं दोन पदें राजधानीमध्यें होतीं. किल्ला हा किल्लेदाराच्या ताब्यांत असून तो किल्लेदारहि एक महत्त्वाचा अंमलदारच होता. ठिकठिकाणच्या बातम्या राजास कळविण्यासाठीं वार्ताहरहि होते. यावरून वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं, तंजावरास राज्य व खाजगी, असे दोन भाग असून, दोहोंकडेस पृथक् पृथक् कामगार होते. १ मंत्री, १ पेशवा, १ धर्माधिकारी, १ दळवी, १ सेनापति, १ ते ८ अष्टप्रधान, १ प्रधान, १ दिवाण, १ धर्माधिकारी दिवाण, १ सुभेदार, १ सरखेल किंवा रायासम्, १ सुभेदार, १ धर्माधिकारी, १ किल्लेदार, १ वार्ताहर, असे बावीस अंमल्दार राज्यांत असून १ गृहामात्य, १ संप्रति, १ धर्माधिकारी, १ सरखेल, ३ कोणाधिकारी व दोन मदतनीस. असे सात अंमलदार खाजगींत होते. कित्येकवेळां अनेक पदावर एकाच इसम नेमिलेला असे.

४ प्राचीन राजकारणी व्यवस्थांचा निर्देश कोरीव लेखांतून होऊं लागला. सन १९२०-२१ च्या क्रमांक १४ च्या ताम्रपत्रांत राजेंद्रसोलवलनादूच्या पंवावलनादूचा उल्लेख आहे. सन १७६९ च्या एका ताम्रपत्रांत जयकोंडानाडु प्रांतांतील पोटमुरकुर्रम् परगण्यांतील पप्पाकुडीवाडु तालुक्यांतील सोळा महालांपैकीं ४५ राजगोपालम्चक्रम्च्या देणगीचा उल्लेख आहे. सन १९२०-२१ च्या क्रमांक १५ च्या ताम्रपत्रांत प्रांतांची विभागणी हीच दिलेली आहे. तोंडामन् येथील शके १६४७ (सन १७२५) च्या ताम्रपत्रांत गांव, मगनम्, नाडु, कुर्रम्, पलैया म्हणजे पट्टु असाच क्रम दिलेला आहे.

खोदीव लेख

५ परंतु राजकीय व्यवस्थेंत प्रांतांचा वगैरे जुनाच क्रम स्वीकारिलेला दिसत नाहीं. सर्व राज्य अनेक सुभ्यांच्या मर्यादेंत विभागिलें असून प्रत्येक सुभ्यावर एक सुभेदार नेमिलेला असे. पट्टुकोट्टाई, मन्नारगुडी, मायावरम्, कुंभकोणम् व तिरुवाडी अशा प्रत्येक ठिकाणीं एक एक सुभा असे. तंजावरचें संस्थान व (अरंतंगीच्या सरहद्दीवरील व्यवस्थेशिवायचा) अर्वाचीन तंजावरप्रांत यांच्या सरहद्दीवरील व्यवस्थेंत कांहींच फरक नाहीं. सुभ्यापेक्षां लहान प्रांताला सिमाई (तालुका) असें म्हणत. सन १९१८ मध्यें सांपडलेल्या क्रमांक ४२० च्या ताम्रपत्रांत शके १६९२ (स. १७७०) त्या श्रीगालीसिमाईचा मुख्याधिकारी (मामलतदार) काडेरिआर असल्याचा उल्लेख आहे. सन १९११ मध्यें सांपडलेल्या क्रमांक २७३ च्या ताम्रपत्रांत चक्कडूच्या सीमाईमध्यें

प्रांतांची वांटणी.

कावेरीपट्टणम् मधील मगनमचा समावेश झाला असल्याचा उल्लेख आहे. सारांश, तंजावर येथें मराठी राजांच्या कारकीर्दीमध्यें गांव, मगनम् (महाल), सिमाई (तालुका) व सुभा असे संस्थानाचे प्रादेशिक विभाग होते असें दिसतें. एखाद्या गांवच्या लोकांनीं जमाबंदी न दिली तर त्यांना कारागारांत घालण्याचा अधिकार अमीनाला असे. त्या अमीनाच्या साहाय्यानें सुभेदार हा प्रांतांतील जमाबंदी वसूल करी. या सुभेदाराला जमाबंदी वसूल करण्याचा अधिकार असून दिवाणी व फौजदारी सत्ताहि असत. संबानकोंइलचा सुभेदार अय्यावय्यान याचा उल्लेख हवालदार थंडवरय मुदाली याच्यासह संबानकोंइल येथील कोरीव लेखांत आला आहे. त्यावरून दिसण्याला तरी मराठी सत्ता फौजेच्या जोरावर अधिष्ठित होती, असा सारांश काढितां येतो.

कामांची सर्वसाधारण वटांणी.

६ अमलदारांची सर्वसाधारण सत्ता प्रत्येक खेडयावर असे व मध्यवर्ती सत्तेशीं आपला कांहीं संबंध नाहीं अशा बेपरवाईनें तें खेडें आपल्या मुख्याच्या तंत्रानें वागत असे. अमलदारांना कांहीं एक कर भरल्याशिवाय नोकरीच्या निमित्तानें जमिनी मिळत. प्रत्येक गांवांत नोकरांचा भरणा नेमिलेला असे. त्यांत कर्नम, पाहरेकरी, पाणीवाला, घरकाम करणारा, सुतार, न्हावी, परीट, (जमिनीचा भोगवटा अनुभविणारा किंवा पीकांत ठरीव हिस्सा घेणारा) शेतकरी इत्यादि इतर लोकांचा समावेश असे. प्रत्येक गांवच्या उत्पन्नांतून गरीब लोकांना व मंदिरांना धर्मादाय देण्याचा सांप्रदाय असे. गांवांतील सार्वजनिक दुरुस्ती व उत्सव हे गांवच्या उत्पन्नांतूनच होत असत.

गांवचे लोकनियुक्त कामगार.

७ सर्व हक्कदारांचे हक्क व भाग यांचा दाखला त्या गांवचा अंमलदार लिहून ठेवीत असे व त्याला नत्तुक्क-नक्कु असें म्हणत. गांवाचे नत्तुवर म्हणजे जमिनीवरचा मालकीहक्क सांगणारे लोक. त्यांना खोदीव लेखांतून महाजन म्हटलेलें दिसतें. आजसुद्धां तंजावर प्रांतांत लग्नप्रसंगीं संभावनेच्या रूपानें त्यांस कांहीं तरी मिळण्याचा त्यांचा हक्क आहे. जमिनीच्या उत्पन्नाच्या मिरासदारीची वांटणी ठरविणें व अशाच प्रकारचा इतर अधिकार मुक्रर करणें, ही सत्ता या लोकांची असून ते पंचायतीसाठीं एकत्र जमा होतात. नत्तुक्कर्नम् या समुदायावर उपर्युक्त मिरासदारांचा पूर्ण ताबा असे. यासंबंधीचा हिशेब व त्याची नक्कल अशा दोन प्रती गांवचा सरकारी अंमलदार महालकरी (मगनम) अथवा सुभा ठेवीत असे.

जमाबंदीची वसूली.

८ गांवची जमाबंदी वसूल करण्याचा अधिकार प्रस्तुतकाळीं मुनसफास आहे. परंतु हा अधिकार सन १८३६ सालीं मुनसफास दिला. सन १८१६ पासून गांवच्या मुनसफाच्या ताब्यांत कांहीं पोलिस असत व त्यास बारीकसारीक बाबतींत न्याय देण्याचेंहि अधिकार असत. जेव्हां इंग्रजांनीं तंजावर हस्तगत केलें तेव्हां मात्र गांवच्यांतून सरकारी हित पाहणारा कोणीहि अंमलदार नव्हता. सन १७९८ मध्यें जें एक चौकशीमंडळ नेमिलें होतें त्याचीहि अशीच तक्रार आहे. प्रत्येक खेड्यांत मध्यवर्ती सत्ता कोणासच नसे.

दप्तरांची अव्यवस्था.

९ प्रतापसिंगाच्यापूर्वीं (म्हणजे सन १७३९ पूर्वीं) न्यायदानाची काय पद्धति असे ? या संबंधीं खात्रीलायक माहिती अशी कांहींच नाहीं. कर्नाटकाच्या नबाबानें तंजावरचा कबजा घेतला तेव्हां किल्ल्यांतील सर्व दप्तरखाना तेथून दुसरीकडेस नेऊन त्यापैकीं कांहीं दप्तरांचा नाशहि केला.

न्यायदान.

१० बार्थोलेम्यू म्हणतो कीं, 'तंजावर व त्रिचनापल्ली येथील न्यायदानाची पद्धति न्यायाधीशांच्या मुक्तामावर अवलंबून असे; परंतु यासंबंधीं प्रमाण असें कांहीं उपलब्ध नाहीं. पूर्वकालीन न्यायदान स्थानिकच असावें. मागाहून फक्त फेरचौकशीचा अधिकार (प्रजेस) देण्यांत आला असावा असें वाटतें.

दिवाणी न्यायाची विशिष्ट पद्धति.

११ दिवाणी न्यायाधीशाची नेमणूक प्रथम प्रतापसिंहानें केली. त्याला दरमहा तीस पागोडा पगार असे. त्याच्या हाताखालीं लहानशी कचेरी असे, व त्या कचेरींतील कारकुनानीं पैसे वसूल करण्याचे हुकुम नोंधावयाचे असत. या न्यायाधीशावर फेर तपासणीअर्ज (Appeal) फक्त राजाकडेसच होत असत. व राजाहि तें काम सरखेलाकडेस सोंपीत असे. न्यायाची विक्री निर्लज्जपणानें होत असे; असें शॉर्झ म्हणतो व त्याच्याच सूचनेवरून त्या पद्धतींत सुधारणा करण्यांत आली. अमरसिंगानें एक लहानसें मंडळ स्थापन केलें. त्या मंडळांत एक अध्यक्ष व चार न्यायाधीश असत. प्रत्येक जातीचे कांहीं पंचहि असत. परंतु जर पक्षकार पंचाकडे न जातां

परभारें सरकारकडेसच आले, तर अशा कामाचा विचार करण्यासाठीं न्यायाची कचेरी दररोज भरत असे. न्यायाधीश अथवा मध्यस्थपंच यांना दिल्या जाणाऱ्या कोणत्याहि देणगीची लेखी प्रसिद्धी अगदीं जाहीर रीतीनें होऊन त्या लेखाखालीं सह्या होत असत अशा न्यायाधीशांनीं केलेला कोणताहि न्याय नाकारण्याचा अधिकार राजास असे. पैशासंबंधींच्या दाव्यांत सरकारी कर शेंकडा पांच टक्के असे. ज्या मालमत्तेबद्दल दावा असे तीबद्दल १२० चक्रम्‌पर्यंत दंड वसूल केला जात असे. परंतु मोठ्या दुःखानें नमूद करणें भाग पडते कीं, व्यवस्थित रीतीनें न्याय करण्याच्या पद्धतींतहि राजाच्या मेहेरबानींतील व्यक्ती अथवा सावकार एखाद्या खटल्यांत पक्षकार असल्यास त्यासच अनुकूल असा न्याय होत असे.

पंचांचे अधिकार.

१२ तंजावर या राजधानीपासून दूर अंतरावर असलेल्या खेडें गांवापर्यंत न्यायाचे खटले पंचांच्या मध्यस्थीनें निकाली लागत असत. जर तो निकाल पक्षकार मान्य करीत नसले तर पंचांची नेमणूक सुभेदार करी. पंचाइतीनें केलेल्या निकालावरहि दाद मागावयाची असल्यास ती राजाकडेसच मागता येत असे. महिन्याच्या कामांचें टांचण राजाकडेस पाठवीत असत व प्रसंगविशेषीं एकादा निकाल राजा फिरवीत असे. पंचांनीं न्याय करण्याची पद्धति एकंदरींनें पाहतां कमी खर्चाची व सत्वर निकाल होण्याची असे. इंग्रजी कायदा व न्याय यांमध्यें पुष्कळ गुण असले तरी त्या

पद्धतीमुळें मनस्वी खर्च व पुष्कळसा कालक्षेप होऊन प्रत्येक प्रसंगीं काळजीचे डोंगर पक्षकारावर निष्कारण येऊन पडतात.

न्यायदानांत दिव्या-चा उपयोग.

१३ जमिनीच्या खटल्यांत दारुण दिव्य करण्याची पद्धति अगदीं अलीकडे अलीकडे म्हणजे दुसऱ्या सरभोजी पर्यंतहि (सन १७९८ ते १८३३) प्रचारांत असल्याचें दिसतें. आरोपी इसमानें उकळत्या तुपांत हाताचा पंजा घातला असतांहि तो न भाजला तरच त्या आरोप्याचें विधान सत्य मानीत. आतां मात्र अशा तऱ्हेनें सृष्टिनियमाजवळ न्याय मागण्याची पद्धति नामशेष झाली आहे.

फौजदारी न्याय.

१४ फौजदारी खटल्याच्या न्यायपद्धतीबद्दल मात्र सन १७९८ मध्यें नेमिलेल्या चौकशी समितीनें स्तुति केली आहे. प्राणान्ताची शिक्षा क्वचितच फर्माविण्यांत येई. फौजदारी कामांतील मुख्य व अंतिम सत्ता प्रत्यक्ष राजाचीच असे. व शास्त्रीमंडळानें केलेला न्याय विशेष चौकशीनंतर राजा फिरवीतहि असे. खेडेगांवांतील मान्य गृहस्थ किरकोळ कामांचा निकाल करून आपल्याच स्वाधीन कायदा असल्याचें दर्शवीत, व याप्रकारें जरब बसवीत. त्यावेळच्या ओबडधोबड व झटपट न्यायदानाच्या पद्धतीशिवाय बाकी स्थानिक न्यायदानाच्या पद्धतींचें अनुकरण इंग्रजांनीहि करावें. खेड्यांतील कवलकर अथवा जागला हा आजच्या पोलिसांचें कर्तव्य करीत असे. मध्यवर्ती सत्ता दुर्बळ होतांच हे जागले वगैरे लोक त्या त्या खेड्यांना अरिष्टरूप झाले व लोकांकडून धाकदपटशहानें द्रव्य उकळूं लागले. कवलकरांची पद्धति इंग्रजसरकारनें सन १८१४ मध्यें बंद केली.

प्रकरण १२ वें.

भूतदया व धर्मसहिष्णुता.

मुद्दे.

१ राजाचीं कर्तव्यें व विद्वत्परामर्ष.
२ तंजावर येथील सरकारी व खाजगीं पुस्तकालयें.
३ धार्मिक सहनशीलता व मिशनरीचें वर्चस्व.
४ शॉर्झ याचें कर्तृत्व.
५ ब्राह्मणांविषयीं शॉर्झचा अभिप्राय.
६ सरभोजीची पूज्यबुद्धि.
७ शॉर्झची रोजनिशी व त्याचे लेख.
८ धर्मांतर केल्यावरहि मूळच्या भावना कायम.

राजाचीं कर्तव्यें व विद्वत्परामर्ष.

१ राज्यांत शांतता ठेविणें हें राजाचें आद्यकर्तव्य होय. त्यानंतरचें म्हणजे दुसरें कर्तव्य दानधर्म सुरू ठेविणें व वृद्धिंगत करणें हें होय. जुनी मंदिरें दुरुस्त करणें व नवीन बांधणें, तळीं खोदणें, धर्मशाळा उभारणें हीं कृत्यें परोपकाराचीं समजतात. फ्रेंचांनीं कारिकाल व इंग्रजांना नागोर याप्रमाणें पृथक् पृथक् बंदरें दिलीं; तेव्हां तंजावरच्या राजांनीं मुद्दाम त्यांस कळविलें होतें कीं, मंदिरें, ब्राह्मण, धर्मशाळा व तळीं यांस मुकर करून दिलेल्या देणग्यांमध्यें त्या त्या परदेशस्थ अधिपतींनीं हात घालूं नये. तत्कालीन एका पत्रावरून दिसतें कीं, ब्राह्मणांच्या खेड्यांत सरकारनें एकहि इमारत बांधूं नये

व मंदिर अथवा अग्रहार यांच्या जवळ युरोपियनानें राहूं नये असें ठरलें होतें. ब्राह्मणांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल, वादननैपुण्याबद्दल, ज्योतिषज्ञानाबद्दल, अश्विनीकुमारांच्या विद्येतील पारंगततेबद्दल किंवा इतर कलाभिज्ञतेबद्दल तंजावरच्या जुन्या मराठी राजांनीं कित्येक अग्रहार दिलेले आहेत. गरीब लोकांच्या भोजनासाठीं अनेक धर्मशाळा किंवा वाड्या बांधिल्या असून त्यांच्या खर्चासाठीं कांहीं जमिनी लावून दिल्या होत्या. मृत राण्यांच्या स्मरणार्थ कित्येक छत्र्या उभारिल्या होत्या. मानमेलकुडी आणि निदमंगलम् ह्या छत्र्या प्रतापानें बांधिल्या होत्या. मिनपेसांड येथें तुळजाजीनें देरासरम् अय्याछत्रम् व राजमाताम् या छत्र्या स्थापिल्या आहेत. ओरात्तनद येथें सरभोजीनें छत्र्यांच्या खर्चासाठीं सालीना तेहतीस हजार उत्पन्न नेमून दिलें होतें, आणि तंजावरप्रांतांतील गरीबांसाठीं कांहीं दीनगृहें शिवाजीनें तंजावरांत सुरू केलीं होतीं. छत्रीमध्यें बसून खाणें याला 'इन्फ्राडिक' असें समजत असल्यामुळें खरोखरीचेंच तें दनिगृहच होय. मद्रासकडील ऊष्ण प्रदेशांतील विश्रांतिगृहांतसुद्धां विहीर व लहानसा बगीचा असतो. पादचारी लोकांना व गाड्यांतून प्रवास करणारांना या छत्र्या म्हणजे अमूल्य विश्रांतिस्थानेंच होत. मंदिरांची दुरुस्ती करणें व तळीं खोदणें हीं पुण्यप्रद कामें करून इहपरलोकीं कीर्ति मिळविण्याची तळमळ राजा व राणी या उभयतांनाहि लागलेली असे व त्यामुळें गरीब लोकांना रगड काम मिळत असे. कित्येक छत्र्यांना पाठशाळा जोडून दिलेल्या असत. तंजावर येथील सरभोजीच्या धर्मशाळेस एक पौरस्त्य व एक पाश्चात्य अशीं रुग्णालयें जोडून दिलीं होतीं. आजसुद्धां (१९३३) अशा सर्वमान्य संस्था तंजावरांत प्रचलित आहेत;

त्यांचा उपयोग श्रौती, ज्योतिषी, वादनवेत्ते व गुरू घेत असून त्या संस्थांची व्यवस्था त्या त्या वेळच्या राजांनीं केली आहे. तंजावर येथील वृहदीश्वरास दिलेल्या देणगींची यादी नि॥ ९ च्या परिशिष्टांत दिली आहे. (ते परिशिष्ट सोबत पाहणें.)

तंजावर येथील सरकारी व खाजगी पुस्तकालयें.

२ तंजावरांत सरकारी पुस्तकालयाशिवाय मानमूभट्टासारख्यांचीं सुंदर अशीं खाजगी पुस्तकालयेंहि प्रसिद्ध असत. या पुस्तकालयांवरून राजधानीच्या तत्कालीन संस्कृतीची ओळख पटते. अलीकडे अलीकडेपर्यंत तंजावर येथील वाद्यकलेची बरोबरी कोणींहि करूं शकत नसे. सध्यांसुद्धां सर्वत्र अशी भावना आहे कीं, प्रत्येक तंजावरकर हा उत्तम गवय्या असून मोठा बुद्धिशाली असतो. एकुणीसाव्या शतकांत तंजावर हें वाद्यवादनाचें प्रख्यात पीठ असल्याची प्रसिद्धी करण्याचें श्रेय थिआगिअर या तेलगू ब्राह्मणाकडेस आहे. तुकोजी, प्रताप व अमरसिंग हे राजे वाद्यवादनांत फार प्रवीण असत. तंजावर हें राजधानीचें शहर असतांना तेथील राजे, राण्या, उपपत्न्या, सरदार व इतर वृद्धजन हे विनोद, वाङ्मय, वाद्य, नृत्य, रंगकाम, धातु व लाकूड यांवरील नक्सकाम, शोलाकाम (Pithwork), रेशीम विणण्याची कला इत्यादि कुशलतेला आश्रय देत असत. परंतु अठराव्या शतकाच्या शेवटीं, म्हणजे तंजावरचें राज्य खालसा झाल्यापासून, तें उत्तेजन एकदम बंद पडलें. हें बंद पडणें तात्पुरतेंच आहे असें आपण मानूं.

३ तंजावरच्या राजांचा स्वभाव शांत व सहनशील असल्याबद्दल ख्रिस्ती मिशन हें त्यांची फार प्रशंसा करितें. नेगापट्टम हें पोर्च्युगीजांनीं सन १६१२ मध्यें व डचलोकांनीं सन १६६० मध्यें व्यापिलें.

धार्मिकसहनशीलता व मिशनरींचें वर्चस्व.

डॅनिशलोकांची वसति झाल्यापासून ८६ वर्षांनीं म्हणजे सन १७०६ मध्यें डॅनिशमिशन तेथें गेलें होतें तेव्हां राज्यामध्यें ख्रिश्चन लोकांची वसति होतीच. हिंदुस्थानांत प्रॉटेस्टंट मताची स्थापना करणारे प्ल्यूटश व झिबान्‌बाग यांना डेनमार्कच्या चवथ्या फ्रेडरिक राजानें हिंदुस्थानांत पाठविलें होतें. झिबान्‌बाग यानें तामिल भाषेचा अभ्यास केला, न्यू टेस्टामेंटचें (तामिल भाषेंत) भाषांतर करून तेंहि छापिलें व आवश्यकतेप्रमाणें ख्रिस्ती लोकांनीं आपला पोषाखहि बदलावा असा उपदेश केला. सन १७२१ मध्यें ग्रंड्लर हा या मिशनचा मुख्य असतांना तंजावरच्या राजानें मिशनशीं मैत्री केली. तिकडील वृद्ध धर्माचरणी जुने लोकहि राजासारखेच परधर्मसहिष्णु असल्यानें मिशनरी लोकांना आपलें कार्य निर्वेधपणें करितां आलें. सतराव्या शतकापासून ख्रिस्ती मिशनरींना आपण ज्या दिलदार-पणानें वागविलें त्याच्या निम्मे औदार्यानें आजचा कोणताहि युरो-पियन देश परकीय धर्म प्रचारकांना वागवील अशी कल्पनासुद्धां करितां येत नाहीं.

४ तंजावरचा इतिहास व तंजावरच्या राजांचा अस्त याशीं जर्मन मिशनरी शॉर्झ याचा निकट संबंध सन १७२६ पासून आला, तो पुढें सन १७९८ पर्यंत म्हणजे त्याचा मृत्यु होईपर्यंत कायमच होता. मद्रास

शॉर्झ याचें कर्तृत्व.

येथील आंग्लसत्तेनें आपल्यातर्फे वकील म्हणून त्याला एकदां हैदराकडेस पाठविलें होतें व त्याच्या कामगिरीबद्दल त्याचा एक पुतळाहि फोर्ट सेंट जॉर्ज येथें उभा करण्यांत आला आहे. हा शॉर्झ मिशनरी सन १७७९ पासून अखेरपर्यंत तंजावर येथेंच राहिला. तंजावरच्या राज्यांत इमारती बांधण्यास व मंदिरांची सुव्यवस्था ठेविण्यास त्याच्या मध्यस्थीनेंच लोकांस जमिनी देण्यांत आल्या. त्याला अनेक भाषा अवगत होत्या. त्याची राहणी फार साधी होती व गरीबांना मदत करणें हा त्याचा स्वभाव बनला होता. इतर कारणांबरोबर मिशनरींच्या वागणुकीनें हिंदूंच्या सामाजिक व धार्मिक वर्तनांत फरक होऊन बौद्धिक व सामाजिक समानता प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला.

ब्राह्मणांविषयीं शॉर्झचा अभिप्राय.

५ तुळजीराजाचा उत्कृष्ट सल्लागार शॉर्झ हा होता व सरभोजीची सर्वप्रकारें व्यवस्था पाहण्याचें कामहि तोच करीत असे. त्याला निश्चयपूर्वक वाटत होतें कीं, ईस्ट इंडिया कंपनीनें कर्नाटकच्या नबाबाला मदत करून जर तुळजाजीला राज्यच्युत केलें नसतें तर तो खात्रीनें ख्रिस्ती झाला असता. परंतु तंजावरच्या राज्यांत ब्राह्मण-धर्माचें इतकें वर्चस्व होतें कीं, धर्मांतराचा प्रकार तेथें घडणें फार कठिण झालें होतें असें शॉर्झलाहि वाटत असे. मिशनरी लोकांच्या विरुद्ध ब्राह्मण असल्यानें शॉर्झ हा ब्राह्मणांना कलागती लाविणारे असे संबोधून शिव्याशाप देत असे. ब्राह्मणांवर तोंडसुख घेण्यास तो कमी करीत नसे. राज्यांतील मोठमोठ्या हुद्यांच्या जागा ब्राह्मणच पटकावीत असत असा ब्राह्मणवर्गावर त्याचा आरोप असे. सर्व दुःखांचें उत्पत्तिस्थान ब्राह्मणच होत असें तो समजत असल्यामुळें

जातीनें हलक्या म्हणून मानिल्या गेलेल्या लोकांस तेच अशिक्षित व तुच्छ मानीत, असें तो म्हणतो. सारांश, ब्राह्मण हे त्याच्या डोळ्यांत कुसळाप्रमाणें सलत असत. लॉकमन याचा ओढा मिशनरी लोकांकडेस विशेष असल्यामुळें तो सन १७०२ च्या सुमारास ब्राह्मणांविषयीं असेच तुच्छतादर्शक उद्गार लिहून ठेवितो. तो म्हणतो कीं, " ब्राह्मणांचें मतांतर करणें हें फार कठिण काम आहे व तंजावरचा प्रधान बालोजी (बाबाजी) हा ख्रिस्ती लोकांच्या अगदीं विरुद्ध आहे. "

सरभोजीची पूज्यबुद्धि.

६ सरभोजीनें तंजावरास एक मंदिर बांधिलें असून त्या मंदिरांत शॉर्झ याचा संगमरवरी पुतळा ठेविला आहे. यायोगें शॉर्झसंबंधीं सरभोजीची किती पराकाष्टेची भक्ति होती हें उघड होऊन, सरभोजीचा मित्र, संरक्षक व लहानपणचा मार्गदर्शक अशा तीनहि नात्यांचें मूर्तिमंत स्मारक झालें आहे. शेंवटीं शेंवटीं सरभोजीला शॉर्झनें जो उपदेश केला, त्यांतील सार असें होतें कीं, ' साधी राहणी असावी, ख्रिस्ती लोकांविषयीं दयार्द्रबुद्धि ठेवावी, न्यायमंदिरें स्थापन करावींत व (सरभोजीनें) ख्रिस्ती धर्म स्वीकारावा. शॉर्झसारख्या मिशनरीचा निकट संबंध असतांना सरभोजीनें ख्रिस्तीधर्म स्वीकारण्याचें कसें टाळिलें हें गूढ मोठें आश्चर्योत्पादक आहे.

शॉर्झची रोजनिशी व त्याचे लेख.

७ इतिहासाच्या अभ्यासूला शॉर्झची रोजनिशी फार उपयोगी असून प्रस्तुत इतिहासांत आतांपर्यंत तिचाच उपयोग केला आहे. सन १७६८ मध्यें त्यानें लिहिलेल्या पत्रांत असें आहे कीं, " युरोपियन लोक परत स्वदेशीं जाताना अपार संपत्ति बरोबर

नेतात व त्यांचा दुष्टपणा व त्यांची द्रव्यतृष्णा हीं खिस्तीधर्मवृद्धीच्या आड येतात." याशिवाय हिंदुसमाजास आर्यधर्मांतच ओढून ठेविणारीं सामाजिक व धार्मिक बंधनें, त्या काळची रूढिप्रियता, खिस्ती धर्म हा सामाजिक समानदर्जा स्थापन करणारा असल्यानें त्या धर्माची नावड, या कारणसमुच्चयामुळें प्रत्येक हिंदूला त्या धर्माविषयीं वाटणारा दूरीभाव; यांशिवाय खिस्ती होणें म्हणजे गोमांस भक्षण करणें, मद्यपान करणें व हिंदूंनीं नीच मानिलेल्या वर्गाशीं संबंध ठेविणें, अशी हिंदूंची सर्वसाधारण परंतु निष्कारण झालेली समजूत इत्यादि अनेक कारणांमुळें खिस्तीधर्माच्या प्रगतीला फार मोठे अडथळे आले."

धर्मांतर केल्यावरहि मूळच्या भावना कायम.

८ सारांश, शॉर्झ व इतर मिशनरी यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यावेळीं मिशनला यशःप्राप्ति झाली नाहीं. शिवाय कांहीं हिंदु, खिस्ती धर्मांत गेल्यावरहि, त्यांच्या मूळच्या जातिविशिष्ट अलिप्तपणाच्या भावना कायमच राहिल्या होत्या. हिंदी खिस्त्यांच्या ठिकाणीं दृग्गोचर होणाऱ्या जातिविशिष्ट सोंवळेपणाच्या भावनांबद्दल हेबर हा खेद प्रकट करितो. कारण त्या भावना फार तीव्र असत. तुळजाजी व सरभोजी यांसारखे राजे धार्मिक बाबतींत मोठे सहनशील असून खिस्ती धर्माला इतर प्रकारच्या सहाय्याबरोबर द्रव्यसाहाय्यहि पुष्कळ करीत होते. अशी विशेष अनुकूल परिस्थिति असताना फार थोड्याच लोकांनीं खिस्तीधर्म स्वीकारावा याचें फार मोठें आश्चर्य लॉर्ड व्हेलेन्शिया याला वाटलें.

प्रकरण १३ वें.

आर्थिक परिस्थिति.

मुद्दे.

१ परदेशीलोकांशीं व्यापार.
२ शेतसारा व गांवांचे प्रकार.
३ शेती मक्त्यानें देत असत.
४ पिकांची वांटणी.
५ गांवचे इतर खर्च.
६ शेतकऱ्यांना भागाची वांटणी देणें.
७ पुट्टाक पद्धतीची सुरुवात.
८ प्रांतांत होणारें धान्य व कापड.

परदेशी लोक व त्यांच्याशी व्यापार.

१ या देशाचा परदेशाशीं चालणारा व्यापार परदेशी लोकांच्याच हातीं असे. परदेशी व्यापारी येथील मालाची किंमत रोकडीनें देत असत, त्यामुळें त्यांना सावकारी मान्यता विशेष असे, असें फक्त नसून युद्धविषयक साहाय्याबद्दलहि त्यांची किंमत अधिक वाढली होती. विशेषतः त्यांच्या तोफखान्यापुढें एतद्देशीय हत्यारें निरुपयोगी ठरल्यानें त्या तोफखान्याच्या मदतीमुळें ते लोक एतद्देशीयांना अनर्घ्य वाटूं लागले. नेगापट्टम्, कारिकल व ट्रांकेबार हीं बंदरें परदेशीयांच्या हातीं असून ते बंदरांसंबंधचा कर तंजावरच्या राजाला वेळच्या वेळीं भरीत असत. यांशिवाय इतरहि अनेक लहान लहान बंदरें होतीं, व त्यांच्या द्वारानें मालाच्या होणाऱ्या

आयातनिर्गतीवरील कर चांगलाच वसूल होत असे. देशांतील मालावरील जकातीचें उत्पन्न थोडेंच असे. १७९५-९६ मध्यें जकातीचा मक्ता पांचजणांनीं रक्कम २,५५,२६७ रुपयांस ठेविला होता. आयात मालावरील जकातीच्या बाबती अनेक असून त्या मोठ्या त्रासदायक होत्या. तथापि, त्या जकाती देणें प्रजेला भाग पडत असे. दुकान, माग, ताडी, मच्छी मारणें, तेल, वसती, खजीना इत्यादि अनेक बाबतींवर कर द्यावा लागे. कवल्कर व गांवांतील उत्सव यांवरहि कर भरावा लागे. राज्याच्या उत्पन्नाचें मुख्य साधन म्हणजे पिकावरील साराच होय. हा सारा पिकाच्या प्रमाणावर वसूल केला जात असे.

शेतसारा व गांवांचे प्रकार.

२ सरकारी हिस्सा दिला म्हणजे शेतकऱ्यांना जमीनदारीबद्दल व मालकीहक्काबद्दल खात्री दिली जात असे. गांवांचा प्रकार पुढें दिल्याप्रमाणें असे.

१८०७	गांवें	एकभोगम्	संज्ञेचीं
२२०२	,,	पलभोगम्	,,
१७७४	,,	समुदायम्	,,
५७८३		एकुण ग्रामसंख्या.	

अशा तीन प्रकारचीं गांवें असत. समुदायम् या तिसऱ्या प्रकारच्या गांवांत गांवांतील प्रत्येक कुटुंबाचा पृथक् पृथक् हिस्सा असे. यास पंगु असें म्हणतात. बाकीच्या प्रकारांत जमिनींची मुदतबंदी वांटणी नेहमीं होत असे. अशी वारंवार वांटणी करण्यांत जमीन कायमची मिळावी हा मुख्य हेतु असे. जमिनीचा दोनतृतीयांश भाग रयत-वारीमध्यें विभागलेला असे. मराठी राजांच्या पूर्वीपासून सुमारें दहा

बारा जमनिदार असे होतें कीं, त्यांच्या जमिनी पाणथळीच्या नव्हत्या. तंजावरच्या राज्यांत २३,९३,०३४ एकर जमीन होती. तिची वांटणी पुढीलप्रमाणें झालेली होती असें दिसतें.

१५,९१,९२५ एकर जमीन रयतवारीची होती.
६, १२, ०८५ एकर जमीन इनामी होती.
१, ८९, ०२४ एकर जमीन जमीनदारी पद्धतींत विभागलेली होती.

२३, ९३, ०३४. एकूण एकंदर एकर जमीन.

या विभागणीचा अर्थ असा कीं, कलावन्त व विद्वान् या लोकांमध्येंच एकंदर जमिनीचा एकचतुर्थांशापेक्षांहि अधिक भाग इनाम या नात्यानें कायमचा गुंतला होता. सन १८०५ मध्यें वॅलेस यानें (खानेसुमारीच्या स्वरूपाचा) एक अहवाल लिहिला आहे त्यावरून असें दिसतें कीं, तंजावरच्या राज्यांत त्याप्रसंगीं पुढील मिरासदार होते.

१७,१४९ ब्राह्मण.
४२,४४२ क्षत्रिय किंवा योद्धे.
१४,५७ मुसलमान.

६१,०४८ ही मिरासदारांची संख्या होय.

शेती मक्त्यानें देत असत.

३ जमाबंदीची कांहीं रक्कम पिकांत भाग घेऊन, कांहीं धान्याच्या रूपानें किंवा रोकड घेऊन आणि कांहीं नेहमींच रोकडीनें वसूल करीत असत. जमिनीचा सारा व्यक्तिविशेषावर ठरविला जात नसून सबंद गांवचा ठरवीत असत. शॉर्झनें

असें लिहून ठेविलें आहे कीं, सन १७६८ मध्यें प्रांतांतील शेती मक्त्यानें देत असत. अर्थात्, अधिक रक्कम भरण्याचें मान्य करणारासच, ठरीव मुदतीकरितां लागवड करण्यासाठीं शेती मिळत असे. ही हानिकारक पद्धति शेंवटपर्यंत अस्तित्वांत होती. म्हणजे दरवर्षीं तिच्या उत्पन्नासाठीं लीलाव होत असे. या पद्धतीमुळेंच तंजावरचा राजा, कर्नाटकाचा नबाव व इंग्रजीकंपनीचे दुभाषी हे कर वसूल करणारे शेतकरी झाले.

पिकाची वांटणी.

४ सन १७६८ च्या एका पत्रांत शार्झ म्हणतो कीं, एकंदर पिकाचा शेंकडा ६०–७० टक्के हिस्सा आपला म्हणून सरकार घेत असे. कर्नाटकाच्या नबाबाच्या किंचित्काळ हंगामी सत्तेच्या कारकीर्दींत नबाब ५९ टक्के उत्पन्न घेत असे व तें फार असे असें समजत. जमीन महसुलाचा प्रख्यात तज्ज्ञ जो नारोपंडित किंवा डबीरपंडित यानें सन १७७३ मध्यें उत्पन्नाचा जो अंदाज केला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, प्रत्येक ‘ नांजाच्या (= पाणथळ) वेली (सात एकर) ’ जमिनींत १४८–४४ कलम्स धान्य उत्पन्न होत असें.

गांवचे इतर खर्च.

५ सारांश, याप्रमाणें धारेबंदी झाली. गांवच्या एकंदर उत्पन्नांतून मंदिरें, ब्राह्मण व गांवनोकर यांच्या सबंधर्चिंा वेतनें प्रथम वजा होऊन नंतर बाकीच्या उत्पन्नावर धारेबंदी केली जात असे. बाकी जें राहील त्यांतून ४० पासून ६० टक्केपर्यंत उत्पन्न शेतकऱ्याची मजूरी म्हणून दिलें जात असें; व यानंतर जें बाकी राहील तें सरकार घेत असें. भातखाचराचा शेतसारा भाताच्या रूपांतच घ्यावयाचा ठराव असे. मात्र

पीक तयार झाल्यावर बाजारभावाप्रमाणें साऱ्याची ठरीव रक्कम रोकड घेत असत. किरकोळ नाणें सोडून मुख्य नाणें पुढील प्रमाणें असें:—

१ एक पॅगोडा कलदार साडेतीन रुपये किंमतीचा असे. म्हणजे सरासरी एक जर्मन डॉलरच होय.

१ एक चक्रम् म्हणजे अर्धा पॅगोडा.

१ एक मोठा फनाम एक रुपयाच्या $\frac{१}{६}$ भागाचा होय. म्हणजे सरासरीं पावणे तीन आणे होत.

१ एक ल्हान फनाम म्हणजे अर्धा मोठा फनाम होय.

नाण्यांची व्यवस्था याप्रमाणें असे.

शेतकऱ्याच्या घेण्याची वांटणी.

६ प्रतापसिंह, तुळजाजी व अमरसिंग यांनीं कुडीवरम्‌चा दर वाढविला. सन १७९९–१८०० मध्यें एकंदर कोरडया पीकाचें उत्पन्न पन्नासापासून साठ टक्क्यापर्यंत शेतकऱ्यास देत असत. इतर कोरडया पीकावर मात्र शेतसारा रोकडीनें वसूल करीत असत. ओहोटीच्या प्रसंगीं कोरडया होणाऱ्या नदीकांठच्या जमीनीस भाटें म्हणतात. अशा भाट्यांतील पिकाचा ४० टक्के भाग पसानम् म्हणून व ४५ टक्के भाग कार म्हणून शेतकरी घेई. फक्त पावसानेंच उत्पन्न होणाऱ्या पीकाचा ५० पासून ६० टक्केपर्यंतचा भाग शेतकरी घेत असे. दुष्काळाच्या प्रसंगीं, शेतकऱ्यांना सरकारांतून कर्ज देऊन त्यांतून शेतसारा वसूल करणें ही प्राचीन पद्धति असे. (अशा कर्जाला तगावी म्हणतात. कारण या रकमेच्या साहाय्यानें शेतकरी कसातरी तग धरून राहूं शकतो) सन १७७६

च्या आगष्टमधील तंजावरच्या रेसीडेंटाशीं राजाचा विचारविनिमय झाल्याचा एक लेख उपलब्ध आहे. त्यावरून असें दिसतें कीं, महापुरानें ज्यांचीं शेती वाहून गेलीं होती त्या शेतकऱ्यांस आपआपल्या शेतांतून पेरण्यास उपयोगी पडणारें बीं विकत घेण्यास (तगावी देण्यासाठीं) कर्ज म्हणून राजानें एक लक्ष पॅगोडांची मागणी केली होती. कर्नाटकाच्या नबाबाच्या ताब्यांत कांहीं अल्पकाळच तंजावर होतें. पण त्या अल्पकाळांतहि त्यानें बैल, बीं वगैरे खरेदी करण्याला तेथील शेतकऱ्यांना तगावी दिलीं होती; व नादुरुस्त कालवे स्वतःच्या खर्चानें दुरुस्त करून दिले. कांहीं धान्यहि उसनवार दिलें होतें. पण त्या उसनवारीचें व्याज मात्र फारच भारी होतें.

पुट्टाक पद्धतीची सुरुवात.

७ सन १७८१ मध्यें हैदरानें तंजावरावर स्वारी केली. त्यानंतर तुळजाजीचा कुशल प्रधान बाबापंडित यानें भाट्याची जमीन वाढविण्याच्या स्तुत्य उद्देशानें पुट्टाक पद्धति सुरू केली. या पद्धतीमध्यें प्रत्येक पुट्टाकदार हा मोठा जमीनदार असे. त्याची निवड गांवकऱ्यांनींच केलेली असे. मात्र अशा पुट्टाकदाराच्या ताब्यांत १२८ खेडीं असत. उत्तम व कनिष्ट अशा दोन प्रकारचीं शेतें सर्वत्रच असतात. उत्तम जमिनींत उपयोगास येणारीं शेतीचीं अवजारें कनिष्ट जमिनींतहि उपयोगास आणण्याचा अधिकार या पुट्टाकदारांना असे. सारांश, या प्रकारानें पिकांची जबाबदारी पुट्टाकदारावरच असे. त्यानंतर त्याच्या ताब्यांतील गावांची सारावसूली करून देण्याची कामगिरीहि त्याच्यावरच आली; इतकेंच नव्हे

पण या वसूलीचें उत्तरदायित्वहि त्याच्यांकडेसच आलें. सारांश, महाराष्ट्रांतील देशमुख म्हणजेच हे पुट्टाकदार होत असें दिसतें. सारा वसूल करणारे अनेक सरकारी नोकर जेव्हां कमी करण्यांत आले तेव्हां, पुट्टाकदारांना अधिक सत्ता साहजिकपणेंच प्राप्त झाली. सन १७९९ मध्यें पुट्टाकदारांची संख्या २२५ होती. पुढें पुढें हें कामहि वंशपरंपरागत चालविण्याची प्रवृत्ति झाली. खेड्यापाड्यांतून शेतीसंबंधीच्या उपयुक्त कामांत तात्पुरती त्वरा करण्याच्या हेतूनें सुरू केलेली पुट्टाकदारीची पद्धति पुढें कायम झाली व तिचा परिणाम हे जमीनदारशेतकरी आपआपल्या खेड्यापुरतें नेतेच होण्यांत झाला. सन १७९८ च्या चौकशीमंडळानें असें लिहून ठेविलें आहे कीं, " सर्वसाधारणपणें असें दिसतें कीं, शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती नसे. विशेषतः तंजावरचे लोक अधिक मेहेरबानीतले असत. " कसेंहि असलें तरी, इंग्रजी राज्यांत ही पुट्टाकदारीची पद्धति अगदीं बंद करण्यांत आली हें फार उत्तम झालें.

प्रांतांत होणारें धान्य व कापड.

८ सन १६१२ मध्यें पोर्च्युगीजांनीं नेगापट्टम् घेतलें; व तंजावरच्या राजाला सालीना पांच हजार चक्रम देण्याचें मान्य करून तेंच नेगापट्टम् डच लोकांनीं सन १६६० मध्यें मिळविलें. तंजावरच्या राजाला मात्र आपलें घेणें वसूल करण्यासाठीं वारंवार स्वाऱ्या कराव्या लागत. सन १७८१ मध्यें हेंच नेगापट्टम् इंग्रजांच्या कबजांत गेलें. नागोरचें कापड व तंजावरचा मुबलक भात यांची प्रशंसा बार्थालोम्यूहि करितो. नेगापट्टमहून रगड भात परदेशीं जातो, असें न्यूहॉफहि प्रशंसापूर्वक नमूद करून ठेवितो. सन १७३६ मध्यें कारिकल बंदर फ्रेंचांस दिलें. सन १७४९ पासून सन १७६५ पर्यंत त्या बंदरांतून

कांहीं महसूल उत्पन्न झाला. यानंतर त्या बंदराचा सालीना महसूल साडेसात हजार रुपये ठरला. सन १७४१ मधील एका डच लेखावरून असें दिसतें कीं, हें कारिकल बंदर चांदीच्या व्यापाराबद्दल फार प्रसिद्ध असे. सन १६२० मध्यें डेन्स लोकांनीं ट्रांकेबार बंदर व्यापिलें व सन १८४५ मध्यें इंग्रजांनीं तें त्यांच्यापासून विकत घेऊन तंजावरच्या राजाला सालीना दोन हजार पॅगोडा देण्याचें मान्य केलें. हॅमिल्टनच्या लेखावरून असें दिसतें कीं, तें बंदर सफेत व रंगी कापडाची मोठीच पेठ असावी. परदेशस्थांनीं याप्रमाणें येथील पीक खरेदी करून या देशाचा व्यापार सुधारला. या लोकांनीं आपल्या राज्यांत व्यापारी म्हणून राहावें अशी तंजावरच्या राजांची इच्छा होती. इंग्रजीफॅक्टरीच्या सन १६२२ मधील एका पत्रावरून असें दिसतें कीं, तंजावरच्या नायकराजांनीं इंग्रजांशीं व्यापार करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. जस्त, शिसें, लोखंड व रक्तवस्त्र या वस्तु इंग्रजांस विकाव्यात व त्यांच्यापासून मिरें, कापड इत्यादि जिनसा विकत घ्याव्यात असा विचार नायकराजांचा होता. सन १६२३ मध्यें नायकराजांनीं कांहीं हक्क इंग्रजांस दिले असें म्हणतात. सुंदर पण स्वस्त कापड आणि मिरें यांचा भरपूर पुरवठा तंजावरास असल्यानें हे जिन्नस तेथें पाहिजे तेवढे मिळत असत.

प्रकरण १४ वें.

---:०:---

उपसंहार.

मुद्दे.

१ इंग्रजास तंजावरसंस्थान बिनखर्चानें मिळालें.
२ मुख्यतः कारस्थानपटुता पाहिजे.
३ प्रजेची बेपरवाई.
४ कल्पनांचें परिवर्तन.
५ प्राचीन संस्कृतीचें रक्षण.
६ प्रस्तुतचें दृश्य.
७ राजांची योग्यता.
८ स्वधर्मच्युति हेंच नाशाचें कारण.

इंग्रजांस तंजावर संस्थान बिनखर्चानें मिळालें.

१ आतांपर्यंतच्या प्रकरणांत तंजावरच्या मराठेराजांचा संक्षिप्त वृत्तांत दिलेला आहे. मराठ्यांच्या पूर्वीच्या नायकराजांनीं आपल्या अस्तकालीं ज्याप्रमाणें कांहीं तेलगू जातीची वसती मागें ठेविली होती, त्याचप्रमाणें या मराठी राजांनींहि तंजावरांत आपले पश्चाताधिकारी म्हणून कांहीं मराठे लोक मागें ठेविले होते. परंतु खरें पाहतां या मराठी राजघराण्याच्या इतिहासाची गोडीहि येथील कोणत्याहि राजघराण्याच्या गोडी-इतकीच आहे. कारण या इतिहासाच्या आधारानेंच आपणांस एका शतकापेक्षां कांहीं अधिक कालपर्यंत उन्नति होऊन, नंतर अवनत झालेल्या घराण्याचा लहानसा पण स्पष्ट व परिणामदर्शक वृत्तांत

आणि इंग्रजीकंपनीचें एतद्देशीयांशीं चाललेलें चंचल राजकारण व कावेबाज कारस्थान यांची सांगोपांग माहिती होते. कोणत्याहि प्रकारचा खर्च न येता, हिंदुस्थानांतील जीं संस्थानें इंग्रजी कंपनीस प्राप्त झालीं त्यांपैकीं तंजावरचें संस्थान हें एक आहे.

मुख्यतः कारस्थान-पटुता पाहिजे.

२ या लहानशा इतिहासावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, सैन्याच्या मदतीला कारस्थान हें असलें म्हणजे स्वातंत्र्याचें संरक्षण व वर्धनहि निश्चितपणें होतें. एकुणीसाव्या शतकाच्या प्रारंभीं विशेषतः अधिक बलवत्तर शस्त्रांच्या, कुशल राजकारणाच्या व मनस्वी धूर्ततेच्या आधारावर जें राज्य वृद्धि पावत होतें, त्याच्या वर्धमान स्थितींत एकादें लहानसें संस्थान द्रव्य व मनुष्य यांच्या दरिद्री साधनांच्या आधारावर स्वतःचें अस्तित्व संभाळणें अशक्य होतें. या भिकार संस्थानाचे तराफे युरोपियन लढाऊ जहाजांची बरोबरी करणें मुळींच संभवनीय सुद्धां नव्हतें. शिकवून शिकवून तरबेज बनविलेले त्या संस्थानचे किल्लेदार युद्धकलानिपुण अशा युरोपियन शिपायांची बरोबरी करणें कल्पनेंतसुद्धां अदृश्य होतें. मोठ्या मेहनतीनें उभारलेले व दुरुस्त होत असलेले त्या लहानशा संस्थानांचें किल्ले इतिहासाच्या अभ्यासूंनाच फक्त उपयोगी होते. तंजावर संस्थानचे प्रतापानंतरचे राजे विलक्षण अडचणींच्या भोंवऱ्यांत येऊन कर्नाटकाचा नबाब व प्रत्यक्ष बलवत्तर इंग्रजकंपनी यांच्यामध्यें अडकित्त्यांतील सुपारीप्रमाणें सांपडून उत्साह व साधनें यांच्या नाशास मात्र कारणीभूत झाले. तंजावरच्या राजांनीं साताऱ्याच्या छत्रपतींचें अंकितत्त्व कायम ठेविलें असतें तर त्या संस्थानाचा असा अपमानकारक शेंवट तरी खात्रीनें झाला नसता. परंतु

सातारा व तंजावर यांच्यामधील शेंकडों मैलांचें अंतर व शिवछत्र-पतीनंतर झालेल्या छत्रपतींच्या राज्यविषक अडचणी व राजकारण-पंगुता अशा अनेक हरकतीमुळें या दोन राज्याच्या एकीकरणास व परस्पर साहय्यास विरोध उत्पन्न झाले. सारांश, ‘ एकीमध्यें बळ असतें ’ ही जुनी म्हणच शेंवटीं सत्य ठरली.

प्रजेची बेपरवाई.

३ नुसत्या मानवी सत्तेच्या ऐवजीं कायद्यांच्या सत्तेनें आपलें प्रावल्य स्थापन केलें ही हितपरिणामी गोष्ट झाली हें खरें आहे. इतर खालसा मुलुखांतील जनतेप्रमाणेंच तंजावर संस्थानांतील प्रजाहि न्याय, द्रव्य व सैन्य यांच्या बलाढ्य सत्तेचें सुख अनुभविती झाली. प्रजेलाहि हळूं हळूं कळूं लागलें कीं, कांहीं कर्तृत्व करण्यासाठीं या राज्याचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. असें आपलेपणाचें शिक्षण मिळाल्या-मुळें तिच्या ठिकाणीं ‘ रामाचें कीं रावणाचें कोणाचें का राज्य असेना !’ ही बेपरवाईची वृत्ति राहिली नाहीं.

कल्पनांचें परिवर्तन.

४ बऱ्याकरितां कीं वाईटाकरितां कशाहि करितां असो, पण राज्याच्या कर्तव्याची कल्पना पार बदलून गेली. मंदिरें आणि छत्र्या उभारणें अथवा पंडि-तांना आणि वादकांना शाली देणें हीं धार्मिक म्हणून समजलीं जाणारीं कृत्यें आतां राजाच्या कर्तव्यांत राहिलीं नाहींत. राजाच्या कर्तव्याचा असा कोणीहि देव नसून तें कर्तव्यहि एका विशिष्ट जाती पुरतेंच असें आतां राहिले नाहीं. जुन्या पद्धतीमध्यें कांहीं गुणहि होते. उदा-हरणार्थ, बेकारी नाहींशीं झाली होती व तीमुळें जनता संतुष्ट असे. पूर्वीच्या सामाजिक चालीरीती बंद न पडतां चालूच राहिल्या होत्या.

सहिष्णुता वाढल्यामुळें जनतेच्या स्वभावांत औदार्य दृग्गोचर होऊं लागलें होतें. पंचायतींचा न्याय हा स्वस्त, हितपरिणामी व त्वरित मिळत असे. मध्यवर्ती सत्ता बदलल्यामुळें सार्वजनिक निधी सुरक्षितपणें चालू राहिला. सत्तेच्या मध्यवर्तीकरणाचे दुष्परिणाम व अंमलदारांची खोगीरभरती यांचा अभाव होता. स्वाऱ्यांच्या धामधुमीमुळें राजधानींत काय गडबड असेल तितकीच. इतर सर्व ठिकाणीं मात्र शांतता अनुभविली जात असे. कायद्यांची अंमलबजावणी होत असल्यामुळें मुख्यतः प्रजा संतुष्ट असे. तेव्हां राज्यकरण्याची पद्धति आतांप्रमाणें नसल्यामुळें फक्त कर वसूलीच्याच वेळीं किंवा सार्वजनिक लाभाच्या प्रसंगीं प्रजेला राजसत्तेची जाणीव होत असे. युद्धमग्न सेनेच्या भरणपोषणाची सिद्धता करणाऱ्या आजच्यासारख्या कारकुनांची किंवा मुल्की अंमलदारांची फौज तेव्हां नसे. अधिक अंमलदार असले म्हणजे लांचलुचपतीला अधिक उत्तेजन मिळतें व दडपशाहीहि अधिक होते. वसतीच्या प्रदेशांत जुल्म जबरदस्ती अधिक झाली म्हणजे किरकोळ अंमलदारहि शांतताप्रिय प्रजेला पिळून काढणारे नायबपरमेश्वरच बनतात.

प्राचीन संस्कृतीचें रक्षण.

५ जुना प्रघात बंद झाल्याबद्दल शोक करणें हें आपण म्हातारे होऊन तरुणपणांतील प्रघात बंद केल्याबद्दल शोक करण्यासारखेंच आहे. जुन्या हिंदी राज्यव्यवस्थेनंतर लगेच इंग्रजी राज्यव्यवस्था सुरू झाली हें सुदैवच म्हटलें पाहिजे. मध्यंतरीं सन १७७३ पासून सन १७७५ पर्यंत तंजावरावर यवनांचें राज्य होतें. तेवढा तीन वर्षांचा काळ वजा केला तर दक्षिणेंतील समृद्ध प्रदेश, शिक्षणाचें आगर, वाद्यवादनाचें निवासस्थान, बुद्धिमान् देशबंधु व बुद्धिमती

देशभगिनी यांचें निलय असा जो तंजावरचा प्रांत तो कारिकल चोल राजांच्या वैभवशाली कारकीर्दीपासुन ख्रिस्ती शकांच्या एकोणीसाव्या शतकापर्यंत हिंदूराज्याखालींच नांदत होता. या राजांनीं, प्राचीन संस्कृति व त्या संस्कृतीचीं दशकें अशीं मंदिरें, हीं यवन अथवा ख्रिस्ती यांच्या संबंधापासून अलग ठेवून, त्यांचें संरक्षण केलें होतें.

प्रस्तुतचें दृश्य.

६ पूर्वीच्या राजधानीचें तंजावर हें शहर आज पाहिलें असतां तेथें उदासीनता दृग्गोचर होत असून पूर्वीच्या मृतवैभवाचें भूत जणुं तेथें वावरत आहे, असें प्रेक्षकांस वाटतें. तंजावर ही राजधानी असतांना येथें नांदत असलेलें वैभव, भव्यपण, अभिमानाचें श्रेष्ठत्व व द्रव्यबळ आतां नष्ट झाल्यानें या नगराचें प्राधान्य आतां लयास गेलें, हें पाहून जागतिक साम्राज्य किती भंगुर असतें याची जाणीव पदोपदीं होतें. येथील किल्ला व भव्य मंदिरें दृष्टीस पडतांच प्राचीन राजराज चोलाचें स्मरण होतें; व मदमलिंगाई व गुड गोपुरम् या इमारती नायक व मराठी राजांच्या आठवणी करून देतात. उपर्युक्त ऐतिहासिक इमारतींच्या दर्शनानें प्रेक्षकांच्या अंतःकरणांत उद्विग्नता उत्पन्न होते यांत संशय नाहीं.

राजांची योग्यता.

७ अठराव्या शतकांतलि हिंदुस्थानच्या इतर राजांच्या प्रमाणानें आपणांस तंजावरच्या राजांच्या योग्यतेची परीक्षा केली पाहिजे. द्वीपांतरीय राजकारणांमध्यें ते मागें पडले व सत्ताहीन ठरले हें खरें असलें, तरी त्यांची अशी स्थिति होण्याला त्यांना काय अडचणी उत्पन्न झाल्या होत्या त्याहि आपण विचारांत घेतल्या पाहिजेत. तो काळच

अवनतीचा व वेकीच्या वृद्धीचा होता. तंजावरच्या राजांपेक्षां अधिक साधनें व जास्त सवलती ज्या राजांना होत्या ते राजेसुद्धां कांहींहि अधिक करूं शकले नाहींत. मराठी राजांच्या पूर्वीं तंजावरावर नायकराजांचें राज्य होतें. ते नायक राजे शांत स्वभावाचे व साम्राज्यनिष्ठ होते. आपलें संस्थान त्यांनीं उत्तम प्रकारें सांभाळिलें. त्यांच्यानंतर मराठी राजे तेथें झाले व त्यांनींहि नायकांचेंच अनुकरण केलें. त्याकाळीं राजकारण व धर्मपालन यांचा संबंध आजच्याप्रमाणें तुटलेला नव्हता. खरें सांगावयाचें म्हणजे राजांचीं कर्तव्यें धर्मानेंच मुक्रर केलीं होतीं. शांतता ठेविणें, न्याय करणें, लहान लहान कर बसविणें इत्यादि कर्तव्यें राजांचींच होत असें धर्मानें मुक्रर केलें होतें पण त्याशिवाय मंदिरें व मठ यांना धर्मादाय देणग्या देणें, ब्राह्मण व इतर विद्यासेवक यांना भरपूर उपहार देणें, वर्णाश्रमधर्माचें संरक्षण व परिपालन करणें व दारिद्र्याचा नाश करणें हीं कर्तव्येंसुद्धां राजानेंच करावींत असेंहि ठरविलें होतें. सार्वत्रिक शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांच्यासंबंधीं विचार करण्यास राजाला सवडच ठेविली नव्हती. कारण हीं कामें जनतेचीं असल्यानें तिनेंच पार पाडावींत अशी समजूत असावीसें दिसतें. प्रजेला नियमबद्ध स्वातंत्र्य असावें ही भावनाच नसल्यानें तिच्यासंबंधीं राजाला कधींहि विचारच करावा लागत नसें. आजसुद्धां साधी, हलकी व सारासारविचारजन्यकायदे करण्याची पद्धति हिंदुस्थानांत प्रचलित आहे. सारांश, त्या वेळीं जमिनी धारण करणाऱ्या वर्गावर कांहीं अधिक बोजा राजांनीं लादला असला तरी तें कृत्य क्षम्यच समजलें पाहिजे.

स्वधर्मच्युति हेंच नाशाचें कारण.

८ नायक व मराठे हे स्वधर्मापासून चळतांच त्यांचा अपकर्ष झाला व मग ते स्वतःचें संरक्षण करूं शकले नाहींत. आनंदरंगम् पिले यानें अनेकवेळां आपल्या रोजनिशींत लिहून ठेविलें आहे कीं, अनीति, अन्याय व अधमवृत्ति या त्रिदोषानें तंजावर वगैरे संस्थानें पंचत्व पावलीं. आनंदरंगम् हा स्वतःची रोजनिशी लिहिणारा मोठा वांका लेखक होता. राज्याला नीतिमत्तेचा पाया मोठा बळकट असतो व त्यावरच पुढील एकीची इमारत उभारलेली असते. कोणतेंहि राज्य चालण्यास त्याची अंतर्व्यवस्था व बाह्यव्यवस्था संघशक्तीवरच अवलंबून असतें. हीं तत्त्वें आनंदरंगमूला पटलीं होतीं. यावरून त्याची ग्रहणशक्ति विलक्षण तीव्र, शोधक व दूरपल्लयाची होती असें दिसतें.

प्रकरण १५ वें

प्राचीन राजवंश.

मुद्दे

१ मदुरेचे नायक राजे
२ कारिकेल चोल.
३ तामिळ
४ चोल राजे

१ मदुरेचे नायक राजे.

पूर्वी मदुरेस पांडवांचें राज्य होतें, तें पुढें सन १५५९ मध्यें विजयानगराच्या विश्वनाथ नायक सेनापतीनें हस्तगत केलें; तेव्हांपासून नायकांचें राज्य झालें.

१ विश्वनाथ (सन १५५९–१५६३)
|
कृष्णाप्पा (१५६३–१५९५)
|
विश्वनाथ (स. १५९५ ते १६०२) — लिंगय्या
|
मुत्तुकृष्णाप्पा (१६०२–१६०९)
|
मुत्तुविरप्पा (१६०९–१६२३)
|
तिरुमल नायक (१६२३–१६५९)
|
मुत्तु अरकादि (वीरप्पा) (१६५९–१६६०)

१ यानेंच मदुरेच्या राज्यांत पाळेगारांची पद्धति प्रथम सुरू केली.

२ चोक्कनाथ (१६६०–१६८२)
|
रंगकृष्ण मुत्तु वीरप्पा (१६८२–१६८९)
याच्या नंतर |
चोक्कनाथाची विधवा **मंगम्माल** (१६८९–१७०४)
|
विजयरंग चोक्कनाथ (१७०४–१७३१)
हा चोक्कनाथाचाच पुत्र |
असावा. याची विधवा **मीनाक्षी** (१७३१–१७३६)

मीनाक्षीच्या मृत्यूनंतर मदुरेचें राज्य खालसाच झालें.

---

२ करिकेल चोल.

(ज्ञानेश्वर नामदेवाचा कक्ष पृ. २२९)

चेर, पांडव, पल्लव, कदंब, गंग व बाण, या दक्षिणेकडील सर्व प्राचीन राज्यापेक्षां चोलांचें साम्राज्य अधिकप्रभावशाली झालें. अशोकाच्याहि फार पूर्वीपासून चोल, पांडव व चेर, यांचीं राज्यें होतीं. चोल पूर्वकिनाऱ्यावर, पांडव दक्षिणेस व चेर पश्चिमेस....... अशोकाच्या वेळीं सीलोन चोलांच्या राज्यांत मोडत असे. सिंहली-लोकांना चोलांशीं अनेक शतकें झगडून स्वातंत्र्य मिळवावें लागलें. कपोतासाठीं स्वतःचें मांस देणारा परोपकारी शिबि राजा चोलांच्या राजघराण्यांत झाला. अतिप्राचीन काळापासून तों विजयानगरच्यां साम्राज्यांत सामील होईपर्यंतच्या काळांतला चोलांचा इतिहास उपलब्ध आहे. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं करिकेल चोल (इ. स. १५०–२००) हा प्रख्यात राजा होऊन गेला. चोलांचा ऐतिहासिक काळांतला हा पहिला सम्राट् होय. अवंती, मगध व वज्र (बुंदेलखंड)

---

२ चोक्कनाथानेंच मदुरेची राजपदाची गादी त्रिचनापल्लीस नेली.

येथील राजे याचे दोस्त होते. यानें आपला व्याघ्रध्वज हिमालयावर नेऊन रोवला होता. यानें पूर्वीची उरैयूर (त्रिशिरापल्ली किंवा त्रिचनापल्ली) ही राजधानी सोडून कावेरीपट्टण ही आपली राजधानी केली, व तिच्या स्थापनेसाठीं यानें सीलोनमधून १२ हजार मजूर आणले होते. कावेरीपट्टण येथें देशावरी व दर्यावरी व्यापार जोरांत चालत होता.........व कावेरी नदीला बंधारे घालून मोठमोठे कालवे बांधले...........याच्या घराण्यांत तोण्डमाण व कोचेंगज हे विख्यात राजे झाले. या घराण्यानें पांचशें वर्षें राज्य केलें.

ज्ञानेश्वर नामदेवांचा काळ यांतील उतारा
पृष्ठ २२७ पासून

---

३ तामिळ.

(गौतम बुद्धाच्या जन्मानंतर सुमारें दीड हजार वर्षांच्या काळांत) चंद्रगुप्त, अशोक, पुष्पमित्र, विक्रमादित्य, हर्षवर्धन, ललितादित्य, भोज इत्यादि महाप्रतापी सम्राट् हिंदुस्थानाच्या इतिहासांत........ प्रायः उत्तरेकडे झाले........या काळांत कलिंग व आंध्र हे (दक्षिणेकडस) पूर्वकिनाऱ्याकडे प्रबळ होते. त्यांच्यापैकीं आंध्र पाय पसरीत पश्चिमेकडे वळले व शाहिवाहन या नांवानें त्यांनीं महाराष्ट्रावर तीनशें वर्षें राज्य केलें........द्रविड प्रांतांत चोल, पांडय, चेर, पल्लव, इत्यादि नामांकित राजघराणीं झालीं. त्या सर्वांत किंबहुना हिंदुस्थानच्या इतिहासांत चोल उर्फ तामीळ राजांची व तामीळ लोकांची कर्तबगारी कांहीं अलौकिक आहे. तामीळ लोकांसारखे साम्राज्य कोणी गाजविलें नाहीं. तामिळांच्या साम्राज्यांत करिकेल,

राजराज, गंगईकोंड ऊर्फ राजेंद्र जयमकोंड, कुलोत्तुंग, इत्यादि मोठमोठे सम्राट झाले व लखदिव, मालदिव हीं बेटें घेऊन कृष्णेच्या खालच्या सर्व हिंदुस्थानावर त्यांनीं राज्य केलें, इतकेंच नव्हें तर पूर्व किनाऱ्यानें कलिंग व आंध्र हे देश घेऊन बंगाल्यांत व ब्रह्मदेशांत आपले पाय पसरले व पुढें जावा सुमात्रादि बेटांत आपल्या वसाहती करून तेथें रायायण महाभारतादि आपले ग्रंथ नेले व रामकृष्णांचीं मंदिरें उभारिलीं. दक्षिणेत कावेरी तुंगभद्रा नदीचा फायदा घेऊन मोठमोठे कालवे व धरणें बांधिलीं, स्वतंत्र आरमार ठेऊन परदेशांशीं मोठा व्यापार केला व साऱ्या जगांत नाहींत अशीं, कांची, मदुरा, तंजावर, शोलापुरम्, श्रीरंगम् इत्यादि ठिकाणीं भव्य मंदिरें बांधून आपल्या शिल्पकलेचीं जिवंत स्मारकें करून ठेविलीं. । देशी वाङ्मय सर्वात प्राचीन तामीळांचेंच आहे................

चोल राजे (इ. स. ८४६ ते १११८)

ज्ञानेश्वर नामदेवांचा काळ पृ. (२३०)

४ करिकेल चोल.

विजयालय याच्या राज्यांत तंजावर, कांची, कन्याकुमारी इ. प्रांत असत. याचा पुत्र पहिला आदित्य यानें आपल्या राज्याची सरहद्द राष्ट्रकूटांच्या सरहद्दीशीं भिडविली, याचा मुलगा परांतक (९०७–९४७) यानें आणखी राज्य विस्तार केला. हा निष्ठावंत शैव होता. चिदंबारम् येथील शिवमंदिराची पटई यानें सोन्यानें मढविली. याची पत्नी केरळकन्या ही मोठी सती होती. या दंपत्याला पांच पुत्र व अनेक प्रपौत्र झाले.......या घराण्यांत राजराज- (९८५–१०१३) व त्याचा पुत्र गंगईकोंड ऊर्फ राजेंद्र (१०१३–१०४३) हे पितापुत्र अत्यंत पराक्रमी निघाले; व उभतांनीं चोल साम्राज्याचा अत्यंत विस्तार करून अपार ऐश्वर्य भोगलें. राजराज

हा अत्यंत श्रेष्ठ राजा झाला. यानें चेरांचें आरमार घेतलें व पांड्यगंग वगैरे राजे जिंकून आपलें राज्य खालपासून तों थेट कृष्णेच्या मुखापर्यंत भिडविलें. यानें फार मोठी सेना तयार केली व आरमार वाढविलें. सत्याश्रय चालुक्याचा पराभव करून यानें लखदिव व मालदिव हीं बेटें घेतलीं व व्यापार मनस्वी वाढविला. यानें तंजावर ही आपली राजधानीं केली व तेथें राजराजेश्वर नामक एक प्रचंड शिवालय बांधिलें. या शिवमंदिरांत याच्या कारकीर्दीचा एक विस्तृत शिलालेख आहे......यानें पहिलें तीन कालवे बांधले व जमीनधाऱ्याचा उत्तम बंदोबस्त केला. या राजराजाचा मुलगा राजेंद्र हा वापसें बेटा सवाई निघाला. त्यानें १०३५ ते १०३७ ह्या दोनच वर्षांत अंदमान, निकोबार हीं बेटें व ब्रह्मदेशांतला पेगू प्रांत घेतला. त्यानें इळम् (सीलोन) वर स्वारी करून तेथून तीन रत्नजडित मुगुट खंडणीदाखल आणले. केरळ व पांड्य या देशांवर आपले पुत्र सुभेदार नेमिले व उत्तरेस गंगातटाकापर्यंत मोहीम करून ओरीसाचा राजा व बंगालचा राजा महीपाल यांना आपले मांडलिक बनविलें. यानें कलिंग जिंकलें, कनोज हस्तगत केलें, आणि केरळ राज्य घेऊन तेथील अफाट खजिना व सूर्यमाळा नामक बहुमोल कंठा लुटून आणिला. यानें अनेक देश जिंकून अपरंपार संपत्ति मिळविली..............आरमाराच्या जोरावर बंगालचा उपसागर ओलांडून यानें ब्रह्मदेशाचा कांहीं भाग आपल्या राज्यास जोडला...............चीन देशांत यानें आपला वकील पाठविला होता !..........यानें गंगैकोंड शोलापुरम् (त्रिचनापल्ली परगण्यांत) येथें एक प्रचंड तलाव बांधला. या तलावाचें नांव त्यानें ' जयस्तंभ तडाग ' असें ठेविलें...........यानें आपला मुलगा राजाधिराज जयमकोंड याला उत्तम शिक्षण दिलें. त्यानेंहि बारा वर्षें मोठ्या तोलदारीनें राज्य केलें. याच्या प्रतापाची एकच गोष्ट सांगितली म्हणजे पुरें कीं यानें चेर, पांड्य, गंग, पल्लव,

चालुक्य सीलोन त्यां सहा राज्यांवर आपला चुलता व पांच भाऊ यांना आपल्या साम्राज्याचे सुभेदार नेमले ! यानें सर्वांशीं लढाया केल्या व हा सर्वत्र नित्य विजयी असे. हा उत्तर हिंदुस्थानांत मथुरे-पर्यंत गेला. यानें आपलें राज्य निष्कंटक केलें व राज्याचा विस्तारहि केला. याचा पुत्र राजमहेन्द्र. यानें राजमहेन्द्री शहर वसविलें व श्रीरंगम् देवास वर्षासन नेमून दिलें. त्याचा चुलता वीरराजेंद्र यानें वेझवाडा आपल्या राज्यास जोडला, व ब्रह्मदेशाचा दक्षिण भाग खालसा करून दर्यावर मोठाले विजय मिळविले. चोलांचा शेवटचा प्रतापी राजेंद्र चोंड ऊर्फ कुलोत्तुंग (१०७०–१११८) हा होय, हा गंगईकोंड याचा मुलीकडून नातु (दौहित्र) होय. याचे बरेच शिलालेख उपलब्ध आहेत. या चोलांचा व्याघ्रध्वज असे, व चालु-क्यांचा वराहध्वज होता. यानें महिपमंडळ (म्हैसूर) प्रांतावर स्वारी करून विक्रमादित्य चालुक्याला तुंगापार घालवून दिलें व पांड्य-राजाला जिंकून मानार, तिनिवेल्ली, मलवार व कन्याकुमारी हा सारा प्रदेश आपल्या राज्यांत आणला व पल्लवांचेंहि राज्य खालसा केलें. मदुरेस त्यानें आपल्या भावास सुभेदार केले. चेर राजा त्याचा मांडलिक झाला. साऱ्या दक्षिणेंत हा अत्यंत बलाढ्य झाला व यानें आपलें कुलोत्तुंग हें नांव सार्थ केलें. द्रविड, आंध्र व कलिंग ह्या अफाट देशांवर त्यानें न्यायनीतीनें अर्धशतक राज्य केलें. त्यानें कलिंग देश जिंकल्यावर याची कीर्ति आणीकच पसरली. यानें राज्यव्यव-स्थेकडेहि उत्तम लक्ष दिलें. साम्राज्याच्या जमीनीची यानें मोजणी केली...... कुलोत्तुंगानंतर चोल साम्राज्याला उतरती कळा लागली. तरी चोलांचें राज्य १३५६ च्या पुढेंपर्यंत चाललेंच होतें. चोल राजांच्या ह्या ५०० वर्षांच्या राजवटींत विजयालय, परांतक, राजराज गंगैकोंड, जयमकोंड, कुलोत्तुंग हे ६ राजे मोठे प्रतापी निघाले व त्यांनीं चोल साम्राज्य दक्षिणभर गाजविलें. चोलसाम्राज्याला चोलमंडळ म्हणत. या शब्दाचेंच कारोमांडल हें रूपांतर झालें आहे.

परिशिष्ट १

तंजावरचा शिलालेख.

अस्सल शिलालेख फार महत्त्वाचा असून तो श्रीयुत सांबमूर्तिराव व राजवाडे यांनीं छापून प्रसिद्ध केला आहे. परंतु तो प्रस्तुत दुर्मिळ असल्यानें सबंद, पण कलमें पाडून दिला आहे. सर्व शिलालेखाचें कलमवार तात्पर्य आरंभीच दिलें आहे.

१ पहिल्या कलमाचा संक्षिप्त सारांश पुढें दिला आहे. भोसल्यांचा वंशवृक्ष.

१ नारायण
|
२ सूर्य
|
३ मनु
|

४ इक्ष्वाकु यापासून कृत त्रेता द्वापर अशा ३ युगांत अनेक राजे होऊन गेले. हल्ली कलियुगांत वंश पुढीलप्रमाणें आहे.

१ शंभु
|
२ येकोजी
|
३ शरभ यास आदिलशहानें बिदलीपुर जहागीर म्हणून दिलें.
|
४ महासेन
|
५ एकोजी
|
६ रामचंद्र
|
७ भीमराव
|

८ एकोजी

९ वराह

१० एकोजी

११ ब्रह्माजी × अनसाऊ

१२ शाहजी × उमाऊ

१३ अंबाजी × रेणुका

१४ परसोजी × उमाऊ

१५ बाबाजी × रेखाऊ. यांस दोन पुत्र झाले, त्यांचा वंश पुढें दर्शविला आहे.

१६ मालोजी × उमाबाई

१६ विठोजी × आऊबाई याला अंबाबाई नावाची कन्या व ८ पुत्र. १ संभाजी. २ खेलोजी. ३ मालोजी. ४ परसोजी. ५ नागोजी, ६ मनोजी. ७ कंकाजी. ८ त्रिंबकजी.

१७ शाहजी × १ उमाबाई २ जिजाबाई. १७ शरीफजी × दुर्गाबाई

शाहजीनें पुढें पुष्कळ युद्धें केलीं. एकदां दर्यासानाचा पराभव केला. पुढें शालिवाहन शके १५५१ मध्यें शाहजीस जिजाबाईचे पोटीं शिवाजी व पुढें लागलीच उमाबाईचे उदरीं येकोजी मुलगा झाला.

शाहजी

१८ शिवाजी (कनिष्ट भार्येपासून) १८ एकोजी (ज्येष्ट भार्येपासून)

२ दुसऱ्या कलमाचा तात्पुरता सारांश:—

शहाजहान+ मरण पावल्यावर औरंगजेबास दिल्लीची पातशाही मिळाली व त्यानें निजामशहावर स्वारी करून निजामशाही खालसा

+ मूळांत जहांगीर नांव आहे.

केली. शाहजीनें मोंगलाशीं युद्ध केलें त्यावेळीं त्यास मराठ्यांच्या शहाण्णव कुळांनींहि सहाय्य दिलें होतें. पुढें शाहजीनें शिवाजीस शके १५६२ मध्यें (सन १६४०) सातान्यास व वेंकाजीस बेंगरूळ प्रांतीं स्थापिलें. युवराजपद व बिरुदें वेंकाजीसच दिलीं. आदिलशहानें शाहजीस कैद केलें. पुढें तह झाल्यावर शाहजीची सुटका झाली व त्यानें आदिलशहातर्फे स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. या एकंदर प्रकारामुळें शिवाजीस वैषम्य वाटलें व शिवाजीनें आदिलशाहीविरुद्ध उठावणी केली. शिवाजीनें राज्यारोहण करून शिवशकाची स्थापना केली. त्यावरून चंद्रराजानें आगळीक केली. त्यावरून शिवाजीच्या पारिपत्यासाठीं अफझलखानाची रवानगी करण्यांत आली. शके १५८१ मार्गशीर्ष शु॥ ७ गुरुवारीं अफझलखान हा समक्ष भेटींत मारला गेला व खानाच्या फौजेचा नाश नेताजीनें केला.

३ तिसऱ्या कलमाचा संक्षिप्त सारांश असा आहे.

शिवाजीनें आदिलशाही व मोगली मुलुखावर स्वाऱ्या केल्या. पन्हाळगडहि घेतला. तेव्हां आदिलशहानें औरंगजेबास हें कळविलें. पुढें शास्ताखान, जोहरखान वगैरेंचे पराजय शिवाजीनें केले. नंतर सन १६७७ मध्यें चंदी प्रांत हस्तगत केला. एकोजीस शके १५९३ मध्यें शाहजी नांवाचा पुत्र झाला. शके १५९६ मध्यें दुसरा मुलगा शरफोजी झाला. शिवाजीच्या अष्टनायिकांची नांवनिशी आहे. शिवाजीला वडील पत्नी सईबाईच्या पोटीं तिघी कन्या व एक पुत्र संभाजी अशीं चार अपत्यें झालीं. शिवाजीच्या इतर भार्यांच्या संततीची यादी व त्यांचा संबंध कोठें कोठें झाला ती माहिती दिली आहे. पुढें शिवाजीचें तंजावरास गमन व तेथून परत येणें व नंतर मृत्यु.

४ चवथ्या कलमाचा संक्षिप्त सारांश पुढें दिल्याप्रमाणें सांगतां येईल. संभाजीचा किंचित् पराक्रम व त्यास औरंजेबानें धरून नेऊन त्याचा शिरच्छेद केला हें वर्णन. पुढें औरंगजेबाच्या कन्येचें भाषण व शाहूचें संरक्षण तिनें केलें ही हकीकत. पुढें शाहूचा विवाह, नंतर मुक्तता व शाहूचा राज्याभिषेक. शाहूला फत्तेसिंग नांवाचा अनाथ मुलगा सांपडताच त्याचें संरक्षण व शिक्षण शाहूनें करविलें व नंतर नागपुरचें राज्य त्यास दिलें.

५ पांचव्या कलमाचा संक्षिप्त सारांश पुढील प्रमाणें सांगता येईल. मागें १ ल्या कलमांतील वंशावळींत १५ व्या बाबाजी राजाचा धाकटा मुलगा जो विठोजी त्याच्या संततीची नांवें दिलीं आहेत. त्यांत विठोजीच्या आठ मुलांत तिसरा मालोजी सांगितला आहे. त्याचा वंश पुढें दिल्याप्रमाणें आहे.

१ मालोजी
|
२ माणकोजी
|
३ विठोजी
|
४ परसोजी
|
५ संभाजी — रामराजे. हा रामराजा शाहूजवळ सातार्‍यास राहिला. हाच रामराजा शाहूच्या पश्चात् छत्रपतीच्या गादीवर छत्रपती म्हणून बसला. शके १६७४ (१७५२) हा रामराजा निपुत्रिकच वारला. त्यानें विठोजीचा दुसरा मुलगा खेळोजी याचा नातू उमाजी याचा पुत्र शाहू यास मांडीवर घेतलें. शके १६९५

शाहु

शिवाजीचा पुत्र रामराजा यास संतति नव्हती. यानंतर वेंका-जीचा वंश पुढीलप्रमाणें दिला आहे. वेंकाजीच्या पराक्रमाचें वर्णन त्यानें शके १५९६ मध्यें तंजावरांत प्रवेश केला व शके १५९८ मध्यें तंजावरचें राज्यावर आरोहण केलें. वेंकोजीला दोन पुत्र झाल्याचा वृत्तांत मागें तिसऱ्या कलमांत दिलाच आहे. पुढें शके १५९८ मध्यें तिसरा पुत्र तुकोजी झाला. एकोजीस दोन स्त्रिया लग्नाच्या व नऊ उपपत्न्या होत्या. दुसऱ्या भार्येला एक मुलगीच झाली. उपपत्न्यांच्या पोटीं पुढील संतति झाली. १ चंद्रभान, २ सूर्यभान. ३ मित्रभान, ४ कलेमान, ५ कीर्तिमाउ, ६ विजयभान, ७ उदयमान, याप्रमाणें सप्त खर्ची पुत्र होत. पुढें शके १६०४ मध्यें एकोजी मृत्यु पावला.

६ सहाव्या कलमाचा संक्षिप्त सारांश पुढील प्रमाणें सांगतां येईल. वेंकाजीच्या पश्चात् त्याचा पुत्र शाहजी गादीवर बसला. शाहजी व सरफोजी यांस संतति झाली. तिसरा तुकोजी याचा वंश पुढील प्रमाणें:—

१ तुकोजी.

२ येकोजी जन्म शक १६१७ (सन १६९५) यास बाबासाहेब म्हणत

शाहजीचा मृत्यु शके १६३३ (सन १७११) मध्यें झाल्यावर सरफोजी गादीवर बसला. सरफोजीला तीन बायका होत्या. तुको-जीला लग्नाच्या पांच बायका होत्या. याशिवाय सहा रक्षा होत्या. यांपैकीं एक मराठा जातीची व पांच नायक जातीच्या होत्या. मराठा जातीच्या स्त्रीच्या पोटीं शके १६६४ (सन १७४२) मध्यें प्रतापसिंग जन्मला. इतर राजपुत्रांचे विवाह व त्यांच्या रक्षा यांची माहिती दिली आहे. पुढें शरफोजीच्या पत्नीनें मूल झाल्याचें प्रगट केलें, पण तें मिथ्या ठरलें. पुढें शके १६४९ (सन १७२७) मध्यें

शरफोजी मरण पावला. त्याबरोबर दोन स्त्रिया सती गेल्या. नंतर त्याचा धाकटा भाऊ तुकोजी हा गादीवर बसला. शके १६५७ (सन १७३५) मध्यें तुकोजीहि निवर्तला. नंतर एकोजी राज्यावर बसला. पण तो एक वर्षानींच निवर्तला. हा फार संशयी होता. शके १६५८ (सन १७३६) मध्यें एकोजी निवतला. पुढें त्याच्या सुजानबाई नांवाच्या स्त्रीनें राज्यकारभार चालविला. परंतु कोयाजी घाटग्यानें तोतया राजाची भूमिका घेतली व राज्य बळकाविलें. यालाच काटराजा म्हणतात. शरफोजीच्या पत्नीनें मुलगा झाल्याचें सोंग केलें होतें त्याचाच फायदा या काटराजानें घेतला. पण पुढें हें ढोंग उघडकीस येऊन शके १६६० (सन १७३८) मध्यें प्रतापसिंहास गादी मिळाली.

७ सातव्या कलमाचें संक्षिप्त तात्पर्य असें सांगता येईल. शके १६६० (सन १७३८) मध्यें प्रतापसिंह गादीवर बसल्यावर लगेच त्याचा विवाह झाला. त्याची संतती पुढें दिली आहे.

१ प्रातापसिंह× १, २ द्रौपदीबाई.

|

२ तुळजाराजे ×१, २ राजकुमारबाई, ३ मोहनाबाई.

मध्यंतरी कट्टुराजानें राज्य बळकाविल्यावर दान, धर्म वगैरे बंद केला होता ही माहिति दिली आहे. त्यानें मोहना नांवाची एक मुरळी भ्रष्ट केली होती. प्रतापसिंह गादीवर बसल्यावरहि या कट्टुराजानें कांहीं अधिकार चालविला पण पुढें त्याला कैद करण्यांत आलें. पुढें या तोतयानें चंदासाहेबाशीं संधान लाविलें. व तें या तोतयानें आपल्या भावाच्या मार्फतीनें लाविलें, पण पुढें तें फुटलें व त्यास देहान्त शिक्षा देण्यांत आली. चंदासाहेबाची स्वारी मात्र जोरांत चालू होती, तेव्हां प्रतापसिंहानें साताऱ्याहून मदत मागविली. शाहूनें रघूजी व फत्तेसिंग भोसले यांस साठ हजार फौजेनिशीं

मदतीस पाठविलें. पुढें मुरारजी घोरपड्यानेंहि मदत केली. पुढें पुष्कळ युद्धें झालीं. प्रतापसिंहाला सात उपपत्न्या होत्या. त्यांसहि संतति झाली. शके १५८५ (येथें शके १६८५ पाहिजे म्हणजे सन १७६३) मध्यें प्रतापहि मरण पावला. दोघी स्त्रियांनीं अनुगमन केलें. तुळजाराजा गादीवर बसला.

८ आठव्या कलमाचा संक्षिप्त सारांश पुढें सांगितल्याप्रमाणें आहे. तुळजाराजा गादीवर बसल्यावर महंमदअल्लीनेंहि वस्त्रें वगैरे पाठवून त्याचा गौरव केला. पण पुढें या महंमदअल्लीच्या मनांतून तंजावरचें राज्य खालसा करावें असे विचार येऊं लागले व तदनुसार त्यानें तंजावरावर स्वारी केली. परंतु इंग्रजांच्या मध्यस्थीनें हें युद्ध थांबलें. पुढें तुळजाजीस संतती नव्हती म्हणून त्यानें आपल्या कुळांतील एक मुलगा दत्तक घेऊन त्यास शरभोजी हें नांव ठेविलें. हा शरभोजी विठोजीच्या वंशांतील होय. वंशवृक्ष पुढें दिला आहे.

१ विठोजी
|
२ त्र्यंबकजी हा विठोजीचा आठवा पुत्र.
|
३ गंगाजी
|
४ उवाजी
|
५ गंगाजी
|
६ सुभानजी

७ उवाजी	**७ शाहजी**
	|
	८ शरभोजी

शरभोजी यासच तुळजाजीनें दत्तक घेतलें. व वसंत पंचमीस (तारीख २४–१–१७८७) राज्याभिषेक व दुसरे दिवशीं शके १७०८ मध्यें तुळजाराजा निवर्तला. पुढें शके १७०९ मध्यें शरभोजीस बाजूस सारून अमरसिंग राजा बनला. पुढें शार्टझच्या प्रयत्नानें शके १७२० (सन १७९८) मध्यें शरभोजीला पुनः राज्यप्राप्ति झाली. पुढें शरभोजीचा विवाह झाला व त्यास संततीहि झाली. प्रस्तुत शिलालेख तारीख १३ डिसेंबर सन १८०३ रोजीं पूर्ण झाला.

तंजापुरीं श्रीबृहदीश्वरालयस्थ शिलालिखित.

भोसलवंशचरित्र.

श्रीमद्भोसल वंशाचा आदि मूलपुरुष श्रीमन्नारायण त्यापरंपरेने श्रीसूर्यनारायण त्यापासून मनू मनूपासून राजा इक्ष्वाकु त्या-राजाचे परंपरेंत कृत त्रेता द्वापर या तीन युगांतहीं प्रख्यात पुण्यश्लोकराजे जाहले. या वंशांत प्रस्तुत कलियुगामध्ये शंभुपर्वत-प्रदेशीं महाराष्ट्र देशाधिपति शौर्योदार्यगुणप्रख्यात राजा शंभू ह्मणून अवतरला. त्याराजानें आपुल्या स्वधर्मयुक्त विहितमार्गानें राज्य परिपालन करी. त्यासरिसें शंभूपर्वतावरी श्रीसांबशिव-प्रसादार्थ अनुष्टानहीं करीत आला. त्या अनुष्टानास संतोष पावून श्रीसांबशिवानी त्या शंभूराजास स्वप्नांत प्रत्यक्षहोऊन तुला संतती संपत्ती विशेषेंकडून होईल ह्मणून प्रसाद वाक्याचे अभय दिल्हे. सवेंच कित्येक दिवसाने त्या शंभुराजाचे जठर-

समुद्रीं गुणरत्न यशप्रथम येकोजीराजे संभवले त्या येकोजी-राजानी त्या शंभुपर्वतप्रदेशीं विहितरीतीने राज्यभार करीत असतां त्या सांबशिवानुग्रहें करून येकोजीराजाचे उदरीं शरभ-राजे नामक प्रथम सत्पुत्राचा संभव झाला. ते शरभराज सार्व-कालहीं विभूतिरुद्राक्षालंकृत करून श्रीसोमस्कंदमूर्तिची उपासना-युक्त राज्यपरिपालनकरीत असतां तेच सोमस्कंदमूर्ति स्वप्नांत प्रसन्न होऊन मन्त्रोपदेश केले. त्या मंत्राचे माहात्म्येकरून दक्षण प्रांताचे पादशाहा संतोष पावून विर्दलीपुरास प्रति नाम बिरुल-रही शरभराजास जाहागीर दिल्हे उपरी शरभराजाचे उदरी महासेन ह्मणून राजे जन्मले. त्या महाशेनराजानी पन्नासहजार स्वार स्ताम घेऊनहंबीरपादशाहस युद्धास कुमुक केले. तदनंतरें त्यामहाशेनराजानी परम नीतीकरून राज्यपरिपालन करीत आल्या पुण्य प्रभावेंकरून त्यांस पन्नास पुत्र झाले. त्या पन्नास पुत्रांपैकीं ज्येष्टपुत्र येकशिवराजा ह्मणणार राज्यधर वंशधरहीं झाले. त्या येकशिवराजानी श्रीसांबशिवाची भक्ती विशेष केल्या-मुळें सांबशिव प्रत्यक्षहोऊन या उपरी तुह्मास व तुमचे वंशपरं-परेसहीं माहाराज ह्मणून सकल प्रपंचांतहीं प्रख्यात होईल ह्मणून तेंव्हाच माहाराज बिरुदें समग्र वागवणेस तुह्मी योग्य करितां उत्तम बिरुदें समग्र वागवणें ह्मणून आज्ञापिले. त्या श्रीसांब-शिवाचे आज्ञेवरून माहाराज येकशिवराजानीं स्वतेज इतर राजास जिंतून संपादिली बिरुदें कित्येक व हंबीर पादशाहानी येकशिवराजाचे वडील महाशेन राजानी आपल्यास फार कामा आलेते नव्हतां येकशिवराजेहीं प्रख्यात होऊन बहुत मुलुखेंकडून आपल्यासहीं फार वेळ कुमुक करून स्थापिले. सांप्रत त्यांस

श्रीसांबशिवप्रत्यक्ष होऊन सकल विरुदें वागवणेस आज्ञापिले करितां आपणहीं या येकशिवराजास आपली खांस विरुदें कितेक द्यावी ह्मणून हत्तीची विरुदें कित्येक व घोड्याची कित्येक इतर विरुदें कित्तेक येणे प्रमाणें दिले. तव्हां त्या येकशिवमहाराजानी ते विरुदें समग्र येकवटून अपल्या जवळील उत्तम सामादिक सर्वदा उत्तम काम करीत आल. त्यांस येकेक काम नेमिले त्याचा विस्तार थोडा जाणवितों. जे मुख्यप्रधान पेशवे व फौजदार सरनोबत देवकराचे घराणे व दुसरे फौजदार पोंवांराचे घराणे. त्या त्रिवर्गासही नेमिली कामें आपल्या घोडयास व हत्तीस विरुदें बांधितांनां इतर सामादिक व वरी लिहिलें त्रिवर्ग मुख्यसामादिकांनीहीं बसून विरुदें उचलून पोंवारानीं पेशव्याचे हाती देणे. त्यानी देवकराकडे देणें देवकरानी बांधणे व कित्तेक बांधवणेहीं येणेप्रमाणे चालविल. त्याचरीती तेते वंशस्थ अद्यापि तेंचकाम करीत येतात. याखेरीज दुसरी यांस हत्यार धुणे देवकरानीच धुतली. खांसहत्यारें देवकरानीच आणून माहाराजापासी देणें तदनंतर ते हत्यार पूजितेवेळेस उजव्या बाजूस पोंवार डाव्या बाजूस देवकर मध्ये महाराज पेशव्यासहीं घेऊन बसून पूजाकरिणे. महाराज सिंव्हासनावरी सदरेस बसल्यावेळेसहीं उजवीबाजू डाव्याबाजूस वरि लिहिल्याप्रमाणे पोंवार देवकर पेशवे पुढेंबसणें. येणप्रमाणें आज्ञापून उरली विरुदें व हत्तीवरील नौबतपंजा हत्तीवरील माही मरतब व हत्तीवरील तासविरुदाचे भालावर्ची निशाने वगैरे इत्यादिविरुदें जिलेंबेस व माघिलांगी यावयाच्या यथाक्रमेकरून चालवीत आले. तदनंतरें प्रकृत आपलेचित्तानुरूप कित्तेक विरुदें अंगीकारिले. त्यांत या महा-

राष्ट्र देशास व त्याजातीसहीं मुख्ययान पालखी जाहल्याकरितां त्या पालखीसच लाविलीविरुदें लिहितों. पालखीची तवकडा व कमान देखील हत्तीचे दांताची शिफेद येकरंग त्यास रेशमी कान्हण्या व नवार रेशमी दांडीचे पुढिले बाजूस सिंव्हललाट सोन्याचे दांडीचे माघले बाजूस शार्दुलवदन सोन्याचे पिंजरीचे शेवटासदोनीबाजूस जडित केळीचे फुलाकृती कलश २. पिंजरीचे चारीकोनेस जडीत गोंडे जरीझालरी ४. दोनीबाजूचे कत्तरीवरील दांडीस रुप्याचे खुऱ्याचे जरी दांडयाचें घोंस. दांडीस समग्र जडित खुऱ्याचे येखादें सोन्याचें रुप्याचेंहीं भरजरी गोंडे. पालखींतसमोर अरसा, वठहिं, पालखीयांत दांडीस मोराचा विजणा, रुप्पेरी पिंजरा वरी शिफेद फूल, वासण, दांडीचे पुढिले बाजूस सिंव्हललाटा, वरी फुलाचाहार, धरितागोंडा, जडितखुवा, येखादे सोन्याचाखुवा. भरजरी दांडीस दोनीबाजूस मखमली गलेफ. येणप्रमाण यायेकशिव महाराजानी बिरुदाचे पालखींत स्वारकरूंलागले. याखेरीज हत्ती घोड्याची वगैरे बिरुदें प्रसंगानुसार लिहिली आहेत. तदनंतरें त्या येकशिवराज्याचे उदरीं रामचंद्रराजे जन्मले. रामचंद्रराजानी न्यायेकडून राज्यपरिपालन करीत असतां त्यांचे उदरी भीमराज ह्मणून राजे जन्मले त्या भीमराजानी विहितधर्मेकडून प्रजापालन करीत असतां त्याचे उदरीं दुसरे येकोजीराजे जन्मले. त्या येकोजीराजानी आपले स्वबाहुबलपराक्रमे करून सातारगड आक्रमिले. तदनंतरें पादशाहासी युद्ध प्रसक्तिपडल्यामुळे गडावरीच वासकरून होते. उपरी त्या येकोजीराजाचे उदरी वराहराजे जन्मले. ते वराहराजे परमशूर न्यायेकडून राज्य परिपालन करीत

येण्यांत पंचावन्नहजार स्वारठेऊन पादशाहाशीं युद्ध करून जिंतून ख्याती केले. उपरी त्यांचे उदरी तिसरे येकोजीराजे जन्मले. त्या येकोजीराजाचे उदरी ब्रह्माजीराज जन्मले. त्या ब्रह्माजी-राजाची धर्म पत्नी अनसाउ त्यां उभयां पासून प्रथम शाहजी राजे जन्मले. त्या शाहजी राजाची पट्टस्त्री उमाउ त्या उभया पासून अंबाजीराजे जन्मले. त्या अंबाजीराजाची स्त्री रेणुकाआउ त्या उभयां पासून परसोजीराजे जन्मपावले. त्या परसोजी राजाची स्त्री उमाउ त्या उभयां पासून बाबाजीराजे जन्मपावले. त्या बाबाजीराजाची स्त्री रेखाउ. त्यां उभयां पासून दोघेपुत्र जन्मले. त्या पैकीं ज्येष्ट मालोजीराजे दुसरे विठोजीराजे. दुसरे पुत्र विठोजीराजाची धर्मपत्नी आउ बाई साहेब त्यां पासून जेष्ट-कन्या अंबाबाई त्या उपरी अष्टपुत्र जन्मपावले पैकीं पहिले संभा-जीराजे दुसरे खेलोजीराजे तिसरे मालोजीराजे चौथे परसोजी-राजे पांचवे नागोजीराजे साहवे मनोजीराजे सातवे कंकाजीराजे आठवे त्रिंबकजीराजे हा बाजाजीराजे यांचे दुसरेपुत्र विठोजी-राजाचा वंश. याउपरी यांचा विस्तार पुढें येयील. आतां बाबा-जीराजे यांचे ज्येष्टपुत्र मालोजीराजे यांची ख्याती, त्यामालोजी-राजे यांनी उमाबाईसाहेब यांसी पाणिग्रहण करून घेऊन विहित धर्म करून स्वराज्य परिपालन करीत येते त्यासमयीं निजाम पादशाहा ह्मणणार देवगिरी दुर्गांत राज्यकरीत होता. व इब्राहीम पादशाहाचा लेंक यद्‌ल्‌शाहा ह्मणणार पादशाहा विजय दुर्गांत राज्यकरीत होता. त्या यद्‌ल्‌शाहास प्रतिनाम अल्लीशाहा ह्मणूनहीं प्रख्यात होतें. अवशात् देवगिरी दुर्गाच्या निजाम शाहासहीं व विजयदुर्गाचाराजा यदिल्‌शाहासहीं युद्धप्रसंग पडलें. त्याप्रसक्तींत

बाबाजीराजाचे पुत्र मालोजीराजे परमशूर बहुत युद्धांत जय पावले आहेत हे जाणून मालोजीराजास व त्यांचे भाउ विठोजीराजासहीं देवगिरीदुर्गाचा निजाम पादशहा सहायास बलाविला. त्या उभयता बंधूनी सैन्यासह निजामशहाला सहायहोऊन विजयदुर्गाचा राजा अलीशहाबरोबर युद्धकरून जयपावून निजामपादशहाची संकटे परिहारकरून त्याचे देवगिरीदुर्गाचे राज्य देते त्यास झाले. तो संतोष पावून आपुल्या समग्र राज्यांतहीं चौथायी जहागीर देऊन मालोजीराजे बिठोजीराजे उभयतां बंधूनी आपल्याकडेंच असावे ह्मणून प्रार्थिले. तेणेप्रमाणेंच मालोजीराजानी आपुले स्वराज्य आपले सचिवाचे स्वाधीन करून आपण उभयतां बंधूनी निजामशाहाकडेंच वास्तव्यकेले. तेव्हां मालोजीराजास शाहाशरीफ वेअल्ली कलंदर ह्मणणार एक फकीर सिद्धपुरुष स्नेहित जाहला. त्या शाहशरीफ ह्मणणार फकीराचे ठांयांस मालोजीराजानी जाऊन आपल्यास पुत्रसंतान नाहीं ह्मणून सांगीतले. त्यास त्या फकीरानी कांहीं वेळ ध्यानकरून सवेंच मालोजीराजास पाहून ह्मणाले. जे तुह्मास दोवेपुत्र होताती दोघे महाशूर परम भाग्यवंतही होतील त्यांचावंशहीं विस्तारकडून होईल. त्यांचे वंशी परंपरेंत जाहले पुत्रसमग्रहीं परम भाग्यवंत होऊन असतील. त्यादोघां पुत्रांसहीं अमचे नावें ठेवा आणि आह्मीदेतों त्या वस्तूस मर्यादें कडून ठेवा ह्मणून पांच वस्तू दिल्हे. त्याचा तपशील नागीन ह्मणोन येक तरवार पद्मीन ह्मणोन येक तरवार येकून तरवारा दोनी व अपला लंगोटा एक व कलदरा एक व पंजा १ ऐशे पांच वस्तू दिल्हे उपरी मालोजीराजास प्रथम पुत्र शालीवाहनशके १५३१ साधारणसंवत्सरीं दुसरे

शाह्जीराज जन्मले. तद्नंतर दुसरे पुत्र जन्मले. त्यांस शरफोजी-राजे ह्मणून नाम ठेविले ते दुसरे तद्नंतरें ज्येष्ट पुत्र शाह्जीराजे ५ वर्षांचे वयारूढ झाले तेंव्हां कोल्हापुरचे राजे होते. त्यास व निजामशहापादशहासहीं विकल्प पडून कोल्हापुराचा राजा व पांच वर्षांचे शाह्जीराजाचे वडील मालोजीराजास युत्धास पाठविले. तेव्हां मालोजीराजे निजामशहाचे प्रेषित होऊन आपले स्वसैन्य व पादशाहाचे सैन्यहीं स्वारवार परिवार हत्त्यारासहीत कोल्हापुरच्या राजावरी जावून अभ्दुत युत्ध करून वहुत वार शत्रूस पराजयहीं करून तद्नंतरें सन्मुख युद्धांत वीरस्वर्गपावले. उपरी शाह्जी राजास निजामशाहा पादशहानी या शाह्जीराजे, शरफोजीराजे उभयतांचे वय लहान करितां त्यांचे संरक्षणास्तव त्यांचेचुलते विठोजीराजांकडे निरवून त्यांचे योग्यतानुसार परि-पालन कराविलें. तद्नंतरें शाह्जीराजे यौवनारूढ जाहल्यावरी मोहते रायांची कन्या उमा बाईसाहेबास प्रथम पाणिग्रहण केले. तद्नंतरे निजामशाहाचे अनुमतीने शाह्जीराजे आपले स्वराज्य-पदास शालीवाह्नशके १५४३ दुर्मतीसंवत्सरीं तक्त निशी जाहले. सवेंच यादवराजे ह्मणणार कोणीएक राजे होते. त्यानी प्रार्थनापू-र्वक आपली कन्या जिजाऊस शाह्जीराजास द्वितीय विवाहास लग्नकरून दिल्हे. या शाह्जिराजाचे धाकुटे भावू शरभोजीराजे यानी विश्वासरायांचीकन्या दुर्गाबाईयांसी लग्नकरून घेतले. तद्-नंतरें कितेकदिवसावरी याउभयतांचे चुलते विठोजीराजे देवगतीस पावले. त्यांचे लेंक आटजणहीं निजामशाहा पादशहास अनुसरून होतें. तद्नंतरें कांहींयेक विशेष दिवसांत निजामशाहा पादशहानी आपल्या खालील राजेलोक तमामास बोलाऊन पाठवून सदर केले. त्या सदरेस आल्या उपयुक्त नावनिशा-प्रथम मालोजीराजे

शाहजीराजे शरफोजी राजे हे दोघेभाऊ व यांचे चुलतभाऊ विठोजीराजे यांचे लेंक आठजण व शाहजीराजे यांचे दुसऱ्या स्त्रीचे जानिता यादवराजे ह्मणणार तेहीं येक व त्यांचे पुत्र दत्ताजी-राजे ह्मणणारही व खंडागळे ह्मणणार तेहीं येक थोरसरदार समग्रहीं सदरसाडा जाहल्यावरी बाहेरी येतेवेळेस दाटणपडली त्या दाट-णींत वरी लिहिल्या खंडागळे ह्मणणार सरदाराचा हत्ती मस्तीस येऊन बहुत प्रजांस मारिला. तेंव्हां यादवराजे ह्मणणाराचे लेंक दत्ताजीराजे यानी तरवार घेऊन त्या खंडागळाच्या हत्तीस मारावेंयास गेले. त्या वेळेस विठोजी राजाचे लेंक आठजण भावांपैकीं संबाजीराजे ह्मणणार एक व खेळोजी ह्मणणार येक यादोघानीहीं खंडागळेचे स्नेहास्तव त्या खंडागळाचा हत्ती मारा-वयास आल्या दत्ताजीराजास हत्ती मारणें गरजनाहीं ह्मणून अटकाविले. तेंव्हा दत्ताजीस रागयेऊन बहुत लोकांस जायां केला हत्तीस मारावें ह्मणालियास तुह्मी अटकावणें काय ह्मणून येकास येक चर्चावाढून हातासहात मिळून हानीं जंगीं जाहली. त्यांत विठोजीराजाचे लेंक संभाजीराजाचा हात चालून दत्ता-जीराजाचे डोसके उडालें. तेंव्हा त्या दत्ताजीराजाचे वडील यादवराजे पुढें लांबले होतें. त्यास आपले पुत्र दत्ताजीराजे खंडागळेचे हत्तीस्तव विठोजीराजाचे लेंक संभाजीराजाकडून दैवगतीतें पावले ह्मणावयाचे वर्तमान कळून तसेंच यासंभाजी-राजे खेळोजीराजावरी युद्धास आले. तेंव्हा शाहजी राजानी यादवराजे आपले सासरे जाहलेतरींहीं आपले चुलतभावू संभाजी-राजे व खेळोजीराजे यां उभयतांवरी युद्धास आलेकां म्हणून त्यायुद्धास आपण पुढे होऊन युद्धकेले. तेंव्हां सासरा यादवरा-

याचा हात चालून शाहजीराजे मूर्छागत जाहले. तेव्हां यादवरा-जानी आपले जांवाई शाहाजीराजे मूर्छागत जाहले त्यावरी हतकरीनासें त्यांच्या सैन्यावरी युद्धास प्रवर्तले. त्या युद्धांत विठोजीराजांचे लेंक संभाजीराजे यादवराजा कडून रणास आले. सवेंच शाहजीराजेहीं मूर्छेतून सावध होऊन युद्धास प्रवर्तते समयीं हे वर्तमान येकंदर निजामशाहा बादशाहास कळून यादवराजास पुत्रशोक जाहल्या करितां पराक्रम असेल त्यासमयी युद्धकामानये म्हणून राहतें करून त्यां त्यांस त्यां त्यांचे स्थलास निरोप दिल्हे. यादवराजे स्वस्थलास जावून विमनस्क होऊन होते. येणे प्रमाणे यादवराजे विमनस्क आहेत ह्मणायाचेहीं विमनस्क होण्यास कारणहीं विजयदुर्गांचे राज्यकरणार अह्लीयदल्‌शाहास कळून त्या अह्लीयदल्‌शाहानी याचना केलीजे. देवदुर्गांचे निजामशाहा पादशाहास आह्मास विरोध पडून येकदोनदा युद्धारंभ केल्यांत शेनेसहित आपण भग्न जाहले. त्यास कारण मुख्य शाहाजीराजे व यादवराजे प्रभृति शूर निजामशाहा पादशाहाकडे मिळून आहेत करितां त्या पैकी यादवराजा महाशूर तो प्रस्तुत विमनस्क जाहला आहे करितां त्याला संविधान करून आपलें करून घेऊन निजामशाहाशी युद्धास आरंभ करून जयप्रद व्हावे म्हणून दृढ याचना करून यादव राजासी संविधान करून भेटी गोष्टी जाहल्यांत यादव राजानी सांगीतले जे केवळ तुमच्या अमच्या सैन्ये कडूनच निजामशाहा जिंतलाजाईना कां ह्मणिजे त्याकडे शाहजी राजे प्रभृति कित्येक प्रख्यात शूर आहेत त्यास्तव दिल्लेश्वर जाहगीर पादशाहासी संविधान करून त्याकडील सैन्य आणवून तदनंतरें

निजामशाहासी युद्धास प्रवर्तावे म्हणून सांगीतले. तेंव्हां अल्ली- यदिल्शाहानी म्हणाले जे तुम्ही सांगीतलें ते युक्तच आहे. तत्रापि अमचे वडील इब्राहीमखानास व जाहगीरपादशाहासहीं रिणानुबंध त्या अनुसंधाने करून जाहगीर पादशाहाही अमुची गोष्टी अंगीकार करून आम्हास सहायहीं करितील म्हणून तेणे प्रमाणे संविधानासही आरंभिले. तेव्हां जाहगीरपादशाहा दिल्लेश्वरयानी इब्रायिम्खानाचे स्वस्नेहास्तव अल्ली यदल्शाहास कुमुक पाठविले ते तांत्रमुखी प्रजा सरदार लस्कीरखान् म्हणणार ताम्रमुखी म्हणिजे शुद्ध मोगलयांस कुमुक पाठविल्या कुमुक करूनहीं व यादवराज आपल्या सरदारासमवेत मिळाल्याकरितांहीं त्यागवेंकडून अल्लीयदल्शहानी निजामशाहासी युद्धकरावे ह्मणून त्यांच्या मुलुकातें उपद्रवास आरंभिले. तेव्हां निजामशाहा पादशहासी मिळून होते. ते सरदाराची नावनिशी मालोजीराजाचे पुत्र शाहजीराजे व शाहजीराजाचे भावू शरफोजीराजे विठोजी राजे यांचे लेंक जेष्ट संभाजीराजे वीरस्वर्गस्थितजातां वरकड नावनिशा खेळोजीराजे, व मालेजीराजे, संबाजीराजे, व नागोजीराजे, व परसोजीराजे, व मक्कोजीराजे, त्रयंबकजीराजे, शामवक्र सैन्याचे सरदार, शामवक्र म्हणजे शुद्धहत, सीह्मीर- खान्, मुधाखान्, फलसखा देशाचा अधिपती बल्लाळराजा बेडराचा यजमान सिंव्हराजा विठोजी राजा म्हणणार अन्य येक झराटा, दत्ताजीराजा म्हणणार अन्य येक झराटा, नागोजी- राजा ह्मणणार अन्ययेक झराटा, नरसिंव्हराजे म्हणणार अन्ययेक झराटे जगदेवराजाचे लेंक सुंदरराजेमराठे तुरुष्कंद- खनी सरदार सारतखान् व याकूतखान् व पनसूरखान, व

सूरूपखान, व जोहरखान, व फत्तेखान, व त्यांचेलेंक अहमदखान प्रमुख देखील, आकबराचे सेनापती निजामशाहा पादशहाचे या इतके सरदार मातबर राजेलोक देखील आपल्या सैन्यासमवेत अपल्यासी मिळाले आहेत करितां, निजाम शाहा पादशाहा अल्ली यदल्शाहास तृणप्राय मानीतहोते. अल्लीयदल्शाहाने यादवराजाचे सैन्यासहित झाल्याकुमुकें व कांहीं व दिल्लेश्वरानी मोगलाची कुमुकें पाठविल्याकडूनहीं निजामशाहासीं युद्धास प्रवर्तलें करितां त्याकडील सरदाराची नावनिशा प्रथम यादवरायाकडील सरदार राजेलोक वगैरे ह्मराठे तुरूक देखील नावनिशा–जलाखान व खर्जीरखान व खरमुल्लाखान् व सुजानखान् व जाहनखान् व शिकंदरखान् व खलेलखान व हिसामदखान सदरल्हा तुरूक ८ जण यादवराजाचे लेंकाच्या नावनिशा–उदारराम, व विश्वनाथ, व अचल, व बाहदार, व दादाजी, व राघव व जसवन्त हे सातहीं यादवराजाचे लेंक. हे यादवराजाकडील सरदार समवेत यादवराजाहीं दिल्हेश्वरानीपाठविल्या मोगलाचा सरदार लष्करखान अल्लीयदल्शाहाकडील सरदार ह्मराठे तुरूक वगैरे देखील मुस्तपखान, काहमदखान् दिलावरखान, याकूतखान, अवरखान्, मुशेखान, फरीदखान्, सजीखान, जाहेरखान, अंकुशखान, येकूनदहा. या खेरीज अल्लीयदल्शहाचे वडील इभरायीम् यांचे आप्तसोझिरे सरदार रुस्तुंखान् प्रभृति आणि धुंडीराव ब्राह्मण सरदार, मराठे सरदार घांटके प्रभृति शेनापती मुल्लामअहमदखान या इतुक्या सरदारानिशी सेनापती मुल्लाम अहंमदखानास पुढें करून निजामशाहासी युद्धास प्रवर्तले. वरी लिहिल्या प्रमाणे निजामशाहानीं

आपले तरफेचें सैन्य व सरदार राजेलोक इत्यादिकांसीसह अंबरखान शेनापतीस पुढें करून अल्लीयदल्शहासीं युद्धकेलें. त्या युद्धांत मालोजीराजाचे लेक शाहजीराजानी रणशूर होऊन पूर्वी देवासुर युद्धापरी युद्धकरून दिल्हेश्वर जाहगीरपादशाहानी अल्ली-यदलशहास कुमुकास पाठविल्या मोगलाच्या सैन्यास तमामास पराजय देऊन पळविलें. त्या बरोबरी मिळून युद्धकेलें. ते यादव राजाची फौजेसहीं पराजय देऊन पळविलें. तसेंच त्या शाहजी-राजाचे भावू शरफोजीराजानी अल्लीयदिल्शाहाचें फौजेशीं निर्वाण युद्ध करून त्या फौजेसहीत सरदारासहीं पराजय देउन अल्लीयदलशाहाची फौज तमाम पळविली. पराजयपावून सैन्य समग्र अल्लीयदल्शाहा आदि करून समग्रहीं कित्येक दूर पळून गेल्यावरी त्या अल्लीयदलशाहा कडील सरदारापैकीं जोहरखान म्हणणार सरदारानें समग्रास ईरेस घालून यादवराजे व मोगलांचे सरदार सर्वत्रांसहीं परतून घेऊन पुन्हा युद्धास आले. तेंव्हां मालोजीराजाचे द्वितीय पुत्र शरफोजीराजानीं युद्धभार घेऊन शत्रु सैन्याभिमुख होऊन बहुतवेळ बहुताप्रकारें बहुत युद्धांची अंगेकरून बहुतसैन्य शत्रूचेरंगास आणून आपणहीं वीरस्वर्ग-पावले. सवेंच त्यांचेवडील भावू शाहजीराजानीं आपले चुलत भावू विठोजीराजाचे द्वितीय पुत्र खेळोजीराजास बरोबर घेऊन बहुत पराक्रमेंकडून युद्ध करून शत्रूस ताप देऊन परतून युद्धास आल्या जोहरखानासमवेत कितेक सरदारांसहीं मारून कितेक सरदारांस जीतधरून काराग्रहीं प्रवेश करवून निर्वाणयुद्ध-केल्यांत अल्लीयदिलशाहानीस्थिरून शाहजीराजासी युद्ध करव-नासें आलें. ते व पडाउ सांपळेसरदार जाता उरलेते सरदार व

यादवराजे प्रभृति सहित छिन्नाभिन्नहोऊन पळोनगेले. तदनंतर शाहजीराजे रण स्वाधीन जाहल्यानंतरें अंबरशेनापतीस पुढें करून निजामशाहा पादशहापासी येऊन खुरनिशी केले. तेंव्हां निजाम शाहानि शाहजीराजास विशेष मर्यादा विशेष बहुमान विशेष आदर केले. तदनंतरें विठोजीराजाचे लेंक खेळोजी-राजानी शाहजीराजास झाला आदरमान आपल्यासहीं व्हावा म्हणायाची अपेक्षा धरून शेनापती अंबरखानास केवळ अनुसरलें. तेंव्हां त्याशेनापती अंबरखानाचे चित्तीं आपण सेनापती होऊन असूनहीं शाहजीराजानी युद्धांत जय संपादिल्याकरितां पादश-हाचे समक्षेमांत आपल्या क्षेमास शतगुणें कडून अधीक मानाई झालेंकी ह्मणावेयाचा मत्सर वाढत होता करितां शाहजीराजाहून खेळोजीराजासी विशेष दिसूनद्यावा ह्मणावयाचा दुराग्रहेंकडून निजामशाहापासी खेळोजीराजाची योग्यता व शौर्य प्रस्तुत संभवल्या युद्धांत जयजाहला तोहीं खेळोजी-राजा मुळेंच म्हणून असें येकंदर जाणवून निजा-मशाहाकडून विठोजी राजाचे पुत्र खेळोजीराजास विशेष मर्यादा करविले. ते शाहाजीराजानी ऐकून विमनस्क होऊन सर्वेच त्या संगतीचा त्यागकरून आपले स्वस्थल सातारगडास पावले. कित्तेक दिवसानंतर शाहजीराजे निजामशाहाकडून विमनस्क होऊन आपले स्वस्थलास पावला विध समग्र अल्लीयदलशाहास कळून शाहाजीराजा सारिख्यास आपले करावें ह्मणावयाचे अपेक्षेने तदनुसार संविधान केलें. त्या संविधानाची बोली प्रशस्त भासल्या करितां शाहजीराजानी अंगीकार करून अल्लीयदिल-शाहाकडे जावून भेटी व बोलणे झाल्यानंतर आपलें सैन्य व

अल्लीयदिल्शाहाचे सैन्यहीं येकवटून येथून निजामशाहावरी मोडिम् केले. तेव्हां पेसजी अल्लीयदल्शहासी दिल्लेश्वर जाहगीर पादशाहानी मोगलाईचा कुमुक पाठविलेहोते तेहीं व यादवराजेहीं यादोनी फौजाहीं अगावूच निजामशाहाशीं मिळून शाहजीराजानी युद्धकेल्यांत पराजय पावून फरारी जाहले. तेहीं व यादवराजे मोगलाचे इलाखेंत राहून गेले. प्रस्तुत शाहजीराजानी अल्लीयदल्-शाहाचे सैन्य मात्र आपल्या सैन्याबरोबरी घेऊन निजामशाहावरी युद्धास जाऊन युद्धकेल्याठायीं निजामशाहाचे सैन्य व सेनापती अंबरखान देखिल पराजय पावून वाताहत झाले. शाहजीराजे जय पावून अल्लीयदिल्शाहाकडे आले. तेंव्हा शाहामजकूरानी फार संतोष पावून शाहजीराजास आपले अर्ध राज्य जाहागीर दिल्हे. तदनंतरे शाहाजी राजे अल्लीयदलशाहाचे स्वाधीनेंत न्यायता होते. ते मुदेखान् प्रभृतीस येकंदर जिंतून स्ववशास आणून पश्चिम प्रांत केरळदेश आदिकरून अनेक देशाचे देशाधिपती समग्र अल्लीयदल्शाहास तोफा देइजेसे करून अल्लीयदिलशाहाच्या खजान्यास बहुत द्रव्य जमा होईजेसे केलें. तदनंतरे शाहजीराजे विजयदुर्ग म्हणावयाचे विजा-पुरांत असतेदिवसांतच त्यांची दुसरी स्त्री जिजाईचे उदरीं शाली-वाहन शकें १५४७ अक्षय संवत्सर प्रथम पुत्र संभाजीराजे जन्मले. त्यामागूनही क्रमेंकरून चौघे पुत्र जाहले. परंतु वर्धमान दशेस पावले नाहींत. ऐसें असतां देवदुर्गचे राज्य करणार निजामशाहाचा सैनापती शाहजीराजासी मत्सर केला. तो अंबर-खान देवगतीस पावला. येथें विजापुरांत अल्लीयदील्शाहाचा बाप इब्राईमखान तोहीं देवगतसि पावला. तेंव्हां दिल्लेश्वरऐसा जाह-

गीर पादशहानें पेसजी आपण दक्षिण प्रांतांत देवदुर्गाचा निजां-शाहासहीं व विजापुरच्या अल्लीयदील्शाहासहीं लढाईची प्रसक्ती पडली होती तेंव्हां अल्लीयदिल्शाहास कुमुक मोंगलाईची फौज देऊन लष्करखानास पाठविला. तेंव्हां निजामशाहानें शाहाजी-राजाच्या बलेंकडून असुचे मोंगलाईच्या फौजेस मारून कांहीं अपमान केला. आतां त्या निजामशाहाकडे शाहजीराजेहीं नाहींत व यादवराजाहीं अगोदरीच निघून गेला. त्याचा सेनापती अंबरखान देवगतीस पावल्याकरीतां त्याचें बलहीं उणें पडलें. दुसरे त्या निजामशाहाची चर्याहीं नीटनाहीं ऐशा समयांत त्याजवरी राजकारण केलीया स्वाधीन होईल म्हणून तजवीज करून निजामशाहावरी युद्धाससैन्य देऊन दर्याखान म्हणणार सर्दारास पाठविले. हेवर्तमान निजामशाहास कळून निजाम-शाहानी आम्हाकडील शाहजीराजे व यादवराजे उभयतांहीं आम्हांकडून गेल्याकरितांम्हणे पराजयहीं आला; आतांहीं दर्या-खानानें चालीकेली आहे, आतां सर्वप्रयत्नकडून शाहजीराजे व यादवराजे उभयतांसहीं बलाऊन घ्यावे म्हणून दृढयोचना करून उभयतांसहीं अंतरंगें कडून संधिवान पाठविले. त्यावरून यादवराजे मोगलाचे इलाखेंत होते तेहीं व शाहजीराजें विजापु-रांत होते तेहीं उभयतां निजामशाहाचा मुलुक् देवगिरी समीप धारागिरी म्हणावयाचे स्थलास येऊन पावले. त्या धारागिरीं समीप शिवनेदीगड म्हणून येक स्थल, त्या शिवनेदीगडचा यजमान विश्वासराव याचा वंशांत जन्मलते विजयराजा म्हणणार त्या शिवनेदीगडचें राज्य करीत होता. त्या विजयराजानी आपुली कन्या जयंती बाई म्हणणारीस शाहजी राजाचे ज्येष्ठ पुत्र संभा-

जीरानास देतों म्हणून सांगून पाठविलें. तेव्हां शाहजीराजांनी त्यांमुलीस आपुले पुत्र संभाजीराजासहीं घटितपाहून तदनंतरें विजापुरांतून आपल्या संसारासहीं बलावून पाठवून शिवनेरी-गडास जावून संभाजीराजाची लग्न सिद्धी केले. तेंव्हां निजाम-शहानी शाहजी राजास मोगलाची फौज घेऊन येणार दर्याखाना-वरी आपल्या स्तोमकडून जा म्हणून निरोपून यादव राजास आपल्या भेटीस या म्हणून बलावून पाठविले. तेंव्हां शाहजी-राजाची दुसरी स्त्री जीजाई बाईसाहेब पूर्ण गर्भहोते. त्यांस व कित्तेक सैन्यहीं त्यांचे संरक्षणास शिवनेरी गडांतच ठेऊन बरकड सैन्यानिशी आपण दर्याखानाचे मोकाविलेस गेले. गेल्यांठायीं दर्याखानासीं युद्ध करून मोगलाची फौजा समवेत दर्याखानास पळवून जयपावून शाहजीराजे परतून शिवनेरी गडास येतोइतु-क्यांत जीजाईसाहेब यांस पूर्णगर्भहोता तो शालीवानशके १५५१ त्यांस इंग्रजी वर्ष सन १६९८ इसवी प्रमोदूत संवत्सरीं प्रसव होऊन पुत्रोत्सव जाहला. सर्वेच शाहजी साहेब यांचे पोटीं पुत्रसंतान जाहले. त्या पुत्रास येकोजीराजे म्हणून नाव ठेविले. हे येकोजीराजे वंशांत चार येकोजीराजे जन्मले. ते शालीवाहन शके १५५२ प्रजोपत्ती संवत्सर पेसजी शाहजी राजानी निजामशाहाचे सहायास्तव शिवनेरी गडांत आपल्र संसार ठेऊन मोगलाचा सरदार दर्याखानावरी जाऊन लढाई करून त्या दर्याखानास पळवून आले होते कीं तो दर्याखान शाहजीराजाकडून पराजय पावून माघारला. तो पलीकडे न जातां तापीनदी तीरींच आपल्या फौजेनिशी राहिला होता. त्यातें या निजामशाहाचीं अव्यवस्थ स्थितीं व

यादवराजे स्वर्गस्थ जाहलें तो विध शाहजीराजे निश्चयेकडून विमनस्क होऊन स्वस्थलास जाऊन पावलें ते ऐसें हे समग्र कळून घेतल्यावरी आतां निजामशहाचें राज्य स्वाधीन करूये म्हणावयाचें दृढबुद्धीनें निजामशाहावरी चाली करून आला. त्यादिवसांत निजामशाहा देवगिरीदुर्गसोडून धारागिरी दुर्गांत होते. निजामशाहाकडील यारीतीचें वर्तमान यकेंदर अलीयीदिल्शाहास कळून याउपरी निजामशहाची दौलत राहणार नाहीं. तो मारलातरी पडावुतरी जाईल परंतु धारागिरीचाकिल्ला फार मजबूत तैसाकिल्लां दर्याखानाचे हातास लागल्याने तो असल्यास नित्यनूत शल्य होईल यास्तव तो धारागिरीचा किल्ला आपल्या स्वाधीन घ्यावाह्मणून अल्लीयदिल्शाहा अपल्या फौजेनिशीं चालेकरून धारागिरीवरी आले. ही वातमी दिल्लीस पावली तेव्हां दिल्लीचे तक्त जाहंगीर वादशाहास होते त्यानी देवगतीस पावून त्यांचे वलदायक अलंगिरी वादशाहा ज्यास प्रतिनाम अवरंगजव ह्मणूनहीं ते अवरंगजव निजामशाहानी पादशाहा आपली करावी ह्मणून सर्वत्र निघून आले. हे वातमी समग्र शान्तजीराजास पावली. त्यानी हे कोणत्यास जातें पाहूं ह्मणून आपल्या स्थलींच राहिले. तेव्हां अवरंगजेवानी आपल्या वडिलांकडून प्रेषितहोऊन आला ऐसा दर्याखानासहित धारागिरीच्या किल्यावरी येक्यावाजूस मोरचे देऊन युद्धकेले. तैसेंची एक्यावाजूस अल्लीयदिल्शाहानी मोरचे देऊन युद्धकेले. त्यांत निजामशाहाचा निर्वाह नाहींसा दौलत समग्र बुडून जाऊन आपणहीं औरंगजेबास स्वाधीन होऊन गेला. सवेंच त्या अवरंगजवानी अल्लीयदिल्शाहाशी युद्धकरून पळवून आपण देवगिरी दुर्गांत

स्थाई होऊन राज्यपरिपालन करूंलागले. तेंव्हां सातारगडांत हातेते शाहजीराजे यानी केली तजवीज जंवरी निजामशाहा अपल्या दौलतेनिशी होते तंवरी अल्लीयदिल्शहा दिल्हेश्वर ऐसा औरंगजवासी मिळून होते. प्रस्तुत धारागिरीदुर्गानिमित्त अल्लीयदिल्शाहास औरंगजवासी विरोध प्राप्त झाल्या करितां अवरंगजवं आपल्या फौजेनिशीमात्र राहिले. या उपरी अल्लीयदिल्शाहाची अवरंगजवाची मिळणिहोणेनाहीं करितां अपल्यास पेसजी निजामशाहाने जाहगीर दिल्ही तो देश आतां आपण साधूये ह्मणून निश्चय करून आपुल्या जाहगीरच्या देशाचें व्याज करून देवगिरीदुर्ग राज्याखालील ऐशी दुर्गेहीं शाहजीराजानी साधून आपुले केले. तेव्हां शाहजीराजाची दौलतेची व शौर्यचेहीं अधिक्यता पाहून इतर राजे व सरदार शाहण्णौकुलाचे ह्मराठे होते ते समग्र शाहाजीराजासी मिळालें. त्या शाहण्णौ कुलाचा विस्तार थोडा जाणवितो. जो छत्रियवंश सूर्यांपासूनहीं चंद्रापासूनहीं ब्रह्मदेवापासूनहीं वृद्धीतें पावला म्हणून भारत, भागवत, हरिवंश, रामायण ही ग्रंथांत विस्तारें सांगीतलें. त्यांत सकल वंशासहीं मुख्य मूल ब्रह्मदेवापासून अलीकडे चंद्र सूर्य हे समग्र कारण जाहले. तत्रापि ब्रंह्मवंश व सूर्यवंश व चंद्रवंशाचे राजे येकास येक मिळणीही आहेकारितां, मुख्य ब्रह्मवंशांत मरीच त्यापासून कश्यप त्यापासून सूर्यनारायण त्यापासून वैवस्वत मनू त्यापासून उत्तानपादराजाचे संततींत दांभीकराजा त्याचे सहा लेंक त्यापासून राजवंश झाला आहे. तैसेंच सूर्यवंशांत रामचंद्राचे लेंक कुशलवापासून वंश विस्तारला आहे. तैसेंच चंद्र वंशांत चंद्राचा लेंक बुध त्याचा लेंक आयु त्याचालेंक नहुष

याचालेंक ययाति त्यापासून पुरूराजा त्यापासून राजवंश विस्तारला आहे. त्या त्रिवंशापासून विस्तारिली क्षत्रियकुलें शाण्णौची नावनिशी "भोंसले, घोरपडे, लिंबालकर, जाप्त्याप, नळवंदे, किकाडो, शदे, साखत, निकवाकड, फडके, माने, इद्ल्कर, भिसले, मोहिते, शिरके, फडतरे, काळे, पुंवार, होलकर, वणगे, रणनवरे, अटाले, पाहतसे, करजादाळे, पोलवा, फडसाळ, खेडगळे, बहुगुण, मोरे, सावत, सूर्यवंशी, सोमवंशी, यादव, मस्तके, लोखडे, शिंगाडे, दळवी, घांटके, सनगर, गायकवाड, दवकर, जाधव, सोनवणे, लांडर, उदारे, पिंसाळ, विरज, राय, जाहे, भाडलकर, युजाठे, शिशोंग, शिरसाठे, भानदुर्गे, कांडे, कराडे, गाळिंगरूड, गावाडे, दुमाल, रणपिशका, पुशे, मठले, ठोके, गुजर, खडटोन, कुराहे, शलके, शिलार, गाडे, काटकर, उहडोक, वानविरे, वितरे, वाघमारे, वाघचवरे, वाघ, कल्पाडे, शितोले, शिकरे, वावर, इगवळे, नारदिवे, बोधळे, बरूगर, इंसाफ, आहारकर, अवोरे, दुनमोताटे, तगठ, लगड, कल्याण, करटोंबर, शंकर, बालके, येणेप्रमाणे तमाम मराठे सरदार शाहजीराजासी मिळाले." तेणेकडून शाहजीराजाची दौलत अधिक वाहडली. हे वर्तमान दिल्हेश्वरास पावून त्यास केली तजवीज येणेप्रमाणे होणेस मुख्य कारण अल्लीयदिल्शाहास आह्मी पळविल्या करितां जाहले. यास्तव आतां अल्लीयादिल्शाहा अह्मी येकमत होऊन शाहजीराजास उणें करावें ह्मणून दिल्लेश्वरऐसे अवरंगजेबानी तजवीज करून अल्लीयदलशास संविधान करून येकहोवून उभयतांहीं शाहजी राजासीं युद्ध योजून भीवरातीरी येऊन उतरले. तेव्हां,

शाहजी राजानी, तमाम यवनास मारून निर्नाम करितों ह्मणून तीनवर्षे युद्ध केलें. तेव्हां शाहजीराजाचे आराध्य दैवत स्वप्नांत येऊन तुजकडून यवनाचा नाश होतनाही ते कारण पुढे कित्तेक दिवसा नंतर तुझे लेंकाकडून होणार करितां अतां यवनाशीं संधी करून घेणे ह्मणऊन आज्ञापिले. त्याईश्वर वचनाचा अंगी-कार करून शाहजीराजानीं नूतन निजामशाहाचे मुल्क आपण बांधिला तो समग्रदिल्लेश्वर अवरंगजब व विजापुरचे अल्लीयदल्-शाहा उभयतास वांटूनदेऊन सोडून आपण आपल्या स्वराज्य सातारगड नगरांतच राहिले उपरी कित्येक दिवसानंतरें अवरंग-जेबास व अल्लीयदिल्शाहासहीं विरोध पडला. तेंव्हां अल्लीयदि-ल्शहानी शाहजीराजे आपले वडील इभराईमखानाचे स्नेहित आणि शूरहीं जाहल्या करितां आतांहीं त्याचास्नेह राखावा ह्मणून शाहजीराजास बलावून पाठवून बोलून आपल्याकडील सरदार रणदुल्लाखान् ह्मणणारास बरोबरी देऊन दक्षिण प्रांतचे राज्य वगैरे अवरंगजबास तोफा देणार समग्रास स्वाधीन करिणे ह्मणून पाठविले. शाहजीराजे तेणेप्रमाणे निघून दक्षिण प्रांतचे राजेलोकांस जिंतले नावनिशा—येल्लीजपूरचाराजा वीरभद्र, कोंगदेशाचाराजा कोंगनायक, कावेरीपट्टणाचाराजा जगदेव, श्रीरंग पट्टणाचाराजा कंठीरव, तंजापुरचा विजयराघवराजा, चंदीचाराजा वेंकठनायक, मधुरेचाराजा तिरुमल नायक, वालीगुंडापुरचाराजा अरिकाल वेंकटनाईक, विधानगरचाराजा रंगशायीनायक, ईसकूटपुरचाराजा तन्नोगोडनायक, वरकड पाळे-पट्टचे राजे कित्तेक याइतुक्या राजांसहीं जिंतून करभार यापासून घेतला. तो समग्र अल्लीयदिल्शाहास पाठविलें. तेणेकडून शहाम-

जकूर फार संतुष्ट होऊन नूतन बेंगळूरचे राज्य आपण स्थापिले-होते ते पांनसुपारीस शाहजीराजास जाहगीर दिल्हे. शाहजी राजानी बेंगळूरास येऊन पाहतेवेळेस किल्ला मजबूत स्थळहीं वासयोग्यसे भासल्याकरितां सातारांतून संसार तमामास बला-वून पाठवून घेऊन आपण बेंगळूरींच वास्तव्य करून शिवाजी-राजे व येकोजीराजे उभयतांस सकल विद्याभ्यास करविले. तेव्हां शिवाजीराजे यांसी बारावर्षाचे वय झाले. शूरहीं जाहले. त्यास-मयीं शाहजीराजास स्वप्नांत श्रीसांबशिवानी येऊन शिवाजीराजास येथे ठेऊन घेऊ नका याकडून उदंड कार्य होणार आहे त्याकारितां यास सातार पुणे प्रांतास पाठवूनद्या ह्मणवून आज्ञापिले. तेव्हां शाहजीराजानी जेष्ठ भार्येपासून जाहली संतती येकोजीराज जाहले करीतां वयानी धाकुटे झालेतरी यानास हेच वडील ह्मणून आपलें युवराज्यपदं व बेंगळूर तक्तहीं शके १५६२ विषु संवत्सरी देऊन आपली विरुदें समग्रहीं येकोजीराजास देऊन आपले कुलदैवतहीं येकोजीराजास देऊन शिवाजीराजास सातार पुने प्रांताचे राज्यास शके १५६२ विषु संवत्सरीं तक्तबांधून पाठविले. तदनंतरें शिवाजीराजे सातारगडास पावून अजूबाजूच गड किल्ले दुर्गें कित्येक बाछाई मुलुकूचे बांधून राज्य करूं लागले. शाहाजीराजे बेंगळूरीच होते. त्यांस अल्लीय-दिल्शाहानी दोनतीनदा बलावून पाठविले. त्यास शाहजीराजे निराकारण करूंलागलेशेच होते त्यावरून अल्लीयदल्शाहास शाह-जीराजे बलाविलीयां येत नाहींत; त्यांचे लेंक शूरहोऊन बाछाई मुलुक बांधीत बसले आहेत. पहिलेपासूनच शाह्जीराजे शूर, आतां त्यांचे पुत्रहीं शूरच जाहल्याकारितां शाहजीराजे चढूनगेले

आहेत म्हणावयाच्या वैषम्याने कपटेंकडून शाहजीराजास धरून कैद करावे म्हणावयाची योजना करून मुस्तफखान नाम सरदार मोटा कपटज्ञ त्याला पाठविणेचा निश्चय करून त्या बरोबर दिलावरखान् फरीदखान् हैवती राजाचालेंक वल्लाळराजा मसूदखान्,अज्जमखान,सजारखान्,रावघराजे ह्मराठे,यादुहखान, बाजीराजे ह्मराठे, अंबरखान, वेदाजीभास्कर ब्राह्मण, जोहरखान् कण्णरचा प्रतिनाम कन्नोळ यासरदारास बरोबरी देऊन हरउपाय कडून शाहजीराजास जीत धरून अणावे म्हणून सांगून मुस्तब खानास बेंगळूर प्रांतास पाठविलें. तो मस्तबखान् बेंगळूर प्रांतास येऊन शाहजीराजास सांगून पाठविलाजे अल्लीयदिल्शाहा बाद-शाहा कडून अन्यत्र कार्यास्तव आाज्ञापितहोऊन मी आलों आहे. त्यास तुम्हांसी भेटून तजवीज करून मग कशास प्रवर्तणेंस निरोपिले आहेत करितां अगत्य भेटीसयावे बोलणे आहे म्हणून सांगून पाठविला. तेंव्हां मुस्तफखानाची कपट योचना शाहजीराजास जाणवल्ली तरीहीं आम्ही वाछायतीचा मर्यादेस उणें कां करावे याच्या कपटानें काय होणें आहे, पाहूनघेऊं म्हणून येकोजीराजे यास अधिपत्य समग्रही दिल्लेहोतें. परंतु, त्यांचें वय लहानझाल्या-करितां यांचे व दूर्गीचेंहीं संरक्षणास ज्येष्टपत्र संभाजीराजास ठेऊन आपण समागम घेतले सरदार खंडोजी म्हणून मानामा-नाजी म्हणून, तानाजी म्हणून वंधूजी, भांडवलकर, दशदीत म्हणून, मेघजित म्हणून, हे सातहीं शूर व आप्त जाहल्याकारित यांस घेऊन मुस्तबखानाचे भेटीस गेले. तेव्हां कित्येक अपशकुनहीं जाहले. परंतु त्याची परवां करीनासें जाऊन पावले. तेव्हां मुस्तबूखानाने फार मर्यादेने भेठी घेऊन उद्दंड

उपचार करून आणखी अपल्यास तजवीज करिणे आहे करितां दाहा पंधरा दिवसाचे कामास आपण येथेंच उतरावें म्हणाले. येणेप्रमाणेच शाहाजीराजानी या समीपच स्थलांत आपले डेरे देऊन उतरले. मुस्तभखानानें शाहजीराजास पातेरा होईजेसे स्नेह नित्य नूतन वाहडवीत आला. परंतु राजे यास विश्वासले नाहीत. बाहेरंगास आपलें कपट राजास कळलें नाहीं म्हणून मुस्तपखानास भासावें यानुसार होते. तेव्हांहीं राजाचे डेरांत अपशकुन चिन्हेंच उदंड दिसूं आली. त्यावरून ते स्थल त्यागून राजानी आपल्यादुर्गांत येऊन पावले. दैवप्राबल्यास्तव येथेंच राहिले तेव्हां मुस्तबखानानें येकेदिवशी रात्री आपल्याबरोबरी आल्या सरदारास शाहजीराजाचा डेरा घेरून घेणेस निरोपून आपणहीं त्यांचा पाठीराखा होवून शाहजीराजास ही सूचना कळली नव्हती करितां आपल्या सरदारानिशी डेरांत सुख करीत होते. येकायेकी अर्धरात्रीं डेऱ्यास सर्दारलोकानी येऊन घेरून घेतले वर्तमान राजाकडील सर्दारानी राजास उठऊन सांगीतले. तेव्हां राजे हुशार होऊन घोड्यावरी स्वारहोऊन आपले सर्दारानिशी युद्धाभिमुख होऊन युद्ध केलें. तेव्हां बहुत लोकांस जायांकरून फारवेळ युद्ध केलें. शेवट खानमजकूराकडील सर्दार बाजीरायांसी युद्ध करीतांना बाजीरायांचाहात चालून शहाजीराजे जखमीहोऊन घोड्याखाले मूर्छागत जाहले. सर्वेची बाजीराजे व मुस्तबखानही शाहजी राजाजवळ येऊन राजास अनेक उपचाराने मूर्छा सावध करून जखमहीं बांधून राजास अंबारींत बसवून विजापूरास अल्लीयदिलशहाकडे पाठविलें शके १५७०. शाहजीराजाचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे बेंगळूरीं होते. त्यांस मुस्तफखानानें केलें कृत्रिम व

शाहजीराजास विजापुरास पाठविले वर्तमान साद्यंत कळून संभाजी राजे मुस्तफ्खानासी युद्धास तयार झाले. इतक्यांत मुस्तफ्खानाने वेंगळूर किल्ला साधावयाचे तात्पर्येंकडून युद्धास आला. उभयतांस युद्धलागले. हे वर्तमान समग्रहीं शीवाजीराजास कळून त्यानी शेना सन्नद्ध करून अल्लीयदिल्शाहावरी चाले करिणेस शिद्ध जाहले. या दोठांयींचे वर्तमान अल्लीयदिल्शाहास कळून अल्लीयदिल्शाहाने बेडराचा यजमान बल्लाळ, फत्तेखान, मुझेखान, या तीघे सरदारांस युद्धसन्नाह, व सेनाहीं देऊन शिवाजीराजानी पादशाहाहीं गड किल्ले बांधिले. तेसमग्र सोडून शिवाजीराजे आहेत ते स्थल पुरंदरगडास पाऊन शिवाजीराजास हस्तगत करिणे ह्मणवून निरोपून पाठविले. उपरी त्या त्रिवर्ग सर्दारानींहीं शिरोवल ह्मणावयाचागड शिवाजीराजानी आक्रमिला होता तो घेऊन तेथें बेडराचा यजमान बल्लाळास ठेऊन, फत्तेखान्, मुसेखान दोघेहीं शिवाजीराजे होते त्या पुरंदर गडास वेढा दिल्हे. तेंव्हां शिवाजीराजानी आपले शेनापती भीम ह्मणणारास वलावून फार रागाभरून याक्षणीं तुह्मी जावून शिरोवलाचा किल्लाघेवून ठाणे ठेवून येणे ह्मणवून निरोपून अपण फत्तेखान हुशेखानासीं युद्धास सन्नद्ध जाहले. भीमशेनापती जावून शिरोवलाचा किल्यास वेढून चहूंकडे मोर्चे देवन तोफखाना नवीवाणाचा मार केले. तेंव्हां बल्लाळाकडील सैनीक समग्र डोसकें दाखविनासें किल्यांतच दडाले. भीमसेना-पतीनी चहूंकडून किल्ला पाडून हल्ला करून आंतशिरून खत्तल करिण्यांत बल्लाळासहीं मारून टाकून किल्ला स्वाधीनकरून घेवून आंत आपलें ठाणें वसवून आपण निघून शिवाजीराजाकडे आले.

त्यानी पावत्या अगोदरी फत्तेखान, मुसखान, उभयतानी फौज तयार करून येवून पुरंदर गडावरी हल्लाकरून फौजचंद्रन गेले. तेंव्हां शिवाजीराजानी वरील किल्यांतून जबर मारकरून कित्तेक फौजेकडें लोट करून कित्तेकांस तोफाने व भांड्याने व बचीने व तरवाराने मारून व शीशें तावून ओतून ऐसा जबर पार करून हल्ला परतून सोडविले. तदनंतरें दुसराकित्ता फते-खान हुशेखान अपल्या फौजेनिशी संधीपाहून येकायेकी पुरंदर-गड तमाम चढून जावून किल्याचा दरवाज्यास जावून लागले. तेव्हां शिवाजीराजे अपल्या जवळील थोंडे लोकानिशी बाहेरी निघून अपल्या अंगेकडून महायुद्ध करून फौज तमाम मारून काहडून आल्या दोघे सरदारां पैकी हुशेखानासही मारूनटाकिलें. फत्तेखान पळून गेला. त्या बरोबरी त्याची फौजहीं गेली. त्या उपरी शिवाजीराजे बाहेर निघून सेनासन्नद्ध करून अल्लीयदल्-शाहावरी जाणेस सिद्ध जाहले. इतक्यांत शिरोबल दुर्ग साधून भीमशेनापतीहीं येवून पावले. ऐसे असतां चित्रकल्लदुर्गाचे राज्यकरणार विच्चकत्तीभरमा म्हणणार मोटाशूर त्याची शेना समीप राहावयाचें स्वार उजव्याबाजूस तीनी हजारस्वार त्याचे तरवारीस मेण सेन्याचे डाव्याबाजूस तीनहजार स्वार—त्याचे तरवारास मेण रुप्याचे त्याखेरीज मार्गे पुढील जिलेबचे वेगलेच याखेरीज चित्रकल्लदुर्गाचे प्यादे फार जबरदस्त तैसे प्यादेहीं त्याकडें फार. या सैन्हानिशी त्याने सर्वदा अल्लीयदिल्शाहाचा मुलूक व विजापुरची पेट देखील मारुन लुटून घेवून जाणे ऐसें बहुतदा करीत आला. तो त्या कित्त्यासहीं पहिल्या प्रमाणेंच जावून विजापुरची पेट लुटून गेला. तेंव्हां अल्लीयदिल्शहानी तजवीजकेलीजे दक्षिणेकडे वेंगळूरास मुस्तबखानास पाटविलचे

जे करितात्ती परंतु संभाजीराजे स्ववशास यावयाचे दिसतनाहीं. चित्रकल्लदुर्गाचा भरमा विजापुराची पेट देखील मारून लुटून घेऊन जातो. पुनेप्रांतास मुसेखान व फत्तेखानास पाठविल्यापैकीं शिवाजीराजानी हुसेखानास मारून टाकिले. फत्तेखान सर्वस्वहीं गमावून जीवानिशी येऊन पावला. आतां शिवाजीराजे फौज तयार करून विजापुरावरी चाले करावयास सिद्धजाहले आहेत. शिवाजीराजे वरप्रसादी आणि शूरहीं कोठें गेल्यांहीं जयच पावणार तशानीं चाले करून आल्यावरी विजापुरचा विचारहीं संशयांत आहे करितां यास मुख्य योचना करून शाहजीराजास कवूल देऊन मोकले करून यांकडून हे राजकारण यकंदर थोपावें ह्मणवून दृढयोचना करून शाहजी राजास कैदेंतून मोकळें करून भेटीस बलावून शाहामजकूरानी म्हणाले राजेहो तुम्हास व अमचे वडील इब्राहीमखानासहीं वहुता दिवसापासून स्नेह तुम्हांकडून इब्राहीमखानासहीं उदंड कामें जाहली इब्राहीमखानानी तुम्हास बहुत उपकार केले. प्रस्तुत अम्हीहीं तूम्हास तसेंच चालविले. तुम्हास दक्षिणप्रांतास आम्ही पाठविल्यास तुम्ही सांगीतल्याप्रमाणे काम मात्र केलें. परंतु तुम्ही अम्हापासी न येतां बेंगळूर जाहगीर तुम्हास दिल्याकरीतां संसारहीं आणवून तुम्ही तेथेंच राहून गेलां. तुम्ही अम्हाजवळी असावें म्हणून तुम्हास बलावणेस्तव मुस्तफखानास पाठविलों. त्यानी वेगळ्याच रीतीनें तुम्हास फाठविले. असो, आतां ते कोपातें मनी धरूनका आतांहीं तुम्हास अम्हास संधी हेच कीं–तुमचें पुत्र शिवाजीराजे यानी अमुचे शिंव्हगड घेतले आहेत ते गड आमुचे आम्हास सोडून द्यावें तुमचे ज्येष्टपुत्र संभाजीराजे बेंगळूरांत

असून मुस्तफखानाशी भाडताती त्यास व तुमचे संसारासहीं सातारासी बलावून घेऊन बेंगळूर सोडून द्यावें. तिसरें चित्रकल्ल दुर्गाचा भरमा फार लवाडी करितो त्यावरी मोहिम करून त्याला स्ववशास आणावें म्हणाले. या तीनी गोष्टीसहीं शाहजी-राजानी अंगीकार करून उभयता पुत्रास लिहून पाठवून शिंव्हगडहीं सोडविले. व संभाजीराजे व येकोजीराजे उभयतां संसारासहित सातान्यांत येवून राहणे म्हणवून बेंगळूरहीं सोडून दिल्हे. आपणहीं फौज तयार करून भरम्यावर चालेकरून गेले. शाहजीराजे चित्रगल्ल पावले तेंव्हां भरमा बागामध्ये माशाची शिकारी खेळत होता. त्याला त्याकडील लोकानी अल्लीयदल्शाहानी फौज पाठविले आहेत. त्या फौजेंत शाहजीराजे येताहेत म्हणून सांगीतले. तेंव्हां भरमा आपुला बिरूदाचा घोडा आणऊन स्वार होवून वरिलिहिल्याप्रमाणें सन्नाहहीं बरोबरी घेऊन युद्धास आला. शाहजी राजानी त्यासीं चांगले युद्ध करून आपले हातानेंच त्याला मारून भरम्याचें डोसकें कापून रुमालांत बांधून घेतले. त्याच्या घोडयाची बिरुदें ताजवस ज्याव तोडेंहीं तीनी-बिरुदें काहडून घेवून त्याची फौजहीं कित्येक लुटून घेऊन राजे विजापुरासी पावून अल्लीयदल्शाहा समोर भरम्याचें डोसकें व त्याचा घोडयाची बिरुदें तीनींहीं ठेऊन खुरनिशि केले. तेंव्हां अल्लीयदल्शाहा अत्यंत संतोष पावून त्यानी आणिली बिरुदें त्यांसच देवून आपल्या सकळ बिरुदांनिशी भरली सदर शाहजी-राजास बकशीस केले. सदर बकशीस केल्यांत शाहजीराजास लाभली वस्तू हीरवा मखमली डेरा, जिलेबाचा तास नगारा, येकट रुदरेचा हिरवा मखमली चांदनी, सोन्याचे कलशासहित

सोन्यारुप्याच्या अंबाऱ्या हत्ती सहित, जिलेब्रेचे सदरेंतील नंगीसंशेरवाले बाछाईचे बाजूचे विचकत्तीचे भरम्यास मारून घेतली घोड्याची विरुदें, नव्हतां बाछाईचे सदरेंतील जिलेब्रेचे घोड्याची विरुदें घोड्यासहीत ताजवस ज्याचा हुंमादेखील मोहिमरत व चंद्रसूर्य वाद्य, सोन्यारुप्याची चोरखणी डेरा, हिरव्यामखमलीची सदरेचा थोर्ला व पत्रापडदे जगाली त्याचे रेशमी तमवे, त्या डेराचे पांय, त्या चडते ठार्यींचा चांदनी हिरवी मखमली व त्याचे हिरे जडित त्याचे कलशदेखील व रेशमी तिवाश्या तक्त खासजीच्या पांयाच्या त्यावरी घालावयाच्या सुजन्या देखील व डेरा खालील सुतर नळयांच उंठ व हिरव्या सखलातीचे निशानाचे हत्ती व सोन्यारुप्याचे मोलाम्याचे पाखरा व दांतास लाविल्यासनिना हिरवे मखमलीचे शेरेमाशेसहीत पाऱ्याचेहत्ती इतुक्या सन्नाहानिशी भरली सदर बकशीस केले. ते समग्रहीं शाहजीराजे पावले. शाहजीराजे तो बहुत मान समग्र पावून अल्लीयदल्शाहाचा निरोप घेऊन सकल विरुदें विशेष संपदेनिशी साताऱ्यास आपले संसारांत पावून सुखी राहिले. आतां शिवाजी राजाची प्रख्यातता झाल्याचा विस्तार जाणवितों. आपुले वडील शाहजीराजे यानी अल्लीयदल्शाहा पासून मोकळीक होणेस्तव लाभलें राज्य देखील सोडून साताऱ्यांत येवून राहिल्यावरी शिवाजी राजे पुरंदरगडांत होते. त्यानी अपला मंत्री सुवर्णनामक ब्राम्हण त्यास सोनाजीपंत म्हणून येक त्यास बलावून येकांती सांगीतले जे अमुचेवडील शाहाजीराजे परम शूर आणी योगवंतहीं त्यानी केली कामेंहीं निर्मळ मनेकडून केले. परंतू त्यांत थोडा भाव सूचतो. तो काय

म्हणजे प्रथम निजामशाहा संगतीस होते ते अल्लीयदिलशाहाचे बोधनेवरून त्याकडे आले. परतून निजामशाहानी बलावितांच त्याकडे गेले. पुन्हा अल्लीयदिलशाहाकडेहीं आले. ऐशा दोनी तीनी येरधारा जाहल्या तशाचे संगतीस जितके दिवस होतेकीं त्या त्याची कामें निर्वंचन करून करूनहीं त्यां त्यांस यांचेठायीं कपटच भासावयाजोगें जाहले. परंतु आपले म्हणून विश्वास धरावयास ठाव नाहींसें जाहले. त्यां त्यांस त्यां त्यांना कार्य करण्यावांचून सरनाते कार्यास यांस आपले करून घेऊन कार्य शेखर करून तदनुसार मान बहुमान केले. येवढच परंतु मनेंकडून हे आपले म्हणून मानावयाजोगी करणी वडीलां कडून घडली नाहीं. ते कैशी म्हणजें थोरमनुष्यानी येकाची संगती धरिल्यावरी त्याशी विगडताच नये कदाचित् विगडावयाजोगे (संभवलेतर) परतून त्यांशी मिळूनये. हे तो प्रसिद्ध नीति असतां या रीती चालून बोलेइतुक्यासहीं वडील अंगेकडून शूर आणि निर्वंचनेंकडुन वर्तल्या करितां कृत्रिमी यवनापासून वडिलांस ईश्वर राखिले. आम्ही प्रयासाने घेतलें सिंव्हगडहीं व आपण बहुत प्रयासेंकडून संपादिले बेंगळूरहीं यवनास सोडून देवून सातान्यांत येवून राहिले. आतां त्यांस वृद्धाप्य दशाहीं आली. याउपरि आम्हास सुचल्या बुद्धीनुसार जावें. अल्लीयदल्शाहाकडे वडिलांनी अनेक प्रयास केले; तरीहीं त्यांचे चित्तांत अम्ही जडजाहलो; अम्हास तोडावे म्हणूनच आहे. तसेच निजामशाहाचे राज्य बांधून घेवून देवगिरीदुर्गांत आहे त्या अवरंगजबासहीं आम्ही येक शल्य होवून आहों. आम्हास तोडावे म्हणावयाचेंच आहे. हे दोन प्रबलशत्रूमध्ये अम्ही पुरंदर-

गडांत असून राज्यकरावें म्हणिजे अम्हास कदापी चाल-णार नाहीं. येखादेवेळेस दगा करून अम्हास बुडवतील याकरितां अम्ही वाहेर निघून यादोघांसहीं अवरावें तेंव्हाच अमचा टिकावा होईल, हे तजवीज तुम्हास मानेत काय म्हणून विचारिल्यास त्यानी उत्तर दिल्हे जे महाराजानी केली तजवीज इतुकीहीं खरीच. प्रस्तुत महाराजानी योजिलें कार्यहीं करावेंच ईश्वरहीं साह्यहोईल म्हणून त्यानी जबाब दिल्हा. त्यावरून महा-राज शिवाजीराजे फौजेची संजोगनीत्व यवनावरी राजकारणास प्रवर्तले. तो विध प्रथम अम्ही या दोघानीहीं सर्व प्रयास केल्याहीं त्यांचा यत्न चालेना त्या ठिकाणी राहून मग वरकड तजवीजेस प्रवर्तावे म्हणवून स्थल परामृश केल्याठायीं पश्चिम प्रदेशीं विराट देशांत साधपर्वताचे घाटाखाले पश्चिम समुद्रतीरासमीप देश लोहपर्वतप्रांतीं प्रतापगडास समीप जयवल्ली नगर आहे तेस्थल वहुत कुवल. तेथें कोणाचाहीं लाग नाहीं. वाटेस घाटहीं कुवल करितां तेस्थल आक्रमावेतरी वाटेस बहुत राजे आहेत. ते राजे समग्र अल्लीयदल्‌शाहास ताफा देणार, त्या समग्रास मारूनच तेस्थल, साधावें म्हणावयाचा दृढनिश्चय करून यास प्रथम सिंव्ह-गड साधिलातो शाहजीराजाचे मोकळीकेस्तव अल्लीयदल्‌शाहास सोडिला होता तो परतून घेऊन त्या सिंव्हगडास अधिकरून आपले गड किल्यांत समग्र सामान रस्त व फौज हे समग्र भरून बंदोबस्त करून आपण बरोबरी घ्यावयाची फौज, धारकरी, चांगला राबूत, निवडून आपल्या मेनास पाहिजे तितुकी शेना पादचारीच विशेष घेऊन बरोबरी कोणती रस्तहीं माघून यावा म्हणावयाची अपेक्षा न धरावयाजोगी

सुलभांत घेऊन प्रयाण सिद्ध करुन, अनेक द्रव्य दक्षिणायुक्त यात्रादान करुन, देवता प्रार्थना कुलदेवताराधना विशेष करून, प्रयाणसमयीं कुलदेवता प्रत्यक्ष होऊन स्वप्नांत जयप्रद ऐसा दृष्टांतहीं दिल्हा. तोहीं पाहून जयभेरी ठोकून सुमुहूर्तें विजयदशमीचे मुहूर्तानें कूच करून चालिले. विजयदशमी सणांस कूचकेलें म्हणजें भोंसल वंशांत जयप्रद दिवस तोच म्हणून परंपरा चालले. याकारतां उत्तम शकुनहीं जाह्ले. त्या शकुन सुमुहुर्तांनिशी कूच करून जातेवेळेस आरंभा पासून जयवल्ली नगर पावेतोहीं वाटेस निबिड वन, निबिड पर्वत संधींत वनांतहा अनेक देशाधिपती दुर्गाधिपति, पाळेगार, जमेदार, त्या सर्वत्रांसहीं मारिले. जातां स्तलसोडून पळालेतेहीं जातां सांपडले यास मारणारास मारून सोडून देणारास सोडून वंदीखाना दाखल करणार त्यां त्यां जोगें योग्यस्थळांत घालून यांत थोर थोर राजे बाजीराजे येक, कृष्णराजा येक, जनकराजा येक, चंद्रराजा येक, या चौघांसहीं जितून त्या जिंतिल्या राज्यास येकंदर मजबूत गणी विश्वासूक सर्दारांस ठेवून, मागील पाउले आपलें करून पुढं चालेकरुन जयवल्लीनगर पावले. त्या नगराची थोरवी थोडी कळावयास्तव सांगिजेलीहोतीं जे—सिंव्हेपर्वताच्या शिरेस घाट उतरून या घाटास रडतोंडीचा घाट म्हणूनहीं नाव पावलें आहे. त्या घाटाची कुवलता प्रख्यात तसा घाट उतरून येकपद्मार्गानें बहुतदुरजावून लोह पर्वताचा माथा चढून खालीं पाहिल्यां समग्र निबिड वन त्या वनांत सूर्येरश्मि पडल्यां भूमिवर गोष्पादमात्रहीं पाहण्यास सांपडेना, शुद्ध अंधकारमय तैशा वनदुर्गाच्या आवरणामध्ये जयवल्ली नगर. त्या नगरासमपि प्रताप-

गिरीदुर्गहीं तेस्थळहीं जिंतूनि तेथील रामचंद्रराजा म्हणून वरी राहिला. तो त्याला पळवून आपले स्वाधीन करून तदनंतरें त्या स्थलांत व प्रतापदुर्गांतहीं मजबूत ठाणी ठेऊन पलीकडें स्वार-होऊन पश्चिम समुद्रतीरीं उतरुन समुद्रामध्यें कित्येक प्रदेशा पलीकडे काठांस विशेष दूर नाहीसे येक किल्ला मजबूत बांधून त्यास शिवलंका म्हणून नाव ठेवून त्या शिवलंकेच्या किल्यांत वस्तींही करून, रत्नखचित सिंव्हसन येक करून, त्या सिंव्हास-नावरी आपण वसून, शिवशक म्हणून येक शक कल्पून, सकल हिशोब कितोब वगैरे लिहिण्यांत शिवशक घालून, लिहिजेसें आपुलें अधिकाराचे भूमीस समग्र आज्ञापून येणेप्रमाणे चालवून, आपण तेथें राहिले. जयवल्ली नगराचा चंद्रराजा पळून गेला. तो अल्लीयदल्शाहापासी पावून शिवाजीराजाची ख्याती व शौर्य-धैर्यादिकृत्य समग्र अल्लीयदल्शाहास जाणती केली. ते अल्लीयद-ल्शाहाने परमाश्चर्य मानून तेवेळ पावेतो शिवाजीराज अमुके ठांयीं आहेत म्हणावयाचें देखील कोणासहीं कळलेनव्हतें. चंद्र-राजानीं सांगितल्या वरून अल्लीयदल्शाहास त्या शिवाजी राजाचा कृत्याचेठायीं आश्चर्य व असूया विशेष होऊन सर्व प्रकारें शिवाजी राजास खालीं करावें नाहीतरी आपलें अधिपत्य टिकणें कठीण म्हणून दृढ योजना करून, त्याचे बारा वजीरापैकीं अफजलखान म्हणणार मुख्य वजीर त्याला अब्दलखान म्हणून प्रासिद्ध आहे त्या अफजल्खानास बलाऊन तुह्मीं पादशाहाचे रफाक मागें बहुत कामें केलां आहां. बहुत मूल्क साधिलाहो आहां तुम्हामुळें बादशाहास नाव आहे. अतां शाहाजीचा ल्योंक केवळ शिवाजी उन्मत्तहोऊन बापाची गोष्टींही ऐकनासे आपण अति

क्रमून वाच्छाई मुलुकें तमाम बांधून वाच्छाई खजान्यास न्यावयाचें द्रव्य लुटिलें होतें नव्हतां प्रस्तुत बाजीराजा, कृष्णराजा, जनकराजा यांचा मुलुक बांधून पलीकडे चंद्रराजाचा मुलुक जयवल्लीनगर प्रतिनाम जावळी म्हणावयाचें स्थलहीं आक्रमून समुद्रामध्यें किल्ला बांधून शिवलंका म्हणून नांवे ठेऊन जडित सिंव्हासन करून आपण बसून आपले शक देखील चालविलें. उपरि तो काय करीना याकरितां तुम्ही विशेष फौज विशेष खजाना घेऊन तुम्हा बरोबरीचे वजीर अकरा आहेत; त्यांसहीं बरोबरी घेवून जावून बहुत बुद्धीनें शिवाजी राजातें धरावें अथवा मारून तरी टाकावें, त्याविना असुचा टिकाव होईना म्हणून सांगीतल्यास अफझुलखान कबूल होऊन सकल-सैन्यहीं अकरा वजिरास कृष्णाजीपंत वकीलास बरोबरी घेवून निघणेस सिद्धजाहला. इतक्यांत शिवाजीराजे पूनेस येवून पावले म्हणून वर्तमान आलें. तेंव्हां चंद्रराजानें सांगीतले ते शिवाजीराजे तेथुन निघून पुणेस आले ते येक्या कामास बरेंच जाहले. जावलीगडांत असलियां त्याचा लाग करिणे बहुत प्रयास तो पुणेस आल्या करितां परतून त्याने येवुनि पावतो इतुक्यांत आम्ही पंढरपुरावरुन निस्संग जावळीगडास जावुन जावळी व प्रतापगड साधिल्यां ते शिवाजी मैदानांत पडला. त्याचें पारपत्य सहज करूये म्हणून सल्ला दिल्हा. त्या चंद्रराजाचे सल्यास युक्तमानून अफजलखान कूच करुन निघाला. तेंव्हां उदंड अपशकुनहीं जाहले. मुख्य त्फथे लस्कर म्हणणार बाछाईचा खासहत्ती जो निशानाचा तो हत्ती पहिल्या मजलेस देवगतीस पावला. तेंहीं अलक्ष करुन अफजलखान पंढरपुरचे

मार्गाने प्रथम जावळीगड प्रतापगड साधून मग शिवाजीवरी परतावें म्हणावयाचे योजनेने चाली केली. तेंव्हां शिवाजी-राजाचे कुलदैवत श्रीजगदंबा तुळजा भवानी राजास रात्रिकालीं प्रत्यक्ष होवून, अफझल्खानाने केली योचना अल्ली-यदल्शाहाने निरोपिला अर्थ अबुजुल्खान कपटाने स्नेहाचे सन्निधान करील त्यास पातेजातानये म्हणूनहीं त्याक्षणी पुणें सोडून जावळीगडास पावणें, तेंथेंच अफजल्खानाचा संहार मी उभीराहून तुजकडून करवितें म्हणून सांगीतली. सवेंच राजे उठून देवीस नमस्कार करून देवी अप्रत्यक्ष जाहल्यावरी स्वप्न पाहिलें म्हणावेतरीं जागाच आहें. अतएव कुलदेवता प्रत्यक्ष होऊन पुढिलें भविष्य जाणविले म्हणून संतोष मानून त्याक्षणी पूणें प्रांतचे गड, किल्ले, दुर्ग समग्र मजबूत करून अपण जावळी गडास प्रयाण जाहले. तेंव्हां वाटेचे गडकिल्लेंत होतेत्या सरदारांस येकंदर संकेत सांगून ठेविले जे अफजल्खान बहुत सैन्यानिशी जावळीस पंढरपुरचे मार्गानें जातो इतक्यांत अम्हीहीं जाऊन पावतों तो अम्हासीं भेटीचे संन्निधान बोलेल. अम्हीहीं त्याप्र-कारेंच बोल देतों. तुम्ही आपले आपले गड किल्ले मजबूत करून फौजमात्र दाखऊन देयीनासे राणांत दबऊन ठेऊन अफजलखान् येणारास त्याचे फौजेनिशी धाराळ सोडूनदेणे, जावळीचे मैदानांत त्याची अमुची भेटी झाल्याठायीं संविधान विघडल्यां त्याघडीस संकेताचा नगारा वाजवितों, तोशद्ब ऐकल्याक्षणी तमाम बाहेर निघून तमाम घाटा बांधून त्याचे एक मनुष्य देखील आंत येऊन देईनासें आंतील येकासहीं बाहेर सोडीनासें ज्याला जेंथें देखिलें तेथें मारून टाकिणें. येकमनुष्य सोडणें गरजनाहीं म्हणून

सांगून आपण संकेतकडून वाजवावयाचा जिनसहीं त्यांस कळवून आपण जावळी जावून पावले. उपरि अपजल्खान् परामर्ष केल्यांत शिवाजिराजे जावळीस पावले म्हणावयाचे कळून पंढर-पुरचे मार्गानें जाणार वाटेने न जातां विठोबाचे मूर्तीस उपद्रव करावयाची योचना केली. त्यास विठोबा अप्रत्यक्ष होवून त्यावेळेस मूर्ति दृष्टीस पडेनासी झाली. त्याउपरी तुळजापुरास पाऊन तुलजाभवानीचे मूर्तीसहीं उपद्रव मांडिला. तेथेंही मूर्ति अप्रत्यक्ष जाहली तेथून निघून शंभूमहादेवास येऊन उप-द्रव आरंभिला. तो बराबरी साहा वजीर मराठे होते. तेंहीं आडवें येऊन अटकाविले. त्या मुळें तेथून निघून पल्लीवन ह्मणावेयाचे पालीचे गडास आला. तेथेंहीं देवानें कांहीं चमत्कार दृष्टांत दाखविल्यामुळें उपद्रवकरीनासें येथें राहून कृष्णाजीपंत वकीलास भेटीचे संविधान बोलणे ह्मणून राजाचे नावें अफजल्-खानाने पत्रलिहिले जें–तुम्ही किती जाहल्याहीं अल्लीयदिल्‌शाहा बादशाहासी विरोधच केला तुमचें नातें तैसें नव्हें. तुमचे वडील शाहजी राजानी केले वर्तुणूक ऐकिलीं असालकी आतांतुम्ही बाद-शाहा किल्ले एकंदर बांधिलें; व, बादशाही मनसूपदारांस येकंदर मारून टाकिलां, बादशाही खजानें लुटलां, रत्नसिंव्हासन येक करून, त्यावरी बादशाहाहोऊन बसतां, याखेरीज तुरुकाचे मतास निंदितां, जेथें तेथें मशीदा तोडितां, ऐसा येकंदर द्वेष वाढवितां, करितां तुम्ही बादशाहीस गुनेगार जाहलां आहां. अल्लीयदिल्-शाहाचे चित्तांत तुम्हास उदंड रीतीने कष्टद्यावें म्हणावयाचे वाटलें. त्यास शाहाजीराजाच्या स्नेहाकरितां बादशाहास उदंड रीतीने सांगून तुम्ही बांधिल्यांपैकीं सिंहगड, भीमरथी, पुरंदरगड,

जयवल्ली येवढें सोडूनदेणे. यथाप्रकारें तुमच्यादेशांत तुम्हीसुखरूप असणें म्हणून वारून घेऊन आलों आहों करितां तुमची अमची भेट जाहल्यावरी वरकडही कळून येईल म्हणून लिहून कृष्णाजीपंताकडे देऊन आणखी कृष्णाजीपंतास कपट युक्तीनिरोपून शिवाजीराजाकडे पाठविले. त्याने राजापासी येऊन केवळ आप्तकीने बोलून भेटीचे संविधान सांगीतलें. त्यास शिवाजीराजानी अंगीकार करून फारउत्तम अमचे अपेक्षित कार्यच खानानी सांगून पाठविले. ते फार उत्तमजाहलें. खान मजकूरानी या जयवल्लीनगर जावळीचे मैदान येथील रान येथील गड व हे कांहीं पाहिले नाहीतकीं येथेंच आलीया भेटे गोष्टी यथास्तितीहोती म्हणवून सांगून पाठविले. ते वर्तमान कृष्णाजीपंत वकीलानें येऊनसांगतांच खानमजकूर वहुत संतोष पावून फौज कूचकरून चालिले. तेंव्हां बरोबरीचे वरकड वजीरानी त्या स्थळास जातानये शिवाजीराजा सामान्य नव्हे कांहीं कपट करील म्हणवून उदंड रीतीनें सांगितलें; व अपशकुनहीं फार जाहले. कोणतेहीं मानीनासें लोहपर्वताचे उतारांत जावळीचे वनदुर्गास बाहेर उतरून राजास सांगून पाठविले. तेंव्हांराजानी घाटा बेटा समग्र बांधून पलीकडिले मनुष्य घाटांत येवूनदेईनासें घाटा तमाम झाडें तोडून खान मजकुराचे लोकांस आपण आलीवाट देखील आपणास कळेनासें करून आपलें गडें, दुर्ग, किल्लेसमग्र मजबूद करून पुणें प्रांता कडील—वहली नवी संपादिल्या मुलकांतहीं त्या त्या ठाणेदारांस आपण संकेताचा नगारा वाजवितांच तोशब्द ऐकिल्याक्षणीं चहुंकडील फौज खवळून

अफजलखानाकडील येक मानव देखील सोडीनासे मारून टाकणें म्हणून ताकीदकरून आपण जावळीचे वनदुर्गा आतील मैदानांत सदर करून खान मजकूरास भेटीस बलावून पाठविले. ऐशा समयीं शिवाजी राजास वर्तमान आले जे अपजलखान विजापुर सोडून येथेवाटेस नवी मुलुकें आम्ही बाधिलातो बांधीत व लुटे करीत येणेप्रमाणें येत असता तुमचे जेष्ठबंधू संभाजी राजे कांहीं फौज घेवून युद्धास गेले त्यास धरून कलहा आधीं देऊन कुत्रमेकरुन मारून टाकिलें. ते वर्तमान शाहाजीराजास कळून त्यांचे उत्तरकार्य जाहल्यानंतर त्याच व्यसनानें थोडें दिवस असून शाहाजीराजेहीं परमपदास पावले. त्याचा दिवस शके १६५८ विकारी संवत्सरीं संभाजीराजे दैवगातीस पावलें. सवेंच दोन महिन्याच्या अभ्यंतरात तोच शक त्याचे वडील शाहाजी राजेहीं परमपदास पावलें. त्यांचे उत्तर कृत्य यकोजीराजानीं केले. मातोश्री जीजाईआउ साहेब तुमचे भेटीस आले ह्मणून वर्तमान सांगितलें तेव्हा शिवाजीराजानी फार क्लेश मानून जीजाई आऊस बलावून घेऊन, भेटून समाधान करून, आऊसाहेबांस प्रतापगडावरी ठेऊन, संभाजीराजाचें उसणें घेतो ह्मणून रागानें असते वेळेस तेंव्हां अफजलखान येक पालखी व कृष्णार्जीपंत हेजीवे चौघे पांचजण खिजमतगारानिशी सद्रेस आला. उपरी शिवाजीराजेहीं तुद्नुसारच दोघे चौघे बरोबरी घेऊन भेटीस आले. येकासयेक भेट होते समयीं थोडी बोला बोली होऊन अफजलखानानें राजास गवसून धरून माजेची कठार काहडून राजाचे पोटावरी चालविली. दोनतीन-

मार चालविले तरीहीं राजानीं अंग्या आत वारीक बखतर ल्यालेहोते, ते कोणासहीं कळेना. त्यामुळें राजाचे पोटावरी चालविली कठार व्यर्थ होऊन गेली. इतक्यांत राजानीं वरचेवरी हाताच्या विसव्याने मार दाखवून डाव्याहाती वाघनखें होतीं त्याने अफजलखानाचे पोटावरी मारून ओढिले. तेणेकडून पोट चिरलेजाऊन चरवीं बाहेरीं आलींतरीहीं खान मजकूर तक्त जाहल्या करितां तेचरवी पोटांत आपले हातें भरून दुशालानें पोट ओढून बांधून हातीं फिरंग घेऊन राजावरीं वार करूं लागला. तेंव्हां राजानी हाती पट्टा घेऊन खानमजकूराचे वार यकंदर पट्ट्यावरीं आडवून आपण वार करून तोवार खानमजकुराचे डाव्याभुजापासून उजव्या बाजूच्या वरगड्या पावेतों उतरल्या मुळें खान दुर्घट होऊन खाले पडला तेंव्हां शालीवाहन शके १५८१ विकारी संवत्सर मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवारीं दुपारा अफजलखान पडला. खान मजकूर देवगतीस पावल्यानंतर खानाची तरवार कृष्णाजीपंत हेजिराणे घेवून राजावरी वार करूं लागला. तेव्हां राजे ह्मणाले जे तूं ब्राह्मण तुला मारणें आह्मास धर्म नव्हे. आह्मी ब्राह्मण चरणरजासच पूजाकरितों. आह्मास गुरुदेवतास्थानहीं ब्राह्मण जाहल्या करितां हाताची हत्यारा टाकून देऊन तुला जावें सारिखें असल्यां सुखरुप जा घाटा मोकळ्या करून देतों. अथवा येथेंच राहावेंतरी अन्न-वस्त्रास चालवितों रहाह्मणून उदंड रीतीनें सांगील्यांहीं त्या ब्राम्हणाने ऐकनासे वारावरी वार चालविला. तो समग्र ओंह-डीत परतून पाहिनासे राजे चालिले. तेव्हां राजाचा खिसमजदार-येकानें पाहून ब्राम्हण हट्टास पेट्न मारितो. येखादा मार चुकून

लागल्या कोट्यावधीं जनास पोसणार राजा जायांहोईल तत्रापीं शस्त्रधरुन मारणार ब्राम्हणास सुखें मारुये म्हणून त्या कृष्णाजीं-पंतास मारून दुधड केला. तो ब्राम्हण देवगतीस पावल्या वरीं शिवाजींराजानी पूर्वसंकेताप्रमाणें नगारा वाजविला. तो नाद ऐकतांच जेथिले तेथें लोक खवळून अफजलखानाचीं फौज तमाम मारून वरकड वजीरांस धरून फौजेंतील हत्तीं घोडे तमाम लुटून राजापासीं आणून पावतें केले. राजानी सांपडल्या वजी-रांस बहुमान करून पाठविले. ते वजीर बहुत शेष थोडें होतें तेंहीं अल्लीयदिलशाहपासी जावून साद्यंत वर्तमान जाणतेंकेले. अल्लियदिल्शाहानी अफजलखानाचे वर्तमान ऐकून दोनघटिका आपले ठायीं खिन्नहोवून बहूत फौज सरदारेंहीं गेलेकीं ह्मणावयाचे व्यसनानें मग्नहोवून पुन्हा हम्मधरुन शिवाजीराजावरी लढायी करावी ह्मणून फौज बंदीकरू लागले. हे वर्तमान पेसजी शिवाजीराजे अफजलखानास मारणेनिमित्त जावळीस जाते. वेळेस पुणेप्रांताचे राज्य समग्र नेतोजी ह्मणणार सेनापतीस निरऊन जावळींत आपण संकेत नगारा वाजविला वर्तमान कळतांच चालावेयाची घटिकहीं सांगुन गेले होते. तो नेतोजीं ह्मणणार सेनापतीनें अफजलखान दैवगतीस पावले वर्तमान ऐकून अल्लीयदिलशहानी पून्हा युद्धार्थ फौज बंदी करितातीं ह्मणावयाचे ऐकून अफजलखान जावळीस राजाचे भेटींस जाते-वळेस ठाणीं ठेविल्या गड किल्यांत येकंदर त्यांची ठाणी ठेऊन आपली ठाणीं मजबूत ठेऊन आपणहीं राजाजवळीं जावळीस जाऊन पावला. तदनंतरें शिवाजींराजयांनी नेताजी सेनापतीस बरोबरीं घेऊन अल्लीयदिल् शाहाचा मुलुक बांधिला. तो पश्चिम

नगर संपगावरासवड हे शाहार किल्ला सहींत घेऊन यास अधिकारी होता तो अल्लीयादिल शाहाकडील हिलालखानास पडाऊ केले. तोहीं निर्मल मनेकडून राजाचा अंकित झाला-त्यालाहीं समागमें घेऊन शिवाजीराजानीं अल्लीयदिलशहाचा मुलूक व दिल्लींद्र अवरंगजेबाचा मुलूक देखील बांधिल्या नावनिशा किल्ले दुर्ग गड देखील मायावनी रामदूर्ग कल्धूतिका जयंतिका, अष्टी, अष्टवठ, वेल्लापुर, उंबरगांव, मसूर, करहाताग, गावें, पल्लीकाने, रलकन, नारवटु, मुरण, कोकपुर, करवार, येणेंप्रमाणें तमामें राज्य बांधून यांतील सरदारांस कित्तेकांस कौलावरी सोडिलें. कित्तेकांस मारून टाकिलें. कित्तेकांस बंदीखानी घालून साधिल्या राज्यास येकंदर मजवूत ठाणी ठेऊन तदनंतरें नेतोजी सेनापती समागम सेना देऊन अल्लीयदिल्शाहाचा मुलख व दिल्लींद्र औरंगजेबाचे मुलूकहीं बांधणें ह्मणून निरोपून पाठवून आपण पणालागड साधावा ह्मणून येऊन पणालास मोर्चे देऊन गडावरी चाल केली. तेंव्हां गडावल्यांनी अनेक गोळयाचा मार व उदंड शिसें तावून ओतिले. याप्रकारीं वहुत मार केले. ते कोणतेंही गणना करितासें शिवाजीराजे गडावरी चढून हल्ला करून, किल्लाहीं घेऊन, आंतिले सरदारांस मारून येकून मारिले लोकजातां उरल्यांस सोडून देऊन पनाळगड संग्रह करून घेऊन तेथेंच राहिले. यास कांहीं अगोदरीच अल्लीयदिल्शाहानी तजवीज केली जे—शिवाजीराजे केवळ शूर प्रस्तुत प्रतापगड जयवल्ली प्रांती आहेत ते पुन्हे पनाळगड समपिच करितां तिकडे येतील ते पणाळगड फारचांगला आह्माला प्रियकर आस्ती होऊन आहे. कदाचित् तो गड शिवाजीराजाचे

हातास लागल्यां मग आह्मांस फार संकट जाईल याकरिता तो राखावा ह्मणून रुस्तुमखान ह्मणणार सरदारास बरोबरी जोर फौज देवून पनाळ राखनेस्तव पाठविले. तो रुस्तुंखान येवून पावतो इतक्यांत शिवाजीराजानी पनाळ हस्तगत केले होते; ते वर्तमान रुस्तुंखानाने अल्लीयदिल्शाहास लिहिले ते पाहून अल्लीयदिशाहा फार व्यसनग्रस्तहोवून पनाळ गडहीं शिवाजीराजानी साधिल्याकरितां या उपरि शिवाजीराजे आह्मास दुर्जय, बहुत राज्य बांधिले, बहुत फौजहीं जमला, आह्मा येकल्याचानें त्यास जिंकवेना ह्मणून दिल्लींद्र ऐसा अवरंगजेबास अल्लीयदिल्शाहानीं कागद लिहिलेजे–" शाहाजीराजाचे लेंक शिवाजीराजे केवळ तुंदह्होवून तुमचा व आमचा मुलूक बांधिला तो मात्र नव्हतां आमचे तुरुकाचे मताचे जे देखिले त्यांस येकंदर मारितात. मशीदा तमाम उपडून सांडिल्या जडित सिंहासन येक करून त्यावरी आपण बसून अपल्यास बादशाहा ह्मणविताहेत. अपल्या नांवें शिवशक ह्मणून शक चालवितात. ऐसें येकंदर उन्मत्त जाहले आहेत. अमच्या आटोप्यांत येत नाहींत. अमचे पनाळगडही स्वाधीन करून घेतले यास्तव तुह्मी फौजा पाठविल्याने अमची फौजहीं बरोबरी देवून पाठवून शिवाजी राजास ठांयास आणितों " ह्मणून लिहिले. ते पाहून अवरंगजबानि अनेक मोगलायी फौज बरोबरीदेऊन जुलुफकारखान ह्मणणार सरदारास पाठविले. त्या जुलफकारखानानें अल्लीयदिलशाहा कडील सरदार पहिले, पनाळ राखनेस पाठविले होते. त्या रुस्तुमखानासहीं मिळून घेऊन पनाळ प्रांतास बहुत सन्नाहानिशी उभ रतां आले. तेव्हां शिवाजीराजे आपल्या फौजेनिशी बाहेर

निघून पुणेंप्रांताकडे समोर येऊन जुलुफकारखान् व रुस्तुफखानाचीफौज तमाम मारून टाकून जुलुफकारखानचा निशान हिरून घेतले. तेणेकडून सैन्य समग्र वाताहत होऊन जुल्फकार खान, पराजय पावून निघून गेला. दुसऱ्याकित्ता जुलुफकारखानानें दर्याखान्, फत्तेखान्, मुसेखान् ऐसे थोर सरदारांस भारी फौजहीं घेऊन आला तैसाचें अल्लीयदिलशाहानेंहीं फौज पाठविला. तेहींवेऊन आले. दुसऱ्या कित्ताहीं राजे बाहेर निघून भांडून सैन्य वाताहत करून सोडिले. पुन्हा जुल्फकारखानानें जावून फौज वंदकिरून आला. येणेंप्रमाणें जुलूफकारखान् व अल्लीयदल्शाहानी फौज सोळा कित्ते युद्धास आले. सोळाकित्तेहीं युद्धांत राजानी फौज तमाम मारून उभयतांची फौज नाशहोऊन गेली. हे वर्तमान हतशेषांचे सांगण्यावरूनहीं व अल्लीयदिल्शाहानी लिहिल्या वरूनहीं अवरंगजवास कळून फार आग्रहें येवून आतां शिवाजी राजा कोठें आहे ह्मणून अवरंगजवानी विचारिले. तेंव्हां जवळऱ्यानी सांगीतले जे–शिवाजीराजा जयवल्ली, चक्रावती याप्रांतासहित अनेक बाछाई किल्ले, गड, शाहार साधून पनाळ गडहीं घेऊन आपण पनाळ गडांत बैसला आहे. त्याचा सेनापती नेतोजी ह्मणणार बाछाई मुलुक साधीत आला आहे. त्या नेतोजीने साधिला मुलुक अल्लीयदल्शाहाचे मुलुकांत कपित्थगांव १, बंद्रगांव १, मळगांव १, कडल १, गोकाक १, दुग्दवाट १, सुरवट १, धारावट १, पोरगांव १, मतपळ १, फागाद १, कद्मवट १, हेणवट १, रायबाग १, दुमैरिका १, काडग्राम १, कमलापूर १, चित्रकूट १, काराळ १, गारयाव १, शामगांव १, सतमीरघड १, हरिद्रा १, क्षुईवट १,

ईवल १, घुणिका १, मिरजे १, हनुवल्ली १, माथोल १, कुणिक १, इत्यादि राज्य आणखी कित्येकहीं बांधिली. ते नव्होतां बाछाई मुलूक तमाम लुटणें जाळणें येणेंप्रमाणें किरात नेतोजी प्रबळ आहे ह्मणून सांगीतले. तेव्हां अवरंजबानी आपला थोर वंशास मिळाला खिनरी सरदार मुसेखान पठाण १, गोंड विठ्ठलदास मऱ्हाटा १, पाठरू १, गिरजासलतान १, अमरसिंव्हमराटा १, कोकाटे १, शादिवदीखान १, सरजेराव मऱ्हाटा १, राजेवगान १, बदलूखान् पठान् १, रामसरु मऱ्हाटा १, कारतकवखान १, जयासाद १, कृष्णराजे १, यानावानिशीचे समग्र देवून शास्ताखानास निरोपिले जे—शिवाजीकडील नेतोजी बाछाई मुलुकांत करावयाची घुदाईस शतांशाने अधीक पणें प्रांतीं जाळणें लुटणें येणेंप्रमाणें करीत जयवल्ली चक्रावती प्रांतां वरून तो प्रांत समग्र साधून पनाळास जावून शिवाजीचें पारपत्य करा ह्मणून शास्ताखानास भारी फौज देवून पाठविलें. त्यानीहीं आपल्यास झाल्या हुकुमा पेक्षा जास्ती घर दायाकरीत मुलुकहीं बांधीत चक्रावती प्रांतास चालिले. येणेंप्रमाणे अज्ञापित होवून बाछाईचा मामा शास्ताखान निघावयाचें वर्तमान अल्लीयदिल् शाहास कळून आतां पनाळांत आहे त्या शिवाजी राजास हे वर्तमान कळतांच आपण निघून समोर जावून शास्ताखानास येऊं देयीनासें तेथेंच रोधील करितां त्याला पनाळांतून बाहेर निघेनासे करावें ह्मणून कनोळचे जोहरखानास लिहिले जे—तुह्मासमागमें वह्लीखान् व बाच्छाई खान् व घोरपडे वगैरे सरदारांस व भारी फौज व भारी सरंजाम् घेवून पनाळास जावून सक्त लढाई करून पनाळगड व शिवाजीसहीं हस्तगत करणें ह्मणून

लिहिले. ते पत्र जोहर खानाने पाहून अती त्वरेनें सेना व सरदार सरंजामहीं शेखर करून घेऊन पनाळावरी उतरून गडास पांच महिने वेढादिल्हा तरीहीं शिवाजीराजानी चांगलें भांडणें भांडत होते. शास्ताखान अवरंगजेबाकडून निघाला तो चक्रावतीप्रांतीं संग्रामदुर्ग वेढून भांडत होता. त्या संग्राम दुर्गांतील शिवाजिराजाकडील ठाणेदार शास्ताखाना संहारिनासें चांगलें भांडणें देतहोते. येणेप्रमाणें शिवाजिराजे पांच महिन्यापासून पनाळ गडांत जोहरखानाचे वेढ्यांत सांपडून युद्ध करीत असतां राजमाता जीजाईआवूसाहेब प्रताप गडावरी थोडे दिवस असून तदनंतरें परतून राजगडास पावले होते ते जिजाईआवुसाहेब प्रस्तुत राजेहीं वेढयांत सांपडले. तेथेंहीं संग्रामगड चक्रावती शास्ताखानाने वेढिला. तेंव्हां जिजाईआवूसाहेबांस शिवाजीराजास पाहावें ह्मणून तेवढा येकपुत्र आपल्यास आहे. कोणा रीतीहीं त्यास पाहावे ह्मणावयाची अपेक्षा जाहली. दुसरें कित्येक सेना घेवून जावून राजास सोकळें करावें ह्मणावयाची हावहीं धरून जीजाईआवुसाहेब पनाळास जाणेस सिद्ध जाहले. पुन्हा आवूसाहेबानि केली तजवीज–जे संग्रामगड चक्रावतीदुर्ग शास्ताखानाचे हातास लागल्यासें दिसतें, पूगेसी सरली सूपगावें हेहीं ताम्रमुखाच्या हातास लागले; शिवाजीराजे पनाळीवेढेंत आहेत करितां आपण जावून सोडवावें ह्मणून निश्चय केले. तेव्हां राजाचा सेनापती नेतोजी म्हणणार हिलालखाना समवेत येवून नम्रतेनें नमस्कार केला. मातोश्री त्या दोघां पाहून माझा लेंक तुमचा यजमान पनाळगडीं शत्रूशीं युद्धकरितो तुम्ही उभयतां लाज नाहीसें–भिवून आपला प्राणच थोरसा समजून पळून आलां कीं त्यास्तव मीच जावून

माझ्या लेंकास सोडवितें म्हणतांच सेनापतींनी मातोश्रीचे प्रथमराजे असाध्य शूर त्यास्तव त्यांचे निरोपावरून विजयगड जिंतून येप्रांती तांम्रमुखीसी युद्धकरिणेस आलों. आपण येथेंच आमुचें संरक्षण करावें पनाळास न जावें नाहींतरी अमचे सैनीक समर्थ ताम्रमुखासी जिंतून गड किल्ले घेऊंसकनात. आम्हींच यजमाना समीप–जातोंसें राजमातेस विज्ञापना करून पनाळेस निघाले. तेंव्हां सेनापतीसह सैन्य येणेचे वृत्त जोहरखान ऐकून व कांहीं सैन्य पाठवून मार्गी निरोधितां उभयता सैन्या-सही अद्भुत युद्ध जाहलें. त्या युद्धीं हिलालखानाचा पुत्र अनेक पराक्रमेकरून घायानें घाबरा जाहला. त्याला यवनाचे लोकानी धरून नेले. हे वर्तमान कळूनहीं सोडवणेस शक्त न जाहले. हे वर्तमान राजानीहीं ऐकून व्यसनाने रात्रीं निद्रिस्त असतां श्रीतुळजाभवानी स्वप्नी येऊन अरे लेंकरा तुझी माय राजगडांत तुजलागीं पाहावें म्हणून बहुत कष्टी होते; आतांच मातोश्रीचे भेटीस स्वल्प सैन्या समवेत जा तेसमयीं शत्रूस मी मोहवितें. जोहरहीं कारणामुळें नाशपावेल. म्हणतांच राजे जाग्रत होऊन श्रीदेवीस साष्टांग नमस्कार करून पुना प्रांत ताम्र मुखानी आक्रमिले असती आम्ही येथें असणें विहित नव्हें. ही तजवीज करून त्र्यंबक भास्कर यांस पनाळी ठेऊन देवीच्या आज्ञेप्रमाणें राजगडास जाणें निश्चय करून जोहरास आपण राजगडांस जातों आमुचे सैन्य येथें तुम्हासी समर करील, कदाचित् ऐसें तुजला संमत नसल्यां उभयदलभारहीं दूसरसें उभें करून आम्ही दोघेही द्वंद्व युद्ध करूंसे राजानी सांगून पाठविलें. ते वर्तमान ऐकूनहीं न ऐकाल्यासे होता. तदनंतर राजे रात्रीं प्रहरा नंतरें

साहाशें पायदळासही तेरी वाजवीत शत्रू समीप मार्गाने चालिले. तेव्हां तो शब्द मेघ गर्जनाम्हणून शत्रूमसग्र समजले. तेव्हां राजेहीं कठीण मार्ग रानचा पांच गांव भोय क्रमून विशालगडास पावले. त्यानंतरें ते वर्तमान जोहराने ऐकून आम्ही घेरिलें असतांहीं कैसें दगा करून गेले म्हणून तप्तहोवून महसुद म्हणणार सेनापती समागमे कांहीं सैन्य देऊन राजास धरणेस्तव पाठविला. तो महसूद तेथून जातानां मार्गीं चिखोलांत वहुत सेना गडून गेली. कांहीं सेनेसमवेत गडासमीप पावला. त्या अगोदरी पल्लीवनाचा राजा जशवंत, शृंगारपुरचा राजा सूर्य राजे दोघेहीं जोहराचे निरोपावरून विशालगडी युद्धकरून पराभव पावले होते. त्यानी महसूद आले वर्तमान ऐकून त्याची भेटी घेऊन तोघेहीं विशालगडास घेरिले. तेंव्हां राजे नीट युद्ध करून स्वसैन्यकडून शत्रूस जिंतून तेथून निघून राजगडास येऊन आपले मातोश्रीस साष्टांग नमस्कार करून चालले वर्तमान येकंदर सांगून येक दिवस तेथेंचि राहिले. महसूदहीं केवळ अपमान पावून प्राणानी जोहराकडें पावला. हे वर्तमान दिल्लीश्वराचा मामा शास्ताखान् प्रभृतीनी ऐकून आपले मनोरथसिद्धी विषयीं संशयी जाहले. ऐसें असतां शिवाजीराजे आलोचना करून त्र्यंबक भास्करास पनाळगड यवनाचे स्वाधीन करून तुम्ही येथें येणे त्यागडास प्रतिनिधी अल्लीयदिल्शाहा पासून इतर गड घेवूंसकतों दोनी ठायीं युद्ध करिणे होईना करितां हा निश्चय समजून शीघ्र येणेसें बलावून पाठविल्यावरून त्र्यंबक भास्कर राजे आज्ञानुसार गड जोहराचे स्वाधीन करून त्याची भेट घेवून त्याकडून अनेकसन्मान पावून राजासमीप येऊन पावले. ऐशासमयीं यदुलाने

राजास जोहर लांच घेऊन सोडिलासे अनुमान मानून जोहरास राजाकडून लांच घेतलास तें द्रव्य देणे नाही तरीं तुझें पारपत्य केलें जाईलसें पत्र पाठविलें. ते पाहून मनस्तापें कडून अपलें सैन्य घेवून कर्नपुरास निघून गेला. आपलें भय नाहीसें निघून गेला ह्मणावयाचे द्वेषानें कित्येक तामुम्रखास पाठविला. त्या ताम्रमुखानी विष देवून जोहरखानास मारिले. राजगडांत शिवाजीराज यानीं ताम्रमुखी, चक्रावती, आणी संग्राम दुर्ग भांडून घेतिले वर्तमान ऐकून मंत्रीस बलावून आतां ताम्रमुखावरी युद्धास जावयास अनेक द्रव्य पाहिजे त्यास्तव कित्येक राजे जिंतून यावेसें म्हणतांच मंत्री प्रत्युत्तर दिलें जे—महाराजानी केली तजवीज युक्तच युद्धासहीं निघावें परंतू दिल्लीश्वराचा मामा सांप्रत पुनेंत आहे. तो महाराज राजगडास आलें वर्तमान ऐकून असचें राज्य सिंह पर्वतप्रांत आक्रामिणेचें योजून कारतलब म्हणणारास कांहीं सैन्य समवेत पाठविणेस निश्चय केला आहे त्यास्तव तो मार्ग निरोधावा म्हणतांच ते ऐकून आपण सैन्यानिशी जयवल्ली प्रांतास जावून खालील आंतील राणांत लोक दबवून ठेविले. त्यानंतरें कारतलबखान व अमरसिंह आणी राजे व्यांघ्रो व जसवंत व सूर्य राजा व कोकाटे व मित्रस्नेह हे समग्र सैन्य समवेत निघून भीमपुर व कल्याणपुर व पनवल्लीपुर व कश्चपदेश हेसमग्र स्वसैन्य समेत निघून भीमपुर वगैरे स्वाधीन करून घेऊन लोहांदीचे राणचे मार्गे सिंह पर्वत उतरून त्या खालील रान परदळ समेत होतेते न कळतां राणीं प्रवेशून दोन तीन दिवस वासकरून पलीकडें साधणेस निघाले. तेंव्हां शिवाजीराजे समोर निरोधिले. दोभागी होतेते राजसैन्यकहीं घेरून

उंब्रगांवचे रानांत बहुत युद्ध केले. उभयतांस युद्ध होताना यवन सैनीकास युद्ध शक्ती नाहीशी जाहली. तेंव्हां राजव्यार्थी ह्मणणारी सरदारिणे कारतलफखानास पाहून ह्या रागी दिल्लीश्वराचे सैन्यसमग्र हत करिणेस इच्छितोस शिवाजीराजे तुजला जीवानिशी सोडीत नाहीत. त्यास्तव त्यासच शरण जावून येथून चुकून जाणें बरें म्हणतांच ते युक्तसें समजून कारतलब आपले हेजीबास राजासमीप पाठवून भरवसा घेऊन येथें आले होते ते राजे समग्र आपलं सर्वस्वहीं राजास देऊन शास्ताखानाकडे निघून गेले. त्यानंतरें शिवाजीराजे फार संतोषानें शत्रूनें दिल्हें सकल सैन्य व द्रव्य घेऊन व आपला मंत्री नेतोजीसी तजवीज करून पुनश्च ताम्रमुखाचे राज्य स्वाधीन करणेनिमित्त दालीयपुरास जावून तो देश स्ववश आणून पल्लीवन प्रांतास गेलें. त्यादेशाचा राजा जशवंत पूर्वी राजाचें भयेंकडून श्रृंगारपुर व प्रभावळी पट्टणाचा प्रभू सूर्यराजासमीप पळून गेला. तो राजाहीं याला संरक्षण करीत होता. ते राजे पूर्वी अपराधी असूनहीं पराधीन त्यामुळें त्यावरी अपराध न मानितां उपेक्षा करून चित्रपुळीन दुर्गास जावून तेथें श्रीपरशुरामस्वामीचे दर्शन घेऊन बहुत पूजन करून श्रीभार्गवापासून वरहीं संपादून त्याप्रांती त्यानी दिल्हा करभार घेवून ब्राह्मणास बहुत दानधर्म देऊन संगमेश्वर दुर्गास गेले. तेथील म्लेच्छ पूर्वीच राजभयेंकडून पळून गेले. तो देशहीं स्वाधीन करून घेऊन तेथेंच जशवंतानी नीलकंठ राजाचे पुत्र ब्राह्मण मलसूरचा वंशस्थ त्याने जितासमवेत राजाचे निरोपावरून संगमेश्वरास येऊन पावले. तदनंतरें महाराजानी सूर्यराजावरी दयाकरून संगमेश्वरीं माझें सैन्य आहे

तुमचेंसें समजणें कांहीं दुर्बुद्धि न करिणेसें राजास हरकाऱ्या समागमें सांगून पाठवून आपणास शरण आले. ते राजेलोकांस अभय देवून राजपुरास पाठवून तेथें असूनच समुद्रतीरींच राहणार कित्येक फरंगाव द्वीपांतरीं असणार समुद्रांत जाहजाचा व्यापार करणार व समस्त राजांस स्ववश करून, त्यांकडून अनेक करभार घेऊन, आणि राजपुरी असतां शिवाजीराजास अंजन न घालितां बहुत द्रव्य मोहराचे कढाया दृष्टीस पडल्या. तेंहीं घेऊन आणि बहुत सामान त्या त्या देशाधिपतीकडून करभार आणवून त्याकडून घेतिला सामान सोने, रुपें, पोलार, शीशें, तांबें, लोखंड, काळेशीशें, कांशें, पश्चिमसमुद्रांत सोन्याची वाळू होती, ते, मोते, मरकत, पद्मराग, वज्र, पोंवळीं, लाख, खडगपात्रें, शिंगचामरें, शिखिग्रीव, त्र, चाक्षुषी, व, त्याविना हे तीनी वस्तू अजमद वाल्हाक, चरक, लोध्रक, गुग्गुळ, पावलाशक, मंजिष्टा, नागसंभव, पारा, हरिताळ, गंधी सामान, नराळीगंधक, गोरोचन, अभ्रक, वत्सनाभी, आदिकरूनी विषवस्तू विषपरिहार औषध, जरीमाल कापडें, शालाचे जिनस कापडें, रेशमी जिनस कापडें, तेंहीं घेऊन. बहूत नाजूक समाने, त्यां त्यां कडून घेऊन अपलें समस्त दुर्गांत पाराचांत ठेऊन तदनंतरें शटवल्लीचे समदळ व हरिचरी व नैखनाथ व कुतबटकेला वल्लीक शनवल्लीका व नाथबाट पासून धावें सांवळा वटच्छार पट्टण ऐशे देशाचेराजे राजाकडून करभार घेऊन सकल देशहीं स्ववश करून घेऊन राजपुरांत होते. ऐसें असतां यदलानें शिवाजीराजास कांहीं शल्य करिणेस सूर्य राजास लिहून पाठविल्या वरून त्याने संगेमेश्वरांत त्यांस रात्री रोधिले. त्याला मल्लसूराने

सुसामर्थ्यें अद्भुत युद्धकरून मारून पळविले. सवेंच शिवाजीराजे राजगडाहून संगमेश्वरास येताहेत असें वर्तमान ऐकून मल्लसूर प्रभृति राजसन्मुखें येऊन दर्शन घेतलें. तेव्हां नीलकंठराजाचे पुत्राने तानजिताचे सामर्थ्य महाराजास कळविलें. ते ऐकून त्याला व सकल लोकांस बहुत सन्मान करून सूर्यराजावरी राग क्षमा करून पुनश्च हरकार्यासमागमें आपण पल्लीवन प्रदेश घेणेस जातों, तू बहुत अपराधी जाहल्याही, क्षमाकरून तुजला जीवभरवसा दिल्हा आहे. शीघ्र सावध होऊनी राहणेसें सांगून पाठविले. हे ऐकून आपण येतोसें सांगून पाठविलें. परंतू, न गेले. राजे पल्लीवनास जावून ते राज्य गड किल्ले समग्र आपलें स्वाधीन आणून तेथील लोकांस अभय देवून पूर्वीहून अधीक वस्ती वसवून तेथें चिरदुर्ग म्हणून येक पर्वत होता त्यावरी येक नूतन प्राकार वांधून मंडतगड म्हणून नाव ठेऊन तेथें समर्थसा येक अधिकारी नेमून कांहीं सैन्यहीं तो प्रांत रक्षणार्थ ठेऊन शृंगारपुर घ्यावें म्हणून रागानें पंधराहजार सैन्यासहित निघाले. पूर्वीच शृंगारपुर न घेतां सांप्रत रागकरणेस कारण काय म्हणाल्यां शिवाजीराजानी जयवल्लीगांव साधाथेंच ईश्वरावतार असें समजून सूर्यराजास आपण महाराजाचा क्रयपुत्र म्हणून शरण आला होता. त्यानंतर वारंवार बहुत सेवाहीं करीत होता. सांप्रत ग्रहचारवशें दुर्बुद्धीकडून यवनाचे गोष्टीवरून द्वेष आरंभिला. तरीहीं अपराधें क्षमाकरून वलावून पाठविलें असतांहीं येतों म्हणून न अल्यामुळेंहीं राजास बहुतराग येऊन निघाले. ते शृंगारवनासमीप येऊन पावले. हे वर्तमान सूर्यराजाने ऐकून पहिले आपण अनेक सैन्य आणविले. ते राजे पल्लीवनास जातांच

इत:पर आपणावरीं युद्धास न येतील असें समजून सर्वत्रास निरोप देवून पाठविले ते इत:पर येवूं सकनात असें अपले मित्रासी तजवीज करून कित्येक सैन्यासमवेत पळून गेला. तेंव्हां राजे वाट कठिणशा रानांत येऊन राजा पळालासें वर्तमान ऐकून विरस होऊन श्रृंगारपुरहीं घेऊन तेथील लोकांस भरवसा देवून अनेक प्रबलसी प्रजा सकल जातीचे सकल कामाचेंहीं वसवून, त्र्यंबकभास्करयांस प्रभावळीचें राज्य देऊन इतक्यांत ग्रीष्म कालहीं आल्याकरितां शिवाजीमहाराज अनेक शीतोपचार अनुभवीत बहुत संतोषानें श्रृंगारपुरी वास करिते जाहले. तदनंतरें परतून पनाळास येऊन पनाळ स्वाधीन करून घेऊन तसेंच दक्षिणप्रांती बेंगळूरासहित व चंदीप्रांतहीं सन् १६७७ इसवीस घेवून व त्या चंदीराज्याखालील प्रबल बंदर पुरचे रीत फराशीस होते. त्यास सन् १६६० इसवींत करारमदाराची टूीटी करून देवून तेथून आणखी कित्येकराज्य स्वाधीन करून घेवून तेथून पूनाप्रांतास जावून चिल्लर कोठेकांहीं पांगळाचा मनुष्य होता त्याकोगास मारणें, शरण आल्यां सोडणें, अपेक्षिले त्यासी चाकरींत ठेविणें, येणेंप्रमाणें तेथील ठाणी समग्र बंदोबस्ती करून तदनंतरें चक्रावती संग्रामदुर्गासहीं ठाणी ठेवून येकंदर नि:शल्य करून पूणेप्रांतास येवून राहिले. त्यानंतरें दिल्लींद्र अल्लीयदिल्शाहा उभयतानी शिवाजीराजाचे वर्णना केली जे–राजा स्वतंत्र शूर, भाला, बर्ची, तरवार वगैरे सकल युद्धांचे हातहीं राजास चांगलें कळताहेत. भाल काठीचे आयुधहीं नूतन येक कल्पविलें. दुसरें आपण श्रीमंत होऊन दरयेक कामें आंगें कडून प्रयासाचेंहीं करणें याखेरीज सकल जनरंजक अतिशय बुद्धिवंत धैर्यवंतहीं

राज्यकरणाराचीं अंगें साम, दान, भेद, दंड, हीचारी प्रयत्नेहीं समय जाणून करणारे आणि जे साधारणेंकडून कैशा प्रबल कार्यातेंहीं अतिश्रमें कडून कार्य जाणूनहीं आणि करणारहीं व परम नीतीवंतहीं आणी दयावंतहीं शरणागत संरक्षणहीं नीट करितो. रूपौदार्य गुणेंकडूनहीं पूर्ण आहे. या इतुक्या गुणेंकडूनहीं वरिष्ठ आहे. ते मात्र नव्हें. ईश्वर वरप्रसादहीं येणेकडून भलत्याठायीं अनेक निधी सांपडताती. शत्रूच्या लाखो फौजा मध्यें राजाकडील सैनीक स्वल्प जन जेथून हरहर महादेव म्हणून शब्दकरुन येऊन पडतांच परसैन्य समग्र हाताहत होऊन जातें. ऐशाराजास जिंतणें असाध्य वरें, स्नेहानें आम्हांहोऊं म्हणालियां तेणेंकडून आपल्यास लाघवहीं आहे. दुसरें तेंव्हां प्रयासकरितां याराजाचे वाटे जाऊन रणें करून आपला फौजेचा व द्रव्याचा नाश न करितां उगाच आपुले ठायीं असणे वरें म्हणून अल्लीयदलशाहा व अवरंगजेवहीं आपले ठायीं स्वस्थ राहिले. तेंव्हां दिल्लेश्वर ऐशे अवरंगजेवानी फौज सन्नहाकरून शिवाजीराजावरी अपणच युद्धासजाणें म्हणून निघाल्या समयीं आपले फौज समग्र शिवाजीराजाचे पराक्रमें भयें कडून मग्न आहेत. ही पाहून मनी कांहीं खिन्नशा व आपल्या फौजेवरी रागहीं धरून चालेकरून जातेवेळेस येक्याप्रदेशी नदींत आपण वसल्या खांस घोड्यास आपणच अनालस करून पाणी पाजविले. तेंव्हां तो घोडा एकदम्म पाणीपीवून परतून दुसरेंदा पिणेस तोंड पाण्यासमीप नेतेसमयीं उसळून पाण्यास आलीकडे कांठावरी येऊन परतून पाण्याकडे पाहिनासे झाला. तेंव्हां बाच्छाई वरी होते. त्यानी सांभाळून वसून आपल्या घोड्यास पाहून येथेंहीं शिवाजी

आलाकाय कां घावरा झालास ह्मणून फौजेकडे पाहिले. तरी त्याफौजेचे चित्तईं व्यग्रजाणून तेथेंच मोकाम करून शिवाजी राजास जीतधरून पहावें म्हणून अनेकप्रयासें केलें. परंतू साध्य जाहिले नाहीं करितां त्यांचा सुरत तरी लिहून आणून पाहावी म्हणून योग्य ऐशा चितार्‍यास पाठविले. आपण तेथून कुचकरून मुरडून स्वस्तळास पावले. त्या चितार्‍याने येऊन बहुतदिवस समय पाहिला परंतु राजाची रीत, देश, सांपडण्याचे आयासा-करितां राहिल्या स्थळी राहणे नाहीं. येका देशावरी जाताहेत ह्मणून राखून असते वेळेस पलीकडें एक प्रदेशी वीसगावें, तीसगावें, भोई वरी आहेत म्हणून ऐकणें. तेथें जाऊन पावतोरी आणखी कोठेंकीं वर्तमान कळेंना नाहीं अशांत शिवाजीराजानी अमुकादेश बांधिला, आमुके राज्य बांधिले, अमकी ठाणी ठेविले. पलीकडें अमुक्या राज्यावरी चाली केले ऐसें ऐकणे मात्र परंतु राजे दृष्टिपथास येईनात. ऐसे अनेक दिवस फिरत असतां येक्या दिवशी मोहिमेचे वेळेस या व खळक अनेक पुढे ओढणे. निखळ स्वार मात्र तीनिलक्ष स्वार जमाव निशीसी शिवाजीराजे राज्यसाधण्याचे कार्योद्देशेंकडून त्वरेने जाणार अशास त्या चित्तार्‍यानें पाहिलें. तेंव्हांचा अवसर शिवाजीराजे भल्या घोड्यावरी स्वारहोऊन शिरीं मुंडास, माजांत माजचोळना, जोडे, छत्री, पासोड्याची पंचगी, वाछण, हातीचा भाला, खांद्यावरी ठेवून मस्तकाने दावून घेवून जोधल्याचे शेतांत जाणार—हाती जोंधल्याचे कणीस घेऊन दोन हाताने ते कणस चोळून फकरा-मारून त्याचा भुलटा घोड्यांचे तोंडांत देतहोते. तैशा अवसरांत चित्तार्‍यानें पाहून त्याचरीति सुरत लिहून नेवून औरंगजेबापासी

दिल्हा. ते पाहून आश्चर्य मानिले जे-शिवाजीराजा नीतीनें लक्ष स्वाराचा सरदार श्रीमंत तसा राजा कार्य साधणेच्या तात्पर्यास्तव येकेठायीं उतरून न्याहरीकरावयाचा विळंबनांत कार्यनासून जाईल ह्मणूनहीं जवळील सरदार आपल्या मनोगतानुसार कार्यकरणेस खोळंबतील ह्मणूनहीं जोधळ्याचे कणसचोळून खावून त्याचा भुलटा घोडयासहीं चारिणाऱ्या राजाचाहुशार आणी प्रयासीराजा साजणार. कोणत्या विषयीं प्रयास करिणे व्यर्थ ह्मणून दृढमानून स्वस्तराहिले. हा राजा अनेक राज्य साधून अनेकद्रव्य संपादून ईश्वर प्रसादेंकडून अनेक निधिला-लाधून अमितद्रव्य जमा जाहल्यावरी आपला नाम्ना अणखी कोणत्यारीतीने प्रख्याती असावी ह्मणून योग्य डोंगर पाहिल्या-ठायीं येकंदर गड बांधवणेस आरंभून मुख्य शिवगड व मंडन गड ऐशे तीनशे साटी गड बांधिले. तदनंतरे शिवाजीराजानी आपले ज्येष्ठबंधू संभाजीराजांचेपुत्र उमाजीराजे व संभाजी-राजाच्या स्त्रिया जयंतीबाई एक, गौरीबाई एक, पार्वतीबाई एक, यातीघीमातोश्री बाई साहेब समवेत उमाजीराजे व त्यांचीस्त्री. सौ० सकूबाई साहेब यांस समग्र राजपुर ह्मणावयाच्या राज्यांत ठेविले. तदुपरि कित्येक दिवसानंतरें उमाजीराजास सकूबाई-पासून परसोजीराजे जन्म पावले. तदनंतरें शिवाजीराजास वडील सावत्र मातोश्री तुकाई आवूसाहेब यांचे उदरी जन्मपावले येकोजीमहाराज यांस पेसजी शाहाजीराजानी येकोजीराजे वडील संतती करितां कुलदैवत व अपली पहिलीलें विरुदें व अह्लि-यदिल्शाहानी सदर बकशीस केले तेव्हां प्राप्तजाहलीं विरुदें दिल्हें होतें ते येकंदर विरुदें देऊन व घोडयावरील अंबारीहीं

येकदेऊन त्याच्या स्त्रियास उंगदीपाबाई आबूसाहेब आदिकरू सौग मातोश्री सईबाई एक, सौग मातोश्री अनुबाई एक, या त्रिवर्गांसहीं समागमें देऊन आपण आणखी कित्येक स्वारवार सन्नाह देऊन बेंगळूर राज्यास पाठविले. त्यांनी बेंगळूरींच राज्य करीत असतां शक १५९३ परीधावी संवत्सरी एकोजीराजे यांचे उदरीं सौग दीपाबाईसाहेबापासून प्रथम पुत्र तिसरे शाहजीराजे जन्मपावले. त्या संधींत अल्लीयदिल्शाहानी तजवीज केली जे शिवाजीराजे प्रबळहोऊन राज्यसमग्र आटोपिले. त्यांस खाली करावें ह्मणून अह्मी व अवरंगजब बाच्छायानीहीं उदंडदा युद्ध करून उदंड प्रयत्ने केल्यासहीं आटोपनासें गले. आतां एकोजीराजे त्यांचे सावत्रभावू व बेंगळूरी पावले आहेत करितां त्यांसी संविधान करून आपलें करून घेऊन दक्षिण-प्रांतावरी तरी आपली सत्ता चालिजेसें करावी. नाहींतरीं शिवाजीराजे यांस वळेंबांधून तेहीं आक्रसितील. आतांच आह्मी येकोजीराजास आपले केल्यानें शिवाजीराजेहीं आपले भावू स्वकर ह्मणून त्याबाटे जाईनात ह्मणून तजवीज करून येकोजी-राजास तुमचे वडील शाहजीराजे अमच्या अनुमतीवरी जैसें होतेकीं तैसेंच तुह्मी असावें ह्मणून उदंडरीतीने संविधान पाठ-विले. त्यास त्या येकोजीराजानी तजवीज करून युक्तमानून अल्लीयदिल्शहाची गोष्टमानून अनुसरले. येकोजीराजे बेंगळूरी राज्यभार करीत असतांना तंजावूर राज्यांत राज्य करणार नायडकूटानी त्रिचनापल्लींत राज्य करणार नायडकूटासीं विगाड पडून तिरचनापल्लीचे नायड बलवंत झाल्याकरितां त्यांकडून आपलेराज्य अपहृत होईल ह्मणून दृढमानून त्या

त्रिचनापल्लीच्यानी तंजाउरच्या किल्यावरी युद्ध करीत असता निर्वाहनाहीसें विजापुरास अल्लीयदिल्शाहा बाच्छाईकडें हेजिबास पाठविले. त्याने जाऊन खादार एक, खलासखान व अवदल्हलीम या दोघेवजीरांस अनसरून त्यांच्या गुजराताने बाच्छायाची भेटी घेवून आपुले यजमानाचा हवाल जाणविले. तेंव्हां अल्लीयदिल्शाहानी या खादारऐक खलास व अवदुल्हलीमासच कुमुकेस जा ह्मणालें. त्यानी अपली फौजच पुरना अणखी कुमकपाहिजे ह्मणालयाकरितां एकोजीराजे बेंगळूरी होते त्यांस दस्तक देऊन त्यांसहीं बरोबरी घेऊन जाह्मणाले. तैसेंच तें उभयतां वजीर बेंगळूरास येऊन एकोजी राजाची भेटीघेऊन दस्तकदिल्हे. राजानी ते दस्तक मानून या उभयतां वजीराशी घेऊन तंजाउरचे वकीलहीं येकोजीराजास कुमुकेस्तव प्रार्थना केले. तेंव्हां येकोजीराजे सकळ सन्नाहानिशी कुमुकेस येताना वाटेस आरणीचे राज्य साधून वेदाजीभास्कर यास आरणीचे किल्यांत ठेऊन तंजाउरास येऊन त्रिचनापल्लीच्यांसी युद्धकरून त्यासीं पळवून तंजावुरच्यास मोकळीक करून आपण बेंगळूरास प्रयाण होउन तिरुमलवाडींत राहिले. तेंव्हां त्यांची स्त्री दीपाबाईसाहेब पूर्णगर्भिणी समागमें होते. येकोजीराजे तिरमलवाडीस उतरलें तेंव्हां दीपाबाई साहेबास प्रसवकाल होऊन येकोजीराजास द्वितीय पुत्र शक १५९६ राक्षस संवत्सरीं तिसरे शरफोजी राजे जन्मले. तेंव्हां येकोजीराजास स्वप्नांत देवानी येऊन सांगीतले जें " तुम्ही तंजावरचें राज्य सोडून जावूनका. तुमचे वंशा परंपरेने हे राज्य भोगावें यास कारण आहे. उद्या पाहाटे तुम्हास संविधान येईल " म्हणून सांगीतले. तैसेंच दुसऱ्यांदिवसीं

तंजावरांतून योग्या योग्य चर्चामुळें येकास येक भेदपडून अमात्यपण करणारहीं विगडून तिरमल्वाडींत होतेत्या येकोजीराजांस तुम्ही हे राज्यपरिपालन करावें म्हणून प्रार्थिले. ईश्वर संकल्प टळतांनये म्हणून अंगीकार करून येकोजीराजे तंजावर किल्ला प्रवेश केले हे पूर्वोत्तर पुढें विस्तारें कडून तंजावूरप्रांती या राजवंशाचे राजे राहिले. ते प्रकर्णें लिहिण्यांत लिहिलेजाते. पुनाप्रांती सकल दिग्विजय करून राहिले शिवाजीराजे यांस अष्टनायिकांची नावें सांग सईबाई लिंबाळकराची १, दुसरी काशीबाजाधराची १, तिसरी सखवारबाई गायकवाडाची १, पुतलाबाई पालकराची १, पांचवी सगुणाबाई शिरक्याची १, साहावी सोयरीबाई मोहित्याची १, सातवी मालव्होची लेंके १, आठवी विचान्याची लेंके १, या अष्ट नाइका समवेत शिवाजीराजे सुखें भोगीत असतां वडील सईबाईच्या पोटीं तीघीकन्या व येकपुत्र जन्मले. त्यांचें नाम संभाजीराजे म्हणून ठेविले. त्या संभाजीराजाचे जननशक १५९८ पिंगळसंत्सर; तीघी कन्यापैकी प्रथम कन्या सखवारबाईस लिंबाळकराचे घरीं दिल्हें. दुसरी कन्या राणूबाई जाधवाच्या घरीं दिल्हे. तिसरी कन्या अमाणिकाबाई महडीकाचे घरीं दिल्हे. त्या हरजी महडीकासच चंदी प्रांती कित्येक जाहगीरहीं दिल्हें. दुसरीस्त्री काशीबाईसाहेबास संततीच नाहीं. तिसरी स्त्री सखवार बाईसाहेबास कमलाबाई ह्मणून येक कन्या ते पालकर नेताजीस दिल्हें. चौथी पुतलाबाईस संतती नाहीं. पांचवी सगुणाबाईस राजकुमारीबाई ह्मणून कन्या जाहली. ते गणोजी शिरकेयांस दिल्हे. साहवी सोयिरीबाईस येकपुत्र जन्मले. त्यांस राजारामराजे

ह्मणून नावें ठेविले. दुसरी कन्या दादूबाई. तदनंतरें शिवाजीराजेयानी आपुले दोघेपुत्र संभाजीराजे ज्येष्टास शके १६०३ दुंदुभीसंवत्सरीं आपले स्वराज्य पुणें प्रांताचे तक्त देऊन धाकटेपुत्र राजारामास प्रथम चंदीचेराज्य दिले होते. सर्वेच महत्कलापें कडून पुणप्रांत समग्र यवनाक्रांत झाल्यावेळेस राजाराम चंदीहून निघून तंजावूराचे किल्यांतहीं थोडे दिवस भावापासी असून उपरी शिवाजीराजानीं बलावून पाठविलें. तेंव्हां बापापासी पावले होते त्यांस पनाळगड देऊन आपण शेतूयात्रेनिमित्त गुप्त मार्गेंकडून येऊन यात्रा शिद्धी करून त्यांत येककित्ता अगोदरी येकोजीराजे तक्ती बसतांच राजे गुप्तमार्गें तंजाउरचा किल्यांत येऊन किल्ला फिरून पाहून बाहेर जाऊन येकोजी राजास सांगून पाठविले जे–" तुह्मी संपादिले राज्यसमग्र आह्मी पाहिले. तुमचा किल्ला गरुडाद्रि आहे. थोर किल्यास चारीबाजूस किल्ले आहेत परंतु पुढें राखणें कठिण पडेल याकरितां दक्षिणेकडील उपकिल्लामात्र पाण्याच्या आसपास आहे. तेवढा किल्ला राखून बरकड पाडून सोडणें. अह्मी किल्यांत आलें तेंव्हां येका दुकानांत अमचा शिखा टाकून शिरणी घेतली. तो शिखा पाठवणे " ह्मणून त्या दुकानची खूणहीं सांगून पाठविले. तेणेप्रमाणेंच तंजावुरी असणार राजानी विकिले होते. तदनंतर येक कित्ता शेतूयात्राहीं करून स्वस्तलासी पावले. तदुपरि शिवाजीराजे दोघे पुत्रास राज्यनेमून सकल पृथ्वींतहीं प्रख्यात गामपावून सकल शत्रूसहीं पराजय पाववून निःशल्य जाहल्यावरी जन्मधेतल्यास कृतकृत्यता कांहीं जाहलें ह्मणून प्रपंच व राज्यपदवीचा परित्याग न करितां पारमार्थिकें निवृत्ती मार्गाचेठायीं मन प्रेरून तोच दृढाभ्यास धरून श्रीगुरुवाक्याचें मनने कडून निजध्यासहीं

जाहल्या दशात पर्याप्तीचे दिवस ढकलून शाश्वतऐशा स्वपदास आनंदरूप होऊन पावले. त्याउपरी संभाजीराजे पितृकीर्तीस विस्तारवीत राज्य परिपालन करीत असतां दिल्लीश्वरऐशा ओरंगजबानी सविक्रमेकडून बावन्न वाळइताहीं साधून, सार्वभौमनामें पाऊन, सकलदेशाचे देशाधिपतीस भेटीस बलाऊन पाठविले. तेंव्हां अखंमाबाद ह्मणावयाचें स्थल अवरंगजेबाकडून निगिजेले त्या स्थलास सकल देशांचे राजां बरोबरी संभाजीराजेहीं जावूनहीं पावले. तेंव्हां सर्वत्रानी बाच्छायाचे भेटीस गेले. तेंव्हां लवून सकळहीं खुरनिशी केले. तैशें संभाहीराजे खुरनिशी न करितां उभेराहिले. त्या वरून पादशाहास रागयेऊन संभाजी राजास कैद् करविले. त्याचे कैदेंत साहा चार महिने असून, शिरनीचे पेठाऱ्यांत बसून बाहेरी येऊन, आपल्या राज्यास पावून राज्यकरीत होते. ते कैदेंतून चुकले ह्मणावयाचे अवरंगजेबास कळून सैन्यपाठवून संभाजी राजास धरून आणा ह्मणून निरोपिले. ते फौज राजावरी युद्धास आली. तेंव्हां संभाजी राजानी युद्ध करून आली सेना व सेनानायकास हतकरून पळविले. हत शेषानी जाऊन बाच्छायास जाणविल्यावरी परतून बाच्छायानी भूराशी सनातोसच सेनानायक वजीरासहीं पाठविले. त्यानी येऊन संभाजीराजासी कांहीं युद्ध कांहीं कृत्रिम येकीकडून करून संभाजीराजास धरून नेऊन बाच्छायापासी सोडिले. बाच्छायानी संभाजीराजास पाहून लवून खुरनिशी करा सोडितों ह्मणाले. तेंव्हां संभाजीराजानी आतां आह्मी तुमच्या हाती सांपडल्या सारिखे तुह्मी सांपडते तरी कळोयेते म्हणाले. अवरंगजबास रागयेऊन पुन्हाहीं कैदेंत ठेविले. थोडे

दिवस गेल्यावरी संभाजीराजानी लवावें म्हणून येकीकडें लहान दरवाजा करून संभाजीराजास त्या वाटेने भेटीस बलाविलें तेंव्हां राजे मजकूर पुढेंपांय सोडून आले. ते पाहून बाच्छायानी संतोष मानून हा केवल शूर आहे याला मारूनये म्हणून तुम्ही तुरूक व्हा तुम्हास सोडून देतों म्हणाले. तेंव्हां संभाजीराजानी तुमची लेंक कन्या आहे तिला द्या तुरुक होतों म्हणाले. तो शब्द कठोर वाटून बाच्छायानी मारून टाकणेस हुकुम दिल्हे. तेणे प्रमाणे मारून टाकिले. तेंव्हां शक १६१८ ईश्वर संवत्संरीं वर्तमान बाच्छायाची लेंक उपवर होती. तिला कळून येवढा थोर बरोबरीचा राजा भंयधरीनासें माझी अपेक्षा धरून जीवानिशी गेले. मी तशा शूराचीच स्त्री; त्या वेघळा पुरुषमात्र माझा पुत्र अथवा पिता भ्राता ह्मणून निश्चय करून यवन सांप्रदाया प्रमाणे दाक्षणी लाविली. तुरुकांतील संकेत कन्यापणी दाक्षणा लावणें नाहीं; लग्न जाहल्या उपरि लावणे करिती. लेंकीनें दाक्ष्णा लाविलें वर्तमान बाछाईस कळून लेंकीस पाहून हे काय केलीस म्हणून विचारिल्यास म्या केलेते उत्तमच केलें. परंतू तुम्ही दोनी गोष्टीचे स्मरण धरिले नाहींत काय म्हणिजे तुम्हा सारिख्याच्या पोटीजन्म जाहल्या उपारे मला तुम्ही तुम्हाखालील येकासच द्यावें. संभाजीराजा तैसा नव्हें. तुम्हासी बरोबरीचा दावा राखून तुम्हास सलाम करीना म्हणाल्या योगें शौर्य राखिला. तो या खेरीज बहुत देशाधिपतिराजे अशानें माझी आशाधरुन मागीतल्यावरी यापेशा अधीक कोणास तुम्ही पाहिलां आहां. याखेरीज अमच्या मतामध्ये तुरूक होतों म्हणून कबूल जाहल्याहीं त्याने न मागण्याचे मागीतल्याहीं

देवूनच त्याला तुरूक करिणे हा माप जाहल्याकरितां उभय पक्षीहीं चुकलें. या उपरी म्यातरी भलत्या येकास लग्न करुन घेऊन कितीदिवस वांचणें आहे. मुख्य कीर्तीच राखावी. यास्तव जे मजवरी मोहून जीवास उदार जाहलेकीं त्यांकरितां रांडपण भोगणेच मजला स्वधर्म परंतु संभाजीराजाविना यितरपुरुषासि संभाषण आपल्यास व्यभिचार म्हणून मानिलें म्हणून साफ सांगितल्या वरून; बाच्छायी व्यसनस्थ होवून ईश्वर आपल्या पोटी तीचे लेंकाचे पाटीसी येक कन्यादिल्ही; तिचा संसार निस्सार जाहला. याखेरीज तिनें दोन कारणें सांगून आपला निश्चयहीं सांगीतला. ते प्रपंच परमार्थास युक्त बोलणें बोलिली. परंतु, आपल्यास क्रोधाने वंचिल्या कारितां, क्षमें येवढें थोर नाही म्हणून ग्रंथांतर बोलताती. ते खरच म्हणून आपल्या जिव्हारी खोंचून या उपरी त्या लेंकराच्या मनास कोणे रीती सौख्य देऊन पाहतों म्हणावयाच्या व्यसनानें संभाजी राजाचे भाग्यास योग्य अधिपती कोण्ही आहे काय परामर्ष करून असेल त्यास आणून सोडा म्हणून आज्ञापिले. त्या वरून सातार पुनें प्रांती बाच्छायाकडिल्यानी विचारणा करूं लागले. तेंव्हां संभाजीराजास धरून नेते वेळेस त्याचे उदरी गुणरत्न ऐशे कुलदीपक शाहूराजे शक १६१५ भवा संवत्सरीं जन्मपावून तीन वर्षाचे होते. परंतु त्याचा लाग लावूंदेयीनासें तदीयानी बाच्छायाचे भयास्तव दबविले. त्यास परतून बाच्छायाकडून प्रमाणपूर्वक अभय पावल्या करितां येतद्विषयींचे शोधनेस आले होते, ते कार्यस्था समागमें लेंकराच्या पक्षपात्यानी शाहूराजे लेंकरास घेऊन दिल्लीस पावून औरंगजेब बाच्छायापासी सोडिले. तेंव्हां

बाच्छायानी हर्ष व खेद येक कालीच पावून शाहूराजास आपल्याचे कडेवरी घेऊन, लेंकीचे महालास जाऊन, माये तुझें लेंकास घे म्हणून हाती दिल्हें. तेंव्हां त्या बेगमास परम संतोष होऊन आपल्या सर्व सौख्याचे कारण हेच म्हणावयाचा निश्चय मानून त्या लेंकरास त्याच्या हिंदूधर्मास तिळप्रमाणेंहीं हानी न येतां सर्व विध संरक्षणा सरिसें विद्याभ्यासहीं करविले. शाहूराजास चंद्रवृद्धीसारिखें विद्याभ्यास परिपूर्तीस बारावर्षें वयहीं जाहलें. तेंव्हां त्या बेंगमाने आपल्या लेंकाचे रूप आणि वय व विद्या व सौजन्यता इत्यादि योग्य ऐसी सर्व उपपत्तीहीं पाहून त्याचे लग्नाचे हव्यासास मनें प्रवर्तून बाच्छायास विनविलें. तेंव्हां बाच्छायानी यथायोग्य लग्नाचे खर्चासहीं देऊन त्याचे लग्नहीं करवून नवरा नवरी दोघासहीं घेऊन या म्हणून निरोपिले. तदनुसारच शाहूराजास जाधवाची कन्या सखवारबाईस लग्न करून दिल्यावरी नवरा नवरीस बाच्छायापासी पाठविते वेळेस सोइरे वगैऱ्यानी उदंड बाच्छाई जाहलेतरीहीं यवन जातीची शंका धरून त्या सखवारबाई साहेबांस न पाठवितां त्या स्थानास वीरु म्हणणारी दासीस निष्कर्ष कडून पाठविले. तेंव्हां बाच्छायानी उभयतां नवरा नवरीस दोनी मांड्यावरी बसवून पाहते वेळेस नवरीचेठाईं कृत्रिमता भासूनहीं आपल्या मांडीवरी बसविल्या करितां हे बाइकोच या शाहूराजाचे सकल भाग्यहीं अनुभवील म्हणून उभयतांच्या मस्तकास हस्तस्पर्श करून उभहतांस सकळ आभरण भूषित करून शाहूराजाचे पितृपितामहानी संपादिले राज्यसमग्रहीं राजे मजकूरास सोडून त्यांचें स्वस्थानास निरोप देते समयी, बेगमाने विनविले जे शाहूचे बाईस दिल्हे परंतु

माझें कांहींच माझा त्योंक शाहूस पावलेनाहीं म्हाणाली. ते वाच्छायानी ऐकून विहितच माझ्या भाग्यास माझे तीचे लेंक जैसें विभागी कीं तैसीच चौथी कन्या करितां इचाभाग चौथा तीच्या लेंकास पावावा म्हणून जेथे जेथें वाच्छायाची आमदनी असेल तेथे समग्रही शाहूराजाची चौथाई म्हणून चौथाईचे प्रमाण करून देवून शाहूराजास पूनेप्रांतास पाठविलें. शाहूराजे साता-रास येऊन शकें १६२६ पार्थिव संवत्सरीं तक्ती बसले. तदनं- तर शाहू महाराजानी आपले दाइजा पैकीं येक मूल रघोजी म्हणणारास पोषीत होते. त्या उपरी येके दिवसी स्वारीस गेल्या ठायीं येक लेंकरु फार सुंदर खेळत होतें. त्याला पाहून पालखींत घेऊन वाड्यास येऊन परामर्ष केल्या ठायीं लोखंडे म्हणून राजाचे आप्तकीचे कोणी होते; त्यांचे लेंकरू म्हणून कळून, त्या लेंकरास पोसून फत्तेशिंग म्हणून नाव ठेऊन, त्याचे नावें भारी दौलत हीं करून, योग्य अशाची मूले त्या फत्तेशिंगास लग्नकरून देऊन, त्यास अक्कळ कोटकिल्ला व त्या खालील राज्यहीं फत्तेशिंगास दिल्हें. तैसेंच रघोजी भोंसल्यास वीरूबायीचे ओटीस घालून त्याचे लग्नकरून त्याला वीरुबाईचे आटी घातल्यामुळें उणीव बोलाचे ठाव झाल्या करितां त्या रघोजी भोंसल्यास स्वराज्यांत न ठेवितां योग्यतेच्या मानास उणें झाल्याकरितां नागपुरचें राज्य दिल्हे. तदनंतरें आणखी आपले दायिजा पैकीं पेसजीवंश लिहिल्यांत तेरा पुरुष बावाजीराजे म्हणून लिहिलें आहे. त्यांचे पुत्र मालोजीराजे १ व विठोजीराजे म्हणून ऐसे मागे लिहिलें आहेत. या खाले त्या विठोजीराजास आठ पुत्र जाहले ह्मणून

निजामशहाचे वेळेस त्या आठजणापैकीं येकदोघाची ख्याती लिहिली आहे. त्या आठभावापैकी मालोजीराजे ह्मणणाराचे लेंक माणकोजीराजे, त्यांचे लेंक विठोजीराजे, त्यांचे लेंक परसोजी-राजे, त्यास दोघे पुत्र, ज्येष्ट संभाजीः दुसरे रामराजे. त्या रामराजास शाहूराजानी ठेऊन घेऊन पोषीत होते. तदनंतरें कित्तेक दिवसा वरी शाहू राजास केवळ उपद्रव झाला. तेंव्हां शाहूराजानी पून्यांतून पेशव्यास बलावून पाठवून तुह्मी कोणत्या रीतीहीं आमचे नांवें राखा म्हणून सांगून परमपदास पावले. उपरी राजानी पोसिलेते रामराजास शकें १६७४ श्रीमुख संवत्सरीं तक्तीं बसविलें. त्यानी कित्येक दिवस राज्य अनुभवून निर्याण समयीं त्यांचे विठोजीराजाचे आठपुत्रांपैकीं खेळोजींराजाचे नातू उमाजीराजा म्हणून वागत असणार त्यांचे लेंक शाहू राजास रामराजे देवगतीस पावल्यानंतरें शके १६९५ जयासंवत्सरीं साताराचे तक्तीं बसविले. आतां तेच राजे होऊन आहेत. शिवाजीराजाचे दुसरे पुत्र राजारामास पनाळ्याचे राज्य दिले होते. त्यानी देह ठेविल्यावरी त्यांचे कुलदीपक औरसपुत्र संभाजीराजे म्हणणार राज्यकरीत होते. त्यांस संतती नाही. निर्वतते वेळेस आपले दायिजापैकी येक मूल घेऊन त्यास शिवाजीराजे म्हणून नावे ठेऊन त्यास पनाळ्याचे तक्त देऊन संभाजीराजे निवर्तले. पेसजी ते शिवाजीराजेच राज्य करीताहेत आतां येकोजीराजेयानी तंजावुर साधिले. त्यांच्या वंश विस्तारातें लिहितों जे–भोंसलवंशात येकोजीराजे म्हणून नाव पावले. चौथे येकोजीराजे दुसरेंदा बेंगळूरी राज्यकरीत असतां विजापुरचे बादशाहा अह्लीयदिल्शाहासीं पत्रें आली. त्यांत तंजावूरचे राजे

विजयराघव नायड वगैऱ्यावरी त्रिचनापल्लीचे राजे नायडानीं मोहिम् करून किल्ला वेढिला आहे म्हणून तंजावुरचे राजानी वक्कीलास पाठविले करितां खादर १, खलासखान् व अबुदुल् हलीम् याबुभयतां वजीरांस थोडी फौज देऊन पाठविलें आहे तरीं तुम्ही आपले फौजेनिशी यां बरोबरी जावून त्रिचनापल्लीचे नायडाची फौज मारून काढ्डून तंजाउरच्यांस मोकळें करून वादशाही प्रेषक व त्यावरी बाकी आहेते वाहाल फौजेचे नालबंदी मोकरोर पावली तेंहीं त्याकडून घेऊन पाठवणें म्हणून लिहिला अर्थ मानून राजेमजकूर बेंगळूरचा किल्ला व राज्यहीं कागलकर घाटे जुझाखा याचे स्वाधीन करून उभयतां वजीरां बरोबरी स्वार होऊन येतेवेळेस आरणीचे राज्य साधून तेथून तंजावर प्रांतास येऊन त्रिचनापल्लीच्या नायडाचे फौज मारून काढ्डून तंजावुरच्यास मोकळें करून प्रेषकशांवि नालबंदीचे पैक्यास्तव आपण तिरुमलवाडींत उतरून बरोबरी आले दोघे वजीर खादर येक, व खलासखान व अबुदुल् हलीम् उभयतांस पैक्यास सक्ती करण्यास्तव किल्या बाहेरच राहते करून राजे मजकूर दुसरे पुत्र शरफोजीराजाचा जन्मकालयामजाहल्याकरितां तिरुमलवाडींत राहिले होते. तेव्हां शके १५९६ राक्षस संवत्सरीं वंशांतील शरफोजीराजे म्हणून नाव पावले. त्यांते तिसरे शरफोजीराजे जन्मले. याचा अर्थ वरि लिहिला आहेकीं त्याउपरि तंजावुरचे राजे विजयराघवनायड वगैऱ्यानी प्रेषकषीव तालबंदीचा ऐवज देण्यास लबाडी करून येकांत येक योग्य अयोग्यतेचे चर्चा पड्डून विजापुरास पाठविल्या वकीलाचे निराकारणें करून किल्या बाहेरील दोघे वजीरासहीं दगाकरावें याची

योचना करून दुसरा किता न पावल्या करितां बादशाहीतें पैक्यास जमा न जाहलातो नायडाचे अमात्यपण करणार व वक्कीलहीं बिगडून कोटा बाहेरील उभयता वजीरांपासी येवून नायडकूट फार दुर्वृत्त जाहले चर्याहीं फार अमंगळ वर्ततातो; राज्यही बुडविले, येकांत येक नाहीत, तयाच्यानें राज्य सांभाळवतनाही करितां तुह्मी हे राज्य आक्रमावें; व्यर्थ येकांत येक भांडून पंधरा वीसजणास मारणार आहेत. आहेते फौज ह्या राजाचे वश वर्तत नाही. उद्या परव्हांत हल्ला करून राजास मारून लुटणार आहेत करितां तुह्मीच हे राज्य करावें ह्मणून सांगीतले. तेंव्हां ते खादर येक खलास व अबदल्हलीम् दोघे वजीरानी येक दोन दिवसाचे अभ्यंतरी राज्य शोध केल्याठांयीं याउभयतानी सांगीतले ते येकंदर खरेंच; याहीं विना राज्यांतील फौजेचे सरदारहीं येऊन बोलूं लागले. तेंव्हां अशा त्या वकीलासहीं उभयतां वजीरानी सांगीतले जे— अह्मा कडूनच होणार नाहीं. येकोजीराजे तिरमलवाडींत आहेत त्यांस आह्मी पत्र लिहून देतों. तुह्मी उभयतां जावून त्यांस बलावून आणिल्यां कार्य साधेल ह्मणून सागून पत्र लिहिले. ते घेऊन अशा वकीला उभयतानी तिरमलवाडीस येकोजीराजापासी येऊन पत्रहीं देऊन किल्ल्यांतील राजाचा व फौजेचा व दायिजाचा विचारहीं जाणवून प्रार्थना केली. तेंव्हां येकोजीराजे जरूरी भांडली फौज मात्र घेऊन तंजावरास येऊन उभयतां वजीरासीहीं बोलून, समागमें घेऊन शकें १५९६ राक्षस संवत्सर माघशुद्ध सप्तमीस तंजावुरचा किल्ला प्रवेश करून आले. ते किल्ल्याच्या उत्तरेचा दरवाज्याने आंत आले. त्याने आला तो

दरवाजा करितां अल्ली दरवाजा ह्मणून नाव पडलें. तेथून समोर दिशेने दक्षिणेस कित्येक दूर आल्यावरी दिवाणवाड्यांतून राजे नायड व त्यांचे दायीज भाऊबंद थोडी फौजहीं घेऊन समोर आले. त्यानी हत्यार धरून भांडल्या करितां तंजावुरराज्य केलेते नायडांचे फौज वगैऱ्यां पैकीं त्यांत आठजण ठार जाहले. वरकड वाताहत होऊन गेले. किल्ला फतेजाहलें याउपरी वरकड शल्य होतें तेहीं काहडून निःशल्य करून सवेंच पूर्वेचे दर्वाज्याने निघून बाहेर येऊन राजे उतरले. फत्तेकरून आल्या दरवाजास फत्तेदरवाजा ह्मणून नाव पडलें. तदनंतरें किल्ला तो मोकळा जाहला. पहिलें अमात्यपण करणारासच त्या वेळेस काम पाहणेस नेमून राजे व उभयतां वजीर बाहेर उतरल्यांवरी येकोजीराजानी उभयतां वजीरांस वेंगळूरास जाणेस निरोप मागीतले. तेंव्हां उभयतां वजीरानी अमचा विवाद वारतोर असावें ह्मणून प्रार्थून हे राज्य मला तुला ह्मणून भांडू लागले. अशांत दोन महिने लोटून गेले. इतक्यांत अवरंगजब बाछायाची मोहिम् होऊन तमाम बाछाईचा अवरंगजबाचे हस्तगत जाहला ह्मणाबयाचे वर्तमान आले. विजापुरहीं भांडजातेईलकी राहीलकी ह्मणून संशयांत पडून खादर येक, खलास व अबदुल्हलीम् उभयतां वजीरानी तजवीज केली जे—आह्मी दोघे भांडून येकतरी राहूं परंतु येकोजीराजे निघून जातील मग अमच्याने हाकिल्ला सांभाळवेना. त्रिचनापल्लीचे नायड बलवंत, दुसरें अल्लीयदिल्शाहाहीं अह्मास जिरूंदेयीनात करितां येकोजीराजे शूर आहेत त्रिचनापळीच्यासहीं दाटादेतील; दुसरें त्यांचे भावू शिवाजीराजे त्या प्रांतीं प्रबलेंकडून आहेत करितां, अल्लीयदल्-

शहाहीं यांजवरी कांहीं करणार नाहीत याकरितां राज्य येकोजी-राजानीच करावें. त्यानी वंश परंपरेने अमची मर्यादा चालवावी. येणेप्रमाणे करावें ह्मणून निश्चय करून घेऊन येकोजीराजासही बोलून सम्मत करवून अपली मर्यादा वंशपरंपरेनें चालवावी ह्मणावयाची बोली राजाकडून घेऊन शकें १५९७ नळ संवत्सर चैत्रमासीं तंजावुर राज्याचे तक्तीं येकोजीराजास बैसविले. येकोजीराजास तंजावरचे राज्य प्राप्त होतांच महाराजानी विजापुरच्या अल्लीयदल्‌शाहा बादशहास योग्य ऐशी नजर देऊन खादर येक खलास व अबदुल्‌हलीम् उभयतां वजीरास आपल्यापासीच राहून घेतल्या करितां, त्यांच्या न येण्या वरून बाछाई विमनस्क होईनासें युक्तीनें कागद पत्र लिहून पाठविले. ते पाहून अल्लीयदल्‌शहा फार संतोष मानून येकोजीमहाराजास वस्त्रें पत्रें पाठविण्यासरिसें हे तंजावरचे राज्य येकोजी महाराजास त्यांचे वंश परंपरेने अनुभोगणेसहीं सानक दिल्हें. असें ह्मणून लिहून पाठविले. तदनंतरें त्रिचनापल्लिचे नायडानी येकोजीराजावरी राजकारण केल्यास राजे मजकूरानी युद्ध करून त्यांस दाटादेऊन त्यांकडून संदली महाल पानसुपारीस ह्मणून लिहून घेऊन खादर येक खलास व अबदुल्‌हलीम उभयतांसहीं त्यांसी बोलिल्या मर्यादे प्रमाणे चालवीत राज्यकरूं लागले. उपरि शकें १५९८ पिंगळ संवत्सरीं येकोजीराजास तिसरे पुत्र तुकोजीराजे जन्मले. हे तीघे पुत्रहीं येकोजीराजाची थोरली स्त्री इंगळ्याची लेंके दीपाबाईसाहेब यांचे उदरीं जन्मले. त्यांची धाकुटी स्त्री मोहित्याची लेंके अण्णूबाईसाहेब त्यांस येक लेंके या खेरीज त्यास परिगृहीत स्त्रिया नौवु. त्यांत जन्मलेते चंद्रभान, सूर्यभान,

मित्रभान, कलेभान, कीर्तिभान, विजयभान, उदयभान, ऐसे सातलेंक जन्मले पैकीं जेष्ट चंद्रभान शूर जाहले. येकून येकोजीराजास पुत्र दहा. तदनंतरें कित्येक दिवस न्यायेंकडून राज्य परिपालन करून शकें १६०४ रुधिरोद्गारि संवत्सरीं येकोजीराजे यांसी परमपदवी प्राप्त जाहली. सवेंच श्रेष्ठ पुत्र तिसरे शाहजीराजे तक्तनिशी जाहले त्या शाहजीराजास भार्या चिमाबाईसाहेब म्हणणार येकच, परीगृहीत स्त्रिया उदंड होत्या त्या शाहजीराजानी धाकुटया वयांत प्राप्त जाहलें राज्य आपल्या बुद्धिवैभवेंकडून आपले धाकटे भावू शरफोजीराजे व तुकोजीराजे उभयतांस व आपल्यासहीं यथाकाली लग्नमुहूर्तेहीं करून आपुली मातोश्री दीपाबाईआऊसाहेब यांचे अनुमतीने सकल जनास सौख्य व्हावें याजोगें आपली फौज व खजाना वाहडवून राज्य करीत येण्यांत मुल्लाया कलाप म्हणून एक कित्ता, यजुल्लफका-राचा येक कित्ता, ऐशे कलाप आले तेंव्हां आपुल्या राज्यापावेतो येवूदेयीनासें परभारेंच वारून विजापुरचें पादशाहासीहीं सल्लक राखून, पेषकषीहीं येकमार्गे कडून वारून घेऊन, राज्यभार करीत असतां त्यांचे तिसरेभावू तुकोजीराजे यांस शकें १६१७ धातु सवत्सरीं पांचवे येकोजीराजे जन्मले. त्यांस प्रतिनाम बाबासाहेबराजे म्हणावयाची रुढीहीं पडली. तदनंतरें शाहजी-राजे चांगल्या नीतीने बहूत दिवस राज्यभार करून शके १६३३ नंदन संवत्सरीं परम पदास पावले. सवेंच त्यांचे दुसरेभावू तिसरे शरफोजीराजे तक्तनिशी जाहले. त्या शरफोजीराजास पहिली स्त्री घांटक्याची लेंकें सुलक्षणा बाईसाहेब, दुसरीस्त्री घांटक्याची लेंकें अपरूपबाईसाहेब, तिसरीस्त्री शिरक्काचीलेंके

राजसबाईसाहेब यासमवेत राज्यभार करण्यांत न्यायास न सोडितां परम नीतीनें राज्यभार करित्या दिवसांत अवरंजिबानी विजापुरचे अल्लीयदिलशाहास दस्तगीर केल्यामुळें त्या संधांत उद्भवल्या कलापाचा धक्का आपल्या राज्यास लागूं देईनासें विजापुरांतून उघडून आल्या मात्वराचा आदर करून राज्यभार करीत असतां, त्यांचे धाकुटे भावू तुकोजीराजानी लग्नकेले स्त्रिया—अरणाबाई मोहित्याची एक, रामकुमारबाई इंगळ्याची एक, मोहिनाबाई पिंगळ्याची एक, मनाबाई पिंगळ्याची एक, लक्षुंबाई इंगळ्याची एक, एकून लग्नाच्या स्त्रिया पांच. याखेरीज, राख्या सहा पैकी एकमात्र म्हराठ्या जातीची वरकड पांचहीं नायडकूटाच्या. त्या म्हराठ्याचे जातीची तरवारीस लग्न केलें ते राखे अन्नपूर्णाबाईचे पोटी शकें १६६४ शार्वरी संवत्सरी प्रतापसिंहराजे जन्मले. सवेंच शामाबाई म्हणून येक कन्या जाहली. वरकड नायड कूटाच्या राख्या पांचापैकी जाहली संतती मालोजीराजे येक, अण्णा साहेबराजे येक त्यांस दुसरे नांव हरिश्चंद्रराजे नानासाहेबराजे येक, कन्या दोघी येणेप्रमाणे जन्मले. त्याउपरि शरफोजीराजाचे राज्यांतच त्यांचे धाकुटे भाउ तुकोजीराजाचे लग्न केले स्त्रीचे पुत्र पांचवे येकोजीराजे प्रतिनाव बावासाहेब म्हणून वरीलिहिले आहे त्यांस लग्नकेल्या स्त्रिया— पहिली सुजानाबाई इंगल्याची लेंक येक, दुसरीबाइको जयंतीबाईसाहेब येक, तिसरी सखवारबाई येक, चौथी सुकुमार बाईसाहेब येक, पांचवी गिरिजाबाईसाहेब येक, साहवी पार्वतीबाईसाहेब हे सहा स्त्रिया लग्नाच्या पैकीं वडीलांनी लग्नकेल्या त्या येक दोन जातां वरकड त्यांच्या प्रौढेंत करून घेतिल्या.

तैशाच राख्या तीनी तैसेच तुकोजी राजाचे दुसरे लेंक राखे संमधाने मऱ्हाठ्याचे जातीचे पोटी जन्मले प्रतापसिंह राजास लग्न केल्या स्त्रिया पांच—पहिली अहिल्या बाईसाहेब मोहित्याची येक, यमराई मरहोवशी त्याची येक, सखववार बाईसाहेब मोहित्याची द्रौपदी बाईसाहेब दुनबोची येक, यशवंत बाई-साहेब माहडीकाची येकून पांच स्त्रियापैकी वडिलानी लग्न केल्या त्या येक दोन जातां वरकड त्यांच्या तखीतांत करून घेतिल्या त्या याखेरीज राख्या मऱ्हाठ्या व नायडकूटाच्या बलजेवाराच्या देखील सात. प्रतापसिंह महाराजाची बहीण शामाबाई म्हणून वरी लिहिलें आहे कीं त्या शामाबाईसच मल्लारि गाडेरायास लग्न करून दिल्हें. आतां उरल्या तुकोजी राजाच्या नायडाच्या जातीच्या पांच राख्या पासून जन्मले पुत्र तीघेहीं तुकोजीराजा समोर देवगतीस पावल्या पैकीं नानासाहेब म्हणणारास मात्र अपुसाहेब म्हणून येक पुत्र त्यानी वऱ्हाड केल्या स्त्रियापासून जाहले होते. त्या अपुसाहेबास लग्न केल्या बाइका खेरीज बलजे वार वगैरे जातीचे राखीपासून येकपुत्र नानासाहेब म्हणून जाहला तो अद्यापि सुखरूप आहे. आतां त्याच राखीचे संघांत जाहल्या दोघे लेंकीहीं तदनुसार गाडे कूटास दिल्ह्या. येणेप्रमाणे खत नीशी जे—शरफोजीराजे त्याचे धाकटे भावू संततीवंत तुकोजीराजे उभयतानी येकत्र राज्यभार करीत असतां उभयतां भावांस ग्रह-कृत्य वैशम्यामुळें तुकोजी राजानी कांहीं मुलूक वडील भावापासी मागून घेऊन महादेवपट्टणांत शाहार वसवून आपल्या सकल संसारानिशी महादेवपट्टणांत राहिले होते. किल्यांत शरफोजी-राज्यभार करीत असतां त्यांच्या पट्टस्त्रिया तीघ्यांपैकी दुसरीस्त्रि

अपरूप बाईसाहेबयांस कित्येक दुष्ट स्त्रियानी बोधिले जे–कनिष्ट भावास संतती वाहडली ज्येष्ट भावु राज्य करणारास संतती नाहीं त्याकरितां, राज्यपट्ट कनिष्टास लागेलकीं म्हणून बोधिले. बोधना रुचून त्या राजस्त्रियेने प्रथम बोधिल्या दुष्टस्त्रियानी सांगीतल्या यत्नाप्रमाणेच नसतां येक गर्भम्हणून बाहेर रंग करून उपरि पुत्र प्राप्तीहीं जाहली म्हणून वर्तमान सांगीतल्या वरून व बंधु वर्गानीहीं संतोष मानून राजपुत्रास करावयाचा उत्सव करून, त्या पुत्रास सवाई शहाजीराजे ह्मणून नामकर्णहीं केलें. तदुपरि थोड्याच दिवसांत चालिलें कृत्रिम राजबंधू तुकोजीराजे महादेवपट्टणांत होते त्यांकडून व्यक्त बाहेर पडून शरफोजीराजानी फार आश्चर्य करून त्या पुत्राचा परिहार करावयाचे रीतीनें करून सोडिलेतरी नष्टजाहल्या पुत्राची कथा कां लिहावी ह्मणाल्यां पुढें याचे कारण सांगणे पडतें करितां लिहिलें. हे कृत्य येकंदर चालिलें ते तीघे राजस्त्रियां पैकीं अपरूप बाईसाहेब ह्मणणारानीं दुष्ट स्त्रियेचे बोधनेस वश होऊन केलें. त्यां उपरि शरफोजी राजानी कित्येक दिवस राज्यभार करून शके १६४९ कीलक संवत्सरीं दैवगतीस पावले. त्या बरोबरी अपरूप बाईसाहेबा खेरीज सुलक्षणा बाईसाहेब व राजस बाईसाहेब उभयतांहीं अनुगमन केले. सवेंच त्यांचे भावू धाकुटे तुकोजीराजे महादेवपट्टणांतून येऊन तक्तनिशी जाहलें. त्यानीं राज्यभार करीत असतांच वरी लिहिलें त्यांच्या राखीच्या संबंधांत तीघे पुत्र नष्ट जाहले. परंतू नानासाहेब ह्मणणारांचे संततींत अपूसाहेब मात्र आहेत ह्मणून वरी लिहिला अर्थ कारणानु सार लिहिला परंतू याचे राज्यांतच चालतो तेंव्हां त्रिचनापल्लींत मिनाक्षिअम्मा ह्मणून

नायडाची राज्यभार करीत होती. तिला पाळेगार वगैरे कारभारामुळें बहूत शल्य जाहलें. त्यास तुकोजीराजानी आपल्याकडील सैन्य व सेनापतीसहीं पाठवून ते सैन्य येकंदर परिहार करून मीनाक्षीअंमास निःशल्य करून स्थापना केले. तदनंतरें तुकोजीराजे बहुतन्याय नीती कडून चांगल्या रीतीनें राज्य करून शकें १६५७ नलसंवत्सरीं दैवगतीस पावले. सवेंच त्यांचे ज्येष्ट पुत्र पांचवे येकोजीराजे त्यांस बावासाहेब ह्मणूनहीं नावें. त्यानी येकवर्ष राज्यभार करण्यांत त्यानी समीपचे त्या कोणावरीहीं पातेरा नाही कोणाची मार्जी कठार असल्यां नाही कोणाच्या हाती सुरी हसल्या नाहीं फार संशय मानणें; कोणी बिदीस जाणार येणार देखील कांही देवाचा नामोच्चार केला अथवा त्यांचा होट हलूं लागला अथवा येकीकडें दोघे मिळून कांहीं बोलूं लागले; कोणाच्या हाती जपमाळ पाहिली तरीहीं त्यांच्या ठायीं आपल्यास वश करिण्यास अपल्यास मारण्यास मंत्र यंत्र करिताहेत ह्मणून निश्चय कडून समजून त्यांच्या पारपत्त्यासहीं करवणें; अणखी राजाचे समीपतेचेहीं चर्चा करण्याने थोरकीं त्यानी समग्र आपुली लेंकरें ह्मणून जे ह्मणतील त्यांस नीट चालवणें; वरकडांस समीपतांही नाहीं. चालवणेहीं तदनुसारेंच. येणे प्रमाणे राज्यभार करण्यांत चंदासाहेब ह्मणून कोणी नवायीत सरदार आर्काड सुभ्याचा दोस्तरीखानाचा जांवांयीं त्या चंदासाहेबाने कित्तेक भारी फौज व फराशीसाकडीलहीं कुमुक घेऊन तंजाउरावरी युद्धास आला. तेंव्हां बावासाहेब राजे उपद्रवानें अशक्त होते. तेंव्हांहीं किल्ला व आपले फौजेची बंदोबस्तीहीं चांगली करून, आपण किल्याचे बुरुजावरी येऊन किल्ल्या वरील

तोफांचांहीं मार करून, फौजेसहीं त्याचे फौजेवरी जाऊन पड-णेस निरोप देऊन चांगले भांडणें भांडले. तेंव्हा चंदासाहेबास किल्ला घेणेस निर्वाह नाहींसें कांहीं पैक्याची बोली बारून घेऊन त्रिचनापल्लीस निघूनगेला. तदनंतरें बावासाहेब राजे त्याच उपद्रवाने शकें १६५८ पिंगळ संवत्सरीं दैवगतीस पावले. तेंव्हां अमात्यपण करणार व योग्य सोइऱ्यांतहीं राज्यपदास कोणी नाहींकीं ह्मणून त्या बावासाहेबाची स्त्री सुजान बाई-साहेबास सर्वेच तक्तनीशी केले. तेंव्हां शके १६५८ पिंगळ संवत्सराचा बाकी काळयुक्ती संवत्सर देखील त्या सुजान बाई-साहेबाने राज्यभार करीत असतां, सोयऱ्यापैकीं कौमाजी घांटके ह्मणणार येकाने पेसजी शरफोजीराजे राज्यभार करीत असतां दुष्ट स्त्रियेचे दुर्बुद्धीनें कृतृम पुत्र येकजण निर्माणहोऊन त्यालाच सवाई शाहजीराजे ह्मणून नांवें ठेविल्यावरी कृतृम व्यक्त होऊन त्या कृतृम पुत्राचा परिहारहीं जाहलाहोता ह्मणून वरी लिहिलें आहे कीं— सांप्रत कौयाजी घांटका ह्मणाराने तो सवाई शाहजीराजा ह्मणणार मूल वांचला आहे ह्मणून कुप्पी ह्मणून येक बटिकीणीचा लेंक रूप वयाने सदृशहोता. त्यालाच तो शाहजीराजा वांचलातो ह्मणून प्रख्यात करून त्याला घेऊन वडेरपाल्याचे रानांत बसून संस्थानाचे नाते रहस्यांत पालेगार वगैऱ्यास भ्रमें घालून त्यांकडून थोडें द्रव्य संपादून थोडी फौजहीं जमाकरून तदनंतरें देवणांपट्टणांत असणार इंग्रेजासी संविधान करून त्यांस नानाविध सांगून त्यांकडून कित्येक उपपत्ती करून घेऊन तेथून नागपट्टण वगैरे स्तलांतून पलांदेवा-लयाकडून कांहीं द्रव्य घेऊन फौज बंदीकरून तंजाऊरांत अस-

णार फौजेस व किल्लेदारांस भ्रमासघालून त्यांच्या अंतरंग शल्यावरून शकें १६६० कालयुक्ती संवत्सरी किल्ला प्रवेश करून राज्यपद कारणार सुजान बाईसाहेबास लोटून परते करून आपण तक्तनिशीनें जाहले. तो रानांतून आलाह्मणून त्याला काटराजा ह्मणून लोक वदंती जाहली. त्या काटराजाने थोडेच दिवस राज्य करण्याने त्याचे चर्चेवरून वळखून पेसजी त्याचे भ्रमांत पडले. ते किल्लेदार व फौजेसहीं हा काटराजा कुप्पी वटिकीचा लेंक याचेनावें सुभान्या कृतृमे कडून राज्यपदास आला ह्मणावयाचें निश्चय कडून कळून अह्मी राजद्रोह करून वटकीचे लेंकास तखतीं बैसविलोंकी ह्मणून केवळ पश्चात्ताप पावून तजवीज केलीजे—तुकोजीराजानी परिग्रहकेल्या स्त्रियांपैकीं प्रतापसिंह राजाची माय राजाची सम जातीची जाहल्या करितां हा पुत्रच राज्यास योग्य ह्मणून सर्वत्रानी निष्कर्ष करून शके १६६० सिद्धार्थी संवत्सरीं प्रतापसिंहराजास तक्तनिशीने केले. तोंच शक त्याच वर्षी प्रतापसिंहराजानी लग्न-केले पट्टस्त्रियांपैकीं दुसरी स्त्री दुनगोची लेंके द्रौपदीबाईसाहेबाचे उदरीं प्रतापसिंह राजापासून तुळजाराजे जन्मपावले. काटराजा कुप्पी वटकीचा लेंक त्यांचें नावें सुभान्या तैशास तंजावुर राज्य परंपरेने भोंसल वंशाचे राजे राज्याधिपत्य करीत आले. तैशा राज्यास वटिकिचा ल्योंक सुभान्या ह्मणणार अधिपति जाहला ह्मणणाराचे सकळ सोइरे धायरे व सकळ जनासहीं व्यक्त जाहल्यावरी ह्या कृतृमांत मिळाल्या सैंदाने परंपरेने राजवंशाची चाकरी करीत आलोंकी ह्मणावयाचे लोकलज्जेस्तवहीं आणखी यांत मुख्य येकोजीराजाचे परिग्रहीत स्त्रियापासून जाहले चंद्र-

भानजीभोंसले यांचे लेंक नायकजीभोंसले भाग्येंकडूनहीं शौर्यें-कडूनहीं प्रख्यात होते.—त्यांच्या भयास्तवहीं प्रस्तुत राजवंशी नामें प्रतापसिंह महाराज रूप, गुण, क्रिया, बुद्धि, या सर्व गुणांकडूनहीं योग्य आहेत ह्मणून प्रतापसिंह महाराजास तक्त-निशी केल्यावरीहीं तो सैंध कृतृमांतच होता. याखेरीज त्या सैंधानें अकृत्यहीं करीत आला. ते काय ह्मणजें प्रथम एकोजी महाराज या तंजावुर राज्यास अधिपति जाहल्यावरी या अगोदरी केले धर्म नव्हतां तंजावर राज्यांत बहुत देवालय कावेरीतीरीं बहुत ब्राह्मण वसताती ह्मणून अग्रहार बांधवणें व देवालय बांधवणें, ब्राह्म-णांस सर्वमान्यदेणें, यज्ञादिक करवणें, अन्नछत्र घालवणें, या रीतीचे अनेक येकोजीमहाराजापासून परंपरेने इत्यादिधर्मे करीतच आले. त्यांत प्रतापसिंह महाराज तक्तास आल्यापासून विशेष धर्मे करीतच आले. या धर्मास येकंदर सैंद विरोधच करीत आला. याखेरीज आपण जातीचा तुरूक होऊन कर्नाट-जातीच्याहीं सुळ्या देवालयांत असणार या नावाल्या त्यांत येक मोहना ह्मणणार सुळीसही भ्रष्ट करून आपले घरीदेखील ठेऊन घेतिले. इत्यादि त्यांची दुष्टकृत्ये व कृतृमें महाराजांस प्रतिपदीहीं कळलें असूनहीं आपण नूतन राज्यपदाधिष्टित जाहलों ह्मणूनहीं त्या सैंदास दंडीनासे कित्येकदिवस त्याचा अधिकारहीं चाल-विला तरीहीं तो सैंध अपल्याकडे राजाची फौजदारी व तंजाउर कोटाची किल्लेदारी व राजाची चिटनिशी ऐशे प्रबल उद्योग समग्रहीं आपले स्वाधीन आहेत, या अधिकाराच्या बळेंकडूनच मागें वटकीचालेंक सुभान्यास राज्य दिल्हों. परतून त्याला कैद करून प्रतापसिंह महाराजास राज्य व्हावेंयाजोगें हीं केलों.

अगोदरी बावासाहेब राजानी ठेविले सरखील सिद्धोजी वगैऱ्यास काटराजाकडून चित्रवधें करविलों. अणखी चिंतिलेंतें करूंसकेन ह्मणावे याचे उन्मत्ततेने आपली लेंक चंदासाहेबाच्या लेंकास देऊसें त्या चंदासाहेबाचे लेंकास तंजावुरचे राज्याचे तक्तावरीं बसवून सकल ऐश्वर्यही आपण भागावें ह्मणावयाची दृढयोचना करून आपला भावू सैंध काशीमाशीं तजवीज केला. ते या भोंसलवंशाच्या पुण्यप्रभावेंकडूनहीं व प्रतापसिंह महाराजाचे योगेंकडूनहीं त्या सैंध काशीमास आपल्या भावानें केला राजद्रोह स्वामिद्रोह, विश्वास घातक, हे समग्र साहिनासें अंतरंगें महाराजास त्या सैंधाचे कृत्रमें येकंदर त्याचाभावू सैंध काशीमाने जाणत केलें. तेंव्हां प्रतापसिंह महाराज येकायेकी उचंवळनासे दूरवर योचना करून त्या सैंध काशीमास तुझ्यासांगण्याचे प्रमाण काय ह्मणून विचारिले. त्या सैंध काशीमानें थोड्याच दिवसांत माझ्या सांगण्याचे निदर्शन महाराजास येयील ह्मणून निरोपघेऊन घरास गेला. सवेंच चार पांच दिवसानंतरें सैंदानें तबक मुस्तीद करून, महाराजापासीं ठेऊन, आपली मूले चंदासाहेबाच्या लेंकास देतों; तेणेकडून संस्थानास बलच आहे ह्मणून अर्ज केला. तेंव्हा महाराजानी वळखून अमच्या राज्यास बलें व्हावी ह्मणून आपली लेंके देखील नवाइतास देताहेत ह्मणून श्लाघना करून पाहिजेते लग्नाचे खर्चास देवून लग्नमात्र किल्यांत करणें गरजनाहीं मध्यार्जुनी करणे ह्मणून भल्यापणाने सैंधास सांगीतलें. तेंव्हां सैंधाने कबूल करून तैसेंच मध्यार्जुनास जावून अतिशय वैभवेंकडून लग्नहीं करून परतून किल्यास येऊन पावल्यानंतरें त्या सैंधानें केलें कृत्रिम काय ह्मणजें—चांदासाहेब

प्रभृतीस तुह्मी मध्यार्जुनांतून रातोरात निघून अरुणोदय काळीं किल्ल्यास पावणें; त्यावेळेस दंडकाप्रमाणें किल्ल्याचे दरवाजे उघडतांच फौजेनिशी किल्लयांत शिरून, राजगृहावरी हल्ला करून आंत शिरून, खत्तल् करून राज्य स्वाधीन करून घेणें, फौजदारी व किल्लेदारी दोनी आपलेस्वाधीन आहेत्या करितां तुह्मास कोणी समोर होणारनाहीं; ह्मणून कागद्‌लिहून आप्त मनुष्याकडे देऊन रहस्याने पाठविला. ते त्या सैंधाचाच भावू सैंदकाशीम ह्मणणार या कागदपत्राच्या रहस्यांत होत्या करितां याकृत्रिमाची पूर्वी सूचना मात्र महाराजास कळविली ते नव्हतां महाराजाचे अंतरंग मनुष्य घेऊन त्यांकडून सैंधाने लिहिला जिनस व कागद व कागद्‌नेले मनुष्यासहीं धरून महाराजाकडे ओपिले. यारीतीची प्रबळसाक्षी महाराजास पावल्यावरी महाराज अत्यंत आश्चर्य व अतिशय क्रोधासहीं वश्य होऊन आपल्या आप्तपरीवार कित्त्येकास मिळवून त्यांत मुख्य सरदार मल्हारजी गाडेराव महाराजाचे मेव्हणे, व अनपाशेटगे महाराजाचे मुख्य कार्यस्थ, मानाजीराव जगताप महाराजाचे आप्त सरदार इत्यादि-कांस आपली दृढयोचना व्यक्त कळवून सैंधास मारणेचा निश्चय करून येकयादिवशीं आपल्या सरदारास व आप्तलोकांस येकंदर संन्नाहानिशी येक्यास्थलीं दववून ठेंऊन आपण येक्याठिकाणीं प्रत्येक वसून मोगलाकडील कित्त्येक कागदपत्रें पाहावे लागतातीं ह्मणून सैंदास बलावून पाठविले. तेंव्हां सैंदाच्या उन्मत्त दर्शे करितां महाराजाची योचना कोणतीहीं कळनासें जाहल्यास्तव महाराजाकडून सात पांच बलावणी घेऊन महाराजापासी येवून पावला. तेंव्हां सैंधाचें उन्मत्त दर्शेकरितां महाराजानी त्याशी येक

क्षणभर उपचाराने बोलून लघुशंकेचे व्याजेंकरून आपण अन्यत्र महालास गेले. तेंव्हां महाराजाचे पूर्वसंकेताचे आर्तप्रमाण त्या त्रिवर्ग सर्दारानींहीं सैंदाकडील येक मनुष्यहीं सैंदाकडे नाहीशी बंदोबस्ती अगोदरीच करवीले होते करितां चिल्लर मनुष्यास सैंदाकडे पाठवून त्याला हाकून देयीनासें हात पांय बांधून अन्यत्र स्थलास आणवून त्याला परलोक गतीस पावविले. सवेंच त्याच्या बराबरीहीं हल्ला करवून पळालेते जातां उरल्यास शत्रुशल्य नाहीसें केले. तदनंतरें महाराजानी अनापाशेटग्यास सैंध खलाव फौजदारी, मल्हार गाडेरायास किल्लेदारी, डबीर नादोपंतास चिटनिशी, येणेंप्रमाणें अधिकार देवून राज्यभार सुरक्षित करून चालते केले. तदनंतरें महाराज श्रीरामेश्वरास यात्रेस सकल संन्नाहानिशी जावून यात्रा करून बहुत दान धर्महीं करून परतून येतेवेळेस रामनाथपुर मरवर जमेदाराने परंपरेकडून महाराजाकडून आपले राज्य स्थापित ह्मणावयाचे कळळ्या करितां गांवेंभर भोय येऊन आपल्या किल्ल्यास येऊन पाहून येकादिवस असून जावें ह्मणून प्रार्थिले. तैसेंच महाराज अंगीकार करून गेले. तेंव्हां दरवाज्यां-तील लोकानी न कळतां साघून येणार चिल्लरांस अटकाविले. ते महाराजास कळून तैसेच परतून चालिले. तेंव्हां रामनाथपुरचे राज्य करणार बहुत भय बहुत विश्वासें करून दोन घटिका पावेतो महाराजाची पालखी धरून घेऊन, महाराजास बहुत प्रार्थिल्या करितां महाराज बहुत, दयावंत होऊन परतून रामना-थपुरास जावून येकदिवस राहून त्याकडील पूजा पावून परतून आपल्या स्वराज्यास पावले. रामनाथपुरवाल्याने अलीकडें

नानाच्या दाक्षिण्यास्तव नबाबाचा ह्मणविला तरींहीं आदी विसरनासें महाराजाची शेवा केली. पेसजी बाबासाहेब राजाचे राज्यभार शेवटी चंदासाहेब ह्मणणार त्रिचनापल्लीचे किल्ल्यावरी जाऊन उतरला ह्मणावयाचे वरी लिहिलें आहेकीं त्या चंदासाहेबाने त्रिचनापल्लीचे राज्य साधून आपण तंजाउरास प्रतापसिंह महाराजास राज्यहोतांच येऊन घेरिलें. तेव्हां प्रतापसिंहराजे दोन महिने पावेतो चंदासाहेबासी चांगलें युद्ध केले. त्यानंतरें चंदासाहेबाने यासी काय भांडणें हे किती दिवस काय खावून भांडतील पाहूं आपल्यासहीं त्रिचनापल्लीकडें पाळेगाराची बंदोबस्ती व्हावी लागते ह्मणून आर्काडांतन बरोबरी आलातो सबदरअल्लीखानास तंजाउरचें राज्यसमग्र येक पटकोट सुभाविना जमा करून सभदर अल्लीखानाकडे ओपून आपण त्रिचनापल्लीस गेला. तदनंतरें सभदरअल्लीखान राज्य आपल्यास जिरेल किल्ल्यांत असणार राज्य काय करून पाहातील म्हणून खदकाची वाली देखील आपलीकरून घेऊन, तिरवादीस पश्चिमेकडे आपल्या नावें सबदरअल्लीआना ह्मणून नांवें ठेवून अणाहीं घालून दोनवर्ष बसला. तेव्हां प्रतापसिंह महाराजास फार संकट पडून फौजेस देणेस व आपले खर्चासहीं तुटारा पडल्यामुळें फौज, भांडण्यास धजनासें गेल्याकरिता, सातार्यांस शाहूराजास पत्रलिहून पाठविले. तेंव्हां शाहूराजानीं वीरूबाईचे औंटीस वातिलेते नागपुरीं असणार रघोजी भोंसल्यास व फत्तेसिंगासहीं साटहजार स्वार देऊन पाठविले. त्यानी अतित्वरेने घाट उतरलेते वर्तमान ऐकतांच, सबदरअल्लीखान मुलूक सोडून, त्रिचनापल्लीस पळाला. उपरी राजास मुलूक

मोकळाझाला. त्यानंतर रघोजी भोंसले व फत्तेसिंग उभयतां त्रिचनापल्लीस येऊन समोर मधरेंतून आलातो चंदासाहेबाचा भाऊ व सबदरअल्लीखानासहीं मारून चंदासाहेबास धरून कैद करून त्रिचनापल्ली किल्ला घेतला. तेंव्हां प्रतापसिंह महाराजानीं त्याकडे आपले अमात्य अन्नप्पा शेटक्यास पाठविले. त्यानी जाऊन रघोजी भोंसले व फत्तेशिंगाची भेटी घेतांच त्यानी किल्ली ओपून द्या ह्मणाले. तेंव्हां राजानी त्याचा अंगीकार करीनासें सांगून पाठविल्यावरून रघोजी भोंसले फत्तेशिंगानी त्रिचनापल्लीचें राज्य व किल्ला देखील राजीघोरपडेचे लेंक मुराजी घोरपडे यांकडें देऊन, आपण चंदासाहेबासही घेऊन, साताऱ्यास शाहूराजाकडे गेले. इकडे प्रतापशिंहराजे तंजाउर देशाचे राज्य करीत होते. तदनंतरें अन्नप्पा शेटक्याने सरखेली केल्यांत राज्य तंत्राची कामें येक विधेंकडून चालते केले तरीहीं कित्त्येक उद्धट कृत्य करूंलागले. त्याचा जिनस थोडा कळवितों जे—महाराजाचे योग्य साज येकंदर आपण व आपले बाइकास येकंदर करूंलागले. याखेरीज महाराजा समीप येते वेळेसहीं व समक्षेमांतहीं महाराजासी बोलण्यांतही उद्धट कृत्येंच करूंलागलें. तेणे कडून महाराज कांहीं मनोवैकल्यातें पावून अन्नप्पाची सरखेली काहडून, मानाजीराव यांस सरखेलीहीं व फौजदारीहीं देऊन, अन्नप्पाशेटक्यास थोड्या दिवसाच्या कामास घरीच असा ह्मणाले. ते अन्नप्पाशेटक्यास साहीनासें सरखेली व फौजदारी आपल्यास बहूत दिवस चालिल्या करितां फौज तमाम आपल्यास वशांत असेल ह्मणावयाचे दुर्भ्रमें कडून आपले भावू बंदासमवेत केसरी कापडें लेवून बाहेर विधान करून बसले.

तेंव्हां महाराजानी पूर्वीच या अन्नप्पाची दुष्टप्रकृती वळखिले होते करितां त्याच संशयाने तुह्मी हत्यारा पत्यारानिशी बाहेर बसाव यास कारण काय ह्मणून विचारून पाठविल्यास अन्नप्पानी सबूरी न करितां जा महाराजाचे अन्नखावून थोरवीस पावलेकी त्यावरीच हत्यार धरून येकदोघांस जखमीहीं केल्यावरी महाराजानी कळून अटोपत नाही ह्मणून आपल्या लोकांस हल्ल्यास निरोप दिल्हे. त्यांच्या यांच्या मारामारींत अन्नप्पा व त्याचे भावू वगैरे सहासात जण ठार ज़ाहले. तदनंतरें महाराजास अन्नप्पा शेटक्यानी सरकाराची चाकरी केली ते आठवास येते वेळेस समग्र अन्नप्पास मारिला तो पश्चात्ताप पावण्यासहीं कारणहोतें. तदनंतरें त्रिचनापल्लीचे किल्ल्यांत असणार मुरारजी घोरपडे यानी आपले अमात्य इनीसखान ह्मणणार तुरकाचे बोधणे वरून तंजाउर राजाचा मुल्क थोडा जाहला तरीहीं चांगले राज्य जाहल्या करितां समग्र आक्रमावें तरींही तेथील राजे आपले यजमान यास्तव कांहीं मुल्क स्वाधीन करून घ्यावें तेंहीं केवल फौजबंदीने देयीनात करितां चिल्लर उपद्रव करीत असावें ह्मणावयाचें बुद्धीनें इनीसखाना बरोबरी २,००० स्वार तैनात करून पाठविले. त्या इनीस खानाने तंजाउरच्या किल्लयांत कोठें लुटणें, कोठें मारणें, भांडण्यास समोरे होईनासें येक दोन चिल्लर उपद्रव फार आरंभिला. तेंव्हां, प्रतापसिंह महाराजाने आपला सेनापती मानाजीरायास निरोपून सपागमें थोडी सेनाहीं देवून पाठविलें. त्यानी जावून थोडे दिवस त्या इनीसखानाचा पाठलाग करीत जावून शेवटी येकटा नदीचे कांठीं सांपडून तीनशें स्वार ठारमारून सात

शेंपांच घोडे व मनुष्यहीं पडावू धरून आणिले. त्या भांडण्यांत सरदार इनीसखान ह्मणणार गुप्त होऊन गेला. तेव्हह्याने देशास मुरारायाचा उपद्रव राहून गेला. तदनंतरें महंमद अरब ह्मणणार येकजण तो कोण ह्मणजे–पेसजी चंदासाहेब उत्तरदेशाहून याप्रांतास येऊन त्रिचनापल्लीचे राज्यहीं साधून तंजाउर राजावरींहीं युद्ध करून शेवटी रघोजीभोंसले व फतेशिंगाच्या हाती सांपडून पुणें प्रांतास जावून, शाहूराजाकडून गडप्रवेश पावल्यानंतरें, त्याच्या संगतीस होतातो महंमद अरब ह्मणणार थोर सरदार, दोन तीन हजार स्वार, पांचहत्ती थोडेबारहीं, इतुक्या फौजेनिशी उचडून कोणाच्यां आश्रयांतहीं राहवेनासें आपण फूट होऊन पुदुचेरींत फराशीसांचा आस्रा थोडा करून घेऊन, मुलुकांत तमाम लुटणें, रात्री वडेरपाळयाचे रानांत दवून राहणे, असें बहुतदा केल्यामुळें तंजाउरचा मुलूक व त्रिचनापल्लीचाहीं केवळ तोराजी त्याला तेंव्हां प्रतापसिंहराजाने आपले किल्लेदार मल्हारजीगाडे या समागमें मानाजीराव जगताप यांसहीं कित्त्येक सन्हाह्य देऊन पाठविले. त्यानी येक महिना पावेतो त्याचे पाठीसी फिरून शेवटीं त्रिकाटपल्ली ह्मणावयाचे किल्ल्याजवळ त्या महंमद अरबास सांपडवून त्याचे हत्ती, घोडे हिरून घेऊन त्याकडील जुलूफकवरखान् ह्मणावयाचे बिरूदाचे निशानासहित कित्त्येक त्याची बिरुदें हिरून घेऊन त्याकडील बहुत लोकांसमवेत त्या महंमद अरबासहीं मारून टाकिलें. प्रतापसिंहराजानी संतोष पावून त्याकडील बिरुदेंसमग्र मल्हारजी गाडेरायास कित्त्येक व मानाजीरायासहीं थोडी दिल्हीं. देवीकोटचा किल्ला साधणेच्या हेतूने इंग्रेजाची फौज कित्त्येक येऊन

देवीकोट बंदरचा किल्ला साधिला तरी महाराजास इंग्रेजासहीं विगाड नसतां त्यानी येण्यास कारण काय ह्मणिजे देवीकोटचे थोरसें इंग्रेजाकडलि येक जहाज पडावू जाहली. त्यापैकीं कित्येक सामाने व एक दोनी कुतरी महाराजानी ठेऊन घेतल्या करितां त्याविषयीं इंग्रेजास ते बंदर अपल्यास पाहिजे ह्मणावयाच्या हेतूवरून येऊन घेतले. तेंव्हां महाराजानी फौजदार नानाजी-रायास बरोबरी फौज देऊन पाठऊन परतून देवीकोटचा किल्ला युद्ध करून घेतला. तेंव्हां देवीकोटच्या किल्ल्यांत माहाराजाचे हुकुमाप्रमाणें जफर साहेब ह्मण्णारास किल्लेदारी देऊन ठेऊन आपण तंजाउरास येऊन पावले. परतून दुसराकित्ता इंग्रेजाची फौज देवीकोठचे किल्यावरी आली. तेंव्हां महाराजानी कित्त्येक सरदारास फौजहीं देऊन त्यावरी पाठविले. त्या युद्ध प्रसंगी इंग्रेजाची फौज सोलदाज वगैरे यावर दलक कोल्लडचे कांठासी उभे होते. तंजाउरची फौज त्यांवरी जाणेस कोल्लड नदीचा कांठ बहुत उन्नत जाहल्या करितां भलतीकडें उतरणेस घोडेस्वारास वाट नाहींसे पलीकडून वाटेने उतरून येकाच मार्गाने येणे पडिलें करितां त्या समयीं नदींत फौज समग्र उतरून येते वेळेस इंग्रज—याकडील लोकानी मार धरिल्या करितां नदीच्या वाळामुळें घोडे खेळवणूकेस देखलि नाहींसें जाहल्या करितां कित्येक स्वार जायां होऊन येक सरदार वीरप्पा ह्मणणार रणास आला. तदनंतरें इंग्रजानी महाराजासी सलूक बोलून येक करारनामाहीं लिहून दिले त्यावरून देवीकोटचा किल्ला इंग्रजांस दिल्हा. ते सन् १७४९ इसवींत. तदनंतरें हैदरावादेंत होतेते थोरले निजाम शाजदीखान ह्मणणारानी दक्षण प्रांताचे वर्तमान

ऐकणेंत चंदासाहेबाने दास्तल्लीखानाचे लेंकास बदरल्लीखान वगैऱ्यांस घेऊन पारशींचा स्नेहहीं करून त्यांची कुमकहीं घेऊन त्रिचनापल्लीचे राज्य साधिले. ते ह्मराटे शाहूराजाकडील रघोजी भोंसले फत्तेसिंगानी जाऊन तंजाउरचे राजाच्या कुमकेस्तव गेले. त्यानी त्रिचनापल्ली राज्यहीं घेऊन चंदासाहेबास धरून आणून गडावरी घातिले. हे समग्र ऐकून त्रिचनापल्लीवरी वाच्छाई निशान चढविले. ते आपण जीवंत असतांच उतरणें विहित नव्हे. ह्मणून शाहूराजास आप्तभावें कडून कागद पत्र लिहून त्याचे अनुमतेवरून ऐशीं हजार स्वारनिशी स्वार होऊन त्रिचनापल्लीस पावले. त्रिचनापल्ली किल्ला मुराररायावरी राज कारण सहा महिने करून मुरारजी घोरफडे यांस कौलावरी बाहेर काहडून त्रिचनापल्लीचा किल्ला व आर्काडची सुभेदाराहीं अनवरदीखान् ह्मणणार समागमें आले होते त्यांचे स्वाधीन करून आपण हैदराबादेस निघून गेले. आर्काडसुभा व त्रिचनापल्लीचे राज्या-सहीं अधिकारी अनवर्दीखान जाहल्या करितां त्याचे पुत्र मापोसखानानी आर्काडसुभ्याच्या नात्याने तंजाउरची पेषकषी यावी ह्मणून जाबाबस्वाल केले. तेव्हां प्रतापसिंह महा-राजानी कित्त्येक सोडवणूकेचा प्रसंग वाजवी प्रकारें सांगून पाठविल्यास समजेनासें मापूसखानाने आपले फौजा-निशी युद्धास आले. तेंव्हां प्रतापसिंह महाराजानेहीं आपली शेना पाठविले. उभयतांस युद्ध तंजाउरचे किल्ल्यास उत्तरेस येक कोसावरी चांगलें भांडणें झालें. तेंव्हां, मापूसखानाने त्याच्या फौजेचाहीं निर्वाह नाहींसें फौज वाताहत होऊन मापूसखानाने पराजय पावून निघून गेले. तेंव्हां पडावू सांपळ्याचा आदर

करून परतून खान मजकूराकडे पाठविले. तदनंतरें मापूसखान आपण पराजय पावले व्यसनानें आपले बाप अनवर्दीखानास जाऊन सांगीतले. तेणेकडून अनवर्दीखानानी योचना केली जे– तंजाउरचे महाराजानी जबाबस्वाल युक्तच केले. त्यास मापूस खानानें समजनासें जलदी केल्या करितां भग्नजाहला. परंतु बाच्छाईफौज माघारली ह्मणावयाची ईर्षाथोडी अंगीकारून अनवर्दीखानानी भारी फौज स्वार बार, तोपखाना, व कालहस्ती व्यंकटगिरी, वेढवल्लं वगैरे स्थलचे पाळेगार वगैरे समग्रांस घेऊन तंजावरचे राजावरी युद्धास स्वार होवून तंजाउरास ईशान्य भागीं तीनी कोसावरी पशुपतिगुडी ह्मणावयाचे गावांसमीप मैदानांत उतरले. तेंव्हां प्रतापसिंह महाराजाने आपुल्या फौजा- पैकी तीन हजार स्वार व थोडे बारहीं, जरोरी तोफखाना वगैरे सन्नाह, गोविंदराव शेटगे व मानाजीराव जगताप इत्यादि सरदार समागमें देवून पाठविले. उभय सेनाहीं जमून प्रातःकाल समयीं युद्ध जाहल्यांत तंजावरची फौज समग्र आंत शिरून त्यांच्या तोफ- खानासहीं माधें टाकून अनवर्दीखानाची फौज तमाम ढवळून जावून तंजाउरचे फौजेकडून बहुत फौज मारीत गेली. बहुतजन नामांकित देखील पुढें टिकवनासें पळूनगेले. शेवट तंजावुरचे फौजेचे लोकानी अनवर्दीखानाचा खास स्वारीचा हत्ती भाल्या बरचीच्या मारानें खिळून उभा करून उड्या टाकून हत्तीवरी चढून अंबा- रीच्या काहाण्या कापूंलागले. तेंव्हां अनवर्दीखान सांपडला जाऊन चार घटकापावेतो अपले तोंडाने तंजाउरचे फौजेचे लोकांस प्रतापसिंह महाराजाची दुराई देऊन राहतें केले. इतक्यांत किल्ला समीप जाहल्या करितां महाराजास हें वर्तमान कळून

महाराजानी बाच्छाई सुभेदार जाहल्या करितां या अनवर्दी-खानास सोडून येणें ह्मणून निरोपिल्या करितां फौज निघून आली. तदनंतरें, खान मजकूरानी महाराजास, वस्त्र पत्र, पाठवून महाराजाकडूनहीं आपण वस्त्र, पत्र, पावून, संविधानहीं येक्या-रीतीनें वारतें घेवून, अनवर्दी खानानें आर्काडास निघून गेले. त्यासंधींत येक पांढरा हत्ती आला होता. तदनंतरें पेसजी रघोजी भोंसले व फत्तेसिंग त्रिचनापल्लीचे पारपत्यास आले होते. तेंव्हां चंदासाहेबास धरून नेवून गडावरी घातले होते ह्मणावयाचा अर्थ वरी लिहिला आहे कीं त्या चंदासाहेबास बलावून तुला सोडितों तूं कोठें पाहिजे तेथें जा. परंतू तंजाउरराज्य अमचे स्थल जाहल्याकरीतां त्याचे बाटेस तां जाणे गरज नाहीं ह्मणून त्यापासून लिहिले. व प्रमाणहीं घेवून त्या चंदासाहेबास सोडून दिल्हे. तो चंदासा-हेब तेथून निघून आदरानी सहिरास्त मोहिदीन् खानाकडें पावून त्याशी बोलून पंचवीस हजार स्वार व तदनुसार बार तोफखाना वगैरे सन्नाहा निशीहीं रास्तमोहिदीन्खान् चंदासाहेबा सहित दक्षिण प्रांतास स्वारीचे वेळेस फराशीसासहीं पत्र पाठवून संविधान लावून बरोबरी त्याची कुमुकहीं घेवून आर्कोड सुभेदार अनवर्दीखानास मारून आर्कोडास पावले. तेव्हां आर्डाडांत होतेते भहमंदअल्लीखानाने गुप्तमार्गेकडून नागपटणास पावून दोन तीन दिवस तेथें राहून तेथून प्रतापसिंह महाराजास कागदपत्र पाठविले. महाराजानी त्या कागदाची नम्रता व वेळसमयहीं मनास प्रार्थिले त्यास अह्मी आश्रा देणेंच विहित पक्षीकडे चंदासाहेब व हिरासत मोहिदीन-

खान यांकडून आला उपद्रव येवो पाहूंघेवूं ह्मणावयाचें दृढतेनें नवाब महंमदअल्लीखानास बलावून घेऊन आपले वाड्यामधील खांस बागा मधील महालांत स्थल करून देऊन ठेऊन घेतिले. नवाब महंमदअल्लीखानानी तीन महिने महाराजाच्या आसेंत असून श्रीरंगपट्टणचे कर्तर व देवराज दळवाई यांसीं व दक्षिण-प्रांतीचे पाळेगारां समग्रांसहीं व हैदराबादेश ज्यासरजंगास व आर्काडपट्टीचे कालहस्ती, वेंकटगिरी, बोम्मराज वगैरे भारी पाळेगारासहीं पत्र लिहून पाठवून तीन महिन्यानंतरें आपण त्रिचनापल्ली किल्ल्यास जावून पावले. त्या दिवसांत प्रतापसिंह महाराजानी आपले पुत्र तुळजा महाराजास नवाब महम्मद अल्लीखान राजाचा आसांत येईनाते अगोदरीच त्याचे प्रथमलग्न मोहितेयांची लेंकीस घेऊन केले. त्या बाईसाहेबाचे नाव राजस बाई साहेब ह्मणून. तदनंतरें कित्येक दिवसानंतरें महाराजाची प्रथमस्त्री अहल्याबाई साहेब परमपदास पावले. चौथीस्त्री यशवंतबाईसाहेबाचे उदरीं दोघ्याकन्या जन्मल्या. पुढें त्या दानी कन्यांस लग्नाचा काल प्राप्तजाहल्या वेळेस येक कन्या माडीकास, येक कन्या लिंबाळकरास देऊन लग्न जाहले. प्रतापसिंह महा-राजाचे राख्या सातुजणापैकीं अन्नपूर्णाबाइ म्हणणार राखीचे पोटीं रामस्वामी म्हणून येक, कृष्णस्वामी येक, ऐशे दोघे लेंक जाहले. परंतू ते विहित मार्गेकडून नाहीत अवहित मार्गें कडून उत्पन्न जाहले म्हणून लोकवदंती प्रख्यात होती. त्यापैकीं धाकटे लेंक कृष्णस्वामी म्हणणार कित्येक दिवस वाहडून दैवगतीस पावले. जेष्ट लेंक रामस्वामी ह्मणणार होते. त्यांचे नावेंच अमर-सिंह ह्मणून रूढी पडली. ह्या चार बाबती लिहिल्या त्या येक

कालीच असनात सात पांच वर्षें मागें पुढें असतील. कळावया-स्तव लिहिलें. तदनंतरें पलीकडील पूर्वोत्तर लिहितों जे–हिरासत मोहिदीनखान व चंदासाहेब देखील दक्षिणप्रांत साधणेच्या हेतूने निघून पुदुच्चेरीच्या वाटे त्रिचनापल्लीस जाणारानी प्रतापसिंह महाराजास कांहीं फौजेच्या खर्चास मागून पाठविलें. महाराजानी नवाब महम्मद अल्लीखानाचा अमचा स्नेह विशेष जाहल्या करितां त्याच्या शत्रूस अह्मी कुमुक करिणें विहित धर्म नव्हें ह्मणून निराकरण केले. त्या रागाने हिरासतमोहिदीनखान व त्याच्या सेना समवेत चंदासाहेब तंजाउरावरी येऊन उतरून किल्लयास वेढा घातिला. तेंव्हां महाराजाची फौजहीं बाहेर निघून दोन तीन भांडणी चांगल्या रीतीनें दिल्ही. चंदासाहेब प्रभृतीनी दोन तीनदा किल्ला पाहून हल्लाचढून आले. त्यास येकंदर महाराजानी पाडिला किल्ला येकंदर त्या त्या ठायीं सवेंच सवेंच मजबूत करून ज्या ज्या वेळेस चढला हल्ला त्या त्या वेळेस आपल्या शौर्येंकडून परतविल्यांत चंदासाहेब प्रभृती भग्नहोऊन कांहीं भांडणें, कांहीं संविधान ऐसें करीत होते. त्यांस महाराजानी आस्पद न देतां दोन अडीच महिने भांडत होते. इतुक्यांत नाजरजंग बहुत सन्नाहानिशी हैदराबादेंतून निघून आर्काडास आले त्याचे हरोल स्वार पुढें आले. त्यानी आर्काडांत होतातो चंदासाहेबाकडील सरदार शेषरायास मारून टाकिले ह्मणावयाचे वर्तमान चंदासाहेबास पावतांच चंदासाहेब वगैऱ्यानी तंजाउरचे किल्लयावरी वेढा दिल्हे होते–ते हिरासत मोहिदीनखाना समवेत कित्येक सामान देखील टाकून देऊन येकंदर पुदुच्चेरीस जावून पावले. नवाब महम्मद-

अलीखान त्रिचनापल्लींतून निघून नाजरजंगा समोर आर्काडास पावले. तेंव्हा तंजाउरास कुमुकेस सांगून पाठविले. तेंव्हां महाराजानी आपले फौजदार मानाजीरायास फौज देऊन नाजरजंगाचे लष्करास कुमुक पाठविले. त्यानी जाऊन कित्येक दिवस असून परतून येऊन पावले. त्यानंतरें नाजरजंग देवगतीस पावले ह्मणावयाचे वर्तमानेहीं आलें. सबेंच चंदासाहेबानी नाजरजंग दैवगतीच पावतांच निघून त्रिचनापल्लीस युद्धास येवून श्रीरंगांत फराशीसाची कुमुकहीं घेवून उतरले. तेंव्हां तंजाउर राज्यांत चाकर जमादार अलंखान ह्मणणार पठाण येक शंभर घोडयाचा यजमान त्याने प्रतापसिंह महाराजासी बिगडून अपला हक्कधरून घेवून चंदासाहेबासी मिळून त्याची परवा न करून घेवून कित्येक पठाणास मिळवून घेवुन त्यास अल्लंखानाचा मेव्हणा मधुरेच्या मुलुकांत तुरुंबुरूचा जाहगीरदार येक होता त्यासी संविधान करून घेवुन नाडचें कल्लर कित्येक मिळवून मधुरेवर जावून उतरून मधुरेचे किल्लयांत मापूसखानहोता त्यासी भांडून त्याला त्रिचनापल्ली पळवून आपण मधुरा, त्रिनवलीराज्यें साधून थोडेच दिवसांत तीन चार हजारस्वार फौज जमाकरून त्या फौजेनीशीस चंदासाहेबास कुमुक आला. येकून चंदासाहेब येक, फराशीस येक, अलंखान येक, ऐशे तीघेजणहीं येक होऊन त्रिचनापल्लीवरी युद्धास सन्नद्ध जाहले. तेंव्हां महंमदअल्लीखान त्रिचनापल्लींत असून आपल्यास केवळ आप्त ऐशे तंजाउरचे महाराजासी सांगून पाठविल्याक्षणी महाराजानी आपली फौज हजार स्वार, पंधरा हजार पांयदळ, भारी तोफखाना, व रस्त वगैरे देऊन मानाजीराव सर्दा-

रासहीं देऊन कुमुकेस पाठविले. तैसेंच विजयरघुनाथनायड मानाजी थोडीबहुत आपली फौज देऊन पाठवून शेवटी रस्तेची कुमुक केले. तैसेंच रामनाथपुरचे मरवर व वोडयातेवर यानी थोडी थोडी कुमुक पाठविले. त्याखेरीज श्रीरंगपट्टणाची भारी फौज घेऊन नंदराज दळवाईयानी सेदंखदू ह्मणणार सरदारा कडून नवाब महमदअल्लीखानानी सांगून पाठविले करितां आपल्या कडील सरदार कत्ती गोपालराज ह्मणणारास त्रिचनापल्लीचे किल्यांत पाठवून नवाब महमदअल्लीखानास कांहीं द्रव्यहीं देऊन आपण आपल्या भारी फौजेनिशी महंमदअल्लीखानास कुमुक आले. तैसेंच मुरारजी घोरपडेहीं नवाइतासी आपल्या फौजेनिशी कुमुकेस आले. येणेप्रमाणे चंदासाहेब,महंमदअल्लीखान्, मुरारजी घोरपडे वगैरे उभयतांची फौज उतरून युद्धास सन्नद्ध होऊन प्रथम अलंखान ह्मणणार तंजाऊरचा चाकर होता. तो मधरेचा मुलुक साधून चंदासाहेबास कुमुक आला. तो अपले फौजेनिशी इतर फौजहीं कित्येक घेऊन तंजाउरचे सरदार मानाजी रायांस सन्मुख युद्धास आला. तेव्हां मानाजीरावहीं आपली फौज सन्नद्ध करून युद्धास सन्मुख होऊन येकमेकांस हातमिळून गोळागोळीचे युद्धहोत असतां इंग्रजाकडील सरदार मेदर ह्मणणार थोड्या फौजेनिशी त्रिचनापल्लीचे किल्यास जाणार वाटेंत मानाजीराव युद्धास सन्मुख होते त्यांस पाहून मेदर मजकूर मानाजीरायासी येऊन वर्तमान विचारिले. राव मजकूरानीं सकल पूर्वोत्तरहीं जाणते केले. ते ऐकून घेऊन मेदर मजकूर तोफखाना जवळी येऊन आपल्या हताने तोफा फिरवून ठेऊन शिर पाहून चार पांच बार केले. त्यांत येक गोळा जावून हैद्या

वरील अलंखानाचे गळ्यास लागून त्याचें डोसकें उंडालें. सेवेंच तंजाउरचे थोडे स्वार अलंखानाचे फौजेवरी पडून मारामारी केल्यांत रणास आली फौज जातां उरलेतें टिकावनासारिखें वाताहत होवून गेली. उरलेते सांपडलेत्यांस धरून घेवून तंजावरचे स्वार मानाजी रायांकडे पावले. येणेप्रमाणे पहिली फत्ते तंजावरच्या कडून महमद अल्लीखानास जाहली. तद्नंतरें महम्मदल्लीखान् व चंदासाहेबास युद्ध लागलें ते बहुत दिवस वाहडलें. श्रीरंग व त्रिचनापल्लीस मध्ये कावेरी आहे कारितां कावेरीचे उत्तरेचे कांठीं चंदासाहेबाचे तरफेनें फरांशीसाचे मोर्चे, कावेरीस दक्षिणेचे कांठीं नवाब महमदल्लीखानाचे तरफेनें इंगरेज्याचे मोर्चे येणेप्रमाणे युद्धास लागलें. तेंव्हां नंदराज व मुरारजी घोरपडे व मानाजीराव जगथाप यानी समग्र चंदासाहेबाचे फौजेस येकदा पारिस्त सोडिनासें चहूंकडून वेढून निर्बंध केल्यामुळें चंदासाहेबास खर्चासहीं नाहींसें व रस्तहिं नाहिसें फौज बेदिल्ल होऊन फौजेचा समग्र दंगा जाहल्या समयीं चंदासाहेबानी निघून जावें ह्मणालियांहीं कोठेंहीं वाट नाहींसें वेढिल्यास्तव आपली फौज आपल्या आटोक्यांत येईनासें जाहल्या करितां चंदासाहेबानी तजवीज केली जे; आपण केल्या मनसोब्यांत येकहीं फळलें नाहीं येथून निघून कोणाकडे जावें यास ठाव नाहीं असो गेलों ह्मणिजे कैसेहीं वांचू ह्मणालियां फौजेचेलोक सोडीत नाहीत; बाहेरहीं वेढा पडला आहेकरितां, अमचे फौजेचे लोकच उद्या परव्हांत आह्मास धरून, महमदल्लीखानाकडे ओपून देतील. महमदल्लीखानाचे बापास आपण मारिले आहे. त्याक-

रितां तो दावा घेईल; यास्तव तंजाउरकर भले सज्जन व शौर्य-वंतहीं आहेत त्यापासी जावेंतरी आपल्यास राखतील येक म्हणजे तेहीं राखूं सकनात कां म्हणजेन इस्तकाबिले पासून त्यासी सलूक राखिलों नाहीं. याखेरीज म्हराटाशी प्रमाण करून देऊन आलों तेव्हांहीं तंजाउरावरी भांडणेच केलों करितां ते आप-ल्यास कांय म्हणून राखतील. याखेरीज महमदअल्लीखान् इंग्र-जाचा स्नेह त्यास फार आहे. त्या नात्यानेंहीं आपल्यास राखी-नात परंतु आपल्यास जीवंत महमदअल्लीखानाशीं बोपीनासें तुमचे हातानें मारून सोडा ह्मणून त्यांस प्रार्थून येथें असून महमदअल्लीखानाचे हातीं बोपीलजाण्यापेक्षां तंजावरकरांचे हातीं मारिलें जाणें बरें, ह्मणून दृढ निश्चय करून अर्धरात्रीं समयीं कोणासहीं न कळवितां एका घोड्यावर स्वार होउन एक खिज-मतदार बरोबर घेवून अति रहस्यकरून तंजावरचें लष्कर त्रिचनापल्लीस पूर्वेस कावेरीस दाक्षिणेकडे उतरलें होतें. त्या लष्करांत येवून सरदार मानाजिरायास रहस्यें कडून सांगून पाठिविलें. तेव्हां मानाजिराव एकटेच पलीकडे जावून चंदासा-हेबासीं भेटून बोलिले जे—तुह्मीं कां आलां. तुह्मांस राखणें अमच्यानें कोणतें विधें कडूनहीं होणार नाहीं. महाराज प्रताप-सिंव्हराजे साहेबासहीं तुमच्या ठाई राग फार आहे. करितां तुह्मांस आह्मीं राखूंसकना आतांहीं पाहिजे ते खर्चास देतों. तुह्मीं आपले फौजेंत जा. तेथें जाणें मनास येईना तर खर्चासहीं देतों बरोबरी मनुष्यहीं विश्वासुक देतों. आतांच यथून निघून जा दक्षिण प्रांती झाडी फार आहे. तेथें जाऊन, तेथून पलीकडे

जाणेस मन असल्यास जावुये. अथवा येथूनच वोडयारपाळेचें राणांत असून पलीकडे वेंटवल्लम त्रिणामलेचे झाडी दाटहीं जाउये करितां तुह्मांसी सुचलेंते करा ह्मणाले. त्यास चंदासाहेबानीं उत्तर दिलें जे—हा अर्थ समग्रहीं जाणून आले. तुह्मीं करावयाचा उपकार काय ह्मणजे महमदअल्लीखानाच्या हातीं जीत वोपुनका तैशा प्रसंगांत तुमच्या मनुष्या कडून मारूंटाका येवढें अभय द्या ह्मणून मागीतले. तेंव्हां मानाजीरायानी त्यास जीत वोपीत नाहीं ह्मणून भरवसा देऊन त्यासप्रत्येक स्थळ करून रहस्यानें व जतनाईनेहीं ठेवून त्याक्षणीं तंजावरास चालिले. पुर्वोत्तर समग्रहीं विस्तार करून लिहिले. त्यास प्रतापसिंव्ह महाराजानी वुत्तरदिलें जे या चंदासाहेबानें केल्या कृत्यास त्याला आम्हीं राखिताच नये तत्रापि शरण आल्यावरी ते समग्र आठवास आणूनये. त्याला राखणेच विहित करितां त्या चंदासाहेबास तंजावरास पाठवा ह्मणून लिहिले. तेंव्हां चंदासाहेवास दृष्टीस आड झाला. तें वर्तमान नवाब महमदल्लीखानास कळून शोध घेतल्या ठायीं तिसरें दिवसीं तंजावरचे लष्करांत आहेते कळून तेंव्हां मानाजिरायास व महाराजासहीं प्रार्थना केली जे महाराजामुळें माझा जीव राहिला. महाराजानीं आस्रा दिल्या करितां वांचून पुनः माझ्या भाग्यास पावलों. त्या वेळेसही रासदमोहदीनखान व चंदासाहेव आले. तेंव्हांहीं माझा जोहार करून मला आस्रा देणार कोण धैर्यवंत होता. तैशा वेळेस महाराजानी मजमुळें आलाच पाहून घेतों ह्मणावें या धैर्याने मला आस्रा दिल्यामुळें मीं पुन्हः दवलतसा जाहलों. आतांही तैशीच दया करून माझा बापाचा दावा

म्यां घेइजेसें चंदासाहेबास मला द्यावें ह्मणून बहुता रीतीनें प्रार्थिलें. याखेरीज नंदराज व मुरारजीघोरपडे यानींहीं चंदासाहेबास आपल्यापासी सोडून द्यावें ह्मणाले. तैसेंच इंग्रेज सरदारानींहीं या चंदासाहेबास आपल्यापासीं ओपावें ह्मणून कांहीं जोरानेंहीं मागूंलागले. तेंव्हां मानाजीरायास व त्यासहीं चर्चा होवून जीत कदापी ओपिणार नाहीं ह्मणून चंदासाहेबास मारून सोडिलें. सन १७५२ इसवी जून माहे तारीक ३ स चंदासाहेबाचें डोसकें कापून नवाबाकडे पाठवून मानाजीराव तंजाउरास निघून आले. या अगोदरी तंजावुरची फौज कुमुकेस येताना सन् १७५२ इसवी येप्रेल् तारीख २१ स मानाजीराव यानी कोविलडीचे किल्ल्यांत फ्रांशीसाचे ठाणें होतेते उडऊन किल्ला स्वाधीन करून घेतले. तदनंतरें, चंदासाहेबासच डोसकें कापिल्या नंतरें नबाव महमदल्लीखानानी प्रतापसिंह महाराजाचे खैराती खर्चास ह्मणून यळंगाडाचा मुल्क लक्ष रुपयाचा व कोविलडिचा किल्लाहीं दिल्हे. तैसें विजयरघुनाथराय तोंडमानास प्रेषकषी माफ केले. नंदराज व मुरारजी घोरपडे यानां त्रिचनापल्लीचीच आशा राहून नवाबाशी युद्धास प्रवर्तले. तेंव्हांही तंजाउरचे महाराजानी नवाबास कुमुक पाठविले. थोडे दिवस युद्ध जाहलें त्या युद्धांत नंदराजा कडील येक हत्ती पळून तंजाउरास येवून पावला. व नंदराजाकडील येक तोफ तंजाउरचे सरदारानी पडावू घेऊन आले. तदनंतरें नवाब महमदल्लीखानानी त्रिचनापल्ली किल्यांत इंग्रेजाचें ठाणे मजबूद ठेऊन आपण जरोरीं चंन्नपट्टणास थोडी इंग्रेजाची फौज घेऊन गेले. ते वर्तमान नंदराज मुरारजी घोरपडे त्यांस कळून आपल्यास दगा देऊन गेले म्हणून

मुरारजी घोरपडे यांचे भाउ भुंजगराव व त्यांचे जावांई देखील थोडे स्वारानिशी पाठलाग करून, पन्निरट्टि तिर्वादीकडे गांठून, नवाबाचे पीलखावरी हल्ला केले. तेंव्हां, नवाबा कडील लोकानी बंदुका वार केल्यांत मुरारजी यांचे भाउ व जावांई देखील ठार जाहले. नवाब पलीकडे निघून गेले. पलीकडे गेले हे वर्तमान मुरार रायांस कळतांच केवळ विमनस्क होऊन मुरारराव आपले फौजेनिशी आपले स्वस्थळास निघून गेले. नंदराज उभय कावेरीतीर आक्रमून कित्येक दिवस जंबुकेश्वर प्रांतीं असून तदनंतरें आपले श्रीरंगपट्टणास जावून पावले. तद नंतरें प्रतापसिंह महाराजानी आपले पुत्र तुळजा महाराजास माहाडीकाची लेंके राजकुमारबाईसाहेबास दुसरें लग्न करून दिल्हें. सवेंच सहा चार महिन्यांत मोहित्याची लेंके मोहनबाई-साहेबास घेऊन तुळजा राजास तिसरें लग्न करून दिल्हे. या उपरी महाराजानी आपले फौजदार मानाजीरायांस दक्षिण प्रांतास पाठविणेस एक कारण जाहले. ते काय ह्मणजें रामनाथपुरचे जमीनदार मरवर महाराजाचे आश्रयांत केव्हांहीं असणार; तरी हीं, नूतन धाकुटे वयस्थांस अधिपत्य प्राप्त जाहल्यामुळें आपल्या यौवन मदें कडून कांहीं कुमुकहीं मिळवून घेऊन नवाब महम-दल्लीखानाचा आश्रय दृढ ह्मणून समजून दक्षिणप्रांत महा-राजाच्या मुलुकांत थोडी दुष्ट चर्या आरंभिला. येक दोन वेळेस महाराजानी क्षमा करूनहीं पाहिले. तदनंतरें त्यांत नवाबाचे कृत्महीं थोडें आहें ते जाणून दक्षिणप्रांत तिरवाडनिरीचा मुलूक कधींहीं तंजाउर संस्थानासी मिळालातो; महाराज रामेश्वर यात्रेस गेले वेळेस रामनाथपुरचें अधिपत्य करणार मरवर वडलि होता

त्याने महाराजाची शेवा फार करून आर्जविल्यामुळें तो तिरवाड-निरिचा मुल्क त्याचे दाक्षण्यास्तव थोडे दिवस त्याला सोडिले होते. त्यास त्याचाच ल्योंक मरवराने नवाबाच्या कृत्मास वश्य होऊन महाराजाचे मुलुकांत दुष्ट चर्येस प्रवर्तल्या करितां फौज व फौजदारांस पाठविणेस कारण जाहलें. तेंव्हां, मानाजी-राव् फौजेनिशी जावून लढाई करून प्रथम हनुमंत गडाचा किल्ला, व वरूरचा किल्ला, व मंगळ गडाचा किल्ला, व कुबटीचा किल्ला, हे चारीहीं हल्ला करून घेऊन, तिरवाड-नीरीचा मुलुकहीं जमा करून जास्ती अर्मुख कोटचा किल्यावर शहा देऊन युद्ध केले तेंव्हां रामनाथपुरच्यानी बकुघ्रा किल्ल्या-वरूनहीं तंजावरांतून महाराजानी अन्यत्र कार्यास्तव अर्मुख कोटचा किल्ला सोडून येणे ह्मणून मानाजीरायांस लिहिल्या करितां मानाजीरायानीं आर्मुखकोट न व्होतां तिरवाडनिरीच्या मुलुकास व साधिल्या किल्ल्यास ठाणी ठेऊन तंजाउरास महा-राजाकडे येऊन पावले. त्या संधींत नवाब महमदल्लीखानास हे वर्तमान कळून महाराजासीं जबाब स्वाल करिणेंसें युक्त नाहीं करितां सन् १७६२ इसवींत इंग्रेजाचे सरदार मेस्तर आर्प्री ह्मणणारास कागद लिहिलें जे–त्रिचनापल्लीचे इलाखेंत असाव-याचे मरवराचे मुलुकांत महाराजानी हनुमंतगड वगैरे किल्ले सात घेतले. ते नव्हतां हनुमंतगुडीचे कुमुकेस करनल् क्लियू ह्मणणारानी करनल् हरनानाता निशान लिहून येक इंग्रेजी निशान पाठविले होते. ते घेऊन हनुमंतगुडीच्या किल्ल्यांत जाऊन होते. त्यानी महाराजास उदंडरीतीने सांगीतले. ते ऐकनासें हनुमंत-गुडी किल्लाहीं हल्ला करून घेऊन करनल् क्लियूकडे

होतेते इंग्रेजी निशानहीं फाडिले ह्मणून लिहिले. ते वर्तमानहीं महाराजास अवगत जाहलें. तदनंतर कित्येक दिवसाने पुदुच्चेरी बंदरास गवनरमेंटचे अधिकारास मुसे लाली ह्मणणार सरदार आला. त्यानें पूर्वी परिशोध न घेतां अकार्णिकें कडून तंजाउरचे राज्यावरी युद्धास आले. तंजाउरचे राजानी तुमचे येण्यास प्रसक्ती काय ह्मणून विचारिल्यां सदुत्तर न देतां येऊन तंजाउरच्या किल्ल्यास वेढा देऊन उत्तरले तेंव्हां प्रतापसिंह महाराजानी दोन महिने पावेतो तो किल्ला भांडवून शेवटी आपली फौज बाहेर काढून मुशे लालीचे लष्करावरी रतावा पडून, बहुत सोलदाज वगैरे कित्येक सरदारासहीं मारून, व कित्येक फौज मुलुकावरी पाठवून, त्याचे लष्करास येक दाणा, रस्त, येवूंदेइनासें बंद केले होते; तेणेकडून मुसे मजकूर घावरें होऊन, भारी तोफा व भारी सरंजाम जडगीर कित्येक टाकून देऊन, अघाद त्वरेनें मजल दरमजल करून पुदुच्चेरीस पावले. तेंव्हां महाराजानीं आपल्या मुलुकास तमाम आज्ञा दिले जे–या संस्तानांत परंपरेपासून चालत आला दंडक या मुलुकांत फरंगी मनुष्य कोणी आल्याने त्यास त्या त्या ठाईंचे जकातींत हसल घ्यावें, याची पद्धती फरंगी सरदार चालत येणारास आसामी येकास पांच होंन्नप्रमाणें, व घोड्यावरी बसून येणाऱ्यास त्यास अधीक, फरंगीलोक पालखींत बसून आल्याने त्यांस विशेष हसल, आणी कांहीं फौज घेऊन कोणी फरंगी सरदार आलियां त्याने अगावू महाराजास सांगून पाठवणें; महाराजानी जगातीवाल्यांस हसल माफास परवानकी पाठवून निरोप देणें; येणेप्रमाणें पुरातन चालत आल्या दंडकास हलीवं-

दूरचे फरंगी कित्येकासी संस्थानास स्नेह विशेष जाहल्यामुळें, या उपरी निरंतर त्या लोकाचा येव होत जाईल. त्यांतही फौजे-निशी येणार आह्मास कळूनच येतील; त्या खेरीज येणार फरंगी अनेक कोणत्या बंदरांतून कोण्या रीती आल्याहीं त्या कोणास आह्मापासून हसल माफ केला असें घेणें गरजनाहीं ह्मणून आज्ञा-पिलें. तदनंतरें पुदुच्चेरीचे गवर्नर व जनरलहीं चंन्नपटणचे किल्ल्यास मोर्चे लाविले तेंव्हां, चंन्नपट्टणचे गवर्नर यानी महा-राज चंदासाहेबाचा कलाप पडिल्या पासूनहीं व नवावास महाराजानी केल्या उपकारास्तवहीं महाराजासीं विशेष स्नेह राखिला होता करितां महाराजास कुमुक पाठवावें ह्मणून लिहिले. तेंव्हां महाराजानी महमद इसूप्खान् कुंमंदान् त्रिचनापलींतून जाणाराबरोबरी चारी पांचशे स्वार वगैरे कुमुक पाठविले. त्या महाराजाकडील कुमुकेच्या फौजेनी चन्नपाट्टणावरी उतरल्या मुसे लालीचा लष्करास कोणती रस्तहीं येऊंदेईनासे व फौजहीं येऊं-देईनासे बहुत मारामारी करून वाट बंद केले. त्या वरी मुसे लालीचा फौजेचा निर्वाह नाहींसें मुसे लाली पुदुच्चेरीस येऊन पावला. दुसरा किस्ता पिकट साहेब कारक्यालावरी येऊन उतरले. तेंव्हां महाराजाचा कुमुक आपेक्षिले. तेंव्हांहीं महाराजानी कुमुक पाठवून साहाय केले. तदनंतरें तिसरा किस्ता पिकेट साहेब पुदु-च्चेरीचे किल्ल्यावरी जाऊन उतरून लढाई केले. तेंव्हांहीं महारा-जाची कुमुक आपेक्षिले. तेंव्हांही महाराजानी भारी कुमुक पाठ-वून सहाय केले. येणेप्रमाणे तीनी किस्तेसहीं इंग्रजाचे खांस राज कारणास महाराजानी कुमुक करून साह्य केल्या करितां पिकट-

साहेब फार संतोष पावून आपण विलायतीस जात्या अगोदरी मेस्तर डुप्लिकेस ह्मणणार सर्दारास महाराजा कडें पाठवून महाराज व इंग्रेजाचे स्नेहातें पुरोवृद्धीस येकत्रहीं केले. तदनंतरें मानाजी राव जगताफ यांस सरखेली व फौजदारी चालत होती परंतू मानाजी रायांची चलंती कोणतें योग्यतेसहीं युक्त नव्हते करितां मारून टाकावें तरी माफ व येक दोघांस त्यांच्या अकृत्यास्तव मारिले. तरींहीं मारावे ह्मणावयाचें महाराजाच्या चित्तीं नव्हतें करितां मानाजीरायांस न मारितां सरखेलचे पदमात्र काहडून ब्राह्मणाची जात कोणत्या कृत्रिमासहीं धजणार नव्हे. आणि भिवून बुद्धीने वर्तुणूक करतील ह्मणावयाचे निश्चये कडून सकळ राज्य तंत्रहीं डबीर नारोपंताचे स्वाधीन करून शेवटारहीं चालवीत आले. तदनंतरें,नवाब महमदल्लीखान् त्रिचनापल्लींत येऊन असून तंजाउरचे महाराजासी प्रेषकपीचा जवाब सवाळ केले. तेंव्हां महाराजानी सांगून पाठविल्या उत्तरास नवाबाचें उत्तर ताळापडनासें महाराजानी फौज सन्नद्ध करून युद्धास सिद्ध जाहले. तेंव्हां इंग्रेज सरकारच्या सरदारानी महाराजानी नवाबास केला उपकार आणि आपल्यासी राखिला विधहीं मनास आणून नवाबाहीं मागावयाच्या रीतीचे सांगून आपल्या मध्यस्तीने मागील राहिलें प्रेषकषीस येक हद्द करून या उपरि प्रति वर्षीहीं द्यावेयाची प्रेषकपी इंग्रेज सरकारचे मारफतीने देणें ह्मणून वारून उभयतांस बूदलूर्चे स्तलांत भेटीचे संविधान करून समाधान केले. त्या दिवसांत लेंक तुळजा महाराजास दुसरी स्त्री राजकुमार बाईसाहेबाचे उदरी येक कन्या जन्मली. पेसजी मृत झाहल्या बाई शाहजीराजा ह्मणणार वांचला आहे ह्मणून कुप्पी

बटकीचा लेंक सुभान्यास तंजाउरचें राज्य प्राप्त व्हावयाजोगें केल्या कोथाजी घांटका उधडून गेला तो अस्थि-लूर्चे राणांत येक्या खेड्यांत आलाहे ह्मणावयाचें महाराजास कळून दोघे विश्वासुक आप्त शिपाई त्या बरोबरी कित्त्येकांसहीं देऊन पाठवून त्यां कोथाजी घांटक्यास मारून टाकिले. येणे प्रमाणे प्रतापसिंह महाराजानी राज्य करण्यांत उत्तम पुण्य कीर्ति विस्तारली. त्याचा विस्तार थोडा जाणवितों जे–उत्तरदेश सातार, पुना, अवरंगाबाद. पावेतोहीं व पूर्व दिशेस समुद्र मध्य प्रदेश, अच्चि, याळयाण, खंडीदेश, शिंगळद्वीपा पावेतोहीं दक्षिण प्रदेश, मलयाळ, कोळंब, कोच्ची गिडडाघाली, श्रीरंगपट्टण देश, बुदलूर देश, गुत्ती, कुष्णातीर, पनाळगडा पावेतोहीं प्रतापसिंह महाराजाची उत्तमरीती, उत्तमचलती, दानधर्महीं, धर्मकीर्तीहीं, औदार्य, शौर्य परराज्य भयंकर इत्यादि कीर्ति पसरल्या. आणि स्वराज्याचे जन समग्रहीं महाराजाचे दानादि औदार्य गुणांकडूनहीं जनरंजक शक्तीकडूनहीं सकल उपजीविकेचे प्रजा समग्रहीं सूखावल्या ऐशा महाराजास परलोक प्रयाण दिवस समीपल्याचे कित्त्येक चिन्हे दिसूं लागली त्यांचा विस्तार थोडा जाणवितों—प्रथम निर्याणास सहा महिन्या अगोदरी पासून महाराजाची चित्तवृत्ती अतिशय कोपाविष्ट जाहली. त्यास येकच दृष्टांतर सांगतो जे—देवदर्शना निमित्त महाराजानी तिर्वाळूरची सवारी केली. तेव्हां महाराजाचेच सेवकांत दोघे मराठे मावळे मागें राहिलें. त्यांनीं महाराजाचे सेवेस अभ्यंतर पडतेंकीं ह्मणून त्वरेने स्वारींत मिळावें ह्मणून धांवत आल्या करितां त्यांचा

अंगवात व त्यांचा पदसंघट्टन रोमा पासून उडाले रज यादोहीं चाहीं स्पर्श महाराजाच्या अंगास जाहलेसें करितां भासलें महाराजानी याक्षणी त्या दोघांचाहीं शिरच्छेद करविले. त्यांस त्यांवरी शिरच्छेद करावेंयाजोगें गुना नव्हता करितां प्रपंचास समग्र आजतागाईत महाराजानी केल्या वर्तु- वर्तणुकेस हा विपरीत चिन्हसें भासलें. ऐशी आणखी कित्येक उग्र कृत्यहीं चालिली. याखेरीज दैवी दृष्टांत येक सबळ चालला तो कायह्मणजें—महाराजाचा निर्याणास तीन महिने अगोदरी पासून रात्री काळी बारा घटिक्या नंतरें बावीस घटिका पावेतोहीं येक थोर ऐसा रोदन शब्द होणें. महाराज आदि करून सकल लोकहीं हा शब्द किल्या बाहेर होतो ह्मणून पहावयास गेल्या ठाईं किल्यांत होणे किल्ल्यांत पाहिल्यां बाहेर होल्या सारिखें असणें येणेप्रमाणे तीन महिने जाहलें. तदनंतरें, दिवान वाडयास पश्चिमभागीं पेसजी नायड कूट राज्य केले त्याच्या हजारीवरील येक गोपूर होतें त्या गोपुराचें शिखर उत्तरची बाजूचें येका येकी खचून पडलें. इत्यादि दुःश्चिन्हें ह्मणून सकल प्रपंचांतहीं ह्मणूलागले. आणखी कित्येक दुश्चिन्हे लोकांच्या दृष्टीसहीं दिसूं लागली. त्यानंतरें, प्रतापसिंह महाराजानी आपल्या तपोबळें करून व योगाभ्यासा करूनहीं श्रीगुरु वाक्या- च्या दृढाभ्यासा करून आपले निर्याण नीट करून घेऊन परि- पूर्तीचे दिवस आनंदेंकरून भोगीत असतां तुकोजी महाराजाचे परिगृहीत स्त्रियांपैकी झाले पुत्र समग्र मृत जाहले. त्यांत नाना साहेबाचे पोटी मात्र येक पुत्र अपुसाहेब ह्मणणार राहिले ह्मणा-

वयाचा अर्थ वरि लिहिला आहेकीं ते अपूसाहेब आपल्या राखीचे पोटीं झाली संतती येक लेंक नानासाहेब ह्मणणारास ठेउन आपण देवगतीस पावले. त्या परलोक गत अपूसाहेबास उत्तर कृत्य दहारोजाचेंहीं करवून त्याचे बारावे दिवसीं प्रतापसिंह महराज आपले पुत्र तुळजाराजास उत्तम रीतीची वर्तणूक समग्रहि सांगून दृढप्रज्ञकरून शेके १८८५, १६८५ स्वभानु संवत्सरीं प्रतापसिंह महराज परमगतीस पावले. त्या समागमें त्याची तिसरी स्त्री यमुनाबाई साहेब, पांचवी स्त्री सखवारबाई साहेब उभयतां बाईसाईब अनुगमन केले. सवेंच तुळजा महाराज तक्तनिशी जाहले. तेंव्हां नवाब महमदल्लीखानानि महाराजास मुबारकाची वस्त्रें व पत्रें व मुतरमुरुग ह्मणणार येक अपूर्व पांखरूं थोर दीड मनुष्य-प्रमाण उंच त्याचे पांय उंठा सारिखे ऐसें पांखरूं पाठविले. तद्-नंतरे, तुळजामहाराजानी चार पांच वर्षें पावेतो आपले वडील प्रतापसिंह महाराजाचे आज्ञे प्रमाणेच आपल्या योग्य परिवारांस यथायुक्त राखून नवाब महमदल्लीखानास संतोष व्हावयाजोगे त्यानी मधरेवरी कुमदीन् महमद् इसूप्खानावरी एक कित्ता व हैदरनायकावरी बेंगळूर पावेतो एक कित्ता नवाबानी राज कारण केले, त्यास येकंदर कुमुकेस फौज वगैरे व सरदार अरुणगिरि अप्पास मधरेचे कुमुकेस, वेंकटराव गाडऱ्यास हैद्-राचे मुलुकावरी कुमुकेस पाठवून इतरराजे व नवाब आदि करून सर्वत्रानी श्लाघना करावयाजोगें राज्य परिपालन करिते जाहले. तद्नंतरें, पूर्वीपासून आपल्या अनुसरणेंत होते त्यांस दौलतवंत करावे ह्मणावयाचे अपेक्षेनें हुसेन् ह्मणणार येका तुरुकास आपले आमात्यपद दिल्हे. तेंव्हां आर्काड प्रांतावर हैदरल्ली

खानाची मोहिम जाहली होती ते हैदरअलीखान् तंजाउरासमीप तिरुमलवाडीस येऊन महाराजासीं जवाब स्वाल केले. महाराजानी चार हत्ती व लाखहोन्न पावेतो दिले ते घेऊन गेले. त्या हुसेनखान्सुर ह्मणणाराने वरकड राज्य कारभार कोण्यारीतीं केल्यांहीं मुख्यकाम प्रतापसिंह महाराजानी केला वट्ट नवाब महमदअलीखानास आर्कोड सुभायाची प्रेषकषी तंजाउर संस्थानांतून प्रतिवर्षीही देत येण्याची इंग्रेज सर्कारचे मार्फतीनें देतयेण्याचे केले होते. तो घट्ट ह्मणावयाचा बाधा हुसेनखान् सुराच्या विपरीत बुद्धिउदकाचे प्रवाहाने उखळिला करितां त्या आधारावरी होत्या संस्थानास धोका येईल अथवा आला ह्मणावयास संदेह नाहींसा जाहाला. तदनंतरें, तुळजामहाराजानी आपल्या अंकितलोकांचे बुद्धीस अनुसरून अस्तकविल तुकोजी महाराजाचे दिवसापासून रामनाथपुरचे पाळेगारांस सहाय संमती करावयाची चाले संस्थानांत आहे ह्मणावयाचे आधारावरून व याखेरीज नागपटण बंदराने महाराजास प्रेषकषी द्यावयाचे हत्ती जहाजावर येतहोता ते जहाज रामनाथपुरचे तालच्या कांठास लागला ह्मणून रामनाथपुरच्यानी तो हत्ती काहडून घेऊन तो हत्ती महाराजाचा ह्मणून कळूनहीं न देता ठेऊन घेतिल्याकरितां महाराज रोषात्कर्षित पावून, रामनाथपुरावरी चालकरून, तो किल्ला वेढून, युद्धकरून किल्लाहीं पावून तो किल्ला हस्तगत होते समयीं तुळजा महाराजानी युक्तायुक्त प्रसक्ती व अप्रसक्तीचे तजवीजेंत मनेंप्रेरून रामनाथपुरचा किल्ला न घेतां, त्यांचा त्यांस राखून त्याकडून आपल्या फौजेची वर्तमान ह्मणून कांहा कांहीं घेऊन, तंजाउरास पावून सर्वेंच आपली कन्या घांट

कयास देऊन बहुत सन्नाहानिशी बहुत खर्च करून लग्न केले. त्या येकंदर खर्चामुळें नवाबास द्यावयाची प्रेषकषी दोन वर्षांची बाकी राहिली. तेंव्हां नवाबमहमदल्लीखानानी तजवीज केली जे- तंजावरचे तुळजाराजे बुद्धिवंत आणि प्रबळहीं; उत्तरेकडील म्हराठ्याचे अनुसंधानाचेहीं आणि प्रथम वयस्थ शूर जाहल्या करितां कधीही आपुले योग्यतेनुसार प्रवर्ततील, तेंव्हां आह्मासहीं जडहोईल यास्तव कोणे रीतीहीं ह्यांस हाताखाले घ्यावें, यास प्रस्तुत प्रेषकषीची बाकीहीं आहे याची मागणी करितांच फौज जमाकरावी प्रसंगानुसार तंजाउरचे राज्य आक्रमून राजासहीं वश्यास आणावे कदाचित् त्यानी प्रेषकषी देऊन सोडिल्याहीं क्रमेंकडून राज्य आक्रमून राजास आपले हाताखाले ठेवणेचें कार्य परंतू वेगळी योचना कामाची नाहीं ह्मणून निश्चय करून प्रेषकषीची मागणें केले. तेंव्हां काल वशांत राजाची बुद्धी दुर्मंत्रीयानी अपहरून निराकरण उत्तर लिहितेंसें केले. तेवढ्याने नवाब महमदल्लीखान, राजाचे वडीलांनी केला उपकार न आठ- वितां राज्य तंत्रावरीच दृष्टी देऊन राज्य आक्रमणेचे बुद्धीने आपुले जेष्ट पुत्र उमदतुलाउम्रा या बरोबरी फौज व युद्ध सन्नाहहीं देऊन युद्धास पाठविले. त्यानी तंजाउरचा किल्ला वेढून युद्धकेले. तेंव्हां ज्या दुर्मंत्रीनी राजाची बुद्धी चोरून युद्धास प्रवर्तविलेकीं त्यांस युद्ध सामर्थ्यहीं पुरनासें, पुढिले योचनेसहीं मंदत्व पावून संविधान करावेंह्मणून राजास विनवूं लागले. तेंव्हां राजानी योचना करून पुरातन वडिलाचे वेळेचे सामादिक येक दोघांसी तजवीज करून संविधान बोलून फौजेचा खर्च पंन्नास साठ लाख रुपये पावेतो वारून घेऊन

कांहीं नग मालहीं दिल्हे. जातां वरकडास अर्धा मुलुकाचा महसूल ईड करून दिले. त्यानंतरें उमदतुल् उमरानी तंजावरच्या किल्ल्या समीप तीन कोसावरी पश्चिमेंकडें वल्लंचा किल्ला आहे; त्यांत आपुले ठाणे ठेऊन येळंगाडचा मुलूक नवावानीच दिलाहोता तो आपले स्वाधीन करून घेऊन आपली फौज घेऊन त्रिचनापल्लीस पावले. तदनंतरें महाराजानी चन्नपटणास नवाबाकडे आपल्याकडील सरदार एशवंतराव सूर्यवंशी ह्मणणारास पाठवून कित्येक संविधान सांगून पाठविले त्यास नवाबाचे मनोगत वेगळेंच कळवितां त्या सरदारा बरोबरी येक घोडा, वस्त्र, पत्र, मात्र पाठविले. परंतू संधी समाधान केले नाहींत. तदनंतरें नवाबानी अपले बाकीचे रुपये समग्र झाड्यानिशी पावतें झाल्यावरी येक वर्षानंतरें तुळजा महाराजास ऐवज समग्र नवाबास पावल्या करितां फौजेच्या देणेस तुटारा पडल्या समयीं त्या लोकांस समग्रहीं लांच देऊन फोडून त्यानी भांडण्यास फित्वा करून कित्येक सर्दारांसहीं फित्व्यांने भेद करून राज्यच आक्रमावें ह्मणावयाचें योजनेने त्या वेळेस मराठ्याकडील येक सरदार माधवरावसदाशिव ह्मणणार चन्नपट्टणास नवाबाकडे चौथाईस्तव आले. त्यास आपले करून घेऊन त्याचे मन्नहीं घेवून राज्य आक्रमणेस आपले दुसरेलेंक सदारमुलुक ह्मणणारास अधिकार देऊन फौजेनिशी अकाणिककडून पाठविले. त्यानी तंजाउरास पावून कांहीं युद्ध कांहीं कृत्रमाचे बलाने तंजाउरचा किल्ला व राज्यहीं आक्रमून घेऊन किल्ल्यांत अपली ठाणी ठेऊन राज्याचा अधिकार समग्रहीं महाराजाचे पुरातन सेवक डबीर नारोपंताचे स्वाधीन करून आपण

कित्येक दिवस कुंभकोणांत असून त्यानंतर निघून चन्नपट्टणास नवाब महमदल्लीखानाकडे जाऊन पावले. येणे प्रमाणे नवाबास तंजावुर राज्य दोन वर्षें अधिकार चालिला. तंजावुर राज्य शंभू महाराजापासून भोंसल वंशास चालत आल्यांत वरकड फौजेचा विचार कैसा असल्यांहीं राजाचे आप्त परिवार मात्र युद्धास प्रवर्तल्यां बहुत सेनेचा नाशकरूं सकतील ऐसें असतां हा किल्ला अन्याक्रांत जाहलाकीं ह्मणून ह्मणावें तरी सकलजनानेंहीं येक दोष आरोपण करावयास ठाव जाहला तो काय म्हणजे–तुळजा महाराजास राज्यपद प्राप्त जाहल्यापासून बहुत दान धर्म केले. बहुत अग्रहारें दान केले. बहुत देवालयाचा उद्धार केला. तूरुकाचे मताच्यांस देखील अनेक धर्में ऊर्जित करून केले. स्वतेव राजे बुद्धिवंत सकल विद्याहीं जाणणारा आंगेकडून चांगले शूरहीं ऐशा महाराजास राज्यपद प्राप्तीनंतरें, चार वर्षां उपरी दुष्ट सामादिकांचे सहवास घडत आल्यामुळें, त्यांच्या विपरीत बुद्धीस महाराजाचे चित्तहीं थोडे अनुसरावेयास अंगीकारिल्या करितां, त्या दुष्ट सामादिकांकडून कित्त्येक दुःष्कृत्त्ये महाराजास कळून न कळूनहीं घडत आली. त्यांत लिंगोजी भोंसलेस प्रतिनामें गिलिअण्णा म्हणणार येकास अमात्यपद प्राप्त जाहलें. त्या गिलिबिलिने राज्यांत त्याचा जिनस कळावयास प्रसक्ते पदारूढहोऊन असतां ब्राह्मण जात देशस्थ आरणीकर कोनेर राव म्हणणार येका जमेदारानें आपल्या हक्कानिशी गिलिबिलि अण्णाशीं आपल्या शिपाईगिरीच्या अंगेकडून जबाब सवाल केले. त्यांत त्यांस राग आलासें कळून त्याकडील येकानें त्या कोनेर रायास अमर्यादेनें बोलूं लागला; तेणेंकरून उभयतांस चर्चा होऊन नग्नशास्त्रें करून मारामारी

केली त्यासमयीं सात पांच जनानी मिळून कोनेरराव ह्मणणार ब्राह्मणा वरी हात चालविल्या करितां, विशेष जखमा लागून ब्राह्मण खालता पडला परंतु त्या वेळेचा अवसर पाहतां ब्राह्मणावरी जबर जास्ती केले ह्मणावयास ठाव जाहला. हे वर्तमान महाराजास कळल्यावरी त्या ब्राह्मणास घरास पाठविले असून त्याचा उपचारहीं केला असल्यां तो ब्राह्मण वांचो अथवा न वांचो शब्दास ठांव नसता; तैसें न होतां त्या गिलिविलि अण्णाचे सांगण्यासच विश्वासून त्याच्या मनोगतीनुसारच महाराजानी अंगीकारिल्या करिता त्या आरणीकर ब्राह्मणास जखमा लागूनहीं सजीव प्रज्ञेसहित असतांच पांयासी दोरी वांधून पंचम जातीकडूनही बिदिंत ओढिले. तेंव्हां त्या ब्राह्मणाचे रक्त विदींत समग्र पसरून तो ब्राह्मण फार दुखवला जाऊन दुःख सोसवनासें कित्येक दूर ओढिल्या नंतरें प्राण सोडिला. तेंव्हां सकलजनासहीं हे कृत्य परम कठोर ह्मणून बोलावेंयांस संदेह नाहीसा जाहला व राज्य नष्ट होण्यासहीं हेच कारण ह्मणून लोक वदंतीस थोर कारण जाहलें. तदनंतरें, नवाबानी तंजावुरचा किल्ला घेतला ते वर्तमान समग्रहीं इंग्रेज सरकाराचे सरदारानी विलायतीस कोर्टाफ् डैरेक्टर वगैऱ्यांस लिहिले. त्या वरून इंग्रेज बादशहा आदिकडून थोर सरदारानी योचना केलि जे—कैंव्हांहीं चन्नपटणाचे वर्तमान येण्यांत नवाब महमदलीखानाची चलती व तंजावरची महाराजाची रीती ऐकत येण्यांत महाराजाकडून केंव्हांहीं नवाबास उपकारच घडत आला. परंतू येकेवेळेसहीं अनुपकार नाहीं. ऐसें असतां प्रथम नवाबानी प्रेषकषीचे अल्प कारणास्तव तंजाउरचे राज्यावरी फौज बंधीकरून आपले

लेंकास पाठविले. त्यास राजानी प्रेषकाषिसहित फौजेचा खर्च ह्मणून सांगीतल्या प्रमाणे येकंदर बहुत अधिक द्रव्य कबूल करून यानी येक किल्ला व भारी मुल्क बांधिला. तोहीं सोडून कबूल केल्याप्रमाणे ऐवजहीं झाड्यानिशी पावतें केले असतां परतून नवाब महमदल्लीखानानी अकारणिक त्या राज्यावरी फौज पाठवून तंजाउरचें राज्य आक्रमिले. ते फार अनुचित केले. तंजाउरच्या राजानी हस्तकविलें पासून केला उपकार समग्र नवाब विसरून कृतघ्न जाहले करितां, तंजाउरच्या राजानी उत्तम रीतीने नवाबासी व अमचा इंग्रेज सर्कारासहीं केल्या स्नेहास्तव याक्षणीं तुह्मी चन्नपट्टणचे अधिकारास जाऊन नवाब महमदल्लीखाना कडून तें राज्य मागून घेऊन, तंजाउरचे तुळजा महाराजास देणे ह्मणून निश्चय कडून निरोपून लाट पिकट साहेबास पाठविले. लाट पिकट साहेब चन्नपटणास पावून विलायतीचे कोर्ट अफ् डैरेक्टरचे हुकुमाप्रमाणें नानाविध उपायाने नवाबाकडून तंजाउरचे राज्य घेऊन आपण तंजाउरचे किल्ल्यास पावून नवाबाकडील ठाणे होते ते उठवून तंजाउरचे राज्य व किल्लाहीं तुळजा महाराजास ओपून परतून तक्तनिशीने केले. तेंव्हां तुळजा महाराजानी इंग्रेज सर्कारचे थोरवीस व नीतीसहीं त्यानी दयेयुक्त केल्या उपकारास व भावाकडूनहीं वश्य होऊन इंग्रेज सर्काराचे न्यायेस मनेकडून पातेजावून तंजाउरची किल्ल्याची किल्लेदारी व फौजदारीहीं इंग्रेज सरकारास ओपून त्या फौजेच्या खर्चास आमुके ह्मणून एक निष्कर्ष करून व इंग्रेज सरकारचे नजरेस लक्ष चकऱ्याचा मुलूक व नागूर ह्मणावयाचा बंदरहीं आपले आप्त संतोषाने

दिल्हे. त्या उपरी नवाब महमदल्लीखानानी आपल्यास प्रतिवर्षासहीं प्रेषकषी यावी ह्मणून प्रयत्न केले. त्यास तुळजाराजानी आपला किल्ला नवाबानी अकारणीक कडून घेतला; तो नव्हतां, आपल्या वाड्यांतील परंपरा राजानीं संपादून सव्वाशें वर्षापासून ठेविला होता तो माल समग्र घेऊन गेले. त्या मालाचे मोल प्रति वर्षासहीं हिशोब पाहिल्या एक वर्षाचे व्याजांत दोन वर्षांचे प्रेषकशीस ऐवज होतो. या खेरीज आपण सर्व विधें कडूनहीं इंग्रेज सरकारासच उपकृत परंतू नवाबानी तर अपुले राज्यच घेतिले. या कारणास्तव आपण प्रेषकषी देतच नाहीं म्हणून आपण जीवंत असतोर दिल्हे नाहींत. नीतिवंत ऐशा इंग्रेजांकडून महाराजास आपलेंच राज्यपद प्राप्ती नंतरे महाराजानीं केली तजवीज काय म्हणजें—वर्णीसकर जातीचे व हीन वर्ण जातीच्यास समीपता व अमात्यपदहीं दिल्या करितां, ब्राह्मण हत्यादि पातकें, राज्य नष्ट होण्यासहीं कारण जाहलें. त्या उपरी उत्तम जाती ब्राह्मण जाहल्या करितां द्रोह करीनात. अगाध कृत्यासहीं भितील म्हणून अपुलें अमात्यपद येकामागें येक ब्राह्मणासच शेवटोर चालविले. या उपरि, तुळजा महाराजानीं आपण लग्न केल्या स्त्रियांपैकीं मोहना बाईसाहेब म्हणणार नवाब महमदल्लीखानानी किल्ला घेत्या अघिलें वर्षी प्रसव होऊन पुत्रासहीत दैवगतीस पावले होते. उरल्या दोघ्या स्त्रियांपैकीं राजसबाईसाहेब ज्येष्ठ, राजकुमारबाईसाहेब दुसरें या दोघ्या स्त्रियांसहीं पुत्रसंतान नाहीं. या उपरी होण्यासहीं होईल न होईल म्हणावयाचा संदेह भासल्या करितां, पुत्रसंतानार्थ दोन लग्न केले. त्यांत एक स्त्री माहडीकाची कन्या सुलक्षणाबाईसाहेब म्हण-

णार, दुसरी इंगळ्याची लेंके मोहनाबाईसाहेब म्हणणार ऐशी दोन लग्न करून घेतिले. त्यांपैकीं राहिल्या स्त्रिया चौघे. मोहनाबाईसाहेबाचे उदरीं प्रथम पुत्रसतान होऊन दशदिवसांतच तो पुत्र देवगतीस पावला. तदनंतरें त्याच मोहनाबाईसाहेबाचें उदरी अव्दुलप्रतापराम जन्मले. ते अव्दुलप्रतापराजे सहा वर्षें वाडवून शेवट देवी दाखवून त्या उपद्रवाने परलोक गतीस पावले. या खेरीज राजाचे दुसऱ्या स्त्रीचे पोटीं एक कन्या जाहली. तीतें अठावर्षास लग्न करून दिल्हे ह्मणावयाचा अर्थ वरी लिहिला आहे; कीं त्या लेंकीच्या पोटीं येक पुत्र मारुतसामी ह्मणून, येक कन्या शांता ह्मणून ऐशी दोन लेंकरें जाहली. त्या दोघे लेंकरास ठेऊन राजाची लेंके अपरूप बाईसाहेब ह्मणणार देवगतीस पावले होते. त्या दोघे लेंकरासहीं तुळजामाहाराजच मात्रकृपेकडून संरक्षीत होते. दैवयोगें कडून ते दोघे लेंकरेंहीं अव्दुलप्रतापरामराजे दैवगतीस पावले वर्षांतच नातुंडे मारुतीसामी व शांतामाहीं दैवगतीस पावले. येणेप्रमाणे लेंक, लेंकीं, नातुंडेंहीं आपल्या समोर दवगतीस पावल्या करितां, तुळजामहाराजास आपलेंहीं शरीर त्याग जाहल्यांच दु:ख शमन या विना दुसरा मनास उपाय नाहीं ह्मणून बहुत व्यसनानें अधिक वैराग्येंकडून अन्नोदकाची चाड देखील न राखितां काल क्रमूं लागले. तेणेकडून शरीरास महद्रोग उद्भवून त्या रोगानेच तीन वर्षें काल क्रमिले. ऐसें असतां नवाब हैदरअल्लीखान ह्मणणार आर्काड चन्नपट्ण प्रांतावरी मोहिमेस आला तो तंजाउर किल्ल्याकडे येऊन उतरून गोळेमारून किल्ल्यांत इंग्रजाची फौज होती त्यासहीं लढाई करून तंजाउरचा मुलुक समग्र जप्ती केला, त्या

दिवसांत तंजाउर देशाचे व किल्लयांतहीं केवल क्षाम पडून दाणा मिळेना; अशा समयीं, सकळ जन क्षोभहीं, होऊन रोजगार वहुत मनुष्य मरूं लागली. सहाशें, सातशें, येणेप्रमाणें जाऊं लागले. तेंव्हां त्या क्षामांत निर्वाह नाहींसें शेवट मनुष्यास मनुष्याने भक्षिले. तेव्हढयाने क्षाम व कलाप दोनी वारून गेला. तदनंतरें, आपुले शरीर या उपरी राहीना ह्मणावयाचे निश्चये-कडून कळल्या वरीं योचना केले जे—आपल्यास जाह्ले पुत्र व नातुंडेहीं आपल्या पुढेंच परलोकगतीस पावले; सांप्रत आपले शरीरहीं राहीना, आपल्या उत्तर कृयेसहीं व राज्य परि-पालनेसहीं कोणी योग्य वाध्य नाहीं, करितां पुत्र पाहिजेतरी आपले वडिल केवळ राजऋषी प्रमाणें वहुत कीर्ती संपादून सकळ सोयरे लोकानींहीं त्यांचे योग्यतेस वश्य होऊन त्यांचा अंगिकार करून आपण होऊन मिळावयाजोगे वर्तणूक केले. तरीहीं तुकोजीराजाचे लग्नकरीनाते वाइकाचे पोटी जन्मले ह्मणा-वयाचा येक कळंक राहूनच गेला असतां तशा कोणत्या शब्दा-सहीं ठांव न राहतां आपले स्वकुलांत स्वगोत्रीज व दाइजापैकी रूप गुणेंकडून युक्त ऐशा मुलास विधियुक्त दत्त घेऊन जातक-र्महीं संस्कारहीं करून शरफोजीराजे ह्मणून नामकर्ण केले. आतां ते शरफोजीराजे कोणाच्या वंशातले ह्मणून कळावयास लिहितों जे—भोंसल वंशांत आदि पुरुष शंभुराजा पासून तेरावे पुरुष वावाजीराजे; यांचे पोटी मालोजी राजे येक, विठोजीराजे येक, दोघे जन्मले ह्मणूनहीं मालोजी राजाचे पोटी शाहजीराजे जाह्ले. त्या शाहजीराजाच्या पोटी शिवाजीराजे, येकोजीराजे जन्मले. त्यांची ख्याती लिहून दुसरे पुत्र विठोजीराजाची ख्यातीहीं

कित्त्येक लिहून त्या विठोजीराजाची संततीच आतां साताऱ्यांत राज्यकरणारहीं व पणाळांत राज्य करणारहीं ह्मणावयाचा अर्थ येकंदर विस्तारें कडून वरी लिहिला आहे. सांप्रत तुळजाराजानी दत्त घेतले शरफोजीराजे त्या विठोजी राजाचे वंशाचेच जाहल्या करितां तो विस्तार जाणवितों जे—विटोजीराजाचे लेंक आठजणापैकीं शेवटील लेंक त्र्यंबकजीराजास जाहल्या लेंकां पैकीं गंगाजीराजे ह्मणून येक लेंक. त्या गंगाजीराजास उवाजीराजे येक, तावोजीराजे येक लेंक ऐसे दोघे लेंक त्या तावोजी राजाची संतती प्रसंगानुसार लिहिलें जाईल. प्रस्तुत त्या उवाजी राजाचा लेंक गंगाजीराजे, त्या गंगाजीराजाचा लेंक सुभानजी-राजे त्या सुभानजीराजाच्या पोटीं उवाजीराजे ह्मणून येक व शाहजीराजे ह्मणून येक ऐशे दोघे लेंक. त्या पैकी शाहजीराजाच्या पोटी जन्मलेतेच शरफोजीराजे; त्यास तुळजा महाराजानीं उत्तम वंश करितां, उत्तमरीतीनें विहित प्रकारें शास्त्रास अनुसरून विधियुक्त दत्त घेऊन हत्तीवरी नौबतेंनिशी गावांत समग्र साखर वांटून, सकळ सोइऱ्यासहीं जेवणें करवून, त्यावेळेस हानरबिल् इंग्रेज कुंपणीचे सरदार तंजाउरचे किल्ल्यांत होते ते मेस्तर जान् हडालेष्लन् रिसिडेंट व मेस्तर ड्पसली, मेस्तर व करणल्, मेस्तर व ऊष्टोट कमांडर व मेस्तर स्वार्च पादरी या चौघाचे हातीहीं या शरफोजी राजास या राज्याची सहज बाध्यता अस-तांही न्यायशास्त्राप्रकारें अह्मी दत्त घेतलें आहे. अमच्या राज्यास व भाग्यास व वंशासहीं हेच अधिपती यास तुमच्या हाती वोपितों आह्मा माघार या शरफोजीराजा कडूनच राज्यतंत्र चालवून सर्वविध अभिमानेकडून याचें संरक्षण करावें ह्मणून

या चौघे सरदाराचे हाती शरफोजीराजास ओपून दिल्हे. सर्वेच चौथे पांचवे दिवशी वसंत पंचमीच्या उत्तम मुहूर्तांत श्रीप्रताप रामस्वामीचे महालांत सदर करून राजासन घालवून त्या आसनावरी शरफोजी महाराजास बसवून सकळ सामादिकां-कडूनहीं राजवत् राजसन्मान करून आपण निश्चिंत जाहले. व चन्नपट्टणाचे गौनरमेंटासहीं चालिला अर्थ समग्रहीं व्यक्त लिहून पाठविले. तैसें जाहल्यास दुष्ट सामादिकानी मिळून योचना केली जे–महाराजास निर्याण समय समीप उरला; महाराजानी आपले राज्यधर वंशधर हा उत्तम कुलांत जन्मल्या शरपोजी-राजास राजे करून इंग्रेज सरदाराचें हाती ओपिल्या करितां, या उपरि महाराजाचे निर्याण होतांच इंग्रेज अभिमानास पडून शर-फोजीराजास तक्तनिशी करऊन सर्व परामर्षासहीं आपण पुढें होतील तेंव्हां तुह्मा सर्वत्राचे जीवन बुडून जाईल; अमचा कोणता मानहीं राहणार नाहीं या करितां राखीच्या समूहांतील अमरसिंग येक आहेत कीं ते राज्यभारास उणें जाहलेंतरीं वयानें प्रौढ आहेत करितां सर्व साहास करून बळ वांधून त्याला पुढें करून आपण सकळहीं अनुभोगुये करितां महाराजा जीवंत असतांच अमरशिंगास रूपरूपबलाबिजेसें करून अंकारोपण करून ठेवावे ह्मणावयाची विपरीत योचना दृढकरून येकमत होऊन तुळजा महाराजास मनोशक्ती केवळ जीर्ण जाहल्या समयीं महाराज बलावितातीं ह्मणून अमराशिंगास रूपरूप आणून सोडून महाराजानी केली वारा वारी ह्मणून येक वदंती कल्प-ऊन चन्नपट्टणचे गौनरमेंटासहीं सांप्रत कल्पविल्या वदंतीस अनुसरून महाराजाचे नावें लिहिल्या कागदास महाराजाचा

शिखाहीं करवून तो कागद गौनरमेंटास पाठविला. सवेंच दुसरें दिवसी शकें १७०८ पराभवसंवत्सरीं तुळजा महाराज परमपद्मास पावले. त्यांचे उत्तर कार्यास दुष्ट सामादिकाचे स्वाधीनतेच्या बळें करून लौकीकार्थ शरफोजी राजासहीं जवळ ठेऊन घेऊन अमरशिंग आपणच पुढें होऊन शास्त्र मर्यादा पाहिनासें चालतें केले. तदनंतरें चन्नपट्टण गौनरमेंटास अधिकारी ऐशे शिराजवळ केमल यांस या दुष्ट सामादिकानें आपण केली योचना शेखर पावगेस उपपत्ती जैसी की तद्नुसार योचना करून लेडी केमलास जाणते करून त्यां कडून शिराजवळ केमलास बोधविले. शिराजवळ केमलानी त्या बोधनेचा अंगिकार करून याविषयास बंगालचे गौनरमेंटास पर्याय कडून जैसें लिहावें कीं तैसें लिहून निरोप आणवून घेऊन आपण तंजावुरास येऊन पावले. या अगोदरीच दुष्ट सामादीकानी तंजावुरांत असणार इंग्रेज सर्दारासहीं आपल्या स्वमतास अनसरून कोणत्या बोलण्यासहीं पुढें न होतां असावयाजोगें सांगून ठेविले होते. शिराज वल केमल तंजावुरास पावल्या नंतरें शरफोजीराजाकडील व अमरशिंगा कडिल्यां खेरीज मध्यस्थ असणारास विचारून कळून घेतो ह्मणावयाचा युक्त प्रकारें दाखवून मध्यस्थ बारा जण पंडित ह्मणून कधीहीं शास्त्रच न जाणते ऐशे दुष्ट सामादिकां पासून सोडिले त्यास मिळवून शास्त्ररीती येकीकडे ठेऊन लौकीक न्यायहीं कळना त्यास आपल्या संमतानुसार त्यांची साक्षी उभऊन द्यावें यांजोगीं विचारणा करून बारा मध्यस्थीच्या सांगण्या वरूनच या राज्यास अमरशिंगच बाध्य ह्मणून शक १७०९ प्लवंगनाम संवत्सरी अमरशिं-

गास तंजावुर राज्याचे तक्तनिशी केले. त्यानंतरें अमरशिंग राजानी राज्यभार करणेंत निज बाध्य ऐशे शरफोजीराजास सहज बाध्यता असतांहीं तुळजामहाराजानी विहित रीतीनें युक्त-प्रकारें दत्त घेऊन कुंपनीसहीं निरविल्या करितां सर्व विघें कडू-नहीं बाध्य ऐशा शरफोजी राजास अमरशिंग यानी मत्सरें कडून करावेंयाचा वुपद्रव सर्वहीं मेस्तर स्वार्च पादरी साहेबानी पूर्वा-पार शोधून पाहून, विचारणा केल्या ठांयीं शरफोजी राजाच्या निजवाने स्वार्च पादरी साहेबाचे दये युक्त अंतःकरणास बोढिलें याकरितां त्यीनी हा अर्थ समग्रहीं इंग्रज कुंपनीस जाणतें केले. त्या संधींत कुंपनीचे तरफेने मेस्तर राम ह्मणणार सरदार तंजा-वुर रेसिडेंटीस आले. त्या मेस्तर राम ह्मणणार रेशिडेंटास मेस्तर स्वार्च पादरी साहेबानी कुंपनीस जाणविला अर्थ विलाय-तसि पावून तेथून कोर्ट अफ डिरेक्टरचे निरोपा प्रमाणे गौनर-मेंटाच्यानी लिहिलें जे—शरफोजीराजास अमरशिंगयाचे निर्बंधा खेरिज करून ठेऊन त्यांचे संरक्षण करा ह्मणून त्यांस तेणे प्रमा-णेच राजे मजकुरास वेघळें स्थळी दिवाण वाड्यांतच ठेऊन रक्षणार्थ कुंपणीचे लोकहीं ठेऊन तदनंतरें, त्यानी मेस्तर स्वार्चा कडूनहीं कित्येक व तंजावुराचे पंडिताकडूनहीं शरफोजीराजाची बाध्यता कळून घेऊन प्रस्तुत शरफोजीराजास खर्चासहीं चालावें या वाटार्थ कुंपणीस जाणते केला तेहीं, इंग्रेज कुंपनीवाल्यानी मनास आणून शरफोजीराजास व त्यांचे संसारासहीं विद्यमाना-नुसार खर्चासहीं करून ठेविले. त्यावरी शरफोजीराजानी वृथा काल जावूं देयीनासें मेस्तर स्वार्चा कडून इंग्रेजी लिहिण्या बोल-ण्याचे अभ्यास स्वमन केले. तेव्हां, मेस्तर स्वार्च पादरीसाहेब

यानी अंतःकरण पुरस्सर त्यांस करविले. तेणे कडून राजे मजकूर इंग्रेजीचा अभ्यास चांगल्या रीतीने केले. तैसेच स्वजाति लिफी महाराष्ट्र व बालोबंदहीं अभ्यासिले. व अरवी लिपीहीं अभ्यासिले. तशामध्येहीं अमरशिंगानी प्रतिपदीहीं उपद्रवच करूं लागले. करितां सकळहीं मेस्तर स्वार्चास शरफोजी राजानी ओपिले. मेस्तर स्वार्चानी हे येकंदर मनास आणून कुंपनीस जाणविले. त्या वरून कुंपनीवाल्यानी शरफोजीराजे व त्यांचे मातोश्री या उभयतांचेहीं मनोगत कळून घेऊन तदनुसारच राजे मजकूर चन्नपट्टणास येणेस निरोप पाठविल्या सरिसेंच शरफोजीराजे व त्यांचे मातोश्री या उभयतानीहीं चन्नपट्टणास पावून कुंपनीच्या आश्रयांत राहिले. तेंव्हां समागमें आले ते मेस्तर स्वार्च पादरी साहेब यानी मेस्तर जरीख पादरी साहेबास अपले कार्यास ठेऊन आपण तंजावूरास परतून आले. तेंव्हां कुंपनी वाल्यानी शरफोजीराजे व त्यांचे मातोश्री उभयतांसहीं आदरें मानकडून चालविले. त्यासरिसें शराफोजीराजे यांचे वाध्यस्थेची विचारणा निर्मल करावी ह्मणून इच्छिल्यासमयीं शरफोजीराजे यांस त्याविषयीं तंजाउरच्या पंडितानी निष्कर्ष केला. पुस्तक कुंपणीस दिल्हे. तेंव्हां कुंपनीवाल्यानी अमरशिंग यांस याविषयीं विचारल्यास अमरशिंग यानी त्यास विरोध लिहून दिल्हे. तोहीं घेऊन काशी वगैरे स्थळास पाठवून विचारणाकरविली. शरफोजीराजे तंजाउरांतच अमरशिंगाच्या उपद्रवाविरहित स्थळांत जाऊन राहातेंसें निरोपिले. राजे मजकूरहीं तदनुसार वर्तणूक केले. तेंव्हां मेस्तर स्वार्चसाहेबानी पेसजी अमरशिंगयास शास्त्र न जाणतां भयकडूनहीं, कांहीं आशे कडूनही लटिक्या

साक्षी दिल्या बारा पंडितां पैकीं मेले ते जातां, वरकड पंडितांनी आह्मी केलेंते अन्याय म्हणून मेस्तर स्वार्च पादरी साहेबास सांगीतले. तो अर्थ मेस्तर स्वार्च साहेब गवर्नमेंटास लिहून पाठविला. तदनंतरें कित्येक दिवसांवरी मेस्तर स्वार्च साहेब दैवगतीस पावले. तेंव्हां शरभोजीराजास फार व्यसन जाहलें. परंतु त्या मेस्तर स्वार्च पादरी साहेबाचे स्थानास मेस्तर जनीक पादरी साहेब आले. त्यानी राजे मजकूराचा विचार वर्तणूक चांगला कळून घेऊन पाहत आल्या करितां, त्या जनीक साहेबानीही राजाचेठायीं फार अंतःकरण करूं लागले. तेव्हां त्या जनीक साहेबाचे स्नेहित मेस्तर् टूर्यन् साहेब ह्मणणार रेसिडेंटीस आल्याकरितां त्यांचे नीति व न्याययुक्त चलंतीहीं पाहात येण्यावरून प्रतिपदीहीं राजास ते व्यसन शमन पावण्यास कारण जाहलें. तदनंतरें इंग्रेजी कुंपनीवाल्यानी आपण करविल्या विचारणेंत सर्व विधेंकडूनहीं शरफोजी राजाची बाध्यता बलवंत ह्मणावयाचे जाणून तंजाउर रेशिडेंटीस मेस्तर इरियसन् साहेब यांसीं निरोपून त्याकडून प्रस्तुत अबाध्यतेकडून राज्य करणार अमरशिंगाने अक्रा वर्षें चुंगडी दिवस राज्य केल्यांत रयतांसहीं सौख्य नाहीसें मुलकांत रुजु मार्गें कडून पैका वसूल होणे नाहीसें वसूल जाहला पैका रुजुमार्गानें सर्कारासहीं पावनामुळें मुशारदारांना मुशाराहीं न पावतां व कुंपनीचें लोकांचे खर्चास ह्मणून नेमिलेतेहीं न पावतां बेसुमार कर्जहीं होऊन कित्त्येक जन स्वतां बेसुमार लटिके कतवेहीं होऊन ऐसे येकंदर येकहीं नीट नाहीसे अन्याय होऊन केवळ अमरतें कडूनच करित आले.

ऐशा अमरशिंगास परतें करून सर्वविध कडूनहीं योग्यऐशे शरफोजी राजास शकें १७२० काळयुक्ती नाम संकत्सरीं तंजाउर राज्याचें तक्तनिशी केले. सवेंच याविषयीं केल्या विचारणेचा मथितार्थाची प्रख्यातिपत्रें प्रचुर केले. तेणेकडून सकल जनासहीं इंग्रेजकुंपनीवाल्याचे विहित विचारणेचाहीं व न्यायाचाहीं प्रकाश चांगल्या रीतीने कळून आला. तदनंतरें शरफोजी राजानीं अपले स्वराज्यपद प्राप्ती नंतरें, या अगोदरील अमरशिंगाचे वेळेस चालिलें अन्याय समग्रहीं निरोधून विहित मार्गेंकडून अपले प्रजेसाहीं विहित सौख्य देऊन आले. दप्तर्चे हिशोबासहीं येक पद्धती करून, राजग्रह समग्रहीं जंद होते तें डाराडूजी करून कित्येक नूतनेहीं करून युक्तप्रकारें राज्यभार करण्याचे दिवसांत कुंपनीचे फौज टिप्पूसुल्तान् याजवरी मोहिम केली. तेंव्हां, महाराजास रस्ते विषयीं जाणविल्यास महाराजानी आपले शक्तीस कांहीं अधिक व करवेल आहे त्या घोड्यापैकीं आपले विरुदाचे व बसावेयाचे व रथाचे घोडे देखील देऊन व हत्ती इत्यादि देवून, कुंपनीच्यानी इच्छिले स्थलास पोहचविले. सवेंच महाराजानी अपल्या समानकुलांत घाटक्याच्या लेंकी यमुना बाईसाहेब ह्मणणार येक व अहिल्या बाईसाहेब ह्मणणार येक या उभयतां बाईसाहेबांसहीं लग्न करून घेतिले. तदनंतरे, पेसजी अमरसिंहाचे राज्यभारा शेवटी इंग्रेजी सरकारचे तरफेने होतेते रेशिडेंट् मेस्तर मकलोठ् साहेब ह्मणणारानी महाराज तक्तनिशी होर्यानाते अगोदरी महाराजास निष्कर्ष पावल्या देण्यास तसा हा विन्यास जाहला आहे ह्मणून इंग्रेज सर्कारास

जाणविल्या क्षणी महाराजाची बाकी पावती केला. त्यास त्या मकलोट साहेबानी जाणविली गोष्टी निजास पावली. ह्मणाव-याचा व याद लिहून दिल्हा. तो प्रस्तुत रेसिडेंट मेस्तर डुयेन्-साहेबाने महाराज साहेबास ओपिल्या वरून महाराजानी आपली निजाची वर्तणूक इंग्रेज सर्कारास व्यक्त होण्यास्तव महाराजानी विहित साक्षियुक्त रेशिडेंट मेस्तर डुयन्तु साहेबास सन् १८०० इसवी माहे मे २७ तारखेस लिहिलें पत्र मेस्तर मजकूरानी पूर्वापर संदर्भ साक्षियुक्तहीं मनास आणून महाराजाचे निजत्व व महाराजाची बरवी वर्तणूकहीं व खरेंपणहीं इंग्रेजस-र्कारास चांगल्या रीतीनें जाणते केले. त्या वरून हानरबिल् कुंपनीवाल्यानी ते पाहून महाराजाचे कार्यस्थान पाठविणे असें निरोपिले. तेव्हां महाराजानी दत्ताजी अप्पास व या अनुभोगांत असणार येक दोघांसहीं पाठविले. त्यास योग्यतेनें बलावून घेऊन विचारून महाराजाचे निजत्वास मानवले कुंपनीवाल्यानी अपल्या स्वजातीवरी दृष्टी देयीनासारिखें शुद्ध न्यायावरच उभे-राहून न्याय विस्तारविले. ते श्लाघना करावेंयास योग्य असे या रीतिच्या मकलोटास संकट काल प्राप्त जाहल्यासमयीं मकलो-टानी त्याची बायका मिसूस्ट्रेस मेकलोट ह्मणणारानींहीं संकट-कालाचा विध जाणवून महाराजास प्रार्थिले. तेंव्हां महाराजानी पेसजी महाराजाच्या बाध्यतेचा मजकूर कित्येक मेकलोटानाहीं कुंपनीस कळविले होते. त्या उपकारास्तवहीं अपले थोरवी करितांहीं पेसजी मकलोट ह्मणणाराचे प्रार्थनेस्तवहीं प्रस्तुत मेक-लोटानी केला अपकार देखील आठविनासें त्यास कांहीं अधीकच दहाहजार रुपये देवविले. त्यावेळेस मेस्तर स्वार्चानी या अनुभ-

वांत होते मेस्तर तरीखपादरी साहेबास मेस्तर जसाख पादरी-साहेबासहीं नीट कळलें होतें. त्याकरितां त्या उभयतांचे निज-बोलणें महाराजाचे निजत्वास केवळ प्रबळ साक्षी होऊन होत्या करितां महाराजानी त्या उभयतां पादरी साहेबाचे खरें बोल-णेच्या उपकारास महाराज बद्ध जाहले. या अगोदरीच महारा-जानी लग्नकेलेली दुसरी स्त्री सौ० अहल्या बाईसाहेब यांचे उदरीं कन्यारत्न जन्मलें. त्यास सुलक्षणा बाईसाहेब ह्मणून नांव ठेविले. तदनंतरें, इंग्रजसर्कार तर्फेस अमरशिंग यानी केल्या राज्यभारांत तंजाउर देशाचे राज्यांत अन्याय चालिला आहे या करितां देश समग्र इंग्रेजसर्कारचे तरफेने केल्या यां चांगल्या रीतीनें न्याय करितों ह्मणून महाराजास जाणविले. त्या न्याय करणेस महाराजानी अंगिकार करुन आपला देश इंग्रेज सर्कारचे तरफेने ओपिले. इंग्रेजसर्कारच्यानी महाराजाचे निर्मल मनास व निर्मल वर्तणुकेसहीं मानून महाराजाचे किल्यांत इंग्रेजाचे ठाणे होते तेंहीं काहडून महाराजाचा किल्ला मोकळा करुन दिल्हे. तेंव्हां महाराज इंग्रेज सर्कारांतहीं येक त्रीटी जाहली त्यांत कित्येक कामास मेस्तर ट्रूरियन् साहेब सहायभूत असून महाराजास युक्त प्रकारें सुलभ केले. तदनंतरें इंग्रेज सर्कारच्यास दक्षिणप्रांती मरदा ह्मणणार पाळेगाराचे पारपत्य करणे जरुर पडल्यावेळेस महाराजास जाणविल्याक्षणी महाराजानी आपला देश ओपिल्या वरहीं आपल्या संरक्षणार्थ थोडें सैन्य आहेत्यांतहीं शिवण्णा ह्मणणार सरदारा बरोबरी समरधीराचे स्वार पन्नास व मोगलायीस्वार वीस झुंजार व पादचार आपले सरक्ष गाहनशार ह्मणणार गलेकाचे बंदूकेचे देखीलानिशी महशदानशया इतुक्या

फौजेसहीं खर्चास देखील आपणच देऊन रेशिडेंट मेस्तर ब्लाकबरन साहेबा बरोबरी कुमुकेस पाठविले. (सन १८०१ इसवी माहे जून तारीख ७ स) तदनंतरें, पेसजी महाराजानी आपलें लग्नहोइनात्या अगोदरीं येक स्त्री सर्वगुण कडून युक्त योग्य वाल्यवयी ऐशे स्त्रियेस परिग्रह केले होते. त्यानीहीं महाराजाचे चित्तानुरुप वर्तणूक करीत होते. तैशी स्त्री दोनदा गर्भ होऊन प्रसवहीं होऊन ते दोनी प्रजाहीं नष्ट जाहली. व दुसरे प्रसवा मध्येच ती स्त्रीहीं नष्ट जाहली करितां त्या स्त्रीचे गुणाधिक्ये कडून महाराजास ते येक व्यसनास्पदहीं जाहले. परंतू, त्या स्त्रियेने आपलें अवसान समयीं आपल्या नावें येक चांगला धर्म अन्नछत्रादिक व्हांवें ह्मणून महाराजास विनविलें होतें. त्याचा अंगिकार करून महाराजानी उत्तम व उपयुक्त ऐशा शेतूमार्गांत छत्र व अग्रहार व देवालय व श्रृंगारवन व तटाक इत्यादिक होण्यास आरंभ करुन त्या स्थलास मुक्तंबापुरछत्र म्हणून नांवहीं ठेऊन चांगल्या रीतीने कामहीं चालतें केले. ते येकंदर त्याचे स्मरण सर्वदा करिणेस हेतुभूत आहे. तदनंतरें, महाराजानी तीर्थ यात्रेचा उद्देश करुन चोळदेश समग्र येक किता, व श्रीरंग यात्रा येक कित्ता व गंगा यात्रा येक कित्ता व पळणी यात्रा येक कित्ता, येणेप्रमाणे तीनी चार कित्ते यात्रा केल्यांत रेशिडेंट मेस्तर ब्ल्याक्बरन् साहेब याने यात्रेंत समागमें येऊन त्या त्या स्थळीहीं वाटेंत प्रति मजलांतहीं महाराजाचे मनानुसार मर्यादा चालवीत आले. त्या वरुन मेस्तर मजकूराचा उपकार महाराजानी फार मानिला. महाराज व इंग्रेज सर्कारास राजी केले त्यांत महाराजास कुंपनीचे स्वाधीन देश जे थोरकी त्या देशा-

तहीं महाराजाचे स्वदेशा सारिखें उपचार करितों ह्मणून वाकदत्त केले होते. ते मेस्तर ब्लाकबरन् साहेबानी दृढ केलें. आणखी येक उपकार मेस्तर ब्लाकबरन साहेबाचा महाराज मानितात ते काय ह्मणजें महाराजानी आपला देश समग्र न्याय करिणेस्तव इंग्रेज सरदारांस ओपिते वेळेस महाराज व इंग्रेज सर्कारामध्ये जाहल्या त्रीटींत महाराजास उपयुक्त कार्य इंग्रेज सरकारानें अंगीकारायाजोगें केलें. ते नव्हतां त्याच त्रीटी मध्ये इंग्रेजास अन्य देशावरी कलाप करणेच्या समयीं हो अथवा इंग्रेजा वरी अन्यदेशाच्यानी कलाप करण्याच्या समयीं हो महाराजाच्या किल्लयांत इंग्रेज सरकारचे ठाणे ठेवणें ह्मणून करार पावला होता त्यास तेणे प्रमाणेच इंग्रेज सरकारच्यास कलाप प्रसक्ती पडल्या वेळेस करारा प्रमाणें ठाणी ठेवणेस उद्युक्त जाहले. तेंव्हां मेस्तर मजकूरानी महाराजाची चलंती व महाराजाचे योग्यतेस व महाराजाचा विश्वास हे समग्रहीं कुंपनीस जाणता करुन महाराजाच्या ठायीं कुंपनीस प्रिय होयसे हीं करुन तो अर्थ राहता करविले. त्या वरुन मेस्तर ब्ल्याक्बरन् साहेबाचा उपकार महाराज बहुत मानितात. तैसेंच मेस्तर टुरायन साहेबाचे रिसिडेंटींत मेस्तर मकूलोट साहेबाचे व्यवहारा विषयीं महाराजाना निजेकडून लिहिला अर्थ येकंदरहीं व महाराजाचे निजत्वहीं व साक्षीचे बलहीं कुंपनीस व्यक्त जाणतें केलें. तो उपकार नव्हतां आपण विलायतीस गेल्यावरीहीं महाराजाचे ठायीं प्रीतीकडून महाराजास कित्येक पुस्तकें व भूगोळ व भूगोळाचे पुस्तकें व रुप्यांचीं बासनें व रुप्याच्या किऱ्ये चीजाहीं पाठविले त्या वरुनहीं मेस्तर टुरियन साहेबाचा उपकार

महाराज प्रतिपदीहीं मानितातिः या पळनी स्वारी अगोदरीच पेसजी महाराजास प्रथम कन्या जाहली. सौभाग्यवती अहल्याबाई साहेबाचे उदरींच महाराजास दुसरी कन्या जन्मली. त्यांस राजकुमार बाईसाहेब म्हणून नांव ठेविले. शरभोजी महाराजाचे राज्यभारीं तबाज ह्मणावयाचें येक पांखरुं फार अपूर्व कधींहीं या देशीं आले नव्हते. तैशें पांखरुं बाज ह्मणावयाचे आले होते. तदनंतरें महाराजास धर्मपत्नी ऐशे सौभाग्यवती मातोश्री अहिल्या बाईसाहेब यांचें उदरीं पेसजी दोघी कन्या जन्मल्या. त्यांचे उदरीं महाराजास तिसरी कन्या जन्मले. त्यांचे नांव बायमा बाईसाहेब ह्मणून ठेविले. आतां शरफोजी महाराज सर्वदा शिवपुराण ऐकणें व शिवपूजा करुन यात्रादिकहीं करीत सन्मार्गांतच आहेत. सकल जनासहीं सकल राज्यासहीं वैषम्य तिरस्कार या दोहींचा परित्याग करुन त्या त्या मताचे मताप्रमाणें, वेदाप्रमाणें चालवीत व सकल जनासहीं व्यसन न येतां युक्तप्रकारें प्रतिपालन करिताहेत श्रीमद्भोंसल वंशांत महादंपती श्रेष्ठ श्रीमच्छंकर प्रसाद जनित प्रताप स्वीकृत दिल्लीचातुर्भाग स्वातंत्र्य विपक्षीकृत दिल्लीराज सार्वभौम अवनीशकुलललामायमान महाराष्ट्र तथा चोळदेशाधिप पुण्यश्लोक राजाचे चरित्र सकल मनोभीष्ट दायक अैसें प्रथमवर्ण महाराष्ट्र जाती भगवंत रायाचे पौत्र विठ्ठल रायांचे पुत्र प्रस्तुत चोळदेशाधिपती श्रीमंत राजेश्री महाराज क्षत्रपती शरफोजीराजे साहेब यांचे निज सेवक चिटनीस बाबुराय काश्यपगोत्र आश्वलायन सूत्र ऋक् शाखाध्याई दाजकडून लिहिजेले ते शालीवाहन शकें १७२५ रुधिरोद्गारि संवत्सर मार्गशीर्षवद्य अमावास्या भौमवासरीं इंग्रेजी सन १८०३ इसवी डिसेंबर १३ तारिखेस लेखन शीमा समाप्त ॥

परिशिष्ट २

नायकराजे

प्राचीनकाळीं पांडवांचें राज्य असलेल्या नगरीस अर्वाचीन काळीं मदुरा हें नांव दिलेलें आहे. या मदुरेवर अनेक घराण्यांनीं एकामागून दुसरे अशा क्रमानें राज्य केल्यावर सन १५५९ मध्यें हें राज्य विजयानगरच्या विश्वनाथ नायकानें हस्तगत केलें. कारण हा विश्वनाथच त्यावेळीं सेनापति होता. अर्थात् सन १५५९ पासून मदुरेवर नायक राजे राज्य करूं लागले. शेवटीं दुसऱ्या चोक्कनाथ नायकाची विधवा पत्नी मीनाक्षी हिच्या मृत्यूनंतर सन १७३६ मध्यें हें राज्य खालसा करण्यांत आलें. नायक राजांची वंशावळ. मागें पृष्ठ १५७–१५८ वर दिलेली आहे.

परिशिष्ट ३.

मीनाक्षिराणी

" In 1732, the Raja of Trichinopoly had died without issue; his second and third wives burned themselves with the body, but the first wife succeeded to the Government, in conformity, it is said, with the desire of the deceased Rajah. Disputes subsequently ensued between the Rani and a Prince of the royal blood. Dost Ali, the Nabob of Arcot, was prevailed upon to take advantage of the confustion, to subject the kingdome of Trichinopoly to his own authority. Accordingly he sent an army under his son Subder Ali, and his son-in-law Chanda Saheb, to seize any opportunity which might offer of getting possession of the capital. The result was tragical. Chanda Saheb who already owed his advancement to his matrimonial arrangements, was fortunate enough to excite the tender regard of the Rani. Accordingly he was enabled to prevail on the love striken lady to admit him with a body of troops into the city of Trichinopoly, having

first taken an oath on the Koran that he would act in nothing to her detriment. But the lover of middle aged queens are not always fortunate and Chanda Saheb proved more cruel to the Rani than Æneas proved to Dido. There is however a slight difference between the classical legend and the modern story. Æneas broke the heart of Dido by running away; whereas Chanda Saheb broke the heart of the Ranee by remaining where he was. The latter seized the City of Trichinopoly, and there imprisined the lady; upon which the latter died of grief and the kingdom of Trichinopoly yielded to the authority of the faithless Chanda." (Madras in olden times)

मंगम्माळ राणीच्या कारकीर्दीमध्यें मदुरा व त्रिचनापल्ली येथील राज्यें एक झालीं. पुढें तेथील राजा विजयरंग चोक्कनाथ हा मृत्यु पावल्यावर त्याची राणी मीनाक्षी ही गादीवर आली. तिची हकीकत वरीलप्रमाणें आहे.

परिशिष्ट ४

यंकोजीस शिवाजीचें पत्र. (सन १६७८)

श्री महादेवकुलस्वामिनी

(१)

" श्री सहस्रायु चिरंजीव अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रिया-विराजित राजमान्य राजश्री येकोजी राजे प्रति राजश्री शिवाजी राजे, आशीर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. उपरि कैलासवासी साहेबी कैलासवास केला, त्यास आज तेरा वर्षें झाली. महाराजांचे पैके व जडाव व हत्ती व घोडे व मुलुख अवघेही राजश्री रघुनाथपंती तुम्हाला राज्यावर बैसवून संपूर्ण राज्य तुमचे हातीं दिलें. ऐशियास आमचा अर्धा वांटा तेरा वर्षें तुम्हींच खादला. आम्हीं जरी तुम्हांजवळीं मागावें तरी बहुत दूर होतां. बऱ्या बोलें तुम्हीं देणार नव्हां; म्हणून तेरा वर्षें सबूरीं केली. मनामध्यें ऐसा विचार केला कीं, बरें महाराजांचे पुत्र तेही आहेत, खाती तोंवरी खात. मालाचे धनीच आहेत. जे समयीं आम्हांला फाविल, ते समयी आम्हीं व्हेहार सांगोन घेऊं. असे मनी धरोन होतों. ऐशियास राजकारणप्रसंगें, आम्हीं कुतूबशहाचे भेटीस भागा नगरास गेलों. तेथून कर्नाटकांत गेलों. चंजीस आलो. चंजी घेतली व येलूर तर्फेचा मुलुख घेतला व सदर खानास (शेरखा-नास) झगड्यांत मोडून गर्दीत मेळवीले. सदर खानाचें हातीं मुलुख होता तेवढाही घेतला. त्यावरी मजला दरमजल कावेरी तीरास गेलों.

तेथून तुम्हांस पत्रें लिहिलीं कीं, राजश्री गोविंदभट गोसावी व राजश्री काकाजीपंत व राजश्री निळोबा नाईक व राजश्री रंगोबा नाईक व तिमाजी यक्षियावर राऊ असे भले लोक आम्हांपासीं पाठविणें म्हणून तुम्हांला वहुता रीती लेहून पाठविलें. त्यावरुन तारहु भले लोक आम्हापासीं पाठवून दिले. त्या भल्या लोकांसीं वहुतां रीतीं घरोवियाचा व्यवहार सांगून, आमचा अर्धा वांटा आम्हांस बऱ्या बोलें द्या, म्हणून सांगून पाठविले. व त्याबराबरी राजश्री बाळंभट गोसावी, राजश्री कृष्ण ज्योतिषी व कृष्णाजी शेखजी असे आपले तर्फेनें भले लोक दिल्हे. हे भले लोक तुम्हां जवळीं जाऊन वहुतां रीतीं बोलले कीं, गृहकलह करूं नये. आपला अर्धा वांटा मागतात तो द्यावा. असें बोलले. परंतु कपटबुद्धी तुह्मीं ऐसी मनीं धरिली कीं, या समयांत आम्हीं थोर राजे जालो आहोंत. आम्हासी आपण खांसा भेटीस येऊन आम्हांजवळ नरमी वहुत दाखवावी, आणि आमचा वांटा बुडवावा. तेरा वर्षे सारे राज्य आपणच खादले. पुढेंही आपणच सारे राज्य खावें, अशी बुद्धी मनीं धरून, वांटियाचा निवाडियाचा तह न करतां आपण खांसाच आमचे भेटीस आले. यांस आमची व तुमची भेट जाहली. त्या उपरी आम्हीं वहुतां रीतीं तुम्हांसी बोलिलों कीं, आमचा अर्धावांटा द्या. परंतु तुम्हीं वांटा द्यावा हा विचार मनीं धराचना. मग जरूर जाहलें कीं, तुम्हीं धाकटे भाऊ आपण होऊन आमचे भेटीस आल्यास तुम्हांला धरावें आणि वाटा मागावा ही गाष्ट थोरपणाचें इजतीमध्यें लायख नव्हे. या निमित्त तुम्हांला चंजाउरास जाण्याचा निरोप दिला. तुम्हीं चंजा-उरास गेलेती. त्याउपरी गृहकलह वाढवूं नये, वाढविल्यानें पहिलें

युगीं पांडव कौरव बहुत कष्टी जाले. ते सारी भारताची कथा मनांत आणून, गृहकलह वाढवीलीयां उभयपक्षीं कष्टी होइजे ऐसें मनांत जाणून राजश्री श्यामजी नाईक व कोन्हेरीपंत व शिवाजी शंकर या हातीं मागतें बहुता रीतीं सांगून पाठविलें कीं, तुम्हीं व आम्हीं वाटे करून घेऊं; परस्परें समाधानें राहूं. परंतु तुम्हीं, दुर्योधनासारखी दुष्ट बुद्धी धरून संधि न करावा, युद्ध करावें, ऐसेंच मनीं धरिलें. ऐशियास आम्हाला रायगड प्रांतें बहुत कांहीं कार्य होतें. या निमित्तें चिरंजीव संताजी भोसले, व राजश्री रघुनाथपंत व राजश्री हंबीरराव असें ते प्रांतीं ठेवून आम्ही स्वार होऊन तोरगळ प्रांतास आलों. येथें अशी खबर ऐंकिली कीं, तुम्हीं तुरूक लोकांच्या बुद्धीस लागून आमचे लोकांशीं झगडा करावा ऐसें मनीं धरून, आपली सारी जमेत एकवट करुन आमचे लोकांवर पाठवून दिलेती. ते वालगोंडपुरास आले. तुमचे लोक चालून आल्यावर तुमचे आमचे लोकांत थोर झगडा जाला. तुमचे लोक पराजय पावले. प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजी डबीर ऐसे तिघे धरले, व कितीएक लोक मारले. कितीएक लोक पळून दाणादाण होऊन गेले. ऐसा समाचार ऐकिला. हें ऐकून बहूत नवल ऐसें वाटले कीं, कैलासवासी महाराज, त्यांचे तुम्हीं पुत्र बहुत थोर लोक, ऐसे असून कांहीं विचार करीत नाहीं व धर्माधर्म विचारीत नाहीं. ऐसे असता कष्टी व्हाल याचे नवल काय ! तुम्हीं म्हणाल की कैसा विचार करावा ? तरि ऐसा विचार करावा होता कीं, अधर्मे करून तेरा वर्षे आपण सारें राज्य खादलें ते खादलें. आतां अर्धा वांटा मागतात, तो त्यांचा त्यांला द्यावा, आणि आपण सुखी राहावे. ऐसा करावा होता. दुसरा विचार करावा होता कीं, श्रीदेवाची व श्रीची कृपा त्यावरी पूर्ण जाली,

आहे. दुष्ट तुरुंकाला ते मारतात. आपल्या सैन्यांत तुरक लोकच असतां जय कैसा होतो, आणि तुरुक लोक कैसे वाचूं पाहतात. हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता. परंतु दुर्योधनासारखी बुद्धी करून युद्ध केलें आणि लोक मारविले. जे जाहले ते जाहले. पुढें तरी हट्ट न करणें. तेरा वर्षें तुम्हीं सारे राज्य खादले तें खादले. याउपरी कितेक प्रांत आमचे आम्हीं घेतले असेत. अरणी, बंगरुळ, कोलार, हसकोट, शिराळकोट व किरकोळ जागे व चंजाऊर असे जे जागे तुमचे हातीं उरले आहेती, ते आमचे लोकांचे हातीं देणें; आणि जमेत, पैका व जडाव व हत्ती व घोडे यांचा अर्धा वांटा देणें. ऐसा विचार करून आम्हांसीं संधि करणें. तुम्हीं ऐसा निर्मळपणें संधि केलीया, आम्हीं आपणा-पासून तुम्हाला तुंगभद्रे अल्याड पन्हाळे प्रांतें तीन लक्ष होनांची दौलत देऊं. अथवा आम्हाजवळील दौलत तुम्हाला मानेना, तरी कुतुबशहास अर्ज करून त्यापासून तुम्हांस तीन लक्षांची दौलत देऊं. असें दोनही विचार तुम्हांला लिहीले आहेती. यां दोनही-मधील एक मनीं धरून मान्य करणें. हट्टाचे हातीं न देणें. आपल्या आपल्यांत आपण कलह करावा आणि कष्टी व्हावें याचे कांहीं प्रयोजन नाहीं. याउपरी तरी आमचा आपला संधि व्हावा. ऐशी बुद्धी मनीं धरून वांटीयाचा व्यवहार निर्गमून टाकणें. आणि सुखी राहणें. गृहकलह बरा नव्हे, आम्हीं रीतीनें वडीलपणें आजवरी तुम्हांला सांगितलें, आतांही सांगतों, ऐकाल तरी बरें. तुम्हीं सुख पावाल न ऐकाल तरी तुम्हींच कष्टी व्हाल. आमचें काय चालते ? बहुत काय लिहीणें. " (मोर्तब)

परिशिष्ट ५ वें.

तहाचीं कलमें. (१६७८)

(२)

१ " सेईरे मानकरी यांचा बंदोबस्त माफक करून, अपमान होऊं न देता आदर ठेवीत जावा. कामांत वागवूं नयेत.

२ दरकदार मंडळी व कामदार यांचे इतल्याशिवाय कामकाज होऊं नये. बरी वाईट सल्ला विचारीत जावी. इतबारी असेल त्याजपासोन काम घ्यावें. परंतु लौकीकांत याचे हातीं कांहीं नाहीं असें दिसण्यांत येऊं नये, दरखांत खलेल करूं नये. भूषण देऊन चालवावे.

३ शागिर्द पेशा मंडळी चांगली कुलीन, इमानी, इतबारी, पाहून जामीन घेऊन जवळ वाळगांवे. कृपेंत ठेवावे. वातमी सर्वाठायींची राखावी. परंतु त्यांचें ऐक्तिात असें दुसरीयास कळों न देतां जरनेंत वागवून नाजूक कामीं सर्व चाकरी घेत जावी.

४ शत्रुमित्राचे ठायीं संस्थानमाफक वकील व हरवातमीदार ठेवून दुसरीयास न समजतां, सर्व जागेंतील वातमी वरचेवरी येऊन पोहोचत असावी. यांस अंतर नसावें.

५ घरपागा, शिलेदार, पथके यांचे काम पाहून योग्यता ठेवावी. उगेंच घोडे माणूस हुशार राखावें. शिलेदार घोड्याघोड्याचें असतील, त्यांस पागा पेठ्यांत ठेवून त्यांची सरवरा करून चाकरीचा रावता नित्य ठेवावा, म्हणजे हुषारी राहाते. नाहींतरी गाफिली येऊन, परचक्र आलें असता नाश होतो. यास्तव पागा, तोफा वगैरे कारखानें सर्व कायम ठेवावे.

६ दुष्ट दुरात्मे निग्रही हिंदुद्वेषी, चोरटे, चहाड, सोदे, फितवेकरी दरवडेकरी, दावेकरी, मद्यपी, हिंसक, त्यांसी आपले राज्यांत ठेवू नये. ठेविल्यास जामीनदंड घेऊन दिक हरकत होऊं नये, येविषयीं बंदोबस्त पक्का राखावा. यांची गाफिली करू नये.

७ अहदनामे, तह, लहान थोराशी केले, त्याचा तंटा पडूं नये. गोरगरीब अनाथ यांचा अभिमान धरून चालवावे, देववावें, हरकत न होय ते करावें.

८ धर्मादाय, देवस्थानें, अग्रहारें चालत आल्याप्रमाणें चालवीत जावीं त्यांचा उच्छेद होऊं नये. बंदोबस्त चांगला ठेवीत जावा.

९ कजिया, तंटा, बखेडा, भाऊपणा, देणेंघेणें, वादी-फिर्यादी यांची पंचाईत, सोपणें, वाजवी करणें, लांच न घेतां इनसाफ तोडणें गोरगरीब यांचा अभिमानी सरकार, मायबाप, त्यांनीं मनावर घेऊन उलगडा करावा. त्याचा लोभ पैशाचा धरूं नये. धरला असता वाईट.

१० वचन प्रमाण, अभय देणें, त्याशीं पुन्हा दंडेली करणें, हे आपले कुळांत जाले नाहीं व पुढें होऊं नये.

११ किल्ले अरणी हा महाल वेदो भास्कर यांसीं पूर्वीं महाराजांनीं दत्त दिल्हा आहे. त्यांस पुत्र आठजण आहेत. त्यांचे उचितास येऊन चाकरीवरी राहिल्यास उत्तम न राहिले म्हणून महालास इजा चाकरीबद्दल म्हणून उपद्रव देऊं नये. दोन रुपयांची लाहूच ठेवूं नये.

१२ विजापुराकडून सनदी अंमल आहे. कांहीं दौलताबादकराकडून इकडे येतां त्यांचा अंमल तहांत घेतला. त्याखेरीज जरबेनें कित्येक पाळेगार वसांत आणून खास अंमल केला. त्यांत इज़मायली

जमेंत कमकसर आहे. तशी विजापुरकराकडे पांच हजार फौजेनिशी चाकरी करावी लागते. त्यांस पांच हजार फौजेनिशी चाकरीचे कलम, आमचा त्यांचा तह जाला त्यांत आम्हीं चाकरी करणार नाहीं. वख्तशीर मदत देऊं, इमाने इतबारे मेहनत करूं, असें तीर्थरूप असतां ठरले आहे. त्यास चाकरी तुम्हाकडे नाहीं. सबब, चाकरीबद्दल वख्तशीर काम लागेल, त्या समयीं तुम्हीं फौज देत जावी. न दिल्यास त्याचा जाब तुम्हास विचारूं. खर्च पडेल त्याचा पैसा घेऊं.

१३ वरघाटी, हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे पाटिलक्या आहेत, व देशमुख्या व नाडगौडया वगैरे वडिलार्जित वतनें आहेत. त्याविशी तुम्हीं बोलूं नये. आम्हीं वहिवाटूं.

१४ वख्तशीर माणूस इकडील तिकडे, अगर तिकडील इकडे आल्यास परस्पर संभाळोन, त्यांचा संतोष राखोन, समजूत करून, खुलासा करून जिकडील तिकडे सोपावें. त्याविशी हरकत करूं नये.

१५ परगणे बेंगरूळ आम्हीं सोडविले, त्यास आसपास ठाणीं हासकोटें, व सिलेकोटें ऐसे तीन महाल, दोन लाख वराईचें उत्पन्न आज आहे. जमेवर आल्यास पांच लाखांपर्यंत उत्पन्नास येतील. त्यास आम्ही आपले तर्फेनें चिरंजीव सौ. दीपाबाईस चोळीबांगडीस दिले आहेत. त्यास याचा विभाग तुमचे वंशांनीं करूं नये. मुलीनीं परंपरा आपले खाजगी खर्चांत ठेवावे, त्याची चौकशी तुम्हीं राखीत जावी, सौभाग्यवती देतील त्यांणी खावेत.

१६ चंदी प्रांतानजीक आम्हीं प्रांत सोडविला, त्यापैकीं सात लाख होनांचे महाल चीरंजीव राजश्री व्यंकोजी राजे यांस दूध भाताकरितां इनाम परंपरेनें चालण्यास दिल्हे आहेत. त्यास त्यांची याद तुम्ही करून पाठवाल, त्याप्रमाणें मजुरा देऊं. सनद पाठवूं. अनुभवीत जाणे.

१७ तुमचा चोर आमचे राज्यांत आला, तरी तुमचा तुम्हीं मागितल्यास देऊं, तसा आमचेकडील हरामखोर आल्यास तुम्ही आमचे स्वाधीन करावयास अंतर करूं नये.

परिशिष्ट ६ वें.

व्यंकोजीस समाधानाचें पत्र. (१६८०)

(३)

श्री.

श्रियासह चिरंजीव अखंडित—लक्ष्मीअलंकृत राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे प्रती राजश्री शिवाजी राजे आशीर्वाद येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणें. विशेषः—कित्येक दिवस जाले, तुमचे पत्र येत नाहीं. याकरितां समाधान वाटत नाहीं. सांप्रत राजश्री रघुनाथपंतीं लिहीलें कीं, तुम्ही आपले ठायीं उदास वृत्ती धरून पहिले सारखे आपले शरीर संरक्षण करीत नाहीं. सणवार उत्सवादिक हेंही कांहीं करीत नाहीं. सेना बहुत आहे, परंतु उपयोग करून कार्यप्रयोजन करवावें हेंहि कांही करीत नाहीं वैराग्य धरलें आहे. एखादे तीर्थीचे बसून कालक्रमणा करूं, ऐशा गोष्टी सांगता म्हणोन विस्तारे लिहीले होतें. तरी या गोष्टी आम्हास बहुत अपूर्व वाटल्या कीं कैलासवासी स्वामीनीं कसे कसे प्रसंग पडले निवाह करून, यवनांच्या सेवा करून आपल्या पुरुषार्थें बाजी सांवरून, उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला, तें सर्व तुम्हीं जाणता. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धी युक्ती सर्वही तुम्हांस उपतिष्टोन त्यापासून शहाणे झाला आहां. त्याउपरी आम्हींही जे जे प्रसंग पडले, तें निर्वाह करून कोणे तऱ्हेनें राज्य मिळविले, हें जाणता व देखत आहा. असें असोन तुम्हांला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याचमध्यें आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून, नसते वैराग्य मनावरी आणून, कार्य प्रयोजनाचा उद्योग सोडोन,

लोकांहातीं रिकामेपणी द्रव्य खाऊन, नाश करवणे व आपल्या शरीराची उपेक्षा करणें. हें कोण शहाणपण व कोणती नीती ? व आम्ही तुम्हांस वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे ? याउपरी सहसा वैराग्य न धरितां मनांतून विषण्णता (काढून) कालक्रमणा करीत जाणे. सणवार उत्साह पूर्ववत करीत जाऊन तुम्हीं आपलें शरीर संरक्षण बरें करीत जाणें. जमेती सेवक लोकांना रिकामें न ठेवून कार्य प्रयोजनाचा उद्योग करून, पुरुषार्थ व कीर्ती अर्जणे. तुम्हीं त्या प्रांते पुरुषार्थ करून संतोष-रूप असलीया आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे कीं कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेत. रा. रघुनाथ पंडित त्या प्रांती आहेती. ते कांहीं इतर नव्हेती. आपले पुरातन. तुम्हासी कोणे रितीनें वर्तावे हें निपुण जाणितात. आम्हास मानितात तैसे तुम्हास मानितात. आम्हीं त्यांचे ठायीं विश्वास ठेविला आहे. तैसा विश्वास तुम्हींही ठेवून कार्यप्रयोजनास परस्परे अनुकूल व साह्य होऊन वर्तत जाणे. पुरुषार्थ व कीर्ती अर्जणे. रिकामे बैसोन, लोकांहातीं नाचीज खाव-वून, काल व्यर्थ न गमावणें. कार्य प्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तरवयी कराल ते थोडे. आज उद्योग करून आम्हांसही तमासे दाखविणे. बहुत काय लिहिणें. तुम्हीं सुज्ञ असा. "(मोर्तब. मर्योदेयं विराजिते).

परिशिष्ट ७ वें.

विद्याप्रिय नृपावलि

राज्यकर्ते, त्यांच्या कारकीर्दीचें शतक, त्यांच्या पदरीं असलेले विद्वान् आणि त्या त्या कालांत झालेली ग्रंथनिष्पत्ति.

गायकवाडांच्या पौरस्त्य ग्रंथप्रकाशनमालेंतील ४९ व्या क्रमांकाच्या शब्दरत्नसमुच्चय कोशांतील उतारा.

परिशिष्ट ७ वें.

हें पत्रक गायकवाडांच्या पौरस्त्य ग्रंथप्रकाशन मालेंतील ४९ व्या क्रमांकाच्या शब्दरत्नसमुन्वय कोशांतून घेतलेले आहे.

क्रमांक	राज्यकर्ता	विशिष्ट शतक	पदरचे विद्वान्	ग्रंथनिष्पत्ति
१	२	३	४	५
१	विक्रमादित्य	५ वें	१ अमरसिंह	नामलिंगानुशासन
			२ वररुचि	नाममाला
			३ महाक्षपणक	अनेकार्थध्वनी मंजरी
			४ कालिदास	नानार्थशब्दरत्न
२	मान्यखेटाचा ३ रा कृष्णराज	१० वें	१ हालायुध	अभिधानरत्नमाला
३	भोज	११ वें	१ निकुलकवि योगींद्र	तरला (नानार्थशब्दरत्नावरील टीका)

४ काश्मीरचा जयसिंह	१२ वें	१ मणरव	अनेकार्थकोश
५ बंगालचा लक्ष्मणसेन	,,	१ पुरुषोत्तम	त्रिकाण्डशेश. एकाक्षरकोश. द्विरूपकोश. वर्णदेशना. हारावली.
६ श्रीधर (सेना वंशज मनुसेनाचा पुत्र)	,,	१ श्रीधर (स्वतःराजा)	मुक्तावली किंवा विश्वलोचन
७ गुजराथचे राजे १ जयसिंह व २ कुमारपाल	,,	१ हेमचंद्र	अभिज्ञान चिंतामणी. अनेकार्थ संग्रह. निघंटुशेष, देशीनाममाला.
८ गंग (ओरीसाचा राजा)	१३ वें.	१ मेदिनीकर (क्षत्रप)	मेदिनीकोश
९ राजराज (कुलोत्तुंग चोलाचा पुत्र)	१२–१३ वें.	१ केशवस्वामी	नानार्थार्णवसंक्षेप
१० मदनपाल	१४ वें.	१ मदनपाल (स्वतः)	मदनपालनिघंटु (ओषधीग्रंथ)
११ विजयानगरचा २ रा. हरिहर	,,	१ माधव (मयनपुत्र)	एकाक्षरनाममाला
१२ अकबर बादशहा	१६ वें.	१ भानुचंद्र गणी (सुरचंद्राचा शिष्य)	विविक्तनामसंग्रह

हें पत्रक गायकवाडांच्या पौरस्त्य ग्रंथप्रकाशन मालेंतील ४९ व्या क्रमांकाच्या शब्दरत्नसमुन्वय कोशांतून घेतलेलें आहे.

क्रमांक	राज्यकर्ता	विशिष्ट शतक	पदरचे विद्वान्	ग्रंथनिष्पत्ति
१	२	३	४	५
			२ कृष्णदास	पारसीक प्रकाश (पार्शी-संस्कृत)
			३ पुंडरीक विठ्ठल	शीघ्र बोधनाममाला
१३	भारतमल्लिका	,,	भारतमल्लिका	मुग्धबोधिनी (अमरकोशावरील टीका)
				द्विरूपध्वनि संग्रह
				एकवर्णार्थसंग्रह
	(हरीहरखानाचा जमीनदार)			
१४	मूर्च्छा (मक्का) खान	१७ वें.	१ मथुरेश	शब्दार्थ रत्नावली
१५	कीर्तिसिंह (बागेल मधील महीपारविषम राजाचा पुत्र)	,,	१ भानूजी दीक्षित	सुधा (अमरकोशावरील टीका)

			(भट्टोजीचा पुत्र)	
१६	जोधपूरचा सूर्यसिंह	,,	१ वल्लभगणी	सारोद्धार (हेमचंद्राच्या अभिधान चिंतामणीवरील टीका)
१७	छत्रपति शिवाजी	,,	१ रघुनाथपंडित	राजव्यवहारकोश
१८	राजधर (त्रिपुराचा अमरमाणिक्य याचा पुत्र)	,,	१ कर्णपुर	वर्णप्रकाश
१९	(दुसरा)शहाजी(तंजावरचा)	,,	१ शहाजी (स्वतः) वेंकटेश्वर (नल्लाशास्त्री व श्रीधर व्यंकोश यांसह)	पदमाणि मंजरी
			३ वेंकटेश्वर	उणादि निघंटु
२०	कृष्णकवि(लक्ष्मण व मल्लिकाराणी यांचा पुत्र)	१८ वें.	१ कृष्ण कवि (स्वतः)	वैभाविक कोश टीकेसह

परिशिष्ट ८ वें.

दुसऱ्या सरभोजीच्या दानधर्माची यादी
तंजावर चेट्टियान् काणीयाची

॥ श्री ॥

श्रीगणेशायनमः ॥ स्वति श्रीमान्महामंडलेश्वर राजाधिराज राजगंभीर भौंसलवंश कुलशिखामणी महाराजराजेश्री प्रतापसिंव्ह महाराज साहेब यांचे गर्भशिरोमणि ऐसे महाराजराजेश्री तुळजामहाराज साहेब यांचे पुत्र भव्यशीलसिखामणि ऐसे महाराजराजेश्री शरफोजीमहाराज साहेब यानी श्रीरामावतार होऊन चोळनीतीसहीं अधीक नीतीकडून राज्यपरिपालन करित असतां, वटीयान् कल्यटी वगैऱ्यानी हुजूर यादी देऊन ते यादी हुजुरूनन्याय निसी माहालास पाठवून परामर्ष करिणे ह्मणून आज्ञा होऊन यादी आल्याठायीं कल्यटीनें लिहून दिल्या यादींत लिहिले होतें जें पूर्वापूर्वीपासून तंजनगर वट्टियका-णियाची आपली ह्मणून तरी ऐसीं वर्षा अगोदरीं सैंदाचे कारभारीं नवे माहार तंज्यान् कोडियान् सिन्नान् यानी कोटची वटियेकाणी बांधूनघेतले ह्मणूनहीं व पूर्वेकडील पेटची वटीयेकाणियाची आपला पंगाळी परमान याची काणियाचींत थोडी बांधून घेतले ह्मणूनहीं, आतां न्यायता वारूनघेऊन द्यावें ह्मणून लिहून दिल्हा. त्यांत पेर-मानानेहीं हस्ताक्षी घातला त्यास वठियान् तंजान् व कोठियान् व सिन्नान् यांस वलाऊन विचारिल्यास त्यानी लिहून दिले ते पूर्वापूर्वी पासून तंजनगर वटिमेकाणियाची आपली ह्मणून व सत्तर ऐंशी वर्षांस अगोदरी कल्यटीने तंजावरनगर वटिमे काणियाचि आपलि ह्मणून सिपारसी करून अगहरिला; सवेंच लटिका होऊन गेला.

अमची काणियाची अनभोगीत येतां पुनः दोनीदफे कल्वटीने व्यवहार करून लटिका होऊन गेला ह्मणून व आतां आला आहे न्यायता परामर्ष करावें ह्मणून लिहून दिल्हे. उभयता वाद्यानीं लिहून दिल्यासहीं उभय वादी यानी बलावून आणिल्या साक्षींतहीं व्यवहार निवडनासें कल्वटीने लिहून दिल्हा जे कीं बृहदीश्वर स्वामीचे देउळाचे सन्निधींत तूप तावून तापल्या तुपांत तंजन्, कोडियन्, सिन्नान्यांपैकीं तंञ्यनानें बोट घाल्हून बोट जळनासें गेल्यां वटिमेकाणियाची माझी ह्मणून धरिला व्यवहार हरून गुनेगारी देतों ह्मणून दिल्हा. तेणेप्रमाणें तंजनानें ताविल्या तुपांत बोट घाल्तिों ह्मणून लिहून देऊन शालीवाहन शकाब्द १७२४ कलयब्द ४९०३ दुंदुभी संवत्सर आडिमास तेदी ८–स श्रीबृहदीश्वर स्वामीचे देऊळाचे सन्निधींत तूप तावून तापिल्या तुपांत तंजनाने वटिमे काणियाची आपली ह्मणून कल्टीस नाही ह्मणून सांगून बोट घातला. बोट जळालें नाहीं. ते, कल्वटीने ओपूनघेऊन, वटिमे काणियाची माझी ह्मणून धरिलों ते व्याज्य मला गरज नाहीं. तंजन् कोडियान् व सिन्नान् यानी अनभोगूं देत ऐसें असतां वटिमेकाणियाची तंजन् कोडियान् व सिन्नान् अनभोगीत यावयाचें अमची ह्मणून मी धरीलोंतें मजवरि गुना ह्मणून लिहून दिल्हा. त्यांत पेरमानानेहीं हस्ताक्षी घातला. उभयवादी यांची यादी व हस्ताक्षी प्रमाणावरून कोठची वटिमे काणियाची कल्वटीस गरजनाहीं ह्मणून व पूर्वेकडील पेठेंत तंजन् कोडियान् सिन्नान् आज तागाईत किती अनभोगीत असतातकीं तितुके पेरुमानास गरजनाहीं ह्मणून कोट व पूर्वेकडील पेठेंत तंजन्, कोडियान्, सिन्नान् आजतागाईत अनभोगीत आल्या प्रमाणें आचंद्रार्क पुत्र पौत्र पारंपर्य तंञ्यान्, कोडियन्,

सिन्नान्, यानीच अनभोगीत येणे; पूर्वेकडील पेटेंत तंज्यान्, कोडियन्, सिन्नान्, आजितागाईत अनभोगीताहेत ते जातां बाकी पेरमानाने आजितागाईत अनभोगीत येल्याप्रमाणें पेरमानाने अनभोगीत येणे ह्मणून वारून तंज्यान् कोडियान् सिन्नान् यांस जयपत्रिका देऊन श्रीबृहदीश्वर स्वामीचे देउळाचे शिळेवरी लिहिलें असें.

परिशिष्ट ९

॥ श्री ॥

बृहदीश्वर स्वामी कारण राजे

श्री शरफोजी महाराज साहेब यानी

नग दिल्ह्यास तपसील

स्वस्ति श्री नृपशाली वाहन शकाब्द १७२० सत्तराशेवीस गतकलिः ४८९९ चारहजार आठशे नव्याणौ इस्तकबील चंद्र १५ मोहरमापासून अर्बामय्यांत नमाहरनव तागाईत श्री बृहदीश्वरस्वामी कारण राजेश्री शरफोजीमहाराज साहेब यानी नग दिल्ह्यास तपसील:—

सनमय्यातन जडीत पदकचंद्र ९ जिलहेजर—रथारूढहोऊन वाड्याचे माहडीकडे आले असतां दिल्हे हिऱ्याचे पदक येक यासि हिरे देखील मदनाईक २४ पाचीशिरस देखील. २ माणकें; १८ लडकन्मोते ९ जज्झेरी गोफाची येकेरि सोनेरी नागमोडी प्रमाण १ "। १ ' २॥ स नग १ रुप्पेरी नग प्याला साधारण चरकीवजन " १ ' २॥ २॥ स न गचंद्र २९ शावन १ अर्घ्य पाद्यासप्याले नकसी यास अइन प्याले २ बसक उभा २ येकून ४ स नगचद्र २९ शावानकित्ताप्याला देखील बसक वजन " २॥ ' २ सं १ कित्ता प्यालादेखील बसक वजन " २॥ २ १ येकून २ थाबदल-चंप्र २६ रजान शंख ऊत्तरफाटोपण रुप्पेरि वरी मोलोमी सोनेरी लडकून मोती १ पोंवलें १ सोनेरी मणी १ येकून ३ येकून च्यार वजन रुप्पें " ॥ ५। २॥ स १ दरह शंखठेवावयास बसक गींदी

तीवयी प्रमाणे वजन " ३७. २स येक येकून २ चंद्र २६ जिल-कांड गोपूरार्ति पंचखणी वजन ४।। ५।।। १।। स १ अति येकपात्र कासंड्या रुंद जोडीत्त्या कित्ता वजन " ३।। ३।।।।। ० स नग १ कित्ता वजन " ३।। २। ०।।। सनग १ येकून २ श्रीदेवीस कवचास किरीट नकशी १ उराचें कवच माजाखाले पासून पोटऱ्यापर्यंत वस्त्रदेखील वस्त्राचाहोलकर्ण पत्रयास कानदेखील मकरकुंडलें व बुगड्या व चंद्रमुरू येकून नकसी २ हातदरचुडे व कंकण्या हातसरफण सीवाले देखील रविराव प्रमाण असे बोटास अंगोट्या २ प्रमाणें हात येक प्रमाणें लाहान थोरहात उजवा अभयहस्त, डावा वरदहस्त १,उजवा जपमाळ असें १ डावेस जास्ती कमळमात्र असें १ येकून ४ पांययास पांयांचे नग देखील अस्सें पाडघम गुजराती सांखळ्या व तोडे अनवटे, फुलें पोलारे, विरवद्या जोडवींदेखील अशे पांय २ येकून १२ यासि सोनेरी मोलामा असे. येकून जिनस १२स कवच पुढील वजन रुप्यें ' २।।। ' ५। २। स नग १ येकून ४ येकून ९ येकून १० सन रहिदे मय्यांतह रुप्येरी नग काळंजीयास वसक कमळाप्रमाणे हरडा देखील वरील घराटर डा देखील मलसूत प्रमाणें १ येकून २ स नग वरील घेऱ्यास लडकन पान ३२ रवदर पोंवळें १ प्रमाणें पोवळी ३२ येकून ह्रस्तद वजन " २।।। ' १।। १। स नग चंद्र १० रविलोवल १ तबक दौलती प्रमाणें दिल्हें असें. चंद्र ३१ शावानी जमाखर्च करविला असें. येकून २ स नइस्सन्न मय्यात्तैइन जडीत नग चंद्र १४ शावान-शिस्फूल्यास ह्महत हिरे मंदनायक कमळ १ पलच लहान थोर १० बारीक ८ येकून १९ माणकें १७३ पाची ३४ घेऱ्यास मोते ४८ येकून नग वजन " । ५. ' २।।। १ यास १ चांदयासशाहत हिरे

पल्चे २३ चाणकें ३७ पाची ३ घेऱ्यास मोते ४६ येकून वजन " । १। १। ०॥० यास नग १ भांग टिळा यास जिनस १३ स पदकें चंद्राकार यास २ हत मटना येकथोर गिर्दहिरा १ माणकें १४ पाचि १ लडकन मोते ११ येकून नग १. टिका लंबोळ्या कित्तापाची थोर १ माणक २ प्रमाणे येककित्ता दर हिरा १ माणकें २ प्रमाणे ९ यास तपसील कित्ता हिरे १ थोर चौक १ माणकें २ स १ कित्ता दर हिरा १ माणकें २ प्रमाणें ८ येकून ९ येकून १० स शहत हिरे ९ पाचि १ माणकें २० स १० भासिंग्यास हिरा पलस १ माणके ९ येकून येक. कित्ता चौफुली यास माणकें ४ स १ येकून १३स शहत हिरागद थोर १ चौक ४ ल्हान बारीक ९ येकून ११ माणकें ४१ पाचे थोर येक लाहान १ येकून २ मोते ११ येकून रेशमीदोरेदेखील वोऊन नग १ पानपट्या साजास जडित जिनस टिका दरमाणकें तीनी प्रमाणे ४० पानदर माणीक १ लडकनूतमोती १ प्रमाणे ४० येकून ८० दोवणीस मोते ११६ येकून शहत माणकें १६० मोते १५६ रेशिमी दोरे देखील नग १ नाकचवसरयास माणकें १९ मोते सिरसल्डकून देखील ११ यास नग १ कापजोड १ शहत माणकें ४१ प्रमाणें ' २ हिरे २९ प्रमाणे १८ पाची कित्ता नगास २५ कित्तानगास २८ येकून ५३ मोते घेऱ्यास ३५ प्रमाणें ५० आंतील कळ्यांदखील जोड १ सनग २ टोपणें बाळ्याजोड १ स शहत माणकें ३२ पाची १६ मोते घोंस १६ पदर ६६ प्रमाणें मोते ९६ स नग २ कापाच्या सांखळ्या कित्ता जोड १ स कित्ता नग १ स टिका ४ गिर्ददर माणकें ६ पाची १ प्रमाणें २ भासिगादर माणकें ६ येण

प्रमाणें २ येकून ४ मोते घोंस वासास ८० मध्य २३ येकून १०३ सनग १ कित्तास नग सदरह प्रमाणें १ येकून २ यास जोड १ स नग २ कित्ता जोड १ स टिका १६ हिऱ्याचे दरहिरा १ प्रमाणें ८ माणकाची दर माणिक १ प्रमाणें ८ येकून १६ मोते घोंस ३२ सदर पांच प्रमाणें १५० घोस ४ सदर ७ प्रमाणें २८ येकून १८८ येकून २०४ येकून सोनेरी आंकोड प्रमाणें नग २ येकून ४ येकून १३ सोनेरी नग चंद्र १४ शावान मदनकसी कोडी रुप्पेरी रेसिमि तिप्पदरी प्रमाणें १ राखडी नकशी मथापूल जडितयास माणकें ८ पाचे पदनायक १ पाटी कोंडी रुप्पेरी प्रमाणे नग १ वेणीचा साज यास नाग पांचाफडीचा नकशी यास मोते माथा ५ लडकून ५ शेंड्यासी १ येकून ११ कोंड्या सोनेरी प्रमाणे १ ताइत दुहेरी नकसी कोंड्या सोनेरी १ फुले नकसी कुरीवचें वंदरी दरमाणिक येक प्रमाणे माणकें १५ स १५ कहिरी नकसी १ मासोळी नकसी १ चांपे कळी नकसी १ येकून २० लाल रेशिमांत वोऊन समूद नग १ चंद्र २९ जिल्हेजी अष्टोत्तर शतलिंग प्रतिष्टेचे दिवसी मंगळसूत्र देवीस सोनेरी कांवींत वोवून दिल्हे असें. वजन "।०॥१॥ सनम १ येकून ४ रुप्पे रीनग चंद्र २९ रबिलाखर चौकीस टावणीची वजन रुप्पें "७॥ ५॥ सनग १ राव नकसीयास १ नरीव १ वलक कमळाचादेंट कमळाचादेंट वांकडा येकून पोखार वर मोलामा सोनेरी लडकून तोंडांत पोंवले थोर १ येकून वजन रुप्पें " २ ०।२ येकून २ चंद्र १४ शाबान कापुरार्तीची तवकडी "॥ ' १॥० धूपार्ती "॥०॥०। येकार्ती "।५ ' १।० पंचार्ती वजन " ॥ १ ॥ २।० येकून ४ चंद्र ३ वउदकारडा दांडी नकसीस जोडी वसज्यांची नकरींचा नकसी मोलामा सोनेरी प्रमाणे नग १

येकून ७ स भार घांट कांशाची मुठी वृषभ रुप्पेरी प्रमाणें चंद्र १४ शावान १ येकून २५ येकून ३७. यास तपसील जडित नग पदक हिऱ्याचे १ शिसफूल १ चांद १ भांग टिळासाच १ पानपट्ट्या साज १ बेसर १ काप जोड १ सनग २. टोपणवळ्या जोड १ सनग २ कापाच्या सांखळ्या जोड २ सनग येकून नग १४. सोनेरी नग मूद १ राखडी १ वेणीचा साजा–गरसोळी देखीलएरी प्रमाणे १ येकून ४. रुप्पेरी नग १८ स तपसील—प्याले तीनीस कित्ता साधाप्याला १, कित्ता नकसी बसक देखील जिनस ४ स २, येकून ३ शंखटोपणाचा मोलामा सोनेरी प्रमाणे १ शंखाची १. कापुरार्ती पंचखणी १ कासड्या २ कवचमोलामा सोनेरी प्रमाणे जिनस १२ स १ काळंजी १ तवक १ ताका १ रावा मोलामा सोनेरी प्रमाणें येक कापुरार्तीची तवक १ चंपार्ती १ येकार्ती १ पंचार्ती कारडा १ येकून १८ सुमार. घांटकांशाची; वृषभ रुप्पेरी. येणेप्रमाणे येकून नग ३७ समाप्त ॥ शुभमस्तु

॥ श्री ॥

स्वस्तिश्री शालीवाहन शकाब्द १७२३ सत्तराशे तेवीस गत कली ४९०२ चारिहजार नौशेदोनि याउपरि चालायाचे दुर्मतिनाम संवत्सर वैशाखमास तारीख ३ शुक्लपक्ष द्वितीया गुरुवार रोहिणी नक्षत्र युक्त शुभदिनी राजेश्री शरफोजी महाराज कृत श्रीबृहतीश्वर-स्वमीचे देउळांत त्रिपर्णीचे काम चालल्यास तपसीलः—

गणेशाचे देउळ गर्भग्रह उपाज कोरडा पासून कफोद तागाईत पांढरे धोंड्याचे काम नूतन करून वर स्तूबी तागाईत इटाचे काम करून गच्चाचे विग्रह करून रंग देऊन नूतन गणेश करवून कल्शा

ठेऊन कुंभाभिषेक करून अर्धमंडप महा मडप पांडरें धोंड्याचे बांधून इटाचे कोडग ठेऊन वरी इटाची दळवशीं घालून गच्च करून मंडपांत पांढरे धोंड्याची दळवशीं १५० गज घालून गच्च करून पाइऱ्या बांधल्या असती १.

सुब्रह्मणी स्वामीचे गोपूर कफोद पासून स्तूवी तागाईत दागदोजी करून गच्चाचे विग्रहें करून रंग देऊन नूतन कलश ठेऊन कुंभाभिषेक करून अर्ध मंडप महामंडपावरी इटाची दळवशीं घालून गच्च करून पुढील मंडपांत पांढरें धोंड्याने ३०० गज दळवशीं घालून मंडपाचे चारी बाजूच्या भिंती इटाने घालून पाइऱ्या दागदोजी केल्या अस्से ती १.

देवीचे देउळ गर्भ गृहावरी अंतस्त ३ अर्ध मंडप १ महा मंडप १ भैरव मंडप १ समोरील नदीमंडप १ येकून मंडप ७ सात मंडपहीं वरीइटाची दळवशीं घालून गच्चकरून महामंडपांत सन्निधीस दक्षिण उत्तर दोनी बाजूस कोरडावरी पांढरे धोंड्याची दळवशीं २०० गज नूतन घातिली अस्सें १.

देवीचे देऊळ अर्धमंडप १ महा मंडप १ येकून दोनी मंडपावरी इटाची दळवशीं घालून गच्च केला असे १.

सभापतीचा मंडप अर्धमंडप १ महा मंडप १ येकून दोनी मंडपावरी इटाची दळवशीं घालून गच्च करून मंडपाचे भिंती गच्च करून पांढऱ्या दागदोजी करून मंडपांत २०० गज पांढरे धोंड्याचे दळवशीं घातली असे १.

दक्षिणामूर्तीचे गोपुरास कफोद पासून स्तूवीतागईत दागदोजी करून रंग दिला असें १.

चंडीश्वर स्वामीचे गर्भग्रह कफोद पासून स्तूवी तागाईत दागदोजी करून विग्रह करून रंग देऊन नूतन कलश ठेऊन कुंभाभिषेक करून, मंडपावरी इटाची दळवशीं घालून गच्च केला असें १.

देउळास ईशान्य भागी त्रिमाळ पतीस लागून यागशालेस पांढर धोंडयाने नूतन बांधिला मंडप अंखण ४ याखेरीज मंडूकतीर्थ जीर्णोत्धार कूपरूप करून नूतन केले असें.

त्रिमांळपत्ती ईशान्यभागीं अंखणें २६ नैऋत्य भागीं अंखणें २४ येकून पन्नास अंखणें पांढरे धोंडयाचे काम नूतन करून वरकड त्रिमाळपत्ती येकंदर जद जाहल्याठायीं पाकछ घाल्डून इटाची दळवर्शी घाल्डून गच्च करुन मंडपास उत्तरेकडे पश्चिमेकडे दोनी ठांई इटाची दळवर्शी घाल्डून गच्च करून मंडपास उत्तरेकडे दोनी ठाई इटाची दळवर्शी घाल्डून गच्च करून प्राकाराचे च्यारी भिंतीसहीं आंतीलंगी गच्च केला असे त्रिमाळ पत्तींत नैऋती कोने पासून ईशान्य तागाईत शिवलिंग २४१ देवि १ येकून २४२ ठेऊन कुंभाभिषेक करून प्रतिष्टा केली असें.

मडपळीचे मंडपास व भिंतीस देखील इटा घाल्डून गच्च केला असें. दक्षिणेकडील प्राकारांत पूर्वेकडील त्रिमाळपत्तीचे कोरडा पासून पश्चिमेकडील त्रिमाळपत्तीच्या कोरडातागाईत बागास नूतन भिंती इटाची घाल्डून गच्च केल्या बाबत्ती गज २६० अडव्या भिंतीस गज ९० येकून गज ३५८ नूतन भिंती घातिली असें. उत्तरेकडीळ प्राकारांत देवीचे देउळाचे बागास भोंताले इटाची भिंती घाल्डून गच्च केल्या बाबती गज १५० देउळचे च्यारी प्राकारांत नूतन इटाच्या दळवर्शीमध्यें पांढरें धोंडयाची दळवर्शी घातले गज १५०० याखेरीज इटाची दळवर्शी तीनीइटा उंचीने घातिली १८०० येणे प्रमाणे दळवर्शी घाल्डून चहूंकडिल पाणी खंदकांत जाऊन पडावयाजोगि मोरी बांधला असें. १

दरवाज्याच्या गोपुरा समोर अष्टकोडीचे खांबास कोरड पांढरे धोंडयाने सव्वा गज उंच तीन गज चौक, नूतन बांधिला असें.

समाप्त.

सूचि